अहवाल क्रमांक : १६६

सत्यमेव जयते

# पंचायती राज समिती

## (२०१७-२०१८)

## (तेरावी महाराष्ट्र विधानसभा)

## महाराष्ट्रातील पंचायती राज संस्थांच्या अकोला जिल्हा परिषदेच्या सन २००८-०९ व सन २०११-१२ च्या लेख्यांवरील लेखा परीक्षा पुनर्विलोकन अहवालातील परिच्छेदाबाबत

# विसावा अहवाल

**(सदर अहवाल दिनांक २९ नोव्हेंबर, २०१८ रोजी विधानसभेस/विधानपरिषदेस सादर करण्यात आला.)**

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
विधान भवन, मुंबई
२०१८

# पंचायती राज समिती

## (२०१७-२०१८)

## (तेरावी महाराष्ट्र विधानसभा)

**महाराष्ट्रातील पंचायती राज संस्थांच्या अकोला जिल्हा परिषदेच्या सन २००८-०९ व सन २०११-१२ च्या लेख्यांवरील लेखा परीक्षा पुनर्विलोकन अहवालातील परिच्छेदांबाबत.**

# विसावा अहवाल

# पंचायती राज समिती
## (सन २०१७-२०१८)

**समिती प्रमुख**

(१) श्री. सुधीर पारवे, वि.स.स.

**सदस्य**

(२) श्री. बाबुराव पाचर्णे, वि.स.स.
(३) श्री. चरण वाघमारे, वि.स.स.
(४) श्री. रणधीर सावरकर, वि.स.स.
(५) ॲड. राहुल कुल, वि.स.स.
(६) श्री. आर.टी.देशमुख, वि.स.स.
(७) डॉ. देवराव होळी, वि.स.स.
(८) डॉ. सुरेश (भाऊ) खाडे, वि.स.स.
(९) डॉ. सुधाकर भालेराव, वि.स.स.
(१०) श्री. सुधाकर कोहळे, वि.स.स.
(११) श्री. भरतशेठ गोगावले, वि.स.स.
(१२) श्री. किशोर पाटील, वि.स.स.
(१३) श्री. राजेश क्षीरसागर, वि.स.स.
(१४) श्री. तुकाराम काते, वि.स.स.
(१५) श्री. राहुल बोंद्रे, वि.स.स.
(१६) श्री. भारत भालके, वि.स.स.
(१७) प्रा. विरेंद्र जगताप, वि.स.स.
(१८) श्री. दिलीप सोपल, वि.स.स.
(१९) श्री. राहुल मोटे, वि.स.स.
(२०) श्री. दीपक चव्हाण, वि.स.स.
(२१) श्री. प्रविण दरेकर, वि.प.स.
(२२) प्रा. डॉ. तानाजी सावंत, वि.प.स.
(२३) श्री. विक्रम काळे, वि.प.स.
(२४) श्री. सतीश चव्हाण, वि.प.स.
(२५) श्री. अमरनाथ राजूरकर, वि.प.स.

**विशेष निमंत्रित :**

(२६) श्री. बाळाराम पाटील, वि.प.स.
(२७) श्री. श्रीकांत देशपांडे, वि.प.स.
(२८) श्री. दत्तात्रय सावंत, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) डॉ. अनंत कळसे, प्रधान सचिव.
(२) श्री. विलास आठवले, उप सचिव.
(३) श्री. प्रकाशचंद्र खोंदले, अवर सचिव.
(४) श्री. मंगेश पिसाळ, कक्ष अधिकारी.
(५) श्री. ह. वि. तामोरे, कक्ष अधिकारी.

# पंचायती राज समिती
## (सन २०१५-२०१६)

**कार्यकारी समिती प्रमुख**

१. *श्री. प्रकाश भारसाकळे, वि.स.स.

**सदस्य**

२. श्री. अनिल गोटे, वि.स.स.
३. श्री. विकास कुंभारे, वि.स.स.
४. श्री. भिमराव तापकीर, वि.स.स.
५. श्री. आर. टी. देशमुख, वि.स.स.
६. श्री. उन्मेश पाटील, वि.स.स.
७. श्री. समीर कुणावार, वि.स.स.
८. श्री. राजेंद्र नजरधने, वि.स.स.
९. श्री. कृष्णा गजबे, वि.स.स.
१०. श्री. अनिल बाबर, वि.स.स.
११. श्री. भरतशेठ गोगावले, वि.स.स.
१२. श्री. हेमंत पाटील, वि.स.स.
१३. श्री. राजाभाऊ वाजे वि.स.स.
१४. ॲड. के.सी.पाडवी, वि.स.स.
१५. श्री. बसवराज पाटील, वि.स.स.
१६. श्री. अमित झनक, वि.स.स.
१७. श्री. राहुल मोटे, वि.स.स.
१८. श्री. सुरेशभाऊ लाड, वि.स.स.
१९. श्री. दीपक चव्हाण, वि.स.स.
२०. श्री. अनिल तटकरे, वि.प.स.
२१. श्री. संदीप बाजोरिया, वि.प.स.
२२. श्री. रामहरी रुपनवर, वि.प.स.
२३. श्री. चंद्रकांत रघुवंशी, वि.प.स.
२४. **रिक्त
२५. **रिक्त

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) डॉ. अनंत कळसे, प्रधान सचिव.
(२) श्री. विलास आठवले, उप सचिव.
(३) श्री. सचिन बाभळगांवकर, कक्ष अधिकारी.

* सन २०१५-२०१६ या वर्षासाठी गठीत करण्यात आलेल्या महाराष्ट्र विधानमंडळाच्या पंचायती राज समितीवर मा. अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांनी दिनांक १५ ऑक्टोबर, २०१६ रोजीपासून श्री. प्रकाश भारसाकळे, वि.स.स. यांची "कार्यकारी समिती प्रमुख " म्हणून नामनियुक्ती केली आहे.

** सन्माननीय समिती प्रमुख श्री.संभाजी निलंगेकर-पाटील, वि.स.स. व श्री. पांडुरंग फुंडकर, वि.प.स. यांचा दिनांक ८ जुलै, २०१६ रोजी मंत्री परिषदेत समावेश झाल्यामुळे रिक्त

## पंचायती राज समिती

## (सन २०१५-२०१६)

**समिती प्रमुख**

१. श्री. संभाजी निलंगेकर-पाटील, वि.स.स.

**सदस्य**

२. श्री. प्रकाश भारसाकळे, वि.स.स.
३. श्री. अनिल गोटे, वि.स.स.
४. श्री. विकास कुंभारे, वि.स.स.
५. श्री. भिमराव तापकीर, वि.स.स.
६. श्री. आर.टी.देशमुख, वि.स.स.
७. श्री. उन्मेश पाटील, वि.स.स.
८. श्री. समीर कुणावार, वि.स.स.
९. श्री. राजेंद्र नजरधने, वि.स.स.
१०. श्री. कृष्णा गजबे, वि.स.स.
११. श्री. अनिल बाबर, वि.स.स.
१२. श्री. भरतशेठ गोगावले, वि.स.स.
१३. श्री. हेमंत पाटील, वि.स.स.
१४. श्री. राजाभाऊ वाजे, वि.स.स.
१५. ॲड. के.सी.पाडवी, वि.स.स.
१६. श्री. बसवराज पाटील, वि.स.स.
१७. श्री. अमित झनक, वि.स.स.
१८. श्री. राहुल मोटे, वि.स.स.
१९. श्री. सुरेशभाऊ लाड, वि.स.स.
२०. श्री. दीपक चव्हाण, वि.स.स.
२१. श्री. पांडुरंग फुंडकर, वि.प.स.
२२. श्री. अनिल तटकरे, वि.प.स.
२३. श्री. संदीप बाजोरिया, वि.प.स.
२४. श्री. रामहरी रुपनवर, वि.प.स.
२५. श्री. चंद्रकांत रघुवंशी, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) डॉ. अनंत कळसे, प्रधान सचिव.
(२) श्री. विलास आठवले, उप सचिव.
(३) श्री. प्रदीप मयेकर, अवर सचिव (समिती).
(४) श्री. सचिन बाभळगांवकर, कक्ष अधिकारी.

**प्रस्तावना**

मी, पंचायती राज समितीचा 'समिती प्रमुख' या नात्याने समितीने अधिकार दिल्यावरुन पंचायती राज समितीचा विसावा अहवाल सादर करीत आहे.

सन २०१७-२०१८ या वर्षाकरिता समिती दिनांक ८ सप्टेंबर, २०१७ रोजी गठीत झाली. महाराष्ट्र विधानसभा नियमावलीतील नियम २४० अन्वये विधानमंडळाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या जिल्हा परिषदांच्या वार्षिक प्रशासन अहवालाची तसेच महाराष्ट्रातील पंचायती राज संस्थांच्या लेख्यांवरील लेखापरीक्षा पुनर्विलोकन अहवाल व एकत्रित वित्तीय महसुली लेखे यांच्या परीक्षणाची कामे प्रामुख्याने या समितीकडे सोपविण्यात आलेली आहेत.

शासनाच्या विविध कामकाजाचा वाढलेला व्याप (Enormous range and complexity) लक्षात घेता विधानमंडळाला उपलब्ध वेळेत आपली कर्तव्ये पुरेशा क्षमतेने बजावता येणे अशक्य झाले आहे. शासन यंत्रणेकडे उक्त किचकट प्रशासकीय कामासाठी सक्षम व तज्ज्ञ प्रशासक यंत्रणा उपलब्ध असते. संसदीय लोकशाहीच्या संवर्धनासाठी व यशस्वीतेसाठी शासनाच्या संपूर्ण प्रशासन व्यवस्थेवर सखोल, संपूर्ण, प्रभावी व अर्थपूर्ण असे (effective meaningful) नियंत्रण व देखरेख ठेवण्याची आत्यंतिक गरज आहे आणि म्हणूनच कार्यकारी प्रशासन (Executive) राबवित असलेल्या विविध योजनांचा अभ्यास करण्यासाठी, त्यातील त्रुटी शोधून काढून योजना अंमलबजावणीला व पर्यायाने प्रशासनाला गती देण्यासाठी (Tone of administration) मा. सभापती, विधानपरिषद व मा. अध्यक्ष, विधानसभा यांनी दोन्ही सभागृहाच्या निवडक सदस्यांचा समावेश असलेल्या पंचायती राज समितीचे गठन दिनांक ८ सप्टेंबर, २०१७ रोजी केले. समिती पध्दतीचे वैशिष्ट असे की, सभागृहात पक्षीय ध्येय धोरणांचा सदस्यांवर प्रभाव पडतो. त्या उलट संसदीय लोकशाही पद्धतीमध्ये विधानमंडळाची ही समिती फार मोठ्या मोलाचे कार्य पार पाडीत आहे. ही समिती विधानमंडळाची निर्मिती असून ती सहाजिकच विधानमंडळास दुय्यम आहे. या समितीला सर्व अधिकार विधानमंडळापासूनच प्राप्त झालेले आहेत. (They derive authority from the Legislature) या समितीला "Mini Legislature" सभागृहाची छोटी प्रतिकृती संबोधली जाते. शासनाने राबविलेल्या योजनांच्या अंमलबजावणीला पर्यायाने प्रशासनाला गती देण्यासाठी व प्रशासनावर सातत्याने नियंत्रण व प्रभावीपणे पहारा ठेवण्याचे महत्त्वाचे काम विधानमंडळाच्या या समितीद्वारे केले जाते. समितीचे कामकाज पक्षविरहीत तत्त्वावर (irrespective of party affiliation) चालत असल्यामुळे समिती समोरील बाबी पक्षीय अभिनिवेशरहीत पद्धतीने (Non-Party Basis) विचारात घेण्यात येतात त्यामुळे एखाद्या विषयाचा अभ्यास अत्यंत नि:पक्षपातीपणे व तपशिलात जाऊन केला जातो परिणामी त्यास पूर्ण न्याय मिळतो.

शासनाचे एखादे धोरण वा योजना याची आखणी कशी करावी याबाबत समिती सल्ला देऊ शकणार नाही, तथापि शासनाने अंमलात आणलेल्या धोरणांची वा योजनेची फलश्रुती अपेक्षेप्रमाणे होत नसेल वा होणार नसेल तर ही बाब संबंधित समिती सभागृहाच्या नजरेस आणून त्या धोरणात वा योजनेत बदल करण्यासंबंधी शासनास सुचविण्याचे काम करते. समिती पद्धतीचा हा एक विशेष फायदा आहे.

विधिमंडळाप्रती शासनाची जबाबदारी ही मर्यादित स्वरूपाची आहे. संसदीय लोकशाहीमध्ये शासन हे प्रत्येक बाबतीत विधानमंडळाला सर्वतोपरी जबाबदार असते आणि शासनाच्या संपूर्ण प्रशासनावर विधीमंडळाचे नियंत्रण हा संसदीय लोकशाहीचा आत्मा आहे.

समितीचे अधिकार, कार्यकक्षा, प्रशासनावर ठेवावयाचे नियंत्रण, शासनाचे समितीप्रती व विधानमंडळाप्रती असलेले उत्तरदायित्व या सर्वांचा साकल्याने विचार केल्यास समितीचे अधिकार निश्चित व निर्विवादपणे सर्वश्रेष्ठ आहेत. परंतु, योजना राबविण्यापूर्वी वा एखादे धोरण आखण्यापूर्वी प्रशासन यंत्रणेने मंत्रिमंडळाला दिलेल्या सल्ल्याची तपासणी करणे निश्चितच समितीच्या कार्यकक्षेबाहेरील होईल. मात्र योजना अस्तित्वात आल्यानंतर व त्यावर आर्थिक तरतूद करण्यात आल्यानंतर समिती या प्रकरणी संपूर्णपणे व तपशिलवार छाननी करण्यास समर्थ ठरेल. ही योजना अगदी अनावश्यक आहे काय, त्यावर अपेक्षेपेक्षा जास्त खर्च करण्यात आला आहे काय ? योजनेची उद्दीष्टे साध्य झाली आहेत काय ? योजना आर्थिकदृष्ट्या सक्षम आहे किंवा कसे, इतकेच काय एखादी योजना आर्थिकदृष्ट्या सक्षम नसल्यास ती बंद करण्यात यावी व त्याऐवजी दुसरी एखादी योजना आखण्यात यावी या मर्यादेपर्यंतसुद्धा समिती शिफारस करू शकते व त्या अनुषंगाने आवश्यक ती सर्व माहिती समितीला मागविण्याचा अधिकार आहे.

समित्यांचे कामकाज अधिक परिणामकारक करण्यासाठी मा. सदस्यांनी समितीच्या कामात जास्तीतजास्त सहभाग घेणे जरूरीचे आहे. या अहवालात नमूद बाबीसंदर्भात समितीने एक एक प्रश्न हाती घेऊन त्या प्रत्येक प्रश्नावर समाधानकारकरितीने साक्षीपुरावा गोळा केला, तसेच मा. समिती सदस्यांनी आळीपाळीने प्रश्न विचारून संबंधित अधिकाऱ्यांकडून माहिती मिळविण्याच्या विनिर्दिष्ट पद्धतीचे पालनसुद्धा भेटीच्या वेळी केलेले आहे. एका सदस्यांनी त्यांचा मुद्दा पूर्ण केल्यानंतरच दुसऱ्या सदस्यांनी माहिती विचारण्याची पद्धत जोपासली आहे. या पध्दतीने समितीचे कामकाज सुव्यवस्थित पद्धतीने चालविण्याचा या समितीने प्रयत्न केलेला आहे.

समितीला तिच्याकडे सोपविण्यात आलेल्या विषयावरील मुद्दे तयार करून आणि त्यांच्या विनिर्दिष्ट क्रमाने त्यांचे परिक्षण करून विषयाशी संबंधित नियम किंवा कार्यपद्धतीमधील त्रुटी आणि उणिवा शोधून काढतेवेळी समितीचा दृष्टीकोन वस्तुनिष्ठ व विधायक होता. केलेल्या चुका सुधारण्यासाठी किंवा प्रशासकीय पद्धतीत सुधारणा घडविण्याच्या दृष्टीने समितीने अनेक बाबतीत सुधारणात्मक उपाय सुचविलेले आहेत, चुकांची पुनरावृत्ती होऊ नये यासाठी देखील समितीने उपाययोजना सुचविलेल्या आहेत. शासनाच्या प्रतिनिधीप्रती सदस्यांचे वर्तन संयमी आणि सौजन्यशील ठेऊन कोणताही साक्षीदार काही वस्तुस्थिती लपवित असल्याबद्दल दोषी असल्याचे किंवा असहकार दर्शवित असल्याचे आढळून आल्यानंतर समितीने संबंधितांविरुद्ध कारवाईदेखील सुचविली आहे. समितीची बैठक बोलविणे आणि साक्षीदारांना साक्षीसाठी बोलविणे यासंबंधीच्या इतर किरकोळ मुद्दयांच्या बाबतीत साक्षीदारांना पुरेसा वेळ देऊन व नोटीस देऊन बोलविण्यात आलेले आहे. थोडक्यात, समिती पद्धती ही अत्यंत उपयुक्त व परिणामकारक असून संसदीय कामकाज प्रणालीमध्ये या पद्धतीचे स्थान व महत्त्व अनन्यसाधारण असेच आहे. संसदीय शासन प्रणाली अधिकाधिक वृध्दिंगत करण्याच्या दृष्टीने या महत्त्वपूर्ण अशा संसदीय समितीच्या कामकाजाचा स्तर उत्तरोत्तर उंचावत नेणे ही आपणा सर्वांची जबाबदारी आहे.

राज्यात समिती जिल्हा परिषदांना भेटी देत असताना समितीला अनेक चांगल्या संकल्पना व राबविलेल्या योजना आढळून आल्या आहेत. त्याचप्रमाणे काही बाबतीत प्रचंड अनियमितता व गैरव्यवहाराची प्रकरणेदेखील आढळून आली आहेत. समितीने चांगल्या बाबींना समर्थन देऊन संबंधितांना प्रोत्साहन दिले. तद्वतच काही अनियमितता किंवा गैरव्यवहाराच्या प्रकरणात समितीने कठोरपणे निर्णयदेखील घेतले आहेत. असे करीत असताना दोषारोपित व्यक्तीवर कारवाई करताना नैसर्गिक न्यायाची पायमल्ली होऊ नये अशा प्रकारच्या सूचनादेखील प्रशासनास केल्या आहेत. लेखा परिक्षणास कागदपत्रे उपलब्ध करून न देणे अशी असंख्य प्रकरणे समितीला आढळून आली. अशा प्रकरणी समितीने कोणताही मुलाहिजा न ठेवता संबंधितांवर मुंबई स्थानिक निधी लेखा परीक्षा अधिनियमातील तरतुदीनुसार दंडात्मक कारवाईदेखील प्रस्तावित केली आहे. या माध्यमातून शासनखाती दंडाची रक्कम जमा होत असताना संबंधित कर्मचाऱ्यांना जरबदेखील बसविण्याचे काम समितीने केले आहे.

या समितीने ज्या ज्या जिल्ह्यांना भेटी दिल्या आहेत त्या त्या जिल्ह्यातील सर्व पंचायत समित्यांना भेटी देऊन उक्त पंचायत समित्यांच्या प्रशासनिक अहवालावर सखोल चर्चा करून ज्या बाबतीत दोष आहेत त्या सुधारून घेण्याबाबत त्यांना उपयुक्त सूचना केल्या आहेत. तसेच पंचायत समित्यांच्या क्षेत्रातील विविध कामांना भेटी देऊन त्याची पाहणी करणे, शालेय पोषण आहार, पुरक पोषण आहार, सार्वजनिक आरोग्य केंद्रे/उपकेंद्रे, पशु वैद्यकीय दवाखाने, रस्ते, जलसिंचनाची कामे,

पाणीपुरवठ्याची कामे इत्यादींना भेटी देऊन त्याबाबतही चुकांचे निरसन करून काही चांगल्या बाबींचे समर्थन करुन संबंधितांना प्रोत्साहितदेखील केले आहे. या अहवालात अशा अनेक बाबींचा उहापोह केला आहे.

सन २००८-०९ व सन २०११-१२ या वर्षाच्या लेखा परिक्षा पुनर्विलोकन व सन २०१२-१३ च्या वार्षिक प्रशासन अहवालाच्या संदर्भात सन २०१५-१६ साठी गठीत झालेल्या समितीने अकोला जिल्हा परिषदेची सखोल तपासणी केली. समितीने अकोला जिल्हा परिषदेस दिनांक १, २ व ३ जून, २०१७ रोजी भेट देऊन डॉ. सुभाष पवार, मुख्य कार्यकारी अधिकारी व इतर संबंधित अधिकारी यांची साक्ष घेतली.

सन २०१७-२०१८ या वर्षाकरिता गठीत झालेल्या समितीने अकोला जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या तसेच साक्षीच्या वेळी संबंधित अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीच्या आधारे उपस्थित झालेल्या मुद्दयांबाबत अधिक माहिती जाणून घेण्याच्या दृष्टीने दिनांक २९ व ३० मे, २०१८ रोजी जिल्हा परिषद, अकोला संदर्भात मंत्रालयीन विभागीय सचिवांच्या, प्रतिनिधींच्या साक्षी घेतल्या.

मंत्रालयीन विभागीय सचिवांचे साक्षीचे वेळी श्री. नंद कुमार, प्रधान सचिव, शालेय शिक्षण विभाग, डॉ. प्रदिप व्यास, प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, श्री. एकनाथ डवले, सचिव, मृद व जलसंधारण विभाग, श्री. एकनाथ डवले, सचिव, ग्रामविकास विभाग (अतिरिक्त कार्यभार), श्री.दिनेश वाघमारे, सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, श्री. विवेक नाईक, सचिव, मुख्यमंत्री ग्रामसडक योजना, ग्रामविकास विभाग, श्री. किरण कुरुंदकर, सचिव, पशुसंवर्धन विभाग, श्रीमती विनिता वेद सिंघल, सचिव, महिला व बालविकास विभाग, श्री. पी. वेलरासु, सचिव, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग (अतिरिक्त कार्यभार), श्री. र. प्र. आटे, सह सचिव, शालेय शिक्षण विभाग, श्री. ना. भा. रिंगणे, उप सचिव (वित्त), ग्रामविकास विभाग, श्री. गिरीश भालेराव, उप सचिव, ग्रामविकास विभाग, श्री. संजय बनकर, उप सचिव, ग्रामविकास विभाग, श्री. प्रि. श. कांबळे, अवर सचिव, ग्रामविकास विभाग, श्री. सिद्धार्थ झाल्टे, अवर सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, श्री. संतोष गायकवाड, अवर सचिव, शालेय शिक्षण विभाग, तसेच श्री. प्रताप मोहिते, संचालक, स्थानिक लेखा निधी संचालनालय, नवी मुंबई यांनी समितीच्या बैठकींना उपस्थित राहून समितीच्या कामकाजात केलेल्या सहकार्याबद्दल समिती त्यांची आभारी आहे. तसेच जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी व इतर संबंधित अधिकारी यांनी साक्षीच्या वेळी समितीला माहिती पुरवून केलेल्या सहकार्याबद्दल समिती त्यांचीही आभारी आहे.

समितीने कामकाजाचे संक्षिप्त कार्यवृत्त परिशिष्टामध्ये दिले आहे.

लेख्यांवरील लेखा परीक्षा पुनर्विलोकन अहवालाच्या संदर्भात समितीने भेटी दिलेल्या अकोला जिल्हा परिषदेच्या कामकाजाची तपासणी करीत असताना समितीला आढळून आलेल्या काही मुद्दयांबाबत समितीचे अभिप्राय व शिफारशी अहवालात देण्यात आल्या आहेत.

सन २०१७-२०१८ साठी नव्याने गठीत झालेल्या समितीने दिनांक २७ नोव्हेंबर, २०१८ रोजीच्या बैठकीत प्रारूप अहवाल विचारात घेऊन तो किरकोळ दुरुस्तींसह संमत केला.

**विधान भवन,**
मुंबई,
दिनांक : २७ नोव्हेंबर, २०१८.

**सुधीर पारवे,**
समिती प्रमुख,
पंचायती राज समिती.

## अनुक्रमणिका


| अ.क्र. (१) | प्रकरण क्रमांक (२) | विषय (३) | परिच्छेद क्रमांक (4) | पृष्ठ क्रमांक (5) |
|---|---|---|---|---|
| (१) | एक | दुधाळा, मंडाळा, खांबोरा रस्ता बांधकाम खर्चातील अनियमिततेबाबत (सन २०११-१२) | 3.233/11 | १ |
| (२) | दोन | मागासवर्गीय राखीव जिल्हा परिषद उपकर निधीतून १०० टक्के अनुदानावर मागावर्गीय लाभार्थ्यांना पिको शिलाई मशिन पुरविणेबाबत (सन २०११-१२) | 3.629/3 | ६ |
| (३) | तीन | मागासवर्गीयांसाठी राखीव असलेला निधी खर्च न केल्याबाबत (सन २०११-१२) | 3.630/4 | १२ |
| (४) | चार | दलित वस्ती सुधार योजनेअंतर्गतची सन २००४-२००५ पासून अपूर्ण बांधकामांना विलंबाने निधी वितरीत केल्याबाबत (सन २०११-१२) | 3.631/5 | १८ |
| (५) | पाच | जिल्हा परिषद सेस फंडाअंतर्गत इयत्ता दहावी व बारावीतील मुलींना संगणक प्रशिक्षण देणे या योजनेतील अनियमिततेबाबत (सन २०११-१२) | 3.718/7 | २६ |
| (६) | सहा | जिल्हा परिषद उपकर निधीतून इयत्ता ५ वी ते १० पर्यंतच्या मुलींना १०० टक्के अनुदानावर लेडीज सायकल पुरविणे या योजनेतील अनियमिततेबाबत (सन २०११-१२) | 3.721/7 | ३१ |
| (७) | सात | सर्वसाधारण शेतकऱ्यांना ५० टक्के अनुदानावर पी.व्ही.सी. पाईप वाटप योजना न राबविणेबाबत (पंचायत समिती, बार्शिटाकळी) (सन २०११-१२) | 4.235/3 | ३५ |
| (८) | आठ | ७५ टक्के अनुदानावर महिलांना शिलाई मशिन पुरविणे योजनेबाबत (सन २०११-१२) | 4.364 | ४० |
| (९) | नऊ | अपूर्ण स्थितीतील बांधकामांबाबत | 4.394 | ४५ |
| (१०) | दहा | लेखापरिक्षणास कागदपत्रे उपलब्ध न करून देणेबाबत (सन २००८-०९ व सन २०११-१२) | | ५२ |
| (११) | अकरा | सर्वसाधारण शिफारशी | | ९२ |
| | | **परिशिष्ट ''अ'', ''ब''**<br>**शासनाचे आदेश व परिपत्रके आणि**<br>**समितीच्या बैठकीचे संक्षिप्त कार्यवृत्त** | | ९५ |

प्रकरण एक

## जिल्हा परिषद, अकोला

## दुधाळा, मंडाळा, खांबोरा रस्ता बांधकाम खर्चातील अनियमिततेबाबत

**परिच्छेद क्रमांक ३.२३३/११ (सन २०११-१२)**

दुधाळा, मंडाळा, खांबोरा रस्त्याचे बांधकाम केले आहे, याबाबत खालीलप्रमाणे आक्षेप आहेत.

पहिल्यावेळी दिनांक ५ मार्च, २०११ रोजी जाहिरात प्रसिद्ध करून निविदा मागविल्या परंतु कंत्राटदाराने काम करण्यांस नकार दिल्याने दिनांक ८ सप्टेंबर, २०११ रोजी दुसरी निविदा मागविली. श्री व्ही.एच.विरमानी यांना कंत्राट देण्यांत आले. त्यांनी आयकर व विक्रीकराची कपात कमी केली आहे. कमी कपात केलेली रक्कम रु. २६,४७०/- + ३०,४३०/- = ५६,९००/- चा भरणा करून योग्य लेखाशिर्षाखाली करून दाखवावे.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, अकोला यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

दुधाळा, मंडाळा, खांबोरा रस्त्याचे कामाची निविदा प्रथम वेळेस दिनांक ५ मार्च, २०११ रोजी जाहिरात प्रसिद्ध करून मागविली होती. सर्वात कमी दरधारक कंत्राटदाराने काम करण्यांस नकार दिल्यामुळे, सदर कामाची निविदा पुनश्च दिनांक ८ सप्टेंबर, २०११ रोजी दुसरी वेळेस निविदा प्रसिद्ध करण्यांत आली. त्यानुसार सदर काम श्री. व्ही. एच. विरमानी यांना मिळाले. सदर कामाची एकूण किंमत रु.२५.२९ लक्ष चे असून यामध्ये मातीकाम व अस्तरीकरण चे मुल्यांकन एकूण स्वामित्वधन (रॉयल्टी) रु.१३.२९ लक्ष असल्यामुळे, एकूण कामाचे मुल्यांकन रुपये २५.२९ लक्ष मधून स्वामित्वधनाची (रॉयल्टीची) रक्कम वजा करून उर्वरित कामाचे रकमेवर विक्रीकर रु.४२,२१५/- व आयकराची कपात रु.२७,७२९/- करण्यांत आली आहे.

मंजूर अंदाजपत्रकात मातीकामाचा एकूण दर रुपये १३३.६५ प्र.घ.मी. असून यामध्ये मातीकामाची किंमत रुपये ६३/- प्र.घ.मी. असून गौणखनिजाची किंमत रुपये ७०.६५/- प्र.घ.मी. एवढी अंतर्भुत आहे. तसेच गौणखनिजाची रक्कम ही कंत्राटदारास अदा केली जात नसल्यामुळे शासनखाती जमा केली जाते. त्यामुळे या रक्कमेवर आयकर व विक्रीकर कपात करण्यात आला नाही. त्यामुळे कामाचे एकूण मुल्यांकनावर आयकर व विक्रीकर कपात करण्यात आलेली नाही. मातीकामाची रक्कम रुपये १३.२९ लक्ष रकमेचा भरणा शासनखाती करण्यात आला आहे.

### मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष

अकोला जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिनांक १ जून, २०१७ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, दुधाळा, मंडाळा, खांबोरा या रस्त्याच्या बांधकाम खर्चातील अनियमिततेबाबत खुलासा करावा, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी विदित केले की, या रस्त्याच्या कामाची निविदा प्रसिद्ध केली होती. परंतु कंत्राटदाराने काम केले नाही. नंतर दुसरी निविदा मागविली. त्यांची आयकर कपात ५६,९०० रुपये कपात केली नाही असा आक्षेप होता. याबाबत २५.२९ लक्ष रुपये देयक त्यांना अदा केले आहे, यामध्ये रुपये १३.२९ लक्ष स्वामित्वधनाची (रॉयल्टी) रक्कम होती. ती शासनखाती भरणा केलेली आहे. कंत्राटदारास दिलेल्या देयकातून विक्रीकर व आयकराची रक्कम कपात केलेली आहे.

या उत्तरावर समितीने अशी विचारणा केली की, आक्षेप असा आहे की, ही रक्कम अगोदर का कपात केली नाही. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, कामाचे मुल्यांकन रुपये २५.२९ लक्ष होते. यामध्ये १३.२९ लक्ष स्वामित्वधनाची (रॉयल्टीची) रक्कम आहे. उर्वरित रक्कम रुपये ११.५ लक्ष रकमेचे देयक कंत्राटदारास अदा केलेले आहे. त्यावरच आयकर आकारणी केली आहे. पूर्ण २५ लक्ष रुपयांवर आयकर आकारणी करावयास पाहिजे होती असा आक्षेप आहे. मात्र स्वामित्वधनाची रक्कम (रॉयल्टी) वजा करून त्यावेळी रक्कम भरणा केलेली आहे. स्वामित्वधनाच्या (रॉयल्टीच्या) रकमेवरही आयकर लावण्यात यावा असा आक्षेप होता.

तद्नंतर समितीने विचारणा केली की, पहिल्या कंत्राटदाराने काम करण्यास नकार दिल्याने त्याची बयाना रक्कम तुम्ही जप्त केली आहे का असा आक्षेप आहे. ती रक्कम किती होती. तसेच रस्त्याची लांबी किती आहे.

यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, याबाबत पूर्वीची नस्ती जिल्हा परिषदेकडे उपलब्ध नाही. सन २०१० च्या जिल्हा परिषद ठरावानुसार हे काम मंजूर झाले असून ते २५ लक्ष रुपयांचे होते. यास सन २०११-२०१२ मध्ये तांत्रिक मान्यता देण्यात आली. दिनांक ३० नोव्हेंबर, २०११ रोजी या कामाचा कार्यारंभ आदेश दिलेला आहे. मुळ कंत्राटदाराने निविदा दाखल करण्यापूर्वी बयाना रक्कम भरल्याबाबतची पहिल्या कामाची नस्ती उपलब्ध झाली नाही. कार्यकारी अभियंता यांनी स्वत: अभिलेख कक्षामध्ये नस्ती शोधली आहे. पण ती सापडली नाही. दोनदा निविदा झाल्यामुळे वेगवेगळया नस्त्या होत्या. दुसऱ्या निविदेच्या नस्तीच्या आधारावरुन जिल्हा परिषदेने उत्तर तयार केलेले आहे.

तद्नंतर समितीने विचारणा केली की, करारामध्ये कामासाठी किती रक्कम होती, कराराच्या रकमेप्रमाणे एक टक्का विमा करण्यात आला होता काय ? दुसऱ्या निविदेमध्ये किती कंत्राटदारांनी सहभाग घेतला व किती कंत्राटदार पात्र झाले, त्यांचे दर काय होते, यावर कार्यकारी अभियंता (बांधकाम) यांनी खुलासा केला की, सदर कामाचे अंदाजपत्रक २५.२९ लक्ष रुपयांचे होते, यासाठी ५ निविदा प्राप्त झाल्या होत्या. यामध्ये ७ टक्के अधिक, ९ टक्के अधिक, १७ टक्के अधिक अशा निविदा प्राप्त झाल्या होत्या. श्री.व्ही.एच.विरमानी यांची निविदा सर्वात कमी रकमेची असल्यामुळे त्यांना काम देण्यात आले होते. या कामाची एकूण रक्कम २५ लाख ४७ हजार ८६२ रुपये इतकी होती. इन्कम टॅक्स व व्हॅटची रक्कम शासनखाती जमा करण्यात आली आहे.

स्वामित्वधनाची रक्कम ७० रुपये प्रतिब्रास आहे, निव्वळ देयकावर कर बसत नाही. एकूण देयकावर दोन टक्के आयकर कापायला पाहिजे. कर व मुल्यवर्धित कर एकूण रकमेवर कपात करायला पाहिजे. विम्याची रक्कम भरली किंवा नाही अशी समितीने विचारणा केली असता मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी खुलासा केला की, एकूण रकमेवर विमा कापला जातो त्याप्रमाणे विम्याची रक्कम कपात करण्यात आली आहे. अंदाजपत्रकात मातीकामाची किंमत ६३ रुपये प्र.घ.मी. आहे. स्वामित्वधनाची रक्कम वजा करून देयक देण्यात आले आहे. स्वामित्वधनाची रक्कम वजा करण्यात आल्यामुळे निव्वळ देयकावर कर भरण्यात आला आहे.

तहसीलदार यांनी स्वामित्वधन भरावयास पाहिजे होते. कोणत्याही प्रकारची शासकीय वसुली तहसीलदार यांनी करावयाची असते. तहसीलदार यांनी स्वामित्वधन घेतले असते तर ते एकूण देयकावर घेतले असते. एकूण देयकावर आयकर भरावयाचा असतो. दोन टक्के टीडीएस, सरचार्ज भरणे आवश्यक होता. जी रक्कम कमी भरण्यात आली ती वसूल करून शासन खाती जमा करायला पाहिजे. त्या ठिकाणची माती वापरली असेल तर प्र.घ.मी.१३८ रुपये देता येणार नाही. १७० मधून १३८ रुपये वजा करावयास पाहिजे.

यावर मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी खुलासा केला की, त्या ठिकाणी जे खोदकाम करण्यात आले त्याची माती तेथे वापरण्यात आली आहे. त्या ठिकाणी स्वामित्वधन घेणे आवश्यक होते. तेथील सामग्री चांगली निघालेली नाही. स्वामित्वधनाची किती रक्कम जमा केली आहे. स्वामित्वधन जमा करण्याचे अधिकार तहसीलदार यांचे आहे. तहसीलदारांनी स्वामित्वधन वसूल केले असते तर ती एकूण देयकावर केली असती. मुल्यवर्धित कर कपात केला असता. अगोदर स्वामित्वधन कपात केल्यामुळे एकूण देयक कमी झाले त्यामुळे त्यावर कर आकारण्यात आला नाही. ही कार्यवाही चुकीची झाली आहे असे मत समितीने व्यक्त केले.

स्वामित्वधन कोणाकडे भरण्यात आले आहे. एकूण रॉयल्टीची रक्कम किती होती अशी समितीने विचारणा केली असता मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, स्वामित्वधनाची रक्कम १३.२९ लाख रुपये होती ती राज्य शासनाकडे भरण्यात आली आहे. यामध्ये दोन बाबी आहेत, नाली खोदून रस्ता उंच करण्यात आला आहे. तेथील काही माती वापरण्यात आली आहे. इतर सर्व बाबींवर स्वामित्वधन द्यावे लागते. कंत्राटदाराची दुसरी कामे आहेत त्यामधून ही रक्कम वसूल करण्यात येईल. नुतनीकरण व इतर अनेक कामे आहेत.

तद्‌नंतर समितीने विचारणा केली की, अशा प्रकारे प्रत्येक निविदेत असा व्यवहार झाला असेल तर कोण-कोणत्या कामांचा निधी जिल्हा परिषद वसूल करणार आहे, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, स्वामित्वधन वजा करून प्रत्येक कामावर आयकर लावला आहे. त्या कामामध्ये स्वामित्वधन कपात केलेले आहे. या वर्षातील सर्व कामांची पडताळणी करून समितीला एक महिन्यात अहवाल सादर करण्यात येईल.

यानंतर समितीने अशी विचारणा केली की, जी नस्ती सापडली नाही त्यासंबंधी आपण संबंधित अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई करणार आहात? लेखा परिक्षणाच्या वेळेस नस्ती उपलब्ध करून दिलेली नाही आणि आताही दिलेली नाही. या प्रकरणाची चौकशी करण्याची जबाबदारी विभाग प्रमुखांची आहे. तत्कालीन विभाग प्रमुख कोण होते, यावर सेवानिवृत्त कार्यकारी अभियंता यांनी खुलासा केला की, तत्कालीन कार्यकारी अभियंता श्री.डी.एस. पाटील होते. ते आता सेवानिवृत्त झाले आहेत.

तद्‌नंतर समितीने विचारणा केली की, लेखा परिक्षणाच्या वेळी कागदपत्रे दाखविली नाहीत त्यामुळे महाराष्ट्र स्थानिक निधी लेखा अधिनियम, १९३० च्या नियम (७) नुसार २५ हजार रुपये दंडाची रक्कम संबंधितांकडून वसूल करण्यात यावी. लेखा परिक्षणाच्या वेळी जाणुनबुजून नस्ती दाखविण्यात आलेली नाही त्यामुळे त्यांची चौकशी होणे आवश्यक होते, ती झालेली नाही असे उत्तरावरुन दिसून येते. कोणत्या स्तरावर ही बाब झालेली आहे याबाबत मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी एका महिन्यात संपूर्ण चौकशीचा अहवाल समितीकडे सादर करावा.

यावर समितीने असे मत व्यक्त केले की, नस्ती गहाळ झाली म्हणून तात्काळ एफआयआर दाखल करणे आवश्यक होते. लेखा परिक्षणाचा अहवाल ज्यावेळेस तयार होतो त्यावेळेस दस्तऐवज उपलब्ध करून दिला नाही. या प्रकरणी जे संबंधित दोषी असतील त्यांच्यावर कारवाई करावी.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्यांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

दुधाळा, मंडाळा, खांबोरा रस्ता बांधकाम खर्चातील अनियमितता :- या प्रकरणी कोणती कार्यवाही केली ? किती जण दोषी आढळले. त्यानुसार महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरिक्षा अधिनियम, १९३० च्या कलम ७ च्या अनुसार किती जागांवर कारवाई करण्यात आली व एकूण किती दंड वसूल करण्यात आला आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय ?

**उपरोक्त मुद्यांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

मौजे दुधाळा, मंडाळा, खांबोरा या रस्त्याच्या बांधकाम खर्चाबाबत एकूण मुल्यांकनावर व्हॅट व आयकर कपात करायला आवश्यक असताना ते कपात झालेले नसल्यामुळे जबाबदार तत्कालीन सहाय्यक लेखाधिकारी श्री.अरुण भागवत, बांधकाम विभाग, वरीष्ठ सहायक श्री.जी.एम.लव्हाळे, कनिष्ठ सहायक श्री.विनीत खंडारे यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आलेल्या आहेत.

सदर कामाची प्रथम निविदेची नस्ती लेखापरिक्षणाचे वेळी तसेच पंचायत राज समिती पथकाच्यावेळी उपलब्ध नव्हती. तथापि, सदर नस्ती त्यानंतर आढळून आली असून याबाबत चौकशी केली असता तत्कालीन सहायक लेखाधिकारी श्री. हिम्मत शेगोकार व वरीष्ठ सहायक/निवीदा लिपीक श्री.सुधाकर देशमुख हे संयुक्तरीत्या जबाबदार असल्याचे आढळून आले आहे. त्यातील श्री.हिम्मत शेगोकार मयत झाले असून श्री.सुधाकर देशमुख यांचेकडून रु.२५,०००/- दंड वसूल करण्यात आला आहे.

## मंत्रालयीन विभागाचा अभिप्राय

**ग्रामविकास विभागाचे अभिप्राय :-** (बांधकाम-३) जिल्हा परिषदेने केलेल्या कार्यवाहीशी सहमत.

## विभागीय सचिवांची साक्ष

पंचायती राज समितीने अकोला जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यांवर अधिक माहिती घेण्यासाठी दिनांक २९ मे, २०१८ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, दुधाळा, मंडळा, खांबोरा रस्ता बांधकाम खर्चातील अनियमितता या प्रकरणी कोणती कार्यवाही केली आहे, यावर सचिव (मुख्यमंत्री ग्रामसडक योजना) यांनी खुलासा केला की, सदरचा विषय आयकर कपातीचा आहे. आयकर कपात एकूण देयकावर केले पाहिजे होते. मात्र त्यांनी कपात केल्यानंतर जी रक्कम होती, त्यावर केले आहे. त्यामुळे दोषी ठरवून तिघांना कारणे दाखवा नोटीसा जिल्हा परिषदेमार्फत पाठविण्यात आल्या आहेत. परंतु यामध्ये आयकर परतावा संबंधित ठेकेदाराने भरला आहे. एकूण आयकर येतो, तो भरला असल्यामुळे शासनाचे काहीही नुकसान झालेले नाही.

दुसरा मुद्दा आहे. कागदपत्रे न दाखविल्याने या लोकांवर कोणती कारवाई केली, असा प्रश्न आहे. निविदेची नस्ती दाखविली नाही. त्यामुळे त्यांच्याकडून २५ हजार रुपये वसूल केले आहेत. मात्र त्यानंतर नस्ती मिळाली आहे. लेखापरिक्षकांनी अहवाल सादर करण्यास सांगितले होते. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी तो अहवाल सादर करण्याबाबत सूचना दिल्या होत्या. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी त्यांच्या स्तरावर पडताळणी करून इतर कोणत्याही कामावर अशी गोष्ट झालेली नाही असे सांगितले आहे. फक्त एकाच कामावर अशी वसुली झाली आहे, असा त्यांचा अहवाल आहे. कागदपत्रे पाहिली आहेत. त्या वेळच्या सर्व कामांच्या नोंदी घेतल्या आहेत आणि त्याप्रमाणे वसुली झालेली आहे. एकाच कामाच्या बाबतीत असे घडले आहे. परंतु त्या ठेकेदाराने सविस्तर आयकर परतावा भरला आहे, कमी वसुली केली होती, त्यामुळे शासनाचे काहीही नुकसान झालेले नाही. ती वसुली झाली आहे.

त्यानंतर संचालक, स्थानिक निधी लेखा यांनी असे मत व्यक्त केले की, निव्वळ देयकावर आयकर दाखविला आहे. एकूण देयकावर आयकर कापला पाहिजे. मुल्यांकन केले तर मुख्य लेखा व वित्त अधिकारी तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी यांची वसुली होऊ शकते. शासनाचे नुकसान तर झालेले आहे. कारण कमी कपात केली आहे. दंड बसू शकतो.

यावर सचिव (मुख्यमंत्री ग्रामसडक योजना) यांनी खुलासा केला की, सनदी लेखापाल यांचेकडे तशी चौकशी केली आहे. पूर्वी तसा नियम होता. २ टक्के स्वामित्वधन कपात केली जाते. कमी कपात झाली आणि लगेच संबंधित ठेकेदाराने आयकर परतावा भरला असेल आणि त्यामध्ये ती बाब घेतली असेल तर ज्याच्याकडून कमी कपात झाली आहे, त्याच्यावर कारवाई होत नाही. जिल्हा परिषदेने ते स्वीकारले आहे. त्याप्रमाणे संबंधित तिघांना कारणे दाखवा नोटीसा दिल्या आहेत.

## अभिप्राय व शिफारशी

दुधाळा, मंडाळा, खांबोरा रस्ता बांधकाम खर्चातील अनियमिततेबाबत लेखापरिक्षकांनी घेतलेल्या आक्षेपामध्ये असे निदर्शनास आले आहे की, श्री. व्ही. एच. विरमानी या कंत्राटदाराने आयकर व विक्रीकराची रुपये २६,४७०/- अधिक ३०,४३०/- अशी एकूण रुपये ५६,९००/- एवढी रक्कम कमी कपात केलेली नाही. सदर रक्कम कंत्राटदाराकडून अगोदर कपात न करता उशिराने कपात करण्यात आली आहे तसेच उपरोक्त रस्ता बांधकामाचे मुल्यांकन रुपये २५.२९ लक्ष एवढे होते. यामध्ये रुपये १३.२९ लक्ष एवढी स्वामित्वधनाची रक्कम कपात करून शासन खाती भरणा केलेली आहे. या स्वामित्वधनाच्या रकमेवर आयकर आकारण्यात आलेला नाही. त्याचप्रमाणे १ टक्का विम्याची रक्कम भरणे आवश्यक होते. मुल्यवर्धित कर व आयकर नियमाप्रमाणे कपात करण्यात आलेली नाही. स्वामित्वधनाची रक्कम वजा केल्यामुळे शासनाचे नुकसान झालेले आहे. उपरोक्त रस्ता बांधकामासाठी दोनवेळा निविदा दिल्यामुळे दोन वेगवेगळ्या नस्त्या तयार करण्यात आल्या. दुसऱ्या निविदेची नस्ती पहिल्या नस्तीच्या आधारावरुन तयार करण्यात आलेली आहे. तथापि, मुख्य निविदेची नस्ती लेखापरिक्षणाच्या वेळी तसेच पंचायती राज समितीने दिलेल्या भेटीच्या वेळी उपलब्ध नव्हती. सदर नस्ती जिल्हा परिषदेमध्ये गहाळ झालेली असताना दुसऱ्या निविदेची नस्ती तयार करण्यात आलेली आहे ही बाब चिंताजनक व अत्यंत गंभीर स्वरुपाची असून कार्यालयीन शिस्तीला धरुन नाही तसेच सदर नस्ती त्यानंतर आढळून आली आहे. नस्ती गहाळ होणेबाबत तत्कालिन सहाय्यक लेखाधिकारी व वरिष्ठ सहाय्यक/निविदा

लिपिक हे संयुक्तरित्या जबाबदार आढळून आले असून त्यातील सहाय्यक लेखाधिकारी मयत झाले आहेत, त्यामुळे निविदा लिपिकाकडून रुपये २५,०००/- इतका दंड वसूल करण्यात आला असला तरी या प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेता असे प्रकार वारंवार होऊ नयेत म्हणून अभिलेख सादर न करणे किंवा गहाळ करणे या अपराधासाठी दस्तऐवज किंवा अभिलेखे यामध्ये गुंतलेल्या एकूण रक्कमेच्या ५ टक्के दंड आकारण्यात यावा किंवा ५० हजार रुपये यापैकी जास्त असणाऱ्या रकमेएवढा दंड आकारुन संबंधितांची एक वेतनवाढ रद्द करण्यात यावी व तशी नोंद संबंधितांच्या सेवापुस्तिकेत घेण्यात यावी व त्यानुसार केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीस एक महिन्याच्या आत पाठविण्यात यावा.

**आयकर कपात एकूण देयकावर करण्याऐवजी निव्वळ देयकाच्या उर्वरित रकमेवर केल्याप्रकरणी तत्कालिन सहाय्यक लेखाधिकारी, वरिष्ठ सहाय्यक, कनिष्ठ सहाय्यक या तिघांना कारणे दाखवा नोटीसेस जिल्हा परिषदेमार्फत बजावण्यात आलेल्या आहेत. रक्कम वसुलीसाठी पुढे कोणतीही कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही. याबाबत समिती तीव्र नापसंती व्यक्त करते. याप्रकरणी निव्वळ देयकावर कपात केल्यामुळे शासनाचे नुकसान झालेले आहे, याबाबीचे मुल्यांकन केले तर जिल्हा परिषदेचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी यांची वसुली होऊ शकते. त्यामुळे दुधाळा, मंडाळा, खांबोरा रस्ता बांधकाम खर्चाबाबत संपूर्ण चौकशी करण्यात यावी व याप्रकरणी जबाबदारी निश्चित करून शासनाचे झालेल्या नुकसानीची भरपाई करण्यात यावी व केलेल्या कारवाईचा अहवाल समितीस एक महिन्याच्या आत पाठविण्यात यावा, अशी समितीची शिफारस आहे.**

प्रकरण दोन

## जिल्हा परिषद, अकोला

## मागासवर्गीय राखीव जिल्हा परिषद उपकर निधीतून १०० टक्के अनुदानावर मागासवर्गीय लाभार्थ्यांना पिको शिलाई मशीन पुरविणेबाबत

### परिच्छेद क्रमांक ३.६२९/३ (सन २०११-१२)

जिल्हा परिषद उपकर निधीतुन १००% अनुदानावर मागासवर्गीय लाभार्थीना पिको शिलाई मशिन पुरविण्याचे योजनेसाठी जिल्हा परिषद स्थायी समिती सभा ठराव क्र.३ दिनांक ८ नोव्हेंबर २०११ चे प्रशासकिय मान्यते नुसार व अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे तांत्रिक मान्यता आदेश क्र.६३५, दिनांक ३ नोव्हेंबर २०११ नुसार मध्यवर्ती भांडार खरेदी संघटना यांचे दरकरार क्र. एसपीसी /आरसीटी/ स्युईंग मशिन/ २०११-१२ /बी २९१९, दिनांक १३ फेब्रुवारी २०१२ प्रमाणे पिको शिलाई मशिन टाईप दोन प्रति नग दर रु.५२०० प्रमाणे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.अकोला आदेश क्र.२३८/२०११-१२ दिनांक २ मार्च २०१२, ६९८ नग पिको शिलाई मशिन पुरवठयाचे आदेश मे. श्रीनाथ जनरल स्टोअर्स अहमदनगर या दरकरार धारक पुरवठादारास देण्यात आलेले होते. सदरच्या पुरवठादाराने पिको शिलाई मशिन साहित्य पुरवठा आदेशापेक्षा कमी फक्त १०० नग पुरवठा केलेला आहे व सदरच्या शिलाई मशिनचे अद्याप वाटप करण्यात आलेले नसुन १०० नग पिको शिलाई मशिन साठा शिल्लक आहे. सदरच्या योजनेवर प्रमाणक क्र.११२६ दिनांक ३१ मार्च २०१२ नुसार रु. ५,२०,००० खर्च झालेला आहे. या बाबत खालील अभिप्राय आहेत.

१) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए २००८/प्र.क्र.४४६/वित्त ९ दिनांक २० जुन, २००८ नुसार जिल्हा परिषदांनी योजना राबवितांना विहीत वेळा पत्रकानुसार विहीत कालावधीत राबविली नाही.

२) मध्यवर्ती भांडार खरेदी संघटना यांचे दरकरार उपलब्ध असतांना व शासन निर्णय क्रमांक २ जानेवारी १९९२ चे तरतुदीनुसार शिलाई मशीन राखीव बाब असतांना, मध्यवर्ती भांडार खरेदी संघटना यांचे कडून दर कराराबाबत कोणतेही ना-हरकत प्रमाणपत्र प्राप्त न करून घेता, नियमबाह्यपणे जाहीर निविदा प्रसिध्दीस देण्यात आलेली आहे व तद्‌नंतर प्रत्यक्षात मध्यवर्ती भांडार खरेदी संघटना यांचे दरकरारानुसार पिको शिलाई मशीन करिता पुरवठा आदेश देण्यात आल्याने वरीलप्रमाणे शिलाई मशीन खरेदीसाठी जाहीर निविदा प्रसिध्दीवर अनावश्यक खर्च रक्कम रु. १२,०००/- वसूल करणे आवश्यक आहे.

३) मध्यवर्ती भांडार खरेदी संघटना यांचे दरकरार क्र.एस.पी.सी./आर सी टी/स्युईग मशीन /२०११-१२/बी २९१९ दिनांक १३ फेब्रुवारी, २०१२ नुसार मे. श्रीनाथ जनरल स्टोअर्स, अहमदनगर यांना पुरवठा आदेश क्र. २३८/११-१२ दि.२ मार्च, २०१२ रोजी ६९८ नग पिको शिलाई मशीन करिता देण्यात आलेला असला तरी संबधीत पुरवठादाराने दि. ३१ मार्च, २०१२ अखेर फक्त १०० पिको शिलाई मशीनचा पुरवठा केलेला असून लेखापरिक्षणाचे अंतिम दिनांकापर्यंत सुद्धा उर्वरित ५९८ पिको शिलाई मशीनचा पुरवठा करण्यात आलेला नाही. तसेच सदर योजनेसाठी समाजकल्याण समिती सभा दिनांक १६ जानेवारी २०१२ ठराव क्र.१ नुसार ६९८ लाभार्थ्यांची निवड करण्यात आलेली आहे. परंतु वरिलप्रमाणे फक्त १०० नग पिको शिलाई मशीनचा पुरवठा स्विकृत केलेला असून सदरचे साहित्याचे वाटप अद्यापही करण्यात आलेली नाही. तसेच स्विकृत करण्यात आलेल्या अर्धवट पिको शिलाई मशीन साहित्याचे वाटप न केल्याने सदरचे साहित्य निकामी होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

४) उपरोक्त मुद्दा क्र. ३ नुसार पुरवठादाराने दिनांक ३१ मार्च, २०१२ अखेर फक्त १०० नग पिको शिलाई मशीनचा पुरवठा स्विकृत केलेला असतांना सुद्धा बिजक मात्र ६९८ नग पिको शिलाई मशीन करिता एकूण रु. ३६,२९,६००/- १०० नग पिको शिलाई मशीनचा पुरवठयाचे देयक प्रदान करतांना दरकरारानुसार अटी व शर्तीनुसार दंडात्मक कार्यवाही करणे आवश्यक असतांना, कोणताही दंड न आकारता नियमबाहयपणे प्रदान केलेले आहे.

**५)** साठापुस्तकांची पडताळणी केली असता सदरचे साहित्याचे वाटप करण्यात आलेले नाही. तसेच जिल्ह्यातील ६९८ लाभार्थींपैकी नेमक्या कोणत्या १०० लाभार्थींना सदर पिको शिलाई मशीनचे वाटप करावयाचे आहे, याबाबतचे कोणतेही नियोजन समाज कल्याण विभागाने केलेले नाही.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, अकोला यांचेकडून खालील प्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

१) महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्र. झेडपी २००८/ प्र.क्र. ४४६/वित्त ९, दि. २० जुन, २००८ (परिशिष्ट २.१)नुसार यापुढे जिल्हा परिषद सेस अंतर्गत योजना राबवितांना विहित वेळापत्रकाप्रमाणे राबविण्याची दक्षता घेण्यात येत आहे.

२) दि. ३१ जानेवारी २०१२ अखेर पर्यत सुद्धा पिको शिलाई मशीन संदर्भात शासन दरकरार प्राप्त न झाल्यामुळे सन २०११-१२ या आर्थिक वर्षातील शिल्लक कालावधीचा विचार करून सदर योजना त्याच आर्थिक वर्षात राबविण्याच्यादृष्टीने पिको शिलाई मशीन खरेदी निविदा प्रसिद्धीस देण्यात आलेली आहे. निविदा प्रसिद्धीच्या दिनांकास दरकरार उपलब्ध नसल्यामुळे रुपये १२००० वसुलीची आवश्यकता नाही. यापुढे मध्यवर्ती भांडार खरेदी संघटना यांचे कडून दरकराराबाबत ना-हरकत प्रमाणपत्र प्राप्त करून घेण्याची दक्षता घेण्यात येईल.

३) मे. श्रीनाथ जनरल स्टोअर्स, अहमदनगर यांना ६९८ नग पिको शिलाई मशिन पुरवठा करणे बाबत पुरवठा आदेश क्र.२३८, दि. २ मार्च २०१२ देण्यात आला होता, संबंधीत पुरवठादारास कार्यालयाचे स्मरणपत्र क्र. जि.प./सकवि/खरेदी/२०% योजना / ३४५/११-१२, दि. २५ मार्च २०१२ अन्वये पुरवठा आदेशानुसार साहित्य पुरवठा विहित मुदतीत करणे बाबत कळविण्यात आले होते. परंतु सदर पुरवठादार यांनी दि. ३० मार्च २०१२ रोजी एकूण १०० नग पिको शिलाई मशिनचा पुरवठा केला असून उर्वरित ५९८ नग दि. ३१ मार्च २०१२ पर्यंत पुरवठा करण्यात येत आहे असे मौखीक सांगण्यात आल्याने अत्यल्प १०० नगाचा पुरवठा स्विकृत करून घेण्यात आला आहे. सदर योजनेंतर्गत निवड झालेल्या ६९८ लाभार्थ्यांमधून १०० लाभार्थ्यांना लाभ देण्याच्या दृष्टीने समाज कल्याण विषय समिती सभा दि. १९ जानेवारी २०१३ ठराव क्र. ५ अन्वये नियोजन करण्यात आले असून १०० लाभार्थ्यांपैकी ५१ लाभार्थ्यांना पिको शिलाई वाटप करण्यात आले आहे. उर्वरित ४९ पिको शिलाई मशिन शिल्लक आहेत.

४) मे. श्रीनाथ जनरल स्टोअर्स, अहमदनगर यांनी पुरवठा आदेश दि. २ मार्च २०१२ नुसार विहित मुदतीत १०० नग पिको शिलाई मशिनचा पुरवठा केला असल्यामुळे सदर १०० पिको शिलाई मशीनच्या अनुषंगाने दंडात्मक कार्यवाही करणे उचित नाही. तसेच ५९८ नगांचा पुरवठा न झाल्यामुळे कोणतीही दंडात्मक कार्यवाही करण्याची आवश्यकता नाही.

५) संबधित पुरवठादाराने १०० नग पिको शिलाई मशीनचा पुरवठा केलेला असून निवड झालेल्या ६९८ लाभार्थ्यांमधून १०० लाभार्थ्यांना लाभ देण्याच्यादृष्टीने समाज कल्याण विषय समिती सभा दि. १९ जानेवारी २०१३ ठराव क्र.५ अन्वये नियोजन करण्यात आले असून एकूण ५१ लाभार्थ्यांना सदर योजनेअंतर्गत पिको शिलाई मशिनचे वाटप करण्यात येऊन लाभ देण्यात आला आहे. शिल्लक ४९ नग पिको शिलाई मशिनचे वाटपाबाबत कार्यवाही सुरू आहे.

## मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष

अकोला जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिनांक १ जून २०१७ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, जाहीर निविदेद्वारे किती निविदा प्राप्त झाल्या, निविदा प्राप्त झाल्या असल्यास त्या स्वीकारण्यात का आल्या नाहीत, दर कराराची प्रत कोणाकडून व केव्हा प्राप्त झाली, ५१ लाभार्थ्यांना मशीनचे वाटप केव्हा करण्यात आले आहे,

यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी विदित केले की, शिलाई मशीन पुरविण्यासाठी निविदा प्राप्त झाल्या नाहीत. शासनाच्या दर करारानुसार शिलाई मशीन खरेदी करण्यात आल्या आहेत. यामध्ये आक्षेप असा आहे की, निविदा प्रक्रियेसाठी १२ हजार रुपये खर्च झाले आहेत. ती रक्कम वसूल करण्यात आली नाही. निविदेची प्रक्रिया करण्यात आली होती परंतु प्रतिसाद मिळालेला नाही. यावर संचालक स्थानिक निधी लेखा संचालनालय यांनी जाहिरात दिल्यावर निविदा आल्या होत्या काय असा प्रश्न विचारला तसेच समितीनेही पुढील प्रमाणे विचारणा केली की, निविदा का आल्या नाहीत, दर करारानुसार खरेदी केल्यामुळे

१२ हजार रुपये वाया गेले आहेत काय ? लाभार्थ्यांना लाभ देण्यात आला आहे काय ? ५१ लाभार्थ्यांना शिलाई मशीनचे वाटप करण्यात आले आहे काय, तसेच एकूण ६९८ शिलाई मशीनचे वाटप अहवाल वर्षात करावयाचे होते ते का करण्यात आले नाही.

यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी विदित केले की, पुरवठा आदेश ६९८ मशीनचा देण्यात आला होता. पुरवठादाराकडून १०० मशीनचा पुरवठा करण्यात आला होता. जिल्हा परिषद सेस फंडातून ही रक्कम खर्च करण्यात आली आहे.

यावर समितीने अशी विचारणा केली की, पुरवठादाराकडून १०० मशीनचा पुरवठा झाल्यामुळे इतर लाभार्थ्यांवर अन्याय झाला आहे. पुरवठा न झाल्यामुळे मागासवर्गीय लाभार्थी वंचित राहिले आहेत. तसेच निविदा प्रोसेस जाहीर केली होती काय, ६९८ शिलाई मशीन पुरवठा करण्याची क्षमता पुरवठादारांची होती किंवा नाही याची तपासणी करण्यात आली नव्हती काय, शिलाई मशीन देण्यासाठी किती लाभार्थ्यांची निवड करण्यात आली होती.

यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी विदित केले की, दर करारावर शिलाई मशीन घ्यावयाच्या असल्यामुळे क्षमता तपासण्यात आली नव्हती. तद्नंतर कृषी विकास अधिकारी यांनी समितीस विदित केले की, ६९८ लाभार्थ्यांची निवड करण्यात आली होती. त्यापैकी १०० मशीनचा पुरवठा करण्यात आला आहे. त्यापैकी अहवाल वर्षात ५१ मशीनचे प्रत्यक्षात वाटप करण्यात आले असून ४९ मशीन शिल्लक होत्या. पुढील वर्षात उर्वरित मशीनचे वाटप करण्यात आले.

तद्नंतर समितीने अशी विचारणा केली की, मशीन खरेदीसाठी अनामत रक्कम देण्यात आली होती काय तसेच सुरक्षा रक्कम १० टक्के व आयकराची रक्कम वसूल करण्यात आली आहे काय, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी विदित केले की, दर करार असल्यामुळे अनामत रक्कम देण्याची आवश्यकता नव्हती.

यावर समितीने असे निदेश दिले की, ६९८ मशीनची मागणी करण्यात आली असताना १०० मशीनचा पुरवठा करण्यात आला आहे. ६९८ मशीनचा पुरवठा करण्यात येणार किंवा नाही याची तपासणी दोन तीन महिन्याअगोदर करणे अपेक्षित होते. समाजकल्याणाच्या २० टक्के निधीतून हा खर्च करण्यात येतो. शिलाई मशीन पुरवठा करण्याची जबाबदारी कंत्राटदाराची होती. त्यामुळे मागासवर्गीय लाभार्थ्यांवर अन्याय झाला आहे. या सर्व विषयाबाबत संबंधितांची विभागीय चौकशी करण्यात यावी. या विषयाबाबत विभागीय सचिवांची साक्ष घेण्यात यावी.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्याबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

मे. श्रीनाथ जनरल स्टोअर्स, अहमदनगर यांना ६९८ नग पिको शिलाई मशीन पुरवठा करणेबाबत आदेश असताना फक्त १०० मशीनचा पुरवठा करण्यात आला उर्वरित ५९८ मशीन पुरवठा न करण्याची कारणे काय आहेत तसेच वेळीच पुरवठा न केल्याबाबत पुरवठादारावर कोणती प्रशासकीय दंडात्मक कार्यवाही करण्यात आली आहे, त्यात दोषी कोण आढळले, सबंधीतावर विभागीय चौकशी प्रस्तावित केली आहे काय, नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

**उपरोक्त मुद्यांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालील प्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

दिनांक ३१ जानेवारी, २०१२ अखेर पर्यंत सुद्धा पिको शिलाई मशिन संदर्भात शासनाचा दरकरार नसल्यामुळे व सन २०११-१२ हे आर्थिक वर्ष संपण्यास अल्पसा कालावधी शिल्लक असल्यामुळे सदर योजना त्याच आर्थिक वर्षात राबविण्याच्या दृष्टीने पिको शिलाई मशिन खरेदीकरिता दिनांक १० फेब्रुवारी, २०१२ रोजी निविदा प्रसिद्धीस देण्यात आली होती.

तथापि, शासनाचा दिनांक १३ फेब्रवारी, २०१२ रोजीचा पिको शिलाई मशीन संदर्भात दरकरार दिनांक २२ फेब्रवारी, २०१२ रोजी प्राप्त झाल्यामुळे आदेश क्र. २३८ दिनांक २ मार्च, २०१२ अन्वये मे. श्रीनाथ जनरल स्टोअर्स, अहमदनगर यांना ६९८ नग पिको शिलाई मशिनचा पुरवठा करणेबाबत आदेश देण्यात आला होता. तसेच स्मरणपत्र क्र. ३४५ दिनांक २५ मार्च, २०१२ अन्वये पुरवठा आदेशानुसार विहित मुदतीत पुरवठा करणेबाबत पुरवठादारास कळविण्यात आले होते.

पुरवठादार यांनी दिनांक ३० मार्च, २०१२ रोजी १०० नग पिको शिलाई मशिनचा पुरवठा करून उर्वरित ५९८ नग दिनांक ३१ मार्च २०१२ पर्यंत पुरवठा करण्यात येतील असे मौखिकरित्या सांगितले त्यामुळे १०० नगांचा पुरवठा स्विकृत करण्यात आला.

समाज कल्याण विषय समितीने ६९८ पात्र लाभार्थ्यांपैकी १०० लाभार्थ्यांची निवड केलेली होती.

मध्यवर्ती भांडार खरेदी संघटनेच्या दरकरारानुसार मे. श्रीनाथ जनरल स्टोअर्स, अहमदनगर हे दरकरारधारक असल्यामुळे संबंधिताना जा.क्र.२३८ दिनांक २ मार्च, २०१२ अन्वये पिको शिलाई मशीनचा पुरवठा करणेबाबत आदेश देण्यात आलेला होता. पुरवठादाराने आर्थिक वर्ष संपतेवेळी १०० शिलाई मशिनचा पुरवठा केला. तसेच उर्वरित ५९८ शिलाई मशिनचा पुरवठा केलेला नाही. विभागाने याबाबत पुरवठादारास पुढील कुठलाही पत्र व्यवहार केलेला नाही. तसेच दंडात्मक कार्यवाही सुद्धा करण्यात आलेली नाही.

तत्कालीन प्रभारी जिल्हा समाज कल्याण अधिकारी यांना जा.क्र.१३८५ दिनांक २६ सप्टेंबर, २०१७ व जा. क्र.२८२ दिनांक १ मार्च, २०१८ अन्वये कारणे दाखवा नोटीस देण्यात आलेली असून खाते चौकशीची कार्यवाही प्रस्तावित करण्यात येत आहे.

## मंत्रालयीन विभागाचा अभिप्राय

**ग्रामविकास विभागाचे अभिप्राय :-** जिल्हा परिषदेने केलेल्या कार्यवाहीशी सहमत.

**सामाजिक न्याय व विशेष सहाय विभागाचे अभिप्राय :-** सदर मुद्दा मागासवर्गीय राखीव जिल्हा परिषद उपकर निधीचा असल्यामुळे सामाजिक न्याय व विशेष सहाय विभागास अभिप्राय देता येणार नाहीत. त्यामुळे ग्राम विकास विभागाचे अभिप्राय घेण्यात यावेत.

## विभागीय सचिवांची साक्ष

पंचायती राज समितीने अकोला जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यांवर अधिक माहिती घेण्यासाठी दिनांक २९ मे, २०१८ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, मागासवर्गीयांसाठी राखीव जिल्हा परिषद उपकर निधीतून १०० टक्के अनुदानावर मागासवर्गीय लाभार्थ्यांना पिको शिलाई मशीन पुरविण्याबाबतचा विषय आहे. तत्संदर्भात माहिती देण्यात यावी.

यावर विभागीय सचिवांनी खुलासा केला की, दरकरार दिनांक २२ फेब्रुवारी, २०१२ ला प्राप्त झाला आहे आणि त्यानुसार दिनांक २ मार्च ला वर्क ऑर्डर दिली आहे. ६९८ नग पुरवायचे होते, १०० नग पुरविले आहेत, ५९८ नग पुरविलेले नाहीत. पुरवठा केला नाही ही वस्तुस्थिती आहे. मधल्या काळात सन २०१२ ची बाब असल्यामुळे त्यावर दंडात्मक कारवाई करणे अपेक्षित होते ती केली नाही. तत्कालिन समाजकल्याण अधिकारी यांना दिनांक २६ सप्टेंबर, २०१७ ला, दिनांक १ मार्च, २०१८ ला कारणे दाखवा नोटीस दिली आहे. ज्ञापन पाठविण्यात आले आहे. ते निवृत्त झाले आहेत. निवृत्त होऊन फक्त ४ वर्षे झाले असल्यामुळे त्यांच्यावर कारवाई करता येऊ शकते. कारवाई निश्चितपणे करता येईल. त्यावेळीच कारवाई केली पाहिजे होती ती का केली नाही, हे समजत नाही. मात्र जिल्हा परिषदेचा यामुळे काहीही तोटा झालेला नाही. सेसची योजना असल्यामुळे पुढील वर्षी अनुशेष पूर्ण केला आहे. अजुनही तशी परिस्थिती नाही. मी आढावा घेतला आहे. जवळपास ६ कोटी रुपयांचे स्पिलवर्क होते, अडीच कोटी रुपये खर्च केलेले दिसत आहेत, ४ कोटी रुपयांचे काम सन २०१८-१९ मध्ये पूर्ण होणार आहे. अफरातफरीचा विषय नाही. प्रशासकीय चुकांचा विषय आहे. काम केले नसल्यामुळे नोटीस दिल्या आहेत.

यावर समितीने विचारणा केली की, पुरवठा केलेला नाही, परिणामी अडचणी निर्माण झालेल्या आहेत. शासनस्तरावर कारवाई होणे अपेक्षित होते. अधिकाऱ्यांची या संदर्भात सुपरव्हिजन करण्याची जबाबदारी होती. विभागीय चौकशी होणे आवश्यक होते.

यावर विभागीय सचिवांनी विदित केले की, दरकरार समाजकल्याण विभागाने केला आहे तसेच दिनांक २६ सप्टेंबर, २०१७ ला पहिली कारणे दाखवा नोटीस दिली आहे. कारणे दाखवा नोटीसीचे उत्तर आले नाही तसेच आणि दिनांक १ मार्च, २०१८ ला दुसरी कारणे दाखवा नोटीस दिली आहे.

यावर समितीने मत व्यक्त केले की, तेवढीच कारवाई चालणार नाही. आपण या समितीची वाट पहावी असा काही विचार आपल्या मनात होता काय, ही पंचायत राज समितीची साक्ष आहे, शेवटचा टप्पा आला असताना आपल्याकडे रेकॉर्ड मिळत नसेल तर आम्ही ही साक्ष कशासाठी घ्यावी, शेवटच्या क्षणी काही तरी सोक्षमोक्ष या विषयाचा लागला पाहिजे.

यावर सचिव, मुख्यमंत्री ग्रामसडक योजना यांनी समितीस माहिती दिली की, त्याच्यावर दिनांक २३ एप्रिल, २०१८ रोजी आरोपपत्र दाखल झाले आहे. परंतु त्यांच्यावर पुढे कोणतीही कार्यवाही झाली नाही. यावर समितीने असे मत व्यक्त केले की, हे बरोबर नाही. त्यासंबंधी कार्यवाही होणे अपेक्षित आहे.

यावर सचिव, मुख्यमंत्री ग्रामसडक योजना यांनी समितीस विदित केले की, याबाबत विभागीय चौकशी नेमलेली असल्यामुळे त्या कामी वेळ लागणार आहे.

यावर समितीने विचारणा केली की, त्याला आपण किती कालमर्यादा निश्चित केली आहे. यावर सचिव, मुख्यमंत्री ग्रामसडक योजना यांनी समितीस विदित केले की, साधारणपणे ६ महिन्यांमध्ये विभागीय चौकशी होणे अपेक्षित आहे.

यावर समितीने असे निदेश दिले की, विभागाने ती चौकशी तात्काळ करण्याच्या सूचना द्याव्यात. कारण या प्रकरणाला आता १२ महिने पूर्ण झाले आहेत. पुढील चार महिन्यात ही कार्यवाही करून या समितीला पुढील दोन महिन्यामध्ये केलेल्या कार्यवाहीचा अहवाल कळविण्यात यावा.

## अभिप्राय व शिफारशी

जिल्हा परिषदेच्या उपकर निधीतून १०० टक्के अनुदानावर मागासवर्गीय लाभार्थ्यांना पिको शिलाई मशिन पुरविणेबाबत लेखा परिक्षकांनी घेतलेल्या आक्षेपानुसार जिल्हा परिषदांनी योजना राबविताना वेळापत्रकानुसार विहित कालावधीत योजना राबविली नाही, मध्यवर्ती भांडार खरेदी संघटना यांचे दरकरार उपलब्ध असताना व शासन निर्णय दिनांक २ जानेवारी १९९२ च्या तरतुदीनुसार शिलाई मशिन राखीव बाब असताना मध्यवर्ती भांडार खरेदी संघटना यांचेकडून दरकराराबाबत कोणतेही ना-हरकत प्रमाणपत्र प्राप्त करून न घेता नियमबाह्यपणे जाहीर निविदा प्रसिद्धीस देण्यात आल्यामुळे अनावश्यक खर्चाची रक्कम रुपये १२००० वसूल करणे आवश्यक आहे. पुरवठा आदेशानुसार ६९८ नग पिको शिलाई मशिन खरेदी करणे आवश्यक असताना १०० पिको शिलाई मशिन खरेदी पुरवठा करण्यात येऊन लेखापरिक्षणाच्या अंतिम दिनांकापर्यंत उर्वरित ५९८ पिको शिलाई मशिनचा पुरवठा करण्यात आलेला नव्हता. १०० नग पिको शिलाई मशिनचे पुरवठा देयक प्रदान करताना दरकरारानुसार अटी व शर्तीनुसार पुरवठादाराविरुद्ध दंडात्मक कार्यवाही करणे आवश्यक असताना कोणताही दंड न आकारता नियमबाह्यपणे देयक प्रदान केलेले आहे. १०० नग पिको शिलाई मशिनपैकी काही पिको शिलाई मशिन साहित्याचे वाटप न केल्याने सदरचे साहित्य निकामी होण्याची शक्यता निर्माण झाली तसेच ६९८ लाभार्थीपैकी नेमक्या कोणत्या १०० लाभार्थींना पिको शिलाई मशिनचे वाटप करावयाचे आहे याबाबतचे कोणतेही नियोजन समाजकल्याण विभागाने केल्याचे दिसून आले नाही, याबाबत समिती तीव्र नाराजी व्यक्त करते.

सदर लेखा आक्षेपावर अकोला जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष घेतली असता साक्षीदरम्यान समितीच्या असे निदर्शनास आले की, शिलाई मशिन पुरविण्यासाठी निविदा प्रक्रिया पूर्ण करण्यात आली होती, तथापि, प्रतिसाद मिळाला नाही. दिनांक ३१ जानेवारी, २०१२ अखेरपर्यंत पिको शिलाई मशिन संदर्भात शासनाचा दरकरार नसल्यामुळे दिनांक १० फेब्रुवारी, २०१२ रोजी निविदा प्रसिद्धीस देण्यात आली, यामध्ये शासन व जिल्हा परिषदेमध्ये समन्वयाचा अभाव दिसून येत आहे. शासनाच्या दर करारानुसार शिलाई मशिन खरेदी करण्यात आल्या, निविदा प्रक्रियेसाठी १२ हजार रुपये खर्च झाले, परंतु कोणताही प्रतिसाद मिळाला नाही याचे समितीस सखेद आश्चर्य वाटते. तसेच **समाजकल्याण विभागाने एकूण ६९८ पिको शिलाई मशिनचे वाटप अहवाल वर्षामध्ये करणे अपेक्षित होते त्याप्रमाणे**

६९८ पिको शिलाई मशिनचा पुरवठा आदेश देण्यात येऊन सुद्धा पुरवठादाराकडून केवळ १०० पिको शिलाई मशिनचा पुरवठा करण्यात आला होता. समाजकल्याण विभागाने पुरवठादारासमवेत कोणताही करार अथवा पत्रव्यवहार केल्याचे दिसून येत नाही ही बाब अतिशय गंभीर आहे.

पुरवठादाराने पुरविलेल्या पिको शिलाई मशिन पैकी फक्त ५१ लाभार्थ्यांना पिको शिलाई मशिन वितरीत करण्यात आल्या व ४९ पिको शिलाई मशिन वाटप न करता शिल्लक ठेवण्यात आल्या. यामध्ये पुरवठादाराने मागणी प्रमाणे साहित्य पुरवठा न केल्यामुळे ५९८ लाभार्थ्यांना लाभापासून वंचित रहावे लागले. दरकरारानुसार पुरवठादाराविरुद्ध संबंधित समाजकल्याण अधिकाऱ्यांनी दंडात्मक कार्यवाही केली नाही. उर्वरित ५९८ शिलाई मशिनचा पुरवठादेखील अद्याप केलेला नव्हता, यावरुन सदर योजना पुरवठादाराच्या सोयीकरिता व हिताकरिता राबविल्याची शंका उपस्थित होत असून जिल्हा परिषदेशी संबंधित समाजकल्याण अधिकाऱ्यांनी जाणीवपूर्वक व हेतुपुरस्सरपणे याकडे दुर्लक्ष केल्याचे दिसून येते, त्यामुळे समिती तीव्र नाराजी व्यक्त करीत आहे.

मागासवर्गीय लाभार्थ्यांना पिको शिलाई मशिन पुरविणे ही सन २०१२ मधील बाब असून संबंधित पुरवठादार व जबाबदार अधिकाऱ्याविरुद्ध दंडात्मक कारवाई होणे अपेक्षित होते. तथापि, कोणतीही दंडात्मक कारवाई न करता तत्कालिन समाजकल्याण अधिकारी यांना याप्रकरणी खूप विलंबाने म्हणजे दिनांक २६ सप्टेंबर २०१७ व दिनांक १ मार्च, २०१८ रोजी कारणे दाखवा नोटीस दिली आहे. सध्या तत्कालिन समाजकल्याण अधिकारी सेवा निवृत्त होऊन ४ वर्षे झालेली आहेत. वास्तविकत: सदर कारवाई ते सेवेत असताना होणे अभिप्रेत होते. मात्र त्यांच्यावर कारवाई करण्यास जाणूनबुजून विलंब करण्यात आला जेणेकरून त्यांना कोणत्याही प्रशासकीय कारवाई शिवाय सेवानिवृत्त होणे शक्य व्हावे याद्दष्टीने प्रकरण हाताळण्यात आल्याचे दिसून येते, ही बाब अत्यंत गंभीर स्वरुपाची असून याप्रकरणी सर्वंकष चौकशी करून संबंधित पुरवठादार व समाजकल्याण अधिकाऱ्यांविरुद्ध दंडात्मक कारवाई करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीला २ महिन्यांच्या आत सादर करण्यात यावा, अशी समितीची शिफारस आहे.

प्रकरण तीन

## जिल्हा परिषद, अकोला

## मागासवर्गीयांसाठी राखीव असलेला निधी खर्च न केल्याबाबत

### परिच्छेद क्रमांक ३.६३०/४ (सन २०११-१२)

महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन निर्णय क्रमांक मागास - १०९३/प्र.क्र.१२३९/३४ दिनांक १ सप्टेंबर, १९९३ तसेच तदनंतरच्या निर्देशातील सुधारणाचे महाराष्ट्र शासन ग्राम विकास व जलसंधारण विभाग शासन निर्णय क्रमांक मागास -१०९८/प्र.क्र.७३/३४, दिनांक २० ऑक्टोबर १९९९ तसेच महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन निर्णय क्रमांक मागास-२००१/प्र.क्र.४०८/३४, दिनांक २० एप्रिल २००१ नुसार दिलेल्या सविस्तर निर्देशाप्रमाणे जिल्हा परिषदांनी त्यांच्या उत्पन्नाच्या किमान २० टक्के रकमेतून मागासवर्गीयांच्या कल्याणाकरिता योजना राबवून त्यावर त्याच वर्षात खर्च करणे बंधनकारक आहे. अनुशेषासह मागासर्वीयांकरिता २० टक्के राखीव निधी एकूण रक्कम रु.२,४२,५७,९९९/- खर्च करावयाचा असतांना मार्च, २०१२ अखेर फक्त त्यावर एकूण रक्कम रु.१,०३,८०,८००/- खर्च झाल्याचे दिसून येते. याबाबत खालीलप्रमाणे आक्षेप आहेत.

१) उपरोक्त प्रमाणे जिल्हा परिषद उपकर अनुदानाचे मागासवर्गीयाचे २० टक्के राखीव निधीसंबधीत अनुशेषासह सन २०११-१२ मध्ये एकूण रक्कम रू.२,४२,५७,९९९/- खर्च करणे बंधनकारक असताना परंतु त्यानुसार खर्च करण्यात आलेला नाही, तसेच २० टक्के रकमेतून मागासवर्गीयाच्या कल्याणाकरिता योजना राबवितांना ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन निर्णय क्रमांक मागास १०९३/सीआर-१२६५/३४, दिनांक ९ डिसेबर १९९३ नुसार एकूण राखीव निधीपैकी ३० टक्के रक्कम मागासवर्गीय महिलांसाठी खर्च करणे आवश्यक असताना केलेला नाही.

२) महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन निर्णय क्रमांक मागास-१०९३ /प्र.क्र.१२३९/३४, दिनांक १ सप्टेंबर, १९९३ व ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन निर्णय क्रमांक मागास १०९३/सीआर-१२६५/३४, दिनांक ९ डिसेबर, १९९३ नुसार जिल्हा परिषदांनी त्यांच्या उत्पन्नाच्या किमान २० टक्के रकमेतून मागासवर्गीयांच्या कल्याणाकरिता योजना राबवून त्यावर त्याच वर्षात खर्च करणे बंधनकारक आहे, परंतु जिल्हा परिषदेने अंदाजपत्रकात तरतूद करून व अनुदान उपलब्ध असून देखील मागासवर्गीयांच्या कल्याणाकरिता तरतुदीनुसार परिपूर्ण योजना राबविल्याच्या दिसून येत नाही.

३) महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन परिपत्रक क्रमांक झेडपी-२००८/प्र.क्र.४४६/वित्त ९, दिनांक २० जून २००८ नुसार जिल्हा परिषदांनी योजना राबवितांना विहीत वेळा पत्रकानुसार राबवीली नाही.

४) महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन निर्णय क्रमांक मागास-२००१/प्र.क्र.४०८/३४, दिनांक २० एप्रिल, २००१ नुसार दिलेल्या निर्देशाप्रमाणे मागासवर्गीयाच्या कुटुंबातील कोणतीही व्यक्ती शासकीय व निमशासकीय सेवेत असल्यास सदर योजनेचा लाभ देता येणार नाही. परंतु, त्यामुळे २० टक्के रकमेतून मागासवर्गीयांच्या कल्याणाकरिता योजना राबवितांना तांत्रिक व प्रशासकीय मंजुरीकरिता अशा प्रकारची पात्रता अट समाविष्ट केलेली नसल्याचे दिसून येते तसेच लाभार्थीचे अर्ज पडताळणीत संबधीत लाभार्थीचे कुटुंबातील कोणतीही व्यक्ती शासकीय वा निमशासकीय सेवेत नसल्याबाबतचे प्रमाणपत्र जोडण्यात आलेले नाही.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हापरिषद, अकोला यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

१) ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्र.मागास १०९३/सी.आर/ १२६५/३४, दिनांक ९ डिसेंबर १९९३ नुसार सन २०११-१२ मधील जिल्हा परिषदेचे स्वउत्पन्न रु.९,४४,६२,०००/- च्या २०% निधी रु.१,८८,९२,४००/- मागासवर्गीयांच्या कल्याणकारी योजना राबविण्याकरिता राखीव ठेवण्यात आला असून सन २०१०-११ चा प्रलंबित अनुशेष निधी रु.१,५७,७७,५९९/- असे एकूण निधी रु.३,४६,६९,९९९/- पैकी सन २०११-१२ मध्ये जि.प. सेस अंतर्गत मागासवर्गीयांच्या

कल्याणकारी योजनावर एकूण रु.१,०४,१२,०००/- खर्च झाला असून उर्वरित निधी रु.२,४२,५७,९९९/- खर्च झालेला नाही. सन २०११-१२ अखेर प्रलंबित अनुशेष रुपये २,४२,५७,९९९/-बाबत खर्चाचे स्वतंत्र विवरणपत्र उपलब्ध आहे. ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन निर्णय क्रमांक मागास १०९३/सीआर-१२६५/३४, दिनांक ९ डिसेबर, १९९३ नुसार एकूण राखीव निधीपैकी ३० टक्के रक्कम मागासवर्गीय महीलांसाठी खर्च करण्याची दक्षता घेण्यात येईल.

२) ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन निर्णय दिनांक १/९/१९९३ व दि.९/१२/२०१३ नुसार या पुढे वित्तीय वर्षात जिल्हा परिषद उत्पन्नाच्या २०% निधीतून त्याच वित्तीय वर्षात मागासवर्गीयाकरिता कल्याणकारी योजना राबविण्यात येऊन त्या वित्तीय वर्षात अनुशेष शिल्लक राहणार नाही याबाबत दक्षता घेण्यात येईल.

३) ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन परिपत्रक क्र.झेडपीए २००८/ प्रक्र.४४६/वित्त ९, दिनांक २० जून २००८ नुसार यापुढे जि.प. उत्पन्नातून मागसवर्गीयकरिता राबविण्यात येणाऱ्या योजना सदर परिपत्रकात नमूद केलेल्या वेळापत्रकानुसार योजना राबविण्यात येतील याबाबत दक्षता घेण्यात येईल.

४) महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन निर्णय क्रमांक मागास -२००१/ प्र.क्र.४०८/३४, दिनांक २० एप्रिल २००१ नुसार यापुढे योजना राबवितांना तांत्रिक व प्रशासकीय मंजुरी आदेशात लाभार्थींचे कुटुंबातील कोणतीही व्यक्ती शासकीय व निमशासकीय सेवेत नसल्याबाबतचे प्रमाणपत्र लाभार्थींचे अर्जासोबत जोडणे बाबतची अट ठेवण्याची दक्षता घेण्यात येत आहे.

## मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष

अकोला जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिनांक १ जून, २०१७ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, माहे मार्च २०१२ अखेर अनुशेषाची रक्कम किती होती व माहे मार्च, २०१७ अखेर अनुशेषाची रक्कम किती आहे, माहे मार्च, २०१७ अखेरची अनुशेषाची रक्कम पूर्ण खर्च करण्याचे नियोजन काय आहे,

यावर जिल्हा समाजकल्याण अधिकारी यांनी विदित केले की, सन २०११-२०१२ मध्ये १ कोटी ८८ लाख ९२ हजार ४०० रुपये मागासवर्गीयांच्या कल्याणकारी योजना राबविण्यासाठी तरतूद करण्यात आली होती. सन २०१०-२०११ चा प्रलंबित अनुशेष रुपये १ कोटी ५७ लाख ७७ हजार ५९९ असा एकूण निधी ३ कोटी ४६ लाख ६९ हजार ९९९ रुपये होता. सन २०११-२०१२ मध्ये जिल्हा परिषद सेस अंतर्गत मागासवर्गीयांच्या कल्याणकारी योजनांवर एकूण १ कोटी ४ लाख १२ हजार रुपये खर्च झाला असून उर्वरित निधी २ कोटी ४२ लाख ५७ हजार ९९९ रुपये खर्च झालेले नाहीत. सन २०१२-२०१३ मध्ये १ कोटी ४ लाख रुपये खर्च झाला. ३ कोटी १० लाख ६७७ रुपयांचा अनुशेष होता. सन २०१५-२०१६ मध्ये ९ कोटी रुपयांची तरतूद केली होती. त्यावर्षी ६ कोटी रुपयांची आवश्यकता असताना तोही अनुशेष शिल्लक आहे. २०१६ मध्ये ६ कोटी २७ लाख २० हजार ५२० रुपयांचा अनुशेष शिल्लक आहे. ६ कोटी ७३ लाख रुपयांची कोंबडीचे पिल्ले वाटपाची मागील वर्षी योजना होती. जिल्हा परिषदेने २१ दिवसाचे कोंबडीचे पिल्लू द्यावे, असा प्रस्ताव पाठविला होता, परंतु तो शासन निर्णयाच्या विरुद्ध असल्यामुळे त्याला मंजुरी मिळालेली नाही. यावर्षी ६ कोटी २७ लाख रुपयांचा अनुशेष आहे.

तद्नंतर समितीने विचारणा केली की, मागासवर्गीयांसाठी कल्याणकारी योजनांची अंमलबजावणी करण्यासाठी जिल्हा परिषदेची एकूणच उदासिनता दिसून येते. १०० टक्के निधी खर्च न झाल्यामुळे याला कोण जबाबदार आहे, मागासवर्गीयांसाठी असलेल्या योजनांची अंमलबजावणी व्हावी यासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी मासिक कृति कार्यक्रम तयार करावयाचा आहे. त्यासंबंधी दरमहा आढावा बैठक घेतली आहे काय, नसल्यास त्याची कारणे काय आहेत, असल्यास कृति आराखड्याची नोंद ठेवणे आवश्यक आहे. जिल्हा परिषदेने सहायक आयुक्तांना दर महिन्यानी अहवाल पाठवायला पाहिजे. लोकशाहीची एक चौकट तयार केलेली आहे. पदाधिकारी हे जनतेमधून निवडून येतात. भारतीय प्रशासकीय सेवेतील अधिकाऱ्यांची एक चौकट असते. मागासवर्गीयांसाठी योजना न राबविल्यामुळे जिल्हा परिषदेच्या समाजकल्याण विभागावर कारवाई होईल. समाजकल्याण विभागाची जबाबदारी काय आहे आणि शासनाचे नियम काय आहेत, या बाबी कोणत्याच जिल्हा परिषदा पाळत नाहीत. शासनाच्या नियमाप्रमाणे कार्यवाही करीत नाहीत, ही अतिशय गंभीर बाब आहे.

यावर कृषि विकास अधिकारी तथा प्रभारी जिल्हा समाजकल्याण अधिकारी यांनी खुलासा केला की, चालू वर्षामध्ये त्याचे पूर्ण नियोजन केलेले आहे. मी कृषि विकास अधिकारी म्हणून कार्यरत असून माझ्याकडे जिल्हा समाजकल्याण अधिकारी पदाचा प्रभार आहे. येत्या दिनांक १५ ऑगस्ट पर्यंत लाभार्थ्यांची निवड करून दिली नाही तर कोणत्याही परिस्थितीत योजना राबविल्याशिवाय राहणार नाही.

यावर समितीने असे निदेश दिले की, मागासवर्गीयासाठी योजनेची अंमलबजावणी करण्यामध्ये जिल्हा परिषदेची एकंदरितच उदासिनता दिसून येते. केवळ याच जिल्हा परिषदेत नव्हे तर संपूर्ण राज्यामध्ये उदासिनता दिसून येते. मागासवर्गीयांच्या योजनांसाठीचा निधी खर्च केला नाही म्हणून विभागीय सचिवांची साक्ष घेण्यात येईल, त्यावेळी राहिलेल्या योजनांवर किती खर्च केला, यावर्षी मागासवर्गीयासाठी त्वरित खर्च करण्याचे आपले नियोजन आहे, ही सर्व माहिती विभागीय सचिवांच्या साक्षीच्या वेळी घेऊन यावी. साक्षीला येताना त्यांचे खर्चाचे पूर्ण विवरणपत्र सोबत घेऊन यावे.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्यांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

मागासवर्गीयांच्या कल्याणकारी योजना राबविण्याकरिता राखीव ठेवण्यात आलेला निधी रुपये २,४२,५७,९९९/- इतका अखर्चित राहण्याची कारणे काय आहेत ? या प्रकरणी उदासीनता दाखविणाऱ्या अधिकाऱ्यांविरुद्ध कोणती कारवाई केली, नसल्यास विलंबाची कारणे काय ?

**उपरोक्त मुद्यांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

जिल्हा परिषद २० टक्के उपकर मध्ये अनुशेषाची रक्कम रुपये ६,२७,२०,५५०/- इतकी असून सन २०१७-१८ चे अंदाजपत्रकानुसार रुपये ६,१३,२१,०००/- एवढी तरतूद आहे. त्यापैकी रु.२,७१,१०,८९४/- ही लाभार्थ्यांना DBT द्वारे लाभ देण्याकरिता पंचायत समितीस्तरावर वित्तप्रेशन केलेले आहे.

तसेच समाज कल्याण विभाग राबवित असलेल्या योजनांकरिता लाभार्थी अर्जांचे प्रमाण अल्प, निवडणूक आचारसंहिता, योजनांना तांत्रिक मंजुरी प्राप्त न होणे इत्यादीमुळे अनुशेष निर्माण झालेला आहे.

शासन निर्णय दिनांक ५ डिसेंबर २०१६ नुसार DBT द्वारे लाभार्थ्यांना प्रत्यक्ष लाभ देणे करिता सन २०१८-१९ व २०१९-२० मध्ये कालबद्धरितीने कार्यक्रम राबवून अनुशेष निरंक करण्याची कार्यवाही पूर्ण करण्यात येईल.

## मंत्रालयीन विभागाचा अभिप्राय

**ग्रामविकास विभागाचे अभिप्राय :-** जिल्हा परिषदेने केलेल्या कार्यवाहीशी सहमत.

**सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाचे अभिप्राय :-** सदर मुद्दा मागासवर्गीय राखीव निधीचा असल्यामुळे सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागास अभिप्राय देता येणार नाहीत. त्यामुळे या मुद्यावर ग्रामविकास विभागाचे अभिप्राय घेण्यात यावेत.

## विभागीय सचिवांची साक्ष

पंचायती राज समितीने अकोला जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यांवर अधिक माहिती घेण्यासाठी दिनांक २९ मे, २०१८ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, मागासवर्गीयांसाठी राखीव असलेला निधी खर्च न केल्याबाबत या विषयासंबंधीची माहिती सचिवांनी समितीला द्यावी. यावर विभागीय सचिवांनी खुलासा केला की, या मुद्यासंदर्भात यापूर्वी सांगितल्याप्रमाणे हा खर्च वेळोवेळी झालेला आहे. जिल्हा परिषद २० टक्के उपकर यामध्ये अनुशेषाची रक्कम रुपये ६,२७,२०,५५०/- असून सन २०१७-१८ च्या अंदाजपत्रकानुसार रुपये ६,१३,२१,०००/- इतकी तरतूद आहे. त्यापैकी डीबीटीद्वारे रुपये २,७१,१०,८९४/- इतकी रक्कम लाभार्थ्यांना देण्याकरिता पंचायत समिती स्तरावर वितरित करण्यात आली आहे. त्यातील एक योजना ४५ लाख रुपयांची होती. त्यात वेगवेगळ्या इतर काही योजना होत्या. काही योजना वैयक्तिक लाभाच्या असून २.७१ लाख रुपये इतकी तरतूद होती. त्यापैकी २.२३ लाख रुपयांचा निधी खर्च झाला आहे. त्यातील आणखी २४ लाख रुपयांचा निधी शिल्लक आहे. समाज कल्याण विभाग राबवित असलेल्या योजनांकरिता लाभार्थींच्या अर्जाचे प्रमाण अल्प असणे, निवडणूक आचारसंहिता, योजनांना तांत्रिक मंजुरी वेळीच न मिळणे आणि त्यासंबंधीच्या प्रक्रियेला विलंब लागणे अशी अनेक कारणे हा निधी अखर्चित राहण्याची आहेत.

यावर समितीने विचारणा केली की, ही योजना १०० टक्के अनुदानाची आहे किंवा कसे, मुख्य कार्यकारी अधिकारी यांना याची माहिती आहे काय, असल्यास त्यांनी याचे उत्तर द्यावे. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, याबाबत त्यांना माहिती नाही.

तद्नंतर महिला व बालविकास विभागाच्या सचिवांनी खुलासा केला की, विशिष्ट प्रकरणांमध्ये शासन १०० टक्के अनुदान देते आणि इतर बाबतीत ७५ टक्के अनुदान व २५ टक्के लाभार्थ्यांचा निधी असे प्रमाण आहे.

या खुलाशानंतर समितीने या योजनेमध्ये जो निधी खर्च करण्यात आला आहे त्यामध्ये कोणते प्रमाण लागू आहे अशी विचारणा केली असता विभागीय सचिवांनी खुलासा केला की, या योजनेच्या प्रमाणाची माहिती आता सांगता येणार नाही. मात्र यामध्ये जे अनुदान दिले जाते ते खास करून विविध अवजारे, ताडपत्री यासारख्या साहित्यांसाठी १०० टक्के अनुदान आहे.

या उत्तरानंतर सन २०११-१२ या वित्तीय वर्षाच्या आक्षेपांबाबत आपण चर्चा करीत आहोत. आज किमान ६ वर्षे झाली आहेत. असे असताना आजही तीच परिस्थिती आहे काय, सन २०१८ मध्ये आपल्याला लाभार्थी सापडत नाहीत काय, शिवाय त्यावेळी डीबीटी योजना होती काय, असेल तर त्या योजनेची माहिती या मागासवर्गीय लोकांना मिळत होती काय आणि अशा योजना मागासवर्गीयांपर्यंत पोहोचविण्यास त्यावेळी दिरंगाई केलेल्या अधिकाऱ्यांवर कार्यवाही झाली पाहिजे असे मला वाटते. यामध्ये जे कोणी तत्कालिन अधिकारी जबाबदार असतील त्यांच्यावर कार्यवाही करण्यात यावी असे समितीने निदेश दिले असता विभागीय सचिवांनी खुलासा केला की, यासंबंधी आढावा घेतला आहे. माहे ऑक्टोबर, २०१८ पर्यंत डीबीटीच्या माध्यमातून लाभार्थी मिळणार नाहीत म्हणून ही योजना मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांच्या माध्यमातून राबविली पाहिजे, यावर समितीने विचारणा केली की, अकोला जिल्हा परिषदेचे ४ मुख्य कार्यकारी अधिकारी बदलून गेले आहेत. त्यापैकी कोणत्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याने किती लाभार्थी निवडलेले आहेत ते सांगावे. जिल्हा परिषदेचे सदस्य त्यांना लाभार्थ्यांची यादी देतात. प्रत्येकाला वाटते की माझ्या यादीतील अमुक इतकी नावे घेतली पाहिजेत. डीबीटी योजना कधीपासून लागू झाली आहे, त्यावेळी म्हणजे सन २०११-१२ मध्ये डीबीटी ही योजना होती काय, त्यामुळे या टिप्पणीमध्ये डीबीटीचा उल्लेख कशाच्या आधारावर केला आहे. यामध्ये असे दिसते की मागच्या वर्षीचा निधी खर्च झालेला नाही आणि तो दरवर्षी वाढत वाढत जाऊन इतका अखर्चित राहिला आहे.

यावर विभागीय सचिवांनी खुलासा केला की, सन २०१३ मध्ये हा अनुशेष रुपये ३ कोटी १० लाख इतका होता आणि त्यासाठी एकूण तरतूद २० टक्क्यांच्या अनुषंगाने २ कोटी ८८ लाख इतकी होती. त्यामुळे मागचा व त्या वर्षीचा मिळून एकूण अनुशेष ५ कोटी ९८ लाख इतका झाला होता. यामध्ये सांगायचा मुद्दा एवढाच आहे की लाभार्थ्यांअभावी प्रत्येक वर्षी हा अनुशेष वाढत गेला आहे. सन २०१७-१८ या वित्तीय वर्षापर्यंत तो ६ कोटी १३ लाखापर्यंत गेला आहे. सन २०१८-१९ च्या अंदाजपत्रकामध्ये सुद्धा ही अखर्चित रक्कम दाखविली असून त्यापैकी आतापर्यंत १ कोटी ५४ लाख रुपये इतका निधी खर्च झाला आहे. त्यामुळे शासनाने आता दिनांक ५ डिसेंबर २०१६ रोजीच्या शासन निर्णयानुसार डीबीटीद्वारे लाभार्थ्यांना लाभ देण्याकरिता सन २०१८-१९ आणि २०१९-२० या दोन वर्षामध्ये कालबद्ध कार्यक्रम आखला आहे. त्यामुळे पुढील दोन वर्षामध्ये या अखर्चित अनुशेषाची रक्कम निरंक टप्प्यावर आणण्याच्या दृष्टीने कार्यवाही करीत आहोत.

सन २०१३ मधील ३ कोटी १० लाख अनुशेष होता आणि २०% अनुषंगाने रुपये २ कोटी ८८ लाख असे एकूण रुपये ५ कोटी ९८ लाख शिल्लक होते. त्याप्रमाणे जर स्थिती आहे तर समितीला दिलेल्या टिप्पणीमध्ये त्यासंबंधी सविस्तर माहिती का दिलेली नाही. त्यामुळे सचिवांनी दिलेले उत्तर योग्य नाही, आपला चौकशी अहवाल योग्य नाही. आपण साक्षीला येताना आणि समितीला उत्तर देताना सविस्तर उत्तर दिले पाहिजे असे समितीचे मत आहे.

समितीने पुढे अशी विचारणा केली की, सन २०१३ पासून आजपर्यंत दरवर्षी हा अखर्चित निधी वाढत जाऊन आतापर्यंत तो ६ कोटी १३ लाख रुपये इतका झाला आहे. डीबीटी योजनेच्या प्रकल्पाचा त्याच्याशी काही संबंध नाही. म्हणजे विषय समितीमध्ये पदाधिकाऱ्यांनी दिलेल्या याद्यांना अंतिम मंजुरी दिली जात नाही म्हणून अडचणी येतात. जिल्हा परिषदेमध्ये प्रत्येकजण भांडतो

आणि त्यामुळे वेळ निघून जाते. या लाभार्थ्यांना त्यांचा लाभ घेता यावा म्हणून आपल्याला आता एकच उपाय करणे गरजेचे आहे. या बाबतीत जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी त्यांचे अधिकार येत्या ६ महिन्यात अत्यंत ताकदीने वापरले तर लाभार्थ्यांना वेळीच लाभ मिळू शकेल. कारण ज्यांच्याकरिता या कल्याणकारी योजनांमधून सरकारने निधी दिला आहे तो त्या लाभार्थ्यांपर्यंत पोहोचला पाहिजे.

यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, या वर्षीचा निधी संबंधित लाभार्थ्यांपर्यंत पोहोचेल अशी आम्ही तरतूद करीत आहोत.

यावर समितीने निदेश दिले की, शासनाने हा निधी मागासवर्गीय लोकांकरिता ज्या ज्या प्रमाणात दिलेला आहे तो त्यांना त्या त्या प्रमाणात मिळाला पाहिजे. यामध्ये जे कोणी संबंधित लाभार्थी असतील त्यांच्या कल्याणासाठी शासनाने दिलेला हा निधी आपल्या स्थानिक अंतर्गत अडचणी बाजूला ठेऊन पात्र लाभार्थ्यांना मिळवून द्यावा. अंतर्गत वादांमुळे हा निधी थांबविता कामा नये. प्रशासनाद्वारे उपलब्ध असलेला हा निधी वापरला जाऊन लाभार्थ्यांना त्यांचा लाभ मिळवून द्यावा. पुढील कालखंडामध्ये हे काम तातडीने करावे.

## अभिप्राय व शिफारशी

ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन निर्णय क्र.मागास-२००१/प्र.क्र.४०८/३४, दिनांक २० एप्रिल, २००१ नुसार जिल्हा परिषदांनी त्यांच्या उत्पन्नाच्या किमान २० टक्के रकमेतून मागासवर्गीयांच्या कल्याणाकरिता योजना राबवून त्यावर त्याच वर्षात खर्च करणे बंधनकारक आहे. अकोला जिल्हा परिषदेमध्ये समाजकल्याण विभागाने अनुशेषासह मागासवर्गीयांकरिता २० टक्के राखीव निधी एकूण रुपये २,४२,५७,९९९/- एवढी रक्कम खर्च करावयाची असताना माहे मार्च, २०१२ अखेर फक्त एकूण रुपये १,०३,८०,८००/- एवढी रक्कम खर्च केल्याचे दिसून आले. याबाबत खालीलप्रमाणे लेखा आक्षेप आढळून आले. अकोला जिल्हा परिषदेच्या अंदाजपत्रकामध्ये तरतूद करण्यात आलेली असताना व अनुदान उपलब्ध असतानादेखील मागासवर्गीयांच्या कल्याणाकरिता तरतुदीनुसार परिपूर्ण योजना राबविल्याचे दिसून आले नाही.

ग्रामविकास व जलसंधारण विभागाच्या दिनांक २० एप्रिल, २००१ रोजीच्या शासन निर्णयानुसार मागासवर्गीय कुटुंबातील कोणतीही व्यक्ती शासकीय व निमशासकीय सेवेत असल्यास त्यांना सदर योजनेचा लाभ देता येणार नाही अशी अट असताना योजना राबविताना तांत्रिक व प्रशासकीय मंजुरीकरिता अशा प्रकारची पात्रता अट समाविष्ट केलेली नसल्याचे दिसून आले. तसेच लाभार्थीच्या अर्ज पडताळणीत संबंधित कुटुंबातील कोणतीही व्यक्ती शासकीय वा निमशासकीय सेवेत नसल्याबाबतचे प्रमाणपत्र जोडण्यात आलेले नाही.

उपरोक्त लेखा आक्षेपासंदर्भात जिल्हा परिषद, अकोला यांचेकडून कळविण्यात आलेल्या लेखी खुलाशानुसार सन २०११-१२ मध्ये जिल्हा परिषद सेस अंतर्गत मागासवर्गीयांच्या कल्याणकारी योजनांवर एकूण रुपये १,०४,१२,०००/- एवढा खर्च झालेला असून उर्वरित निधी रुपये २,४२,५७,९९९/- बाबत खर्चाचे स्वतंत्र विवरणपत्र उपलब्ध आहे. राखीव निधीपैकी ३० टक्के रक्कम मागासवर्गीय महिलांसाठी खर्च करण्याची व कल्याणकारी योजना राबविताना वित्तीय वर्षात अनुशेष शिल्लक राहणार नाही तसेच लाभार्थीचे कुटुंबातील कोणतीही व्यक्ती शासकीय व निमशासकीय सेवेत नसल्याबाबतचे प्रमाणपत्र अर्जासोबत जोडण्याची अट ठेवण्याची दक्षता घेण्यात येईल असे कळविण्यात आले. या लेखी माहितीच्या आधारे समितीने दिनांक १ जून २०१७ रोजी मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष घेतली. या साक्षीदरम्यान समितीच्या निदर्शनास आले की, **सन २०१२-१३ मध्ये मागासवर्गीयांच्या कल्याणकारी योजनांसाठी रुपये ३ कोटी १० लाख ६७७ रुपयांचा अनुशेष होता. सन २०१६ मध्ये रुपये ६ कोटी २७ लाख २० हजार ५२० रुपयांचा अनुशेष शिल्लक आहे. १०० टक्के निधी खर्च झालेला नाही त्यामुळे समाजकल्याण अधिकारीच सकृतदर्शनी यासाठी जबाबदार आहेत. त्याचबरोबर मागासवर्गीयांसाठी असलेल्या योजनांची अंमलबजावणी विहित वेळापत्रकानुसार होत आहे किंवा कसे याकरिता मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी मासिक कृति कार्यक्रम तयार करून त्यासंबंधी दरमहा आढावा बैठक घेणे आवश्यक होते. शासनाच्या धोरणाप्रमाणे**

**कार्यवाही होत नसणे ही अतिशय गंभीर बाब आहे. त्यामुळे संबंधित समाजकल्याण अधिकारी यांची जबाबदारी निश्चित करून त्यांचेविरुद्ध कारवाई करण्यात यावी व केलेल्या कारवाईचा अहवाल समितीस दोन महिन्यांच्या आत सादर करण्यात यावा तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सदर योजना विहित कालावधीत वेळापत्रकानुसार राबविण्याच्या दृष्टीने दरमहा बैठक घेण्याची दक्षता घ्यावी.**

केवळ याच जिल्हा परिषदेत नव्हे तर संपूर्ण राज्यामध्ये मागासवर्गीयांच्या कल्याणाकरिता योजना राबविण्याबाबत अतिशय उदासिनता दिसून येते. त्यामुळे **मागसवर्गीयांच्या कल्याणकारी योजनांसाठी विशिष्ट प्रकरणांमध्ये १०० टक्के अनुदान देण्यात येते आणि इतर बाबतीत ७५ टक्के अनुदान व २५ टक्के लाभार्थ्यांचा हिस्सा असे प्रमाण आहे. १००% अनुदान खास करून विविध अवजारे, ताडपत्री यासारख्या साहित्यासाठी देण्यात येते. सदरहू आक्षेप सन २०११-१२ या वित्तीय वर्षातील असून सन २०१८ मध्ये देखील या योजनेचे लाभार्थी अप्राप्त आहेत, त्यामुळे समिती याबद्दल तीव्र नाराजी व्यक्त करीत आहे.** लाभार्थ्यांअभावी प्रत्येक वर्षी हा अनुशेष वाढत गेला आहे. सन २०१७-१८ या वित्तीय वर्षापर्यंत ६ कोटी १३ लाख रुपयांपर्यंत वाढत गेला आहे. सन २०१८-१९ च्या अंदाजपत्रकामध्ये सुद्धा ही अखर्चित रक्कम दाखविली असून त्यापैकी आतापर्यंत केवळ १ कोटी ५४ लाख रुपये इतका निधी खर्च झाला आहे. **सन २०१२-२०१३ पासून सदर निधी खर्च न करण्यास जबाबदार असलेल्या सर्व संबंधितांची मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी चौकशी करून व त्यासंबंधात जबाबदारी निश्चित करून केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस तीन महिन्यांच्या कालावधीत कळविण्यात यावी, अशी समितीची शिफारस आहे.**

**दिनांक ५ डिसेंबर, २०१६ रोजीच्या शासन निर्णयानुसार डीबीटी व्दारे (Direct Beneficiary Transfer) लाभार्थ्यांना लाभ देण्याकरिता सन २०१८-१९ आणि सन २०१९-२० या दोन वर्षामध्ये कालबद्ध कार्यक्रम आखण्यात यावा व अखर्चित अनुशेषाची रक्कम निरंक टप्प्यावर आणण्याच्या दृष्टीने कार्यवाही करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल दोन महिन्यांच्या आत समितीला सादर करावा, अशी समितीची शिफारस आहे.**

प्रकरण चार

## जिल्हा परिषद, अकोला

## दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत सन २००४-२००५ पासून अपूर्ण बांधकामांना विलंबाने निधी वितरित केल्याबाबत

### परिच्छेद क्रमांक ३.६३१/५ (सन २०११-१२)

जिल्हा परिषदेच्या समाज कल्याण विभागामार्फत दलित वस्ती सुधारणा योजनेच्या अंमलबजावणीसाठी सर्व पंचायत समित्यांमार्फत ग्रामपंचायतींकडून प्राप्त प्रस्तावानुसार दलित वस्त्यांमध्ये सिमेंट काँक्रीट रस्ते व नाल्यांची बांधकामे/समाज मंदीर बांधकामे/ पाणी पुरवठयासंबंधीची कामे हाती घेण्यात येतात व सदर बांधकामासांठी प्रशासकीय मंजुरी अंती प्रथम अग्रिम ४० % तसेच काम सुरू केल्यावर मुल्यांकनाअंती दुसरा अग्रिम ४० % व काम पूर्ण झाल्यावर व काम पूर्णत्वाचे प्रमाणपत्रानुसार गट विकास अधिकाऱ्याकडून प्राप्त प्रस्तावाप्रमाणे अंतीमतः २० % अनुदानाचे वितरण करण्यात येते. समाज कल्याण विभागाने लेखापरीक्षणास उपलब्ध केलेल्या विवरणपत्रानुसार वित्तीय वर्ष २००४-०५ पासून सन २०१०-११ पर्यंत प्रशासकीय मंजूर अंती प्रथम अग्रिम ४० % व दुसरा अग्रिम ४०% अग्रिम प्रदानासाठी अनुदान वितरित केलेल्या बांधकामांपैकी ३४६ बांधकामे अद्यापही अपूर्ण आहेत. तसेच वित्तीय वर्ष २०११-१२ मध्ये एकूण रु.७,५९,९३,०००/- निधी / अनुदान उपलब्ध असतांना प्रत्यक्षात फक्त रु.१,१८,९३,९५४/- एवढाच खर्च झालेला असून रक्कम रु.६,४०,९९,०४६/- अनुदान अखर्चित असल्याचे दिसून येते. याबाबत खालील प्रमाणे अभिप्राय आहेत.

१) महाराष्ट्र शासन, सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य, क्रिडा व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय क्रमांक युटीए १०९४/ प्रक्र २२९/मावक-२/ दि. १६ ऑक्टोबर, १९९५ नुसार दलित वस्ती सुधारणा योजनेअंतर्गत प्रशासकीय मंजुरी अंती प्रथम अग्रिम ४० % मंजूर व प्रदान केल्यावर सदरचे बांधकाम ग्रामपंचायतीने ६ महिन्याचे आत पूर्ण करण्याचे बंधनकारक आहे. तसेच बांधकामांचे प्रगतीवर संबंधित गट विकास अधिकारी / पंचायत समितीचे शाखा अभियंता /ग्रामसेवक यांनी नियंत्रण/पर्यवेक्षण करावयाचे असून बांधकामाचे प्रगतीप्रमाणे वेळोवेळी निधी मागणीचा प्रस्ताव आवश्यक अभिलेख्यासह समाज कल्याण अधिकारी जिल्हा परिषद यांना सादर करणे आवश्यक आहे व त्याचप्रमाणे संबंधीतांना वेळीच मूल्यांकनाअंती दुसरा अग्रिम ४०% व काम पूर्ण झाल्यावर व काम पूर्णत्वाचे प्रमाणपत्रानुसार गट विकास अधिकाऱ्याकडून प्राप्त प्रस्तावाप्रमाणे अंतीमतः २० % अनुदानाचे वितरण करणे आवश्यक असतांना वित्तीय वर्ष २००४-०५ पासुन सन २०१०-११ पर्यंतची ३४६ बांधकामे अध्यापही अपूर्ण असल्याने शासन निर्देशाचे उल्लंघन झालेले असून योजनेची अंमलबजावणी संबंधीतांनी काटेकोरपणे/विहीत कालावधीत केलेली नसल्याने, वित्तीय वर्ष २००४-०५ पासूनच्या ३४६ अपूर्ण बांधकामात शासनाचा निधी नाहक अडकून पडलेला दिसून आला.

२) तसेच सदर योजनेची उपलब्ध केलेल्या नस्तीची पडताळणी केली असता नस्तीतील दि. १ जून, २०११ चे टिपणी नुसार रु.५१,२४,३८१/- चा अपूर्ण असलेल्या बांधकामासाठी गट विकास अधिकाऱ्याकडून प्राप्त प्रस्तावाप्रमाणे ४०% दुसरा अग्रीमाचा व काम पूर्ण झाल्यावर व काम पूर्णत्वाचे प्रमाणपत्रानुसार अंतिमतः २०% अनुदानाचे वित्त प्रेषणासाठीचा प्रस्ताव सादर करण्यात आलेला होता, सदर प्रस्तावानुसार आवश्यक त्या पडताळणी अंती, अनुदानाचे वितरण तातडीने पंचायत समित्यांना करणे गरजेचे असतांना वारंवार त्याच बाबीसंबंधी त्रुटी व परिपुर्ततेबाबतचे मुद्यांचा उहापोह करण्यात आल्याचे नस्तीमधील टिपण्या व त्यावरील अभिप्रायावरून दिसून येते. त्यामुळे सदर दि. १ जून २०११ चे टिपणीनुसार सदर प्रस्तावास अंतिमतः दि. १९ ऑक्टोबर, २०११ रोजी म्हणजेच चार महिन्याचे अवास्तव विलंबाने मंजुरी देऊन अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, यांचे आदेश क्र. ६५०/२०११ दि. १४ नोव्हेंबर, २०११ नुसार अनुदान वितरित करण्यात आलेले आहे.

३) तसेच महाराष्ट्र शासन, सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य, क्रिडा व विशेष सहाय्य विभाग शासन निर्णय क्रमांक दवसु-२००३/प्रक्र ३४२०/मावक-२/ दि. १५ जानेवारी, २००४ नुसार दलित वस्ती सुधारणा योजनेअंतर्गत दलित वस्तीमध्ये कायमस्वरुपी पिण्याच्या पाण्याची सोय झाली आहे असे लेखी प्रमाणपत्र संबंधित मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद

यांनी शासनास सादर केल्याशिवाय इतर बाबींवर या योजनेतुन खर्च करण्यात येवु नये. असे शासनाचे आदेश असतांना विभागाने पुरविलेल्या अपूर्ण कामांच्या यादी नुसार अद्याप देखील जिल्ह्यात सन २००४-०५ पासून पाणी पुरवठयाची एकूण ७८ कामे अपूर्ण आहेत.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, अकोला यांचेकडून खालील प्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

आक्षेपात नमुद केलेली सन २०११-१२ मध्ये एकूण रुपये ७,५९,९३,०००/- इतकी नसून प्रत्यक्षात ती रुपये ५,५९,९३,०००/- इतका निधी उपलब्ध झाला आहे.

१) समाज कल्याण विभाग, जिल्हा परिषद, अकोला अंतर्गत सन २००४-०५ ते २०१०-११ पर्यंत दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत एकूण १२६० कामांना मंजुरी प्रदान करण्यात आलेली होती.

सन २००४-०५ ते सन २०१०-११ या कालावधीत एकूण मंजूर केलेल्या कामापैकी लेखापरिक्षणाच्या कालावधीपर्यंत एकूण ३४६ कामे अपूर्ण होती. तद्नंतर अपूर्ण कामांपैकी १८८ कामे पूर्ण झालेली असून आजस्थितीत १५८ कामे अपूर्ण आहेत. सदर अपूर्ण कामांपैकी ७८ कामे ही पाणीपुरवठ्यांची असून ती अपूर्ण आहेत.

संबधित गट विकास अधिकारी / पंचायत समिती स्तरावरील शाखा अभियंता / संबधित ग्रामसेवक यांनी शासन निर्देशानुसार सदर योजनेची काटेकोरपणे अंमलबजावणी न केल्यामुळे संबधिताकडून सन २००४-०५ ते सन २०१०-११ या कालावधीतील अपूर्ण असलेल्या कामावरील वितरीत केलेला निधी वसूल करण्याची कार्यवाही सुरू आहे.

२) आक्षेपात नमूद केल्याप्रमाणे दलित वस्ती सुधार योजनेअंतर्गत सन २०११-१२ मध्ये संबधित गट विकास अधिकारी, पंचायत समिती यांचेकडून मंजूर झालेल्या विकास कामांचे ४०% दुसरा हप्ता व पूर्ण झालेल्या कामांचा अंतिम हप्ता २०% अनुदान मागणीचे प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर नस्तीतील दि. ०१ जून, २०११ चे टिपणीनुसार रुपये ५१,२४,३८१/- च्या प्रस्तावास अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी दि. ४ जुलै, २०११ रोजी मंजुरी प्रदान केली असून पंचायत समिती स्तरावर वित्तप्रेषणव्दारे आदेश क्र. १९७ दि. ४ जुलै, २०११ अन्वये अनुदान वितरीत करण्यात आले आहे.

तसेच आक्षेपात नमूद केल्यानुसार आदेश क्र. ६५० दि. १४ नोव्हेंबर, २०११ अन्वये पंचायत समितीकडून प्राप्त झालेल्या वेगळया कामांचे अनुदान मागणीचे प्रस्तावानुसार रुपये ४१,०६,५९४/- ची टिपणी दि. १९ ऑक्टोबर २०११ पासून सुरू झाली असून दि. १४ नोव्हेंबर, २०११ ला वित्तप्रषणाव्दारे पंचायत समिती स्तरावर अनुदान वितरीत करण्यात आले आहे.

३) दलित वस्ती सुधार योजनेअंतर्गत ग्राम पंचायत स्तरावर दलित वस्त्यांमध्ये मागासवर्गीयांचे मुलभूत सुविधानुसार सिमेंट काँक्रीट रस्ते / नाली बांधकामे / स्मशानभूमि बांधकामे / पाणी पुरवठा बांधकामे / समाज मंदिर बांधकामे / पथदिवे इत्यादी विकास कामांची मागणी असल्याने सदर बाबींवर खर्च झालेला आहे.

जिल्ह्यातील दलित वस्त्यांमध्ये नळ पाणी पुरवठा / सार्वजनिक विहिरी /बोअरवेल व्दारा पिण्याच्या पाण्याची सोय झालेली आहे, परंतू काही दलित वस्त्यांमध्ये सन २००४-०५ पासून पाण्याचा स्त्रोत न मिळाल्याने तथा बोअरवेल ड्राय गेल्याने एकूण ७८ कामे अपूर्ण आहेत. सदर अपूर्ण कामांवरील गट विकास अधिकारी पंचायत समिती स्तरावर वितरित केलेले अनुदान वसूल करण्याची कार्यवाही सुरू आहे.

## मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष

अकोला जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिनांक १ जून, २०१७ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने दलित वस्ती सुधार योजनेंतर्गत सन २००४-२००५ पासूनची बांधकामे अद्यापपावेतो अपूर्ण बांधकामांना अवास्तव विलंबाने निधी वितरित केल्याबाबत तसेच १) अपूर्ण कामावर वितरित केलेल्या निधीची रक्कम किती आहे, २) सदर निधी कोणाकडून वसूल करणार आहात, ३) वसुलीचा कालबद्ध कार्यक्रम आहे काय,

४) अपूर्ण कामासाठी गटविकास अधिकारी, शाखा अभियंता व ग्रामसेवक यांच्यावर कार्यवाही करण्यात आली आहे काय, असल्यास कोणती, ५) अपूर्ण कामे पूर्ण करून घेणेबाबत जिल्हा परिषदेमार्फत काय कार्यवाही करण्यात आली, ६) पाणी पुरवठ्यांच्या ७८ कामांना मंजुरी केव्हा दिली, कामे पूर्ण होणार नसतील तर सदर कामांवरील प्राप्त निधी परत का करण्यात आला नाही, अनावश्यक निधी गुंतून पडला असल्याने संबंधितांवर जबाबदारी निश्चित का करण्यात येवू नये अशी विचारणा केली असता यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, सन २०११-२०१२ मध्ये ७ कोटी ५९ लाख ९३ हजार रुपये इतकी रक्कम उपलब्ध नसून प्रत्यक्षात ५ कोटी ५९ लाख ९३ हजार रुपये निधी उपलब्ध झालेला होता. तद्नंतर मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांना विचारणा करण्यात आली की, हा फरक का आला, आपण जुने पुस्तक पाठविले होते त्यामध्ये ७ कोटी ५९ लाख ९३ हजार रुपये होते आणि या नवीन पुस्तकामध्ये ५ कोटी ५९ लाख ९३ हजार रुपये उल्लेख आहे.

यावर मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी खुलासा केला की, जुन्या पुस्तकात नमूद केलेले तेवढे पैसे प्रत्यक्षात प्राप्त झालेले नाहीत. या उत्तरानंतर संचालक, स्थानिक निधी लेखा यांनी विचारणा केली की, निधी उपलब्ध असताना अपूर्ण कामे पूर्ण का होत नाहीत, ५ कोटी रुपयांमधून फक्त १ कोटी रुपये खर्च झाले आणि ४ कोटी रुपये शिल्लक राहिले. पिण्याचे पाणी ही अतिशय महत्वाची बाब आहे. पिण्याच्या पाण्यासाठी जिल्हा परिषद पैसे खर्च का करु शकली नाही. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी विदित केले की, त्या ग्रामसेवकांवर नोटिसा बजाविलेल्या आहेत. वसुलीच्यासंदर्भात सात आठ वेळा गटविकास अधिकारी यांचेकडे पत्र व्यवहार केलेला आहे. ३४६ कामे अपूर्ण होती त्यातील १४८ कामे पूर्ण झालेली आहेत. या १४८ पूर्ण कामांमध्ये ७८ पाणी पुरवठ्याची कामे होती. उद् भव कोरडा झाल्यामुळे पाणी पुरवठ्याच्या योजनेवर ती रक्कम खर्च होऊ शकली नाही.

या उत्तरानंतर समितीने असे मत व्यक्त केले की, दलित वस्ती सुधार योजनेंतर्गत सन २०११-२०१२ मध्ये संबंधित गट विकास अधिकारी, पंचायत समिती यांचेकडून मंजूर झालेल्या विकास कामांचा ४० टक्के दुसरा हप्ता व पूर्ण झालेल्या कामांचा अंतिम हप्ता २० टक्के अनुदान मागणीचे प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर नस्तीतील दिनांक १ जून, २०११ रोजीच्या टिप्पणीनुसार रुपये ५ कोटी १२ लाख ४ हजार ३८१ च्या प्रस्तावास अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी दिनांक ४ जुलै, २०११ रोजी मंजुरी देऊन पंचायत समिती स्तरावर अनुदान वितरित करण्यात आले.

यावर समितीने असे निदेश दिले की, या प्रकरणासंबंधी विभागीय सचिवांची साक्ष घेण्यात यावी. जिल्हा परिषदेची प्रशासकीय यंत्रणा अतिशय ढिसाळ आहे. पाण्याकरिताचे पाच कोटी रुपये शिल्लक राहिले आहेत. हे पैसे विहीत कालावधीत खर्च होणे आवश्यक होते. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी विदित केले की, या अगोदर दहा, बारा पत्रे दिलेली आहेत. काही गटविकास अधिकाऱ्यांना कारणे दाखवा नोटिसा दिलेल्या आहेत तरी देखील कामे पूर्ण झालेली नाहीत.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्यांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

एकूण १५८ अपूर्ण कामांसाठी ४ कोटी इतका निधी उपलब्ध असतानासुद्धा पाणीपुरवठ्याची ७८ कामे अपूर्ण राहण्याची कारणे काय आहेत, या प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, त्यात कोण दोषी आढळले, त्यानुसार त्यांचे विरुद्ध काय कारवाई केली, नसल्यास विलंबाची कारणे काय ?

**उपरोक्त मुद्यांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालील प्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

दलित वस्ती सुधार योजनेअंतर्गत समाज कल्याण विभाग, जिल्हा परिषद, अकोला यांनी प्रस्तावित गावांच्या नळ पाणी पुरवठा योजनेच्या कामांना प्रशासकिय मान्यता प्रदान केली. प्रशासकीय मान्यतेनुसार ग्रा.पा.पु.उपविभाग यांनी प्रत्येक गावांचे सविस्तर अंदाजपत्रके तयार करून ग्रा.पा.पु. विभागास तांत्रिक मान्यतेकरिता सादर केले होते. सदर अंदाजपत्रकांची तांत्रिक तपासणी करून विभागीय स्तरावरुन तांत्रिक मान्यता प्रदान केली होती. सचिव, ग्रामपंचायत यांनी अंदाजपत्रकामधील केलेल्या कामांचे मुल्यमापन ग्रा.पा.पु. उपविभागाने करून दिले आहेत. उपरोक्त कामांचा निधी समाज कल्याण विभागाकडून संबंधित गटविकास अधिकारी, पंचायत समिती यांना देण्यात आला होता. गट विकास अधिकारी, पंचायत समिती यांनी सदर निधी सचिव,

ग्रामपंचायत यांना कामे पूर्ण करण्यासाठी दिला होता. निधी वितरणाबाबत कोणतीही कार्यवाही ग्रामीण पाणी पुरवठा विभागामार्फत झालेली नाही आणि सचिव, ग्रामपंचायत यांनी केलेल्या बांधकामाचे मुल्यमापन ग्रामीण पाणी पुरवठा विभागांतर्गत असलेल्या उपविभागांनी करून दिलेले आहेत. त्यामुळे सदर प्रकरणी पाणी पुरवठा विभागामार्फत कुठलीही दिरंगाई झालेली नाही.

पाणीपुरवठा कामांवर रुपये २,९०,८४,०६२/- एवढा निधी वितरीत केलेला असून सदर निधीमधून पंचायत समिती अकोला रु.८,८७,०५३/- बार्शी टाकळी रु.२९,५५,९८१/- मुर्तीजापूर रु.९,३०,७७२/- असे एकूण रु. ३८,८६,७५३/- निधी खर्च झालेला आहे. ७७ अपूर्ण कामांपैकी १६ कामे पूर्ण झालेली आहे. उर्वरित ६१ कामांचा निधी पंचायत समितीस्तरावर तसेच ग्राम पंचायतस्तरावर उपलब्ध असून रु. २,५१,९७,३०९/- निधीबाबत गटविकास अधिकारी, पंचायत समिती स्तरावरुन माहिती अप्राप्त आहे. उपरोक्त निधी शासन खाते जमा करणेबाबत गट विकास अधिकारी व कार्यकारी अभियंता पाणीपुरवठा यांना पत्राद्वारे वारंवार कळविण्यात आलेले आहे.

तसेच या संबंधी खालील प्रमाणे अपूर्ण कामांच्याबाबत माहिती मागविण्याबाबतचा पत्र व्यवहार करण्यात आला.

| **अ.क्र.** | **अपूर्ण असलेल्या दलित वस्तीच्या कामाबाबत करण्यात आलेल्या पत्र व्यवहाराचा तपशील** |
|---|---|
| 1) | जि.स.क.अ. यांचे पत्र क्र.६५७ दिनांक १२.५.२०१० अन्वये (ग.वि.अ.) सर्व |
| 2) | मा.अति.मु.का.अ. यांचे पत्र क्र.१०५३ दिनांक ३.९.२०१० अन्वये (ग.वि.अ.) सर्व |
| 3) | मा.मु.का.अ. यांचे पत्र क्र.१०८२ दिनांक १७.९.२०१० अन्वये (ग.वि.अ.) सर्व |
| 4) | मा.मु.का.अ. यांचे पत्र क्र.१५८४ दिनांक १४.१.२०११ अन्वये (ग.वि.अ.) सर्व |
| 5) | जि.स.क.अ. यांचे पत्र क्र.१७३१ दिनांक १७.२.२०११ अन्वये (ग.वि.अ.) सर्व |
| 6) | जि.स.क.अ. यांचे पत्र क्र.१७६४ दिनांक २३.२०११ अन्वये (ग.वि.अ.) सर्व |
| 7) | जि.स.क.अ. यांचे पत्र क्र.१८७८ दिनांक १७.३.२०११ अन्वये (ग.वि.अ.) सर्व |
| 8) | मा.अति.मु.का.अ. यांचे पत्र क्र.१९९९ दिनांक ३०.३.२०११ अन्वये (ग.वि.अ.)सर्व |
| 9) | जि.स.क.अ. यांचे पत्र क्र.२५१ दिनांक १.८.२०११ अन्वये (ग.वि.अ.) सर्व |
| 10) | जि.स.क.अ. यांचे पत्र क्र.५९६ दिनांक १.११.२०११ अन्वये (ग.वि.अ.) सर्व |
| 11) | मा.अति.मु.का.अ. यांचे पत्र क्र.६१२ दिनांक ४.११.२०११ अन्वये (ग.वि.अ.) सर्व |
| 12) | जि.स.क.अ. यांचे पत्र क्र.११०७ दिनांक २१.११.२०११ अन्वये (ग.वि.अ.) सर्व |
| 13) | जि.स.क.अ. यांचे पत्र क्र.४१ दिनांक ७.१.२०१३ अन्वये (ग.वि.अ.) सर्व |
| 14) | म.वि.अ. पं.स.यांचे पत्र क्र.२०४ दिनांक १२.१.२०१३ (ग्राम सेवक) |
| 15) | जि.स.क.अ. यांचे पत्र क्र.९५३ दिनांक २१.१.२०१३ अन्वये (ग.वि.अ.) सर्व |
| 16) | मा.मु.का.अ.यांचे पत्र क्र.१३१ दिनांक २९.१.२०१३ अन्वये (ग.वि.अ.) सर्व |
| 17) | जि.स.क.अ. यांचे पत्र क्र.१४०८ दिनांक ९.२.२०१४ अन्वये (ग.वि.अ.) सर्व |
| 18) | मा.उप.मु.का.अ.यांचे पत्र क्र.५६ दिनांक २२.२.२०१३ अन्वये (ग.वि.अ.) सर्व |
| 19) | गट वि.अ. यांचे पत्र क्र.५३८ दिनांक ६.३.२०१३ अन्वये उप अभियंता पा.पु./ कार्यकारी अभि.पा.पु |

| | |
|---|---|
| 20) | दिनांक १४.५.२०१३ रोजी आढावा सभेत दिलेल्या सुचना अन्वये (ग.वि.अ.)सर्व |
| 21) | जि.स.क.अ. यांचे पत्र क्र.२२७३ दिनांक ११.९.२०१५ अन्वये (ग.वि.अ.) सर्व |
| 22) | जि.स.क.अ. यांचे पत्र क्र.२२७४ दिनांक ११.९.२०१५ अन्वये (ग.वि.अ.) सर्व |
| 23) | ग.वि.अ. पं.स.यांचे पत्र क्र.३१९५ दिनांक १६.९.२०१५ (सचिव/ग्रामसेवक/शाखा अभियंता) |
| 24) | जि.स.क.अ. यांचे पत्र क्र.२३२१ दिनांक ३.१०.२०१५ अन्वये (ग.वि.अ.) सर्व |
| 25) | मा.अति.मु.का.अ.यांचे दालनात सभा दिनांक ८.१०.२०१५ अन्वये (ग.वि.अ./ शा. अधि/ ग्रामसेवक/अभियंता पा.पु.) |
| 26) | मा.अति.मु.का.अ.यांचे पत्र क्र.२३५१ दिनांक १३.१०. २०१५ अन्वये (कार्यकारी अभियंता पाणी पुरवठा) |
| 27) | मा.वि.अ.पं.स.पातुर यांचे पत्र क्र.३३०४ दिनांक १३.१०.२०१५ अन्वये (तलाठी) |
| 28) | ग.वि.अ.पं.स.बा.टा. यांचे पत्र क्र.२८९५ दिनांक १६.१०.२०१५ अन्वये (उप. अभियंता पाणी पुरवठा) |
| 29) | मा.अति.मु.का.अ. यांचे पत्र क्र.२४३५ दिनांक ३.११.२०१५ अन्वये (उप मु.का.अ. पं.स.) |
| 30) | मा.मु.का.अ.जि.प. यांचे पत्र क्र.२६२० दिनांक १६.१२.२०१५ अन्वये (ग.वि.अ./उप अभियंता पा.पु/कार्यकारी अभि.पा.पु/उप.मु.का.अ.(प) उप मु.का.अ. सा.प्र.वि.यांना कारणे दाखवा नोटीस) |
| 31) | मा.अति.मु.का.अ.यांचे पत्र क्र.१८२ दिनांक २९/२/२०१६ अन्वये उप.मु.का.अ.(पं) जि.प.अकोला |
| 32) | जि.स.क.अ.यांचे पत्र क्र.९३९ दिनांक १.७.२०१७ अन्वये (ग.वि.अ.) सर्व |
| 33) | मा.अति.मु.का.अ. यांचे पत्र क्र.१३०० दिनांक १४.९.२०१७ अन्वये (ग.वि.अ.) सर्व |
| 34) | मा.अति.मु.का.अ. यांचे पत्र क्र.१३०२ दिनांक १४.९.२०१७ अन्वये (ग.वि.अ.) सर्व |
| 35) | जि.स.क.अ. यांचे पत्र क्र.१८३९ दिनांक ३०.१२.२०१८ अन्वये (ग.वि.अ.) सर्व |
| 36) | जि.स.क.अ.यांचे पत्र क्र.६८७ दिनांक १९.४.२०१८ अन्वये (ग.वि.अ.) सर्व |

दिनांक २६ एप्रिल, २०१८ नुसार गट विकास अधिकारी पंचायत समिती सर्व अकोला जिल्हा यांना पाणी पुरवठ्याची अपूर्ण ६१ कामांविषयी तत्कालीन गट विकास अधिकारी व तत्कालीन ग्रामसेवक यांच्या कार्यकाळातील माहिती देणेबाबत कळविण्यात आलेले आहे.

## मंत्रालयीन विभागाचा अभिप्राय

**पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाचे अभिप्राय :-** सदर मुद्दा सामाजिक न्याय विभागाशी संबंधित असून, याबाबत कार्यकारी अभियंता, ग्रा.पा.पु.विभाग जि.प.अकोला यांनी दिलेले अभिप्रायाशी हा विभाग सहमत आहे.

**सामाजिक न्याय विभागाचे अभिप्राय :-** सदर अभिप्रायाशी शासन सहमत आहे.

## विभागीय सचिवांची साक्ष

पंचायती राज समितीने अकोला जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यांवर अधिक माहिती घेण्यासाठी दिनांक २९ व ३० मे, २०१८ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, दलित वस्ती सुधार योनजेअंतर्गत सन २००४-२००५ पासून अपूर्ण बांधकामांना विलंबाने निधी वितरीत केल्याप्रकरणी पाणी पुरवठा विभागाने प्रथम खुलासा करावा की, एवढ्या राष्ट्रीय पेयजल योजना राबविण्यात आल्या आहेत. त्यामध्ये पाणी पुरवठा समितीमार्फत निधी वाटप झाला आहे किंवा कसे, जिल्हा परिषदेने हे काम केले आहे किंवा नाही.

यावर पाणी पुरवठा विभागाच्या सचिवांनी खुलासा केला की, ही कामे दलित वस्ती सुधार योजनेंतर्गत आहेत. या विषयाशी संबंधित विभाग पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग आहे. ग्रामीण भागामध्ये हे काम करण्यासाठी कार्यान्वयन यंत्रणा ही संबंधित ग्रामपंचायत असते. दलित वस्ती सुधारणा योजनेंतर्गत हे काम असल्यामुळे जिल्हा परिषदेने संबंधित गटविकास अधिकाऱ्यांना वेळोवेळी कळविले आहे. मात्र या कामामध्ये विलंब झालेला आहे. समन्वयाच्या बाबतीत जिल्हा परिषद आणि तालुका स्तरावर अडचणी आल्या आहेत. आतापर्यंत ६१ योजना पूर्ण झाल्या आहेत. या बाबतीत गटविकास अधिकाऱ्यांचा आढावा घेतल्यानंतर असे लक्षात आले आहे की त्यांनी ती माहिती यापूर्वी सादर करताना त्यामध्ये काही तरी गफलत झाली आहे. अकोट तालुक्यामध्ये या ४ योजना राबविण्यात आल्या आहेत तर बाळापूर तालुक्यामध्ये २ योजना राबविण्यात आल्याचे म्हटले आहे. मात्र यामध्ये संपूर्ण योजनांचा आकडा ६१ इतका दाखविण्यात आला आहे. त्या योजना मुख्य अभियंता यांच्याकडून समाविष्ट करण्यात आलेल्या आहेत. परंतु या बाबतीत समितीला सुधारित उत्तर देण्यात येईल.

यावर समितीने निदेश दिले की, दोन महिन्यांपूर्वी या विषयासंबंधी अकोला जिल्ह्यात चर्चा झाली होती. जिल्हाधिकारी यांनी या विषयी चौकशीचे आदेश दिलेले आहेत. यापूर्वीच्या १० टक्के योजना सुद्धा पूर्ण झाल्या नाहीत. त्यामुळे यासंबंधी पाणी पुरवठा विभागाने सविस्तर माहिती जिल्हाधिकारी यांच्याकडून मागवून घ्यावी व त्यानंतर समितीला सादर करावी. यावर पाणी पुरवठा विभागाच्या सचिवांनी विदित केले की, यासंबंधी मुख्य कार्यकारी अधिकारी यांना जेवढी माहिती आहे ती आणि इतर माहिती घेऊन यासंबंधी उत्तर सादर करण्यात येईल.

यावर समितीने असे मत व्यक्त केले की, या योजनेमध्ये ९९ टक्के भ्रष्टाचार झालेला आहे. निधीचा गैरवापर करणे, कामे अपूर्ण ठेवणे, अपूर्ण कामांना निधी उपलब्ध करून न देणे, यासारख्या अनेक गोष्टींमुळे ही योजना सुरू झालेली नाही. या योजनेतील लोकवर्गणी बाद झाली आहे. या प्रकरणासंबंधी अकोला जिल्हा परिषदेची फार मोठी चौकशी सुरू केली आहे. त्यामुळे त्यासंबंधी अधिकची माहिती घेऊन उत्तर द्यावे.

दलित वस्ती सुधार योजनेंतर्गत पाणी पुरवठा करण्यासंबंधी जिल्हा परिषदेने केलेल्या पत्र व्यवहाराचा तपशील या टिप्पणीमध्ये दिलेला आहे. त्यानुसार एकूण ३६ वेळा हा पत्रव्यवहार केला आहे. त्यामध्ये असे म्हटले आहे की, "दिनांक २६ एप्रिल, २०१८ रोजीच्या पत्रानुसार सर्व गट विकास अधिकारी, पंचायत समिती अकोला जिल्हा यांना पाणी पुरवठ्याच्या ६१ अपूर्ण कामांविषयी तत्कालीन गटविकास अधिकारी व तत्कालीन ग्रामसेवक यांच्या कार्यकालातील माहिती देण्याबाबत कळविण्यात आले आहे." असे करताना निदान आपण हा विषय कधीचा आहे याचा तरी विचार करायला हवा. सन २००४-०५ या वर्षातील ही कामे आहेत आणि असे असताना अजूनही कळविले आहे किंवा त्यांना पोहोचले आहे अशा प्रकारची उत्तरे ऐकण्यासाठी सचिवांची साक्ष समितीने बोलाविलेली नाही. या बाबतीत आपल्याकडून उद्या उत्तर हवे आहे. यामध्ये गटविकास अधिकारी, पंचायत समिती स्तरावरुन रुपये २,५१,९७,३०९/- इतक्या रकमेची माहिती येणे अप्राप्त असल्याचे म्हटले आहे. रकमांचा ताळमेळ जोडला पाहिजे. हा निधी कोठे आहे आणि यामध्ये कोण दोषी आहे हे आम्हाला जाणून घ्यायचे आहे. समितीला याची माहिती मिळणे अपेक्षित आहे. त्यामुळे या बाबतीत सविस्तर माहिती व उत्तर द्यावे. त्याशिवाय समितीचे समाधान होणार नाही.

यावर पाणी पुरवठा विभागाच्या सचिवांनी खुलासा केला की, यामध्ये बाळापूर तालुक्याचा अभ्यास केला असून त्याची माहिती विभागाकडे आहे. सन २००४-०५ मध्ये बाळापूर तालुक्यासाठी १४ योजना घेण्यात आल्या होत्या. त्यापैकी ९ योजनांची कामे प्रत्यक्षात पूर्ण झाली आहेत. २ योजनांची कामे सुरू आहेत आणि ३ योजनांची कामे अपूर्ण आहेत. ही एका तालुक्यापुरती माहिती झाली. मात्र अशा प्रकारची तालुकानिहाय माहिती समितीला उद्या देण्यात येईल.

तद्नंतर समितीने निदेश दिले की, याबद्दल समितीचे समाधान झालेले नाही. त्यामुळे समितीला उद्या यासंबंधी सविस्तर माहिती द्यावी. याचबरोबर अकोला जिल्ह्यामध्ये जेवढ्या राष्ट्रीय पेयजल योजना सुरू आहेत त्यांची सद्य:स्थिती द्यावी.

तद्नंतर समितीने अशी विचारणा केली की, एकूण १५८ अपूर्ण कामांपैकी रु. ४ कोटी इतका निधी उपलब्ध असतानासुद्धा पाणी पुरवठ्याची ७८ कामे अपूर्ण राहण्याची कारणे काय, या प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, त्यात कोण दोषी आढळले, त्यानुसार त्यांचे विरुद्ध काय कारवाई केली, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

७७ अपूर्ण कामांपैकी १६ कामे पूर्ण झालेली आहेत. उर्वरित ६१ कामांचा निधी पंचायत समितीस्तरावर तसेच ग्राम पंचायतस्तरावर उपलब्ध असून, रुपये २,५१,९७,३०९/- निधीबाबत गट विकास अधिकारी पंचायत स्तरावरुन माहिती अप्राप्त आहे.

तद्नंतर पाणी पुरवठा विभागाच्या सचिवांनी खुलासा केला की, सदरहू मुद्याच्या अनुषंगाने काल सूचना दिल्या होत्या. यासंदर्भातील माहिती विस्कळीत झालेली आहे. सद्य:स्थितीत ७७ पैकी २० कामे अपूर्ण आहेत. यासंदर्भात समितीच्या माहितीस्तव विवरण दिलेले आहे. यानंतर समितीने असे मत व्यक्त केले की, सन २००४-२००५ पासूनच्या योजना आहेत. अकोला जिल्ह्यामध्ये पाणी टंचाई आहे. अनियमितता झालेली आहे. सद्य:स्थितीत योजना पूर्ण झालेल्या नाहीत.

समितीने पुढे अशी विचारणा केली की, योजना पूर्ण करण्याची जबाबदारी कोणाची आहे, शासन हा निधी पाणी पुरवठा विभागाकडून देते की सामाजिक न्याय विभागाकडून देते, यावर पाणी पुरवठा विभागाच्या सचिवांनी खुलासा केला की, हा सर्व निधी ग्रामपंचायातीला जातो. यामधील निधी शिल्लक आहे.

समितीने तद्नंतर अशी विचारणा केली की, सामाजिक न्याय विभागाच्या माध्यमातून दलित वस्ती सुधार योजनेंतर्गत गटविकास अधिकारी आणि ग्रामसेवकांचे संलग्न खाते असते त्यामुळे हे सर्व पाहण्याची सामुहीकरीत्या गटविकास अधिकाऱ्यांची एक मोठी जबाबदारी होती. त्या विभागाकडून पैसे आल्यानंतर ते योजनेसाठी उपयोगी झाले किंवा नाही हे देखील पाहण्याची जबाबदारी गटविकास अधिकाऱ्यांचीच होती.

यावर पाणी पुरवठा विभागाच्या सचिवांनी खुलासा केला की, जिल्हा परिषदेने दिलेल्या यादीतील कामे जर पूर्ण झाली नसतील आणि पैशाची उचल झाली असेल तर एक महिन्यामध्ये पूर्ण पथक तयार करून पाणी पुरवठा विभागातर्फे त्याची चौकशी करण्यात येईल. पथक त्या ठिकाणी जाऊन या ७७ योजनांचे परिक्षण करेल.

यानंतर समितीने निदेश दिले की, तालुकानिहाय, गावनिहाय त्या योजनेची तपासणी केली पाहिजे. एक महिन्यामध्ये सर्व चौकशी करून समितीला त्याचा अहवाल सादर करावा. यामध्ये जर कोणी दोषी आढळले तर त्यांच्यावर तात्काळ कारवाईसह अहवाल सादर करावा.

## अभिप्राय व शिफारशी

जिल्हा परिषदेच्या समाज कल्याण विभागामार्फत दलित वस्ती सुधार योजनेअंतर्गत सन २००४-०५ ते सन २०१०-११ पर्यंत अनुदान वितरीत केलेल्या बांधकामांपैकी ३४६ बांधकामे अद्याप अपूर्ण आहेत. तसेच वित्तीय वर्ष सन २०११-१२ मध्ये एकूण रुपये ७,५९,९३,०००/- एवढा निधी उपलब्ध असताना प्रत्यक्षात फक्त रुपये १,१८,९३,९५४/- एवढाचा निधी खर्च झालेला असून रुपये ६,४०,९९,०४६/- एवढा निधी अखर्चित असल्याचे लेखा आक्षेपामध्ये दिसून आले. सामाजिक न्याय विभागाच्या दिनांक १६ ऑक्टोबर, १९९५ च्या शासन निर्णयानुसार दलित वस्ती सुधारणा योजने अंतर्गत प्रशासकीय मंजुरी अंती प्रथम अग्रिम ४०% प्रदान केल्यावर सदरचे बांधकाम ग्रामपंचायतीने ६ महिन्याचे आत पूर्ण करण्याचे बंधनकारक आहे. तसेच बांधकामांचे प्रगतीवर संबंधित गट विकास अधिकारी/पंचायत समितीचे शाखा अभियंता/ग्रामसेवक यांनी नियंत्रण/पर्यवेक्षण करून वेळोवेळी निधी मागणीचा प्रस्ताव आवश्यक त्या अभिलेख्यांसह समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद यांना सादर करणे आवश्यक आहे व त्याचप्रमाणे संबंधितांना वेळीच मुल्यांकनाअंती दुसरा अग्रिम ४० % व काम पूर्ण झाल्यावर व काम पूर्णत्वाचे प्रमाणपत्रानुसार गट विकास अधिकाऱ्यांकडून प्राप्त प्रस्तावाप्रमाणे अंतिमत: २०% अनुदानाचे वितरण आवश्यक असताना वित्तीय वर्ष २००४-०५ ते सन २०१०-११ पर्यंत ३४६ बांधकामे अपूर्ण असल्याने शासन निर्देशांचे उल्लंघन झालेले आहे.

उपरोक्त आक्षेपासंदर्भात प्राप्त लेखी खुलाशानुसार सन २००४-०५ ते सन २०१०-११ पर्यंत दलित वस्ती सुधार योजनेअंतर्गत दलित वस्त्यांमध्ये सिमेंट काँक्रीटचे रस्ते बांधणे, नाली बांधकामे, स्मशानभूमीची बांधकामे, पाणी पुरवठ्याची बांधकामे, समाज मंदीर बांधकामे, पथदिवे अशा प्रकारच्या कामांसाठी एकूण १२६० कामांना मंजुरी देण्यात आलेली होती. त्यापैकी ३४६ कामे अपूर्ण होती, यापैकी १८८ कामे पूर्ण झालेली असून सद्य:स्थितीत १५८ कामे अपूर्ण आहेत. त्यामधील ७८ पाणी पुरवठ्याची कामे असून पाण्याचा स्त्रोत न मिळाल्यामुळे व बोअरवेल कोरडे असल्यामुळे अपूर्ण राहिलेली आहेत. निर्देशानुसार सदर योजनेची काटेकोरपणे अंमलबजावणी न केल्यामुळे संबंधित गटविकास अधिकारी, पंचायत समिती स्तरावरील शाखा अभियंता तसेच ग्रामसेवक यांचेकडून अपूर्ण असलेल्या कामावरील वितरित केलेला निधी वसूल करण्याची कार्यवाही सुरू आहे. सदर योजनेंतर्गत मुलभूत सुविधांसाठी निधी उपलब्ध असताना ५ कोटी ५९ लाख ९३ हजार रुपयांपैकी फक्त १ कोटी १८ लाख ९३ हजार ९५४ रुपये खर्च झाले आणि रुपये ४ कोटी ४० लाख ९९ हजार ४६ रुपये एवढी रक्कम शिल्लक राहिली. **जिल्हा परिषद पिण्याच्या पाण्याच्या बांधकामासाठी निधी खर्च करु शकली नाही. यावरुन जिल्हा परिषदेची प्रशासकीय यंत्रणा अतिशय निष्क्रीय व ढिसाळ असल्याचे दिसून येते. निधीचा गैरवापर करणे, कामे अपूर्ण ठेवणे, अपूर्ण कामांना निधी उपलब्ध करून न देणे या सारख्या बाबींमुळे योजना कार्यान्वित झालेल्या नाहीत या योजनेतील लोकवर्गणी सुद्धा वाया गेलेली आहे त्यामुळे समिती तीव्र नाराजी व्यक्त करीत आहे.**

जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या माहितीनुसार दलित वस्ती सुधार योजनेअंतर्गत अपूर्ण कामांच्या बाबत सर्व तत्कालिन गटविकास अधिकारी, तत्कालिन ग्रामसेवक, तत्कालिन कार्यकारी अभियंता/उप अभियंता, पाणी पुरवठा, उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडे एकूण ३६ वेळा पत्रव्यवहार करून देखील अपूर्ण कामांबाबतची माहिती त्यांनी कळविल्याचे दिसून येत नाही. गटविकास अधिकारी पंचायत समिती स्तरावरुन रुपये २,५१,९७,३०९/- एवढ्या रकमेची माहिती अप्राप्त आहे. सदर रकमांचा ताळमेळ नसल्याने हा निधी निश्चित कोठे आहे तसेच यामध्ये कोण दोषी आहे याबद्दल समितीला माहिती मिळणे अपेक्षित आहे. **सन २००४-०५ मध्ये बाळापूर तालुक्यासाठी घेण्यात आलेल्या १४ योजनांपैकी ९ योजनांची कामे प्रत्यक्षात पूर्ण झाली असून २ योजनांची कामे सुरू आहेत आणि ३ योजनांची कामे अपूर्ण आहेत. अशाप्रकारे अकोला जिल्ह्यातील सर्व तालुकानिहाय माहिती समितीला पाठविण्याचे निदेश देऊनही त्याची पूर्तता करण्यात आलेली नाही. याबाबत समिती तीव्र नाराजी व्यक्त करते. सदर रकमेबाबतची माहिती अद्यापही पाठविली नसल्यामुळे नेमका या रकमेचा ताळमेळ लावला की नाही, या रकमेचे काय करण्यात आले इत्यादी माहिती समितीला विचारात घेता आली नाही. या प्रकरणी माहिती पाठविण्यात दिरंगाई करणाऱ्यांविरुद्ध चौकशी करून कारवाई करावी तसेच उक्त रक्कमेचा ताळमेळ घेऊन संबंधित दोषी अधिकारी/कर्मचारी यांचेविरुद्ध कडक स्वरुपाची कारवाई करण्यात यावी, अशी समितीची शिफारस आहे.**

**सन २००४-०५ पासूनच्या सदर योजना आहेत. अकोला जिल्ह्यात पाणी टंचाई असून अनियमितता झालेल्या योजना अद्यापही पूर्णत्वास गेलेल्या नाहीत. सामाजिक न्याय विभागाच्या माध्यमातून दलित वस्ती सुधार योजनेअंतर्गत गटविकास अधिकारी आणि ग्रामसेवकांचे संलग्न खाते असते त्यामुळे विभागाकडून पैसे आल्यानंतर ते योजनेसाठी उपयोगात आणले अथवा नाही हे पाहण्याची सामुहिक जबाबदारी संबंधित गटविकास अधिकाऱ्यांची आहे. जिल्हा परिषदेने दिलेल्या यादीतील कामे पूर्ण झाली नसतील आणि पैशाची उचल झाली असेल तर संपूर्ण पैसे पाणी पुरवठा विभागाला द्यावे लागतील. त्यामुळे पाणी पुरवठा विभागातर्फे अपूर्ण कामांबाबतची तालुकानिहाय, गावनिहाय तपासणी करण्यात यावी तसेच ७७ योजनांचे परिक्षण चौकशी पथकामार्फत करण्यात यावे आणि उक्त अपूर्ण कामांबाबतची सर्वंकष चौकशी करण्यात यावी व चौकशीनुसार सर्व संबंधितांवर जबाबदारी निश्चित करून त्यांचेविरुद्ध कारवाई करण्यात यावी व याबाबत केलेल्या कारवाईचा अहवाल एक महिन्याच्या आत समितीला पाठविण्यात यावा, अशी समितीची शिफारस आहे.**

प्रकरण पाच

## जिल्हा परिषद, अकोला

## जिल्हा परिषद सेस फंड अंतर्गत इयत्ता दहावी व बारावीतील मुलींना संगणक प्रशिक्षण देणे या योजनेतील अनियमिततेबाबत

**परिच्छेद क्रमांक ३.७१८/७ (सन २०११-१२)**

सन २०११-१२ (परिच्छेद क्रमांक-३) महिला व बाल कल्याण विभाग, जिल्हा परिषद, अकोला यांनी जिल्हा परिषद सेस फंडातुन इयत्ता दहावी व बारावी उत्तीर्ण मुलींना संगणक प्रशिक्षण योजना प्रशासकिय व तांत्रीक मंजुरात घेऊन मिटकॉन कंसल्टंसी लिमीटेड अकोला या संस्थेमार्फत राबविली आहे योजनेसाठी खर्च रक्कम रुपये १६,६३,५५०/- करण्यात आला या बाबत खालील प्रमाणे अभिप्राय आहेत.

१) केवळ सन २००७-०८ करिता लागु असलेल्या उद्योग उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक एसएसआय-२००३/प्रक्र./७९१८/उद्योग-३, दिनांक २९ ऑक्टोबर, २००७ नुसार प्रशिक्षणाकरिता मिटकॉन कंसल्टंसी लिमिटेड, अकोला ची निवड व दर निश्चिती केलेली आहे. सदरचा शासन निर्णय हा सन २००७-०८ मधील उद्योजकता विकास प्रशिक्षण कार्यक्रमाकरिताच लागू आहे. सदर संस्थेची निवड करण्याबाबत सन २०११-१२ करिता महिला व बालकल्याण विभागाचे स्वतंत्र आदेश व दरकरार नाही. विभागाने सदर प्रशिक्षण देणाऱ्या तंत्र शिक्षण विभाग/यांचेकडुन प्रशिक्षण देणाऱ्या शासन मान्य संस्था २) तालुका स्तरावरील उपलब्ध सोयी, ३) प्रशिक्षण कालावधी ४) दर या बाबत माहिती मिळवून त्याप्रमाणे प्रस्ताव बोलावणे आवश्यक होते व तसे करण्याबाबत मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी नस्ती पान क्र.८ वर सूचित करूनही तशी कार्यवाही केलेली नाही, या प्रमाणे कार्यवाही केली असती तर या पेक्षा कमी दर प्राप्त होऊन जास्त ग्रामिण विद्यार्थीनींना लाभ देणे शक्य झाले असते.

२) महिला व बालकल्याण विभाग, जिल्हा परिषद, हिंगोली यांचे आदेश क्रमांक ४०८, दिनांक ३१ डिसेंबर, २०११ नुसार मिटकॉन संस्थेव्दारा सदर माहिती पत्रकानुसार प्रशिक्षण दोन महिने कालावधीचे घेणे बाबत नमुद असतांना ते केवळ एक महिना कालावधीचे घेण्यात आले आहे. तसेच प्रशिक्षणात विद्यार्थीनींकडून घेतलेल्या मध्ये सदर प्रशिक्षण अधिक कालावधीचे असणे आवश्यक होते असा अभिप्राय नमुद केलेला आहे. त्यामुळे एक महिना कालावधीचे प्रशिक्षण योग्य गुणवत्तेचे असल्याबाबत पुर्तता दर्शविणे आवश्यक आहे.

३) महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए-२००८/प्रक्र-४४६/ वित्त ९, दिनांक २० जून, २००८ नुसार विहित वेळापत्रक तसेच करावयाच्या जबाबदारीचे पालन केलेले नाही. लाभार्थी निवड ही महिला व बालकल्याण विभागाने केलेली नाही. मिटकॉन कंसल्टंसीने लाभार्थी अर्ज प्राप्त करवून घेऊन स्वतःच लाभार्थी निवड केलेली आहे. लाभार्थी निवड मिटकॉन कंसल्टंसीने करण्याचे आदेश देऊन जिल्हा परिषदेने जबाबदारी टाळलेली आहे.

४) मिटकॉन कंसल्टंसी यांना दिलेल्या आदेशातील अटी व शर्ती मधील अट क्रमांक १२ ई नुसार ३% अपंग महिलांची निवड केलेली असल्याबाबत व अट क्रमांक ८  नुसार परिक्षा घेऊन त्या बाबतचे प्रमाणपत्र अदा केले असल्याबाबतचा अभिलेख आढळून आलेला नाही.

५) महाराष्ट्र शासन, उद्योग ऊर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय दिनांक २९ ऑक्टोबर, २००७ मुद्या क्र. २ नुसार एका वेळेस जास्तीत जास्त ३० ते ४० विद्यार्थ्यांचे प्रशिक्षण घेण्यात यावे मात्र मुर्तिजापूर, बाळापूर, आकोट येथे प्रति केंद्र ६० प्रशिक्षणार्थी घेतलेले आहेत.

६) निवडक लाभार्थी अर्जाची तपासणी केली असता त्यामध्ये १४ अर्जामध्ये त्रुटी आढळून आल्या, त्यामुळे लाभार्थी निवड योग्य असल्याची पुर्तता दर्शविणे आवश्यक आहे.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, अकोला यांचेकडून खालील प्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

१) प्रशिक्षणाकरिता मिटकॉन लिमिटेड अकोला यांची निवड उद्योग व कामगार विभाग, शासन निर्णय क्र.एसएसआय २००३/प्रक्र.७९१८/उद्योग-३, दिनांक २९ ऑक्टोबर, २००७ नुसार करण्यात आली होती. महिला बाल कल्याण विभागाने स्वतंत्र आदेश व मिटकॉन यांचेशी दर करार करूनच प्रशिक्षणाचे नियोजन केले आहे. मिटकॉन लिमिटेड अकोला यांची निवड उक्त शासन निर्णयामुळे केली असल्यामुळे स्वतंत्रपणे प्रस्ताव बोलाविण्याची आवश्यकता विभागाला वाटली नाही. तेव्हा मिटकॉन लिमिटेड, अकोला यांचेकडील प्रशिक्षण देण्याच्या सोईसुविधा तसेच त्यांचे तालुका स्तरावरील अद्यावत प्रशिक्षण केंद्र पाहता त्यांच्यापेक्षा चांगल्या सोईसुविधा इतर संस्था पुरवू शकत नव्हती, या बाबत खात्री करूनच प्रशिक्षणाचे काम मिटकॉन लिमिटेड, अकोला यांना देण्यात आले असून यामुळे कमी दरात योग्य व प्रभावी सोईसुविधा मिळाल्या नसत्या, विभागाने केलेली कार्यवाही व कंपनीची निवड योग्य असून शासन निर्णय दिनांक २९ ऑक्टोबर, २००७ अन्वये प्रति प्रशिक्षणार्थी रुपये ३०००/- संस्थेस अदा करावे असे नमुद असतांना विभागाने प्रति प्रशिक्षणार्थी रुपये २५००/- या प्रमाणे रक्कम मिटकॉन संस्थेस अदा केलेली आहे. सबब या मध्ये कोणतेही नुकसान झालेले नाही.

२) मिटकॉन संस्थेव्दारे माहिती पत्रकानुसार सदर प्रशिक्षण दोन महिने कालावधीचे घेणे ही बाब जरी नमुद असली तरी सुध्दा सन २०११-१२ या आर्थिक वर्षाचा शेवटचा कालावधी शिल्लक राहीला असल्यामुळे व त्याच आर्थिक वर्षात योजना राबविणे शक्य व्हावे म्हणुन दोन महिन्याऐवजी प्रशिक्षण कालावधी एक महिना करण्यात आला. परंतु प्रशिक्षणाच्या तासिका दुप्पट (५ तास) करून कालावधी भरुन काढण्यात आला आहे व प्रशिक्षणाचे गुणवत्तेवर कोणताही परिणाम झालेला नाही.

३) महिला बालकल्याण विभागामध्ये कर्मचाऱ्यांची अपुरी संख्या असल्याने मागदर्शक सुचना वेळापत्रकानुसार योजना राबविण्यास विलंब झालेला आहे. सदर योजनेचे अर्ज गोळा करण्याची जबाबदारी ही महिला बालकल्याण समितीने मिटकॉन हया संस्थेस दिली होती. परंतु लाभार्थी यादी ही महिला बाल कल्याण समितीमार्फत मंजूर केलेली आहे. योजना पूर्ण करण्यास अवधी कमी असल्यामुळे मिटकॉन संस्थेस यादी गोळा करण्याचे समितीने ठरावानुसार सूचित केले होते. त्यामुळे विभागाने जबाबदारी टाळलेली नसून निकषानुसार योग्य लाभार्थ्यांची निवड केल्याची खात्री करूनच अंतिम यादी करण्यात आली होती.

४) मिटकॉन कन्सल्टंसी यांनी दिलेल्या अटी व शर्ती नुसार प्रशिक्षणार्थीना प्रमाणपत्र देण्यात आलेले आहे. प्रशिक्षणामधे परिक्षा घेण्याचे निश्चित नव्हते. प्रमाणपत्राची प्रत उपलब्ध आहे. अपंग महिला लाभार्थ्यांची वेगळी नोंद ठेवण्यात आली नाही. तथापि, गरजू लाभार्थ्यांना लाभ दिला आहे. यापुढे ३% अपंग निवडीची प्रक्रीया प्राधान्याने करण्यात येईल.

५) इतर पंचायत समिती कडुन लाभार्थीचे अर्ज अपुरे प्राप्त असल्यामुळे मुर्तिजापूर, बाळापूर, अकोट येथे प्रशिक्षणार्थीची संख्या वाढवुन देण्यात आली. तसेच विषय समिती ठराव क्र. ५, दि. ३० जानेवारी, २०१२ नुसार प्रत्येक पंचायत समिती स्तरावर प्रत्येकी ६० प्रशिक्षणार्थी घेण्याबाबत ठरले होते.

६) अर्ज सादर करावयाची जबाबदारी ही मिटकॉन संस्थेची होती. या कार्यालयाकडे अर्ज सादर केल्यानंतर अर्जामध्ये त्रुटी असल्याचे दिसुन आले. त्यानुसार त्रुटीची पुर्ततेबाबत कार्यवाही करण्यांत आली आहे.

## मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष

अकोला जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे महिला व बालकल्याण विभाग जिल्हा परिषद सेस फंडांतर्गत दहावी व बारावी मुलींना संगणक प्रशिक्षण देणे या योजनेतील अनियमिततेबाबत समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिनांक १ जून, २०१७ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, निविदा कार्यवाही करून दर करार निश्चित करण्यात आलेला आहे काय, योजना हाती घेण्याचा उद्देश आर्थिक तरतूद खर्च करण्याचा दिसतो. पाठपुराव्यानुसार

प्रशिक्षण गुणवत्तेचे झालेले दिसत नाही. प्रशिक्षण दिलेल्या विद्यार्थ्यांपैकी किती विद्यार्थी एमएससीआयटी परीक्षा उत्तीर्ण झालेले आहेत.

यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, निविदा मागविण्यात आलेली नाही. मिटकॉन हा महाराष्ट्र शासनाचा उपक्रम असून, त्यांना हे काम देण्यात आले होते. तसेच यासंदर्भात दिनांक १९ ऑक्टोबर, २००७ रोजीचा शासन निर्णय आहे. सदरहू शासन निर्णयानुसार विद्यार्थ्यांना संगणक प्रशिक्षण देण्यात आले होते. मिटकॉनच्या प्रतिनिधींना आजच्या बैठकीस बोलाविण्यात आलेले नाही. या ठिकाणी मिटकॉनचे केंद्र नाही. परंतु त्यावेळी या ठिकाणी मिटकॉनने कार्यालय सुरू केले होते. त्यानुसार त्यांनी विद्यार्थ्यांना प्रशिक्षण दिले होते. तालुका स्तरावर विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देण्यात आले होते. सर्वच पंचायत समितीमध्ये मिटकॉनचे केंद्र होते आणि त्यावेळी तालुका स्तरावर विद्यार्थ्यांना प्रशिक्षण दिले होते.

अकोला येथे मिटकॉनची ३ केंद्रे सुरू करण्यात आली होती. तेल्हारा येथे २, अकोटमध्ये २, बार्शिटाकळीमध्ये २, पातूरला १, मुर्तिजापूर १ आणि बाळापूर येथे ३ मिटकॉनची केंद्रे होती. त्यावेळी एकूण ६८० लाभार्थ्यांना संगणक प्रशिक्षण देण्यात आले होते. यामध्ये एकूण १६ लाख ६३ हजार ५५० रुपयांचा खर्च झालेला आहे. या योजनेसाठी १७ लाख रुपयांची तरतूद होती. प्रती लाभार्थ्यांवर २५०० रुपयांचा खर्च केलेला आहे.

तद्नंतर समितीने विचारणा केली की, प्रशासकीय मंजुरीस विलंब लागण्याची कारणे काय आणि विभागामध्ये अपुरी कर्मचारी संख्या आहे असे कारण देणे संयुक्तिक वाटत नाही, याबाबत समितीला माहिती देण्यात यावी. तसेच अट क्रमांक ८ नुसार परीक्षा घेणे बंधनकारक असताना ती घेण्यात आलेली नसून, त्याची कारणे काय आहेत.

यावर उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, त्यावेळी कार्यरत असणाऱ्या वरिष्ठ लिपिक यांना निलंबित करण्यात आले होते. मिटकॉनला एमएससीआयटीची परीक्षा घेण्याबाबत सांगण्यात आले होते. अट क्रमांक ८ नुसार मिटकॉनने स्वत:च्या शिक्षणानुसार परीक्षा घेतलेली आहे. परीक्षा घेतल्याबाबतचा पुरावा म्हणून परीक्षेत उत्तीर्ण झाल्याबाबतची प्रमाणपत्रे आहेत. विद्यार्थी उत्तीर्ण झालेले असून विद्यार्थ्यांचा गुणानुक्रम लावलेला नाही.

यानंतर समितीने असे मत व्यक्त केले की, विद्यार्थ्यांचा गुणानुक्रम लावणे क्रमप्राप्त होते. संबंधित विद्यार्थ्यांची एमएससीआयटीची परीक्षा न घेतल्याने त्यांचे शैक्षणिकदृष्ट्या नुकसान झालेले आहे. कोणत्याही विद्यार्थ्यांकडे एमएससीआयटीचे सर्टिफिकेट नसल्यामुळे नोकरी मिळताना अडचणी येणार आहेत. त्यांच्याकडे केवळ मिटकॉनचे सर्टिफिकेट आहे. त्यामुळे या योजनेबाबत शासनाचा उद्देश सफल झालेला नाही आणि शासनाच्या निधीचे देखील नुकसान झालेले आहे. तत्कालिन अधिकारी श्री. इनामदार यांना बैठकीस उपस्थित राहण्याबाबत पत्रान्वये कळविण्यात आलेले आहे. असे असताना देखील ते आज आलेले नाही. ते यवतमाळ येथे गट विकास अधिकारी म्हणून कार्यरत आहेत. त्यांच्याकडून खुलासा घेऊन तो समितीच्या अवलोकनार्थ सादर करावा. श्री.इनामदार यांना तात्काळ नोटीस देण्याची कार्यवाही करण्यात यावी. मिटकॉन संस्थेने एसएससीआयटीच्या स्तरावर विभागीय चौकशी करावी आणि त्यासंदर्भातील अहवाल समितीच्या अवलोकनार्थ सादर करावा, अशी सूचना आहे. तसेच या विषयी समिती विभागीय सचिवांची साक्ष आयोजित करणार आहे.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्यांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देण्यासाठी जिल्हा परिषदेने शासन मान्य संस्थेला वगळून दुसऱ्या संस्थेला काम दिल्याने संबंधित अधिकाऱ्यावर नियमानुसार कोणती कार्यवाही करण्यात आली ?

**उपरोक्त मुद्यांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

प्रस्तुत प्रकरणी श्री. जावेद एस. इनामदार, तत्कालिन उप मुख्य कार्यकारी अधिकारी (बाक) तसेच श्री. अभिजित बन्नोरे, तत्कालिन, स.प्र.अ., महिला व बाल कल्याण विभाग, जिल्हा परिषद अकोला यांच्या विभागीय चौकशीचा या कार्यालयाचे पत्र

क्र.जिप/मबाक/आस्था/८२३, दिनांक ४ डिसेंबर, २० १३ अन्वये मा.आयुक्त, अमरावती विभाग, अमरावती यांचे मार्फत शासनास सादर करण्यात आलेला आहे. सद्य:स्थितीत सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने शासन स्तरावरुन कार्यवाही सुरू आहे. शासनाचे पत्र क्र.मविसे-५२१५/प्र.क्र.१०३/आस्था-२, दिनांक १६ फेब्रुवारी, २०१८ च्या पत्रानुसार शासनाने संबंधीत कर्मचारी यांचा सेवा तपशील व प्रत्येकाच्या जबाबदारीनुसार वसुलीबाबतची माहिती मागविण्यात आली होती. त्याअनुषंगाने सदर माहिती या कार्यालयाचे पत्र क्र.जिप/मबाक/ आस्था/१८७, दिनांक २१ मार्च, २०१८ अन्वये शासनास सादर करण्यात आली आहे. सद्य:स्थितीत विभागीय चौकशीचे प्रकरण शासन स्तरावर प्रलंबित आहे.

## मंत्रालयीन विभागाचा अभिप्राय

**ग्रामविकास विभागाचे अभिप्राय :-** (आस्था-२) श्री. जावेद ए. इनामदार, तत्कालिन उप मुख्य कार्यकारी अधिकारी (बाक) व इतर यांचा विभागीय चौकशीचा प्रस्ताव विभागीय आयुक्त, अमरावती यांचे दिनांक १८ मे, २०१५ च्या पत्रान्वये शासनास प्राप्त झाला. तद्नंतर सदर प्रस्ताव सामान्य प्रशासन विभागाकडे पाठविण्यात आला असता सामान्य प्रशासन विभागाने काही मुद्दे उपस्थित केले आहेत. सदर मुद्यांच्या अनुषंगाने शासन पत्र दिनांक १६ मे, २०१७, १६ फेब्रुवारी, २०१८ व २८ मार्च, २०१८ अन्वये माहिती मागविण्यात आले आहे. प्रस्तुत प्रकरणाच्या अनुषंगाने मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद अकोला यांचे दिनांक २१ मार्च, २०१८ चे पत्र शासनास प्राप्त झालेले नाही. सदर पत्र शासनास पुन्हा पाठविण्यात जिल्हा परिषद अकोला कार्यालयास कळविले आहे. सदर पत्र प्राप्त झाल्यानंतर पुढील आवश्यक कार्यवाही तात्काळ करण्यात येईल.

## विभागीय सचिवांची साक्ष

पंचायती राज समितीने अकोला जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यांवर अधिक माहिती घेण्यासाठी दिनांक २९ मे, २०१८ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, महिला व बालकल्याण विभाग जिल्हा परिषद सेस फंड अंतर्गत मुलींना संगणक प्रशिक्षण देणे या योजनेतील अनियमिततेबाबत खुलासा करावा, यावर महिला व बालविकास विभागाच्या सचिवांनी खुलासा केला की, सदर योजना १६ लाख रुपयांची होती. एक्साईज फंड मार्फत योजना राबवण्यात येत होती. सदर योजनेबाबत विभागीय चौकशी करावी असे निर्देश दिले होते. जावेद इनामदार व अभिजित बन्नोर हे निलंबित होते. विभागीय आयुक्तांमार्फत शासनाच्या ग्रामविकास विभागाकडे चौकशीकरिता प्रकरण आले होते. सध्या ते अंतिम टप्प्यात आहे. कोणाची काय जबाबदारी आहे व किती वसुली अनुज्ञेय आहे, ही माहिती जिल्हाधिकाऱ्यांनी दिलेली आहे. आता ग्रामविकास विभागाकडून माहिती येणे बाकी आहे. ग्रामविकास विभागाकडून विभागीय चौकशी होत आहे.

तद्नंतर ग्रामविकास विभागाच्या प्रभारी सचिवांनी खुलासा केला की, काही माहिती मागवली आहे. ६ महिन्याचा कालावधी लागेल.

## अभिप्राय व शिफारशी

जिल्हा परिषद सेस फंडांतर्गत इयत्ता दहावी व बारावीतील मुलींना संगणक प्रशिक्षण देणे या योजनेच्या लेखापरिक्षणामध्ये असे आढळून आले आहे की, केवळ सन २००७-०८ करिता लागू असलेल्या उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाच्या दिनांक २९ ऑक्टोबर २००७ रोजीच्या शासन निर्णयानुसार प्रशिक्षणाकरिता मिटकॉन कन्सलटन्सी लिमिटेड, अकोला यांची निवड करून दरनिश्चिती केलेली होती. सन २०११-१२ करिता स्वतंत्र आदेश व दरकरार नसल्यामुळे तंत्र शिक्षण विभागाकडून प्रशिक्षण देणाऱ्या शासन मान्य संस्था, तालुकास्तरावरील उपलब्ध सोयी, प्रशिक्षण कालावधी, दर याबाबत माहिती मिळवून त्याप्रमाणे प्रस्ताव मागविणे आवश्यक होते व तसे करण्याबाबत मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी सूचित करूनही तशी कार्यवाही केलेली नाही. मिटकॉन संस्थेद्वारा प्रशिक्षण कालावधी दोन महिने नमूद असताना केवळ १ महिना कालावधीचे प्रशिक्षण घेण्यात आले आहे. लाभार्थीची निवड मिटकॉन कन्सल्टन्सीने करण्याचे आदेश देऊन जिल्हा परिषदेने मिटकॉन कन्सल्टंन्सीवर जबाबदारी टाकली आहे. मिटकॉन कन्सलटन्सी यांना दिलेल्या आदेशातील अटी व शर्तीनुसार ३% अपंग महिलांची निवड केलेली

असल्याबाबतचा अभिलेख आढळून आलेला नाही, एकावेळेस ३० ते ४० विद्यार्थ्यांचे प्रशिक्षण घेण्यात यावे असा शासन निर्णय असताना मुर्तिजापूर, बाळापूर, अकोट येथे प्रति केंद्र ६० प्रशिक्षणार्थी घेतलेले आहेत. लाभार्थ्यांच्या निवड केलेल्या अर्जातील १४ अर्जांमध्ये त्रुटी आढळून आल्या. त्यामुळे लाभार्थी निवड योग्य असल्याची पुर्तता दर्शविणे आवश्यक होते. या योजनेसाठी रुपये १६,६३,५५०/- एवढी रक्कम खर्च करण्यात आली आहे.

या आक्षेपासंदर्भात जिल्हा परिषद, अकोला यांचेकडून प्राप्त लेखी खुलाश्यानुसार मिटकॉन लिमिटेड, अकोला यांचेकडील प्रशिक्षण देण्याच्या सोईसुविधा तसेच तालुकास्तरावरील अद्ययावत प्रशिक्षण केंद्र पहाता मिटकॉन लिमिटेड पेक्षा चांगल्या सोईसुविधा इतर संस्था पुरवू शकत नव्हती. शासन निर्णयानुसार प्रति प्रशिक्षणार्थी रुपये ३०००/- संस्थेस अदा करावे असे नमूद असताना विभागाने प्रति प्रशिक्षणार्थी रुपये २५००/- प्रमाणे मिटकॉन लिमिटेड या संस्थेस रक्कम अदा केलेली आहे. प्रशिक्षणाचा कालावधी तासिका दुप्पट (५ तास) करून भरून काढण्यात आला आहे, लाभार्थ्यांची यादी महिला व बाल कल्याण समितीमार्फत मंजूर केलेली आहे. अपंग महिला लाभार्थ्यांची वेगळी नोंद ठेवण्यात आली नाही, यापुढे ३% अपंग निवडीची प्रक्रिया प्राधान्याने राबविण्यात येईल. इतर पंचायत समित्यांकडून लाभार्थीचे अर्ज अपूर्ण स्वरूपात प्राप्त झाल्यामुळे मुर्तिजापूर, बाळापूर, अकोट पंचायत समितीमध्ये प्रत्येकी ६० प्रशिक्षणार्थी घेण्यात आले. अर्जाच्या त्रुटींच्या पूर्ततेबाबत कार्यवाही करण्यात आली आहे. असा जिल्हा परिषदेच्या वतीने केलेला खुलासा समाधानकारक नसल्याचे समितीचे मत आहे. समितीच्या मते योजना हाती घेण्याचा उद्देश आर्थिक तरतूद करण्याचा दिसून येतो. पाठपुराव्यानुसार विद्यार्थ्यांचे प्रशिक्षण गुणवत्तापूर्ण झालेले दिसून येत नाही. मिटकॉन लिमिटेडने घेतलेल्या परिक्षेमध्ये उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचा गुणानुक्रम लावणे क्रमप्राप्त होते. परंतु गुणानुक्रम लावलेला नाही. संबंधित विद्यार्थ्यांची एमएससीआयटी परीक्षा न घेतल्याने त्यांचे शैक्षणिकदृष्ट्या नुकसान झालेले आहे. कोणत्याही विद्यार्थ्यांकडे एमएससीआयटी उत्तीर्ण असल्याबाबतचे प्रमाणपत्र नसल्यामुळे संबंधित विद्यार्थ्यांना नोकरी मिळविण्यासाठी तांत्रिक अडचणी उद् भवणार आहेत त्यामुळे या योजनेचा उद्देश व हेतू सफल झालेला नाही आणि शासनाच्या निधीचे देखील नुकसान झालेले आहे.

**प्रस्तुत प्रकरणी तत्कालिन उप मुख्य कार्यकारी अधिकारी (बालकल्याण) तसेच तत्कालिन, सहाय्यक प्रशासन अधिकारी (महिला व बालकल्याण विभाग) यांना निलंबित करण्यात आले होते. सध्या विभागीय आयुक्तांमार्फत शासनाच्या ग्रामविकास विभागाकडे हे प्रकरण पुढील कारवाईसाठी प्रलंबित आहे. प्रस्तुत प्रकरण सन २००७-२००८ मधील असून या प्रकरणाबाबत ग्रामविकास विभागाने कार्यवाही करणे अपेक्षित होते. मात्र सुमारे १० वर्षांच्या प्रदिर्घ कालावधीनंतरही याप्रकरणी कोणतीही कार्यवाही न होणे ही बाब अनाकलनीय व खेदजनक असल्याचे समितीचे मत असून याप्रकरणी संबंधितांची चौकशी करून त्याद्वारे दोषी आढळल्यास संबंधितांवर जबाबदारी निश्चित करून त्यांचेविरुद्ध कठोर कारवाई करण्यात यावी तसेच संबंधितांकडून किती रुपयांची वसुली करण्यात आली आहे इ. याबाबतचा कार्यवाही अहवाल समितीस एक महिन्याच्या आत सादर करण्यात यावा, अशी समितीची शिफारस आहे.**

प्रकरण सहा

## जिल्हा परिषद, अकोला

## जिल्हा परिषद उपकर निधीतून इयत्ता ५ वी ते १० वी पर्यंतच्या मुलींना १०० टक्के अनुदानावर लेडीज सायकल पुरविणे या योजनेतील अनियमिततेबाबत

### परिच्छेद क्रमांक ३.७२१/७ (सन २०११-१२)

जिल्हा परिषद उपकर निधीतून वर्ग ५ वी ते १० वी मध्ये शिकणाऱ्या मुलींना १००% अनुदानावर लेडीज सायकल पुरविणे या योजनेतील अनियमिततेबाबत.

महिला व बालकल्याण विभाग जि.प. अकोला यांनी जि.प. सेस फंडातून वर्ग ५ वी ते १० वी मध्ये शिकणाऱ्या मुलींना १००% अनुदानावर लेडीज सायकल पुरविणेबाबत योजनेला प्रशासकीय व तांत्रिक मंजुरात घेऊन व लाभार्थी निवडीला मंजुरात घेऊन दरकरारावर स्वस्तीक एन्टरप्रायजेस यांना ५०९ नग सायकलीचा पुरवठा आदेश देऊन रुपये १३,२३,३०९/- एवढा खर्च सन २०११-२०१२ मध्ये नमूद केलेला आहे याबाबत खालील प्रमाणे अभिप्राय आहेत.

(१) दर करारातील अटी नुसार साहित्य पुरवठा प्रति आठवडा विलंबाबाबत १/२ % दराने दंड वसूल करणे आवश्यक आहे. पातूर पंचायत समितीच्या साठा पुस्तकानुसार सदर साहित्य दिनांक १८ एप्रिल, २०११ ला म्हणजे ३ आठवडे उशिरा प्राप्त झालेले असतांना एकाच आठवड्याची रक्कम वसूल करण्यात आलेली आहे. तेव्हा उर्वरित २ आठवड्यांची रक्कम रुपये ३,३७५/- वसूल करणे आवश्यक आहे. तसेच अकोट पंचायत समितीच्या साठापुस्तकानुसार दिनांक २१ ऑक्टोबर, २०११ ला म्हणजे ७ महीने उशिरा पुरवठा झालेला आहे.

(२) दरकरारानुसार अतिरिक्त साहित्य बेल, स्टॅन्ड कॅरियर चेन ई. देणे बधंनकारक असताना सदर साहित्य प्राप्त झाल्याबाबत संबधिताच्या साठा पुस्तकांत याबाबत नोंद नाही.

(३) सदर पुरवठा केलेल्या सायकलीची औद्योगिक प्रशिक्षण संस्थेकडून तपासणी केल्याचे प्रमाणपत्र घेण्यात आलेले नाही.

(४) सदर योजना महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक डपीए-२००८/प्र.क्र.४४६/वित्त-९ दिनांक २० जून २००८ नुसार योजना विहित वेळापत्रकानुसार राबविण्यात आलेली नाही.

(५) सदर साहित्य त्याच वित्तीय वर्षात वाटप करणे आवश्यक असताना पंचायत समिती बाळापूरच्या ८ नग, अकोला ग्रामिण-१ च्या ३७ नग व अकोट १५ नग सायकली लेखा परिक्षण कालावधीपर्यंत शिल्लक आहेत.

(६) पंचायत समिती अकोट येथील साठा पुस्तकावर साहित्य प्राप्त झाले यावर वितरणावर बालविकास प्रकल्प अधिकारी यांची स्वाक्षरी नाही. लाभार्थी अर्ज लेखापरीक्षणास सादर केलेले नाही तसेच साठा पुस्तकात ७ लाभार्थ्यांच्या सायकल प्राप्त म्हणून स्वाक्षरी घेतलेल्या नाही.

(७) तेल्हारा प्रकल्पाचे साठा पुस्तक अर्धसास पत्र क्रमांक ५ दिनांक १७ नोव्हेंबर २०१२ नुसार मागणी करूनदेखील लेखा परीक्षणास सादर केलेले नाही.

(८) योजनेकरिता लाभार्थी अर्ज माहे जुलै, २००९ मध्ये घेण्यात आलेले असून योजना राबवून साठा पुस्तकानुसार त्याचे वाटप माहे ऑक्टोबर, २०११ मध्ये झालेले आहेत निवडक तपासणी केलेल्या लाभार्थी अर्जापैकी २२ विद्यार्थीनींना या जुलै, २००९ मध्ये वर्ग ९ मध्ये शिकत असलेल्या आहेत माहे ऑक्टोबर, २०११ पर्यंत त्यांचे शालेय शिक्षण संपलेले आहे. विभागाच्या प्रशासकीय दिरंगाईमुळे योजनेचा उद्देश सफल झालेला नाही. वर्ग ९ मध्ये शिकत असणाऱ्या २२ लाभार्थ्यांची सायकल खर्च रुपये ५९,४००/- वसूल करणे आवश्यक आहे.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, अकोला यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

महिला व बालकल्याण विभागातील परिच्छेदाचे अनुपालन सादर करण्याकरिता या विभागामधील नस्ती आढळून आल्या नाहीत, त्या करिता उप मुख्य कार्यकारी अधिकारी, (बालकल्याण) यांचे समवेत या विभागातील अधिकारी / कर्मचारी यांनी बराच शोध घेतला परंतु नस्ती आढळून आल्या नाहीत.

या बाबत उप मुख्य कार्यकारी अधिकारी, (बालकल्याण) यांचे आदेश क्रमांक/जिप/ मबाक/कावि/२६/२०१६ दिनांक १३ जानेवारी, २०१६ अन्वये संबधितास कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली आहे. त्या अनुषंगाने संबंधितांकडून समाधानकारक खुलासा प्राप्त झाल्यास किंवा नस्ती उपलब्ध करून न दिल्यास या सबंधात सबंधित कर्मचारी / अधिका-यांवर मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद, अकोला यांचे पूर्व मंजुरीने पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा नोंदवून फौजदारी कार्यवाही करण्याचे प्रस्तावित आहे. तसेच मध्यंतरी नस्ती उपलब्ध झाल्यास लेखापरिच्छेदामध्ये नोंदविलेल्या आक्षेपाचे अनुषंगाने सुधारित अनुपालन सादर करण्यात येईल.

**मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष**

अकोला जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिनांक १ जून २०१७ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, जिल्हा परिषद उपकर निधीतून इयत्ता ५ वी ते १० वीत शिकणाऱ्या मुलींना १०० टक्के अनुदानावर लेडीज सायकल पुरविणे या योजनेतील अनियमिततेबाबत पंचायत समिती तेल्हारा व अकोट येथे लेखापरीक्षणासाठी लाभार्थी प्रस्ताव व साठा नोंदवही उपलब्ध का करून देण्यात आली नाही, पंचायत समिती बाळापूर येथील शिल्लक लेडीज सायकल वितरित करण्यात आल्या आहेत अगर कसे, यावर उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, पंचायत समिती तेल्हारा, अकोट व बाळापूर यांना नोटीसा दिलेल्या आहेत. काही पंचायत समितीमध्ये सायकलची नस्ती प्राप्त झाली नाही. हे सर्व वाटप पंचायत समिती स्तरावर वाटप झाले आहे. ज्या पंचायत समितीने वाटप केले नाही त्यांना कारणे दाखवा नोटीस दिली आहे. ज्या ठिकाणी अनियमितता झाली आहे त्याबाबत एफआयआर नोंदविण्याची कार्यवाही करण्यात येईल.

तद्नंतर समितीने सूचित केले की, यासंदर्भात सविस्तर चौकशी करून सदर अहवाल एक महिन्यात समिती शाखेला उपलब्ध करून देण्यात यावा, त्यानंतर विभागीय सचिवांची साक्ष घेण्यात येईल.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्यांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

पंचायत समिती तेल्हारा, अकोट बाळापूर यांना नोटीसा देऊनही सायकलची नस्ती प्राप्त न होणे, तसेच सर्व पंचायत समिती स्तरावर सायकलींचे वाटप केले नाही. त्यांना कारणे दाखवा नोटीस दिलेली असून याबाबत एफआयआर नोंदविण्यात येऊन त्याबाबत संबंधीतांविरुद्ध कोणती कार्यवाही करण्यात आली ?

**उपरोक्त मुद्यांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

याबाबतच्या नस्तीचा कार्यालयात शोध घेण्यात आला असता सदर नस्ती कार्यालयात आढळून आली नाही.

प्रस्तुत प्रकरणी श्री.जावेद इनामदार, तत्कालिन उप मुख्य कार्यकारी अधिकारी, (मबाक) तसेच अभिजित बन्नोरे, तत्कालिन स.प्र.अ.यांच्या विभागीय चौकशीचा प्रस्ताव मा.आयुक्त अमरावती यांचे कार्यालयाकडे पत्र क्र.जाक्र.जिप/मबाक/आस्था ८२३ दिनांक ४ डिसेंबर, २०१३ अन्वये सादर करण्यात आला आहे.

## मंत्रालयीन विभागाचा अभिप्राय

**ग्रामविकास विभागाचे अभिप्राय :-** (वित्त-३) जिल्हा परिषदेने केलेल्या कार्यवाहीशी सहमत

## विभागीय सचिवांची साक्ष

पंचायती राज समितीने अकोला जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यांवर अधिक माहिती घेण्यासाठी दिनांक २९ मे, २०१८ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, जिल्हा परिषद, उपकर निधीतून इयत्ता ५ वी ते १० वीतील मुलींना १०० टक्के अनुदानावर लेडीज सायकल पुरविणे या योजनेतील अनियमिततेबाबत खुलासा करावा.

यावर महिला व बालविकास विभागाच्या सचिवांनी खुलासा केला की, ही १२ लाख रुपयांची योजना होती. या संदर्भातील मूळ नस्ती गहाळ झालेली आहे. ती अद्याप सापडलेली नाही. नस्ती सापडत नसल्यामुळे सत्य परिस्थिती बाहेर येणार नाही. या बाबतचे पुरावे गोळा केले जात आहेत. त्या संबंधी मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी निर्देश दिलेले आहेत. श्री. जावेद, हे तत्कालिन उप मुख्य कार्यकारी अधिकारी आहेत. त्यांनी या नस्तीचा शोध घेणे अपेक्षित होते. तसेच नस्ती गहाळ झाल्यानंतर एफआयआर नोंदवणे आवश्यक होते, मात्र ते अद्याप केलेले नाही. सन २०१३ नंतर ४-५ अधिकारी बदलून गेलेले आहेत.

तद्नंतर समितीने विचारणा केली की, जुन्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांना आपण कळविले होते काय, यावर सचिव, महिला व बालविकास विभाग यांनी विदित केले की, तत्कालिन मुख्य कार्यकारी अधिकारी यांना कळविले नाही. नवीन मुख्य कार्यकारी अधिकारी यांना कळविले होते.

तद्नंतर समितीने सूचित केले की, हा विषय सन २०११-१२ मधील आहे. या संदर्भात कारवाई करण्यास एवढा उशीर का झालेला आहे ? १२ लाख रुपयांचा विषय आहे.या बाबत तात्काळ कारवाई होणे अपेक्षित होते.

यानंतर महिला व बालविकास विभागाच्या सचिवांनी खुलासा केला की, या संबंधी जिल्हापरिषद व विभागीय स्तरावर प्रक्रिया सुरू असल्यामुळे सचिव स्तरावर माहिती आली नाही. नस्ती गायब होणे ही बाब अतिशय गंभीर आहे. या संबंधी कारवाई करण्यास उशीर झालेला आहे, ही बाब खरी आहे.

तद्नंतर ग्रामविकास विभागाच्या प्रभारी सचिवांनी खुलासा केला की, दिनांक २८ मे, २०१८ रोजी अज्ञात व्यक्तीच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यास अधिकाऱ्यांना सांगितले आहे. गहाळ झाल्याची तक्रार करणे गरजेचे आहे. यावर समितीने विचारणा केली की, एक वर्षापूर्वी समितीची साक्ष झाली होती त्यावेळी असे सांगितले होते की, फौजदारी गुन्हा दाखल करतो. एक वर्ष होऊन देखील गुन्हा दाखल झालेला नाही, याला कोण जबाबदार आहे, दोषींना कोण पाठीशी घालत आहे.

तद्नंतर महिला व बालविकास विभागाच्या सचिवांनी विदित केले की, महिला व बाल कल्याण अधिकारी श्री.जावेद यांची ही जबाबदारी होती. आज दिनांक २९ मे, २०१८ रोजी समितीची बैठक असून हा विषय समोर येणार असल्यामुळे ते १५ दिवस वैद्यकीय रजेवर गेले आहेत.

या उत्तरावर समितीने विचारणा केली की, दिनांक ४ डिसेंबर, २०१३ मधील आयुक्तांचे पत्र आहे. आता सन २०१८ सुरू आहे. या प्रकरणास ५ वर्षे एवढा विलंब होण्याची कारणे काय आहेत, अनुपालन अहवाल असल्यामुळे आता स्पष्ट कारवाई काय करण्यात आली हे समिती समोर सांगणे आवश्यक आहे. या प्रकरणात अनियमितता झालेली आहे. कारवाई करणे आवश्यक आहे.

यावर ग्रामविकास विभागाच्या प्रभारी सचिवांनी खुलासा केला की, अद्याप सामान्य प्रशासन विभागाकडून प्रकरण आलेले नाही. १ ते ४ प्रपत्रातील दोन्ही मुद्दे एकाच व्यक्तीशी निगडित आहेत. या बाबत ६ महिन्यांत चौकशी केली जाईल. ६ महिन्यांत कारवाईसह अहवाल सादर करू. विभागीय चौकशी ६ महिन्यांत पूर्ण करावी लागते. तद्नंतर महिला व बालविकास विभागाच्या सचिवांनी खुलासा केला की, नस्ती गहाळ होणे व अपहार होणे या दोन्ही प्रकरणाबाबत ६ दिवसांत अहवाल सादर केला जाईल. या

दोन्ही गोष्टी समांतर चालू राहू शकतात. श्री. जावेद निलंबित आहेत. विभागीय चौकशी माझ्या अधिकारात नाही तो विषय ग्रामविकास विभागाकडे आहे. यावर समितीने सूचित केले की, या संदर्भात लवकरात लवकर विभागीय चौकशी करून समितीला अहवाल सादर करावा.

## अभिप्राय व शिफारशी

जिल्हा परिषद उपकर निधीतून इयत्ता ५ वी ते १० वीतील मुलींना १०० टक्के अनुदानावर लेडीज सायकल पुरविणे ही योजना दरकरारावर मे. स्वस्तिक एंटरप्रायजेस यांचेमार्फत ५०९ नग सायकलींचा पुरवठा आदेश देऊन रुपये १३,२३,३०९/- एवढा खर्च सन २०११-१२ मध्ये नमूद केलेला आहे. सदर योजनेसंदर्भात खालीलप्रमाणे आक्षेप घेण्यात आलेले आहेत.

दर करारातील अटीनुसार पातुर पंचायत समितीच्या साठा पुस्तकाच्या नोंदीवरून ३ आठवडे विलंबाने साहित्य पुरवठा झाल्यामुळे २ आठवड्याचे विलंब शुल्क रुपये ३३७५/- वसूल करणे आवश्यक आहे तसेच अकोट पंचायत समितीच्या साठा पुस्तकानुसार ७ महिने विलंबाने साहित्य पुरवठा झालेला आहे. दरकरारानुसार अतिरिक्त साहित्य बेल, स्टॅन्ड, कॅरियर, चेन इत्यादी देणे बंधनकारक असताना ते साहित्य प्राप्त झाल्याबाबत संबंधितांच्या साठा पुस्तकात नोंद नाही तसेच सायकलींची औद्योगिक प्रशिक्षण संस्थेकडून तपासणी केल्याचे प्रमाणपत्र देखील घेण्यात आलेले नाही. पंचायत समिती, बाळापूरच्या ८ नग, अकोला ग्रामीण-१ च्या ३७ नग, व अकोटच्या १५ नग सायकली अशा एकूण ६० लेडीज सायकली लेखा परिक्षण कालावधीपर्यंत शिल्लक होत्या. तद्वतच लाभार्थी अर्ज लेखापरीक्षणास सादर केलेले नाहीत. तेल्हारा प्रकल्पाचे साठा पुस्तक मागणी करून देखील लेखा परीक्षणास सादर केलेले नाही. लाभार्थी अर्जापैकी वर्ग ९ मध्ये शिकत असलेल्या २२ विद्यार्थिनींना माहे जुलै, २०११ मध्ये सायकलींचे वाटप केलेले आहे. या प्रशासकीय दिरंगाईमुळे योजनेचा उद्देश सफल झालेला नाही.

उपरोक्त आक्षेपासंदर्भात जिल्हा परिषद, अकोला यांचेकडून प्राप्त लेखी खुलाशाच्या अनुषंगाने घेण्यात आलेल्या साक्षीदरम्यान समितीच्या असे निदर्शनास आले आहे की, पंचायत समिती, तेल्हारा, अकोट व बाळापूर येथे लेखापरीक्षणासाठी लाभार्थी प्रस्ताव व साठा नोंदवह्या उपलब्ध करून देण्यात आलेल्या नाहीत, त्यामुळे त्याठिकाणी अनियमितता झालेली आहे असे समजण्यास वाव आहे. याव्यतिरिक्त जिल्ह्यातील काही ठिकाणी पंचायत समित्यांनी सायकलचे वाटप केलेले नाही, त्यामुळे इयत्ता ५ वी ते १० वीतील मुलींना १०० टक्के अनुदानावरील लेडीज सायकल मिळण्यापासून वंचित रहावे लागणे ही बाब अत्यंत गंभीर व चिंताजनक आहे, याबद्दल समिती तीव्र नापसंती व्यक्त करीत आहे.

प्रस्तुत प्रकरणी संबंधितांवर फक्त कारणे दाखवा नोटीस बजावून कार्यवाही पूर्ण होऊ शकत नाही. कारण लेखापरिक्षणासाठी लाभार्थी प्रस्ताव व साठा नोंदवही उपलब्ध करून न दिल्याप्रकरणी तसेच ज्या पंचायत समित्यांनी सायकल वाटप केलेले नाही व मूळ नस्ती गहाळ केल्याप्रकरणी दस्तऐवज/अभिलेखे यामध्ये गुंतलेली रक्कम मोठी असल्याने चौकशी करण्यात यावी तसेच लेखा परीक्षणास कागदपत्रे उपलब्ध करून न दिल्यामुळे संबंधितांवर प्रशासकीय व दंडात्मक कारवाई करण्यात यावी तसेच संबंधित व्यक्तीची एक वेतनवाढ रद्द करून सेवापुस्तिकेमध्ये तशी नोंद घ्यावी तसेच प्रकरण गंभीर असल्याचे चौकशीमध्ये निष्पन्न झाल्यास फौजदारी कारवाई देखील करण्यात यावी. **प्रस्तुत प्रकरणी तत्कालीन उप मुख्य कार्यकारी अधिकारी (महिला व बालकल्याण विभाग) आणि सहाय्यक प्रशासन अधिकारी यांच्या विभागीय चौकशीचा प्रस्ताव आयुक्त, अमरावती विभाग यांचे कार्यालयाकडे दिनांक ४ डिसेंबर, २०१३ रोजी सादर केलेला आहे. सदरची विभागीय चौकशी तातडीने निकाली काढण्यात यावी तसेच या याप्रकरणी चौकशीमध्ये दोषी आढळून आल्यास संबंधितांविरुद्ध कडक स्वरूपाची कारवाई करण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे व याबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीस एक महिन्याच्या आत पाठविण्यात यावा.**

प्रकरण सात

## जिल्हा परिषद, अकोला

## सर्वसाधारण शेतकऱ्यांना ५० टक्के अनुदानावर पी.व्ही.सी. पाईप वाटप योजना न राबविणेबाबत (पंचायत समिती, बार्शिटाकळी)

**परिच्छेद क्रमांक ४.२३५/३ (सन २०११-१२)**

पंचायत समिती, बार्शिटाकळी येथे सर्वसाधारण शेतकऱ्यांना ५० टक्के अनुदानावर पी.व्ही.सी.पाईप वाटप योजना न राबविणेबाबत :--

पंचायत समिती बार्शिटाकळी येथे सर्वसाधारण शेतकऱ्यांना ५० टक्के अनुदानावर पी.व्ही.सी. पाईप वाटप योजनेकरिता अंदाजपत्रकीय प्राप्त तरतूद रू १,५०,०००/- मधून रक्कम रुपये १,४९,९२८/- चे पुरवठा आदेश दिले आहेत याबाबीत खालील प्रमाणे अभिप्राय आहेत.

१) योजनेच्या आदेशामध्ये प्रशासकीय व तांत्रिक मान्यतेचा क्रमाक व दिनांक नमूद केलेला नाही.

२) योजनेच्या टिपणीनुसार ५३ लाभार्थ्यांची निवड करण्यात आल्याची आढळते मात्र अधिकृत यादी लेखा परीक्षणास सादर केली नाही. निवड यादी लेखा परीक्षणास सादर करणे आवश्यक आहे.

३) साहित्याचा पुरवठा आदेशातील अटी व शर्तीनुसार साहित्य प्राप्त न होता निकृष्ट दर्जाचे प्राप्त झाल्याने साहित्य परत केल्याचे नमुद आहे. साहित्य निकृष्ट दर्जाचे प्राप्त झाले असतांनाही प्रदानार्थ देयक सादर करण्याचे प्रयोजन काय, जोपर्यंत पुरवठा केलेले साहित्य आदेशातील अटी व शर्ती नुसार व चांगल्या स्थितीत प्राप्त होत नाही व तसे प्रमाणपत्र उप प्रमाणकावर नोंदवून देयक सादर करत नाही तोपर्यत देयक प्रदानार्थ सादर करणे नियमात धरून नाही. म्हणजेच संबधितांना साहित्य पुरवठा होण्यापूर्वीच चुकीच्या प्रमाणपत्राच्या आधारे देयक सादर केल्याचे स्पष्ट होते. नियम बाहयतेबाबत खुलासा सादर होणे आवश्यक आहे.

४) सदर योजने अंतर्गत वसूल करण्यात आलेला लाभार्थी हिस्सा लेखा परीक्षण कालावधीपर्यत संबधितांना परत करण्यात आलेला नाही.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, अकोला यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

१) योजनेस तांत्रिक व प्रशासकीय मान्यता गट विकास अधिकारी, पंचायत समिती, बार्शिटाकळी यांनी प्रदान केलेली आहे. हस्तलिखित प्रतीवर तांत्रिक व प्रशासकीय आदेश क्रमांक व दिनांक घेण्यात आलेला आहे, परंतु अनावधानाने आदेशाच्या प्रतीवर तांत्रिक व प्रशासकीय आदेश क्रमांक व दिनांक नमुद केल्याचे राहून गेले होते.

२) पंचायत समिती सर्वसाधारण सभा दिनांक २० मार्च, २०१२ चे ठराव क्र. ३ नुसार ५३ लाभार्थ्याच्या यादीस मंजुरी प्रदान करण्यात आलेली असून ठरावासह निवड यादी उपलब्ध आहे.

३) पी.व्ही.सी. पाईप पुरवठा आदेश हा महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळ, अकोला यांना दिलेला होता. संबधीत फर्मने साहित्याचा पुरवठा केला त्या अनुषंगाने देयक तयार करून लेखा विभागास सादर करण्यात आले. तथापि प्राप्त साहित्य समाधानकारक नसल्यामुळे तसेच त्याबाबत सभापती, उपसभापती व शेतकऱ्यांनी तक्रारी केल्यामुळे साहित्य परत करण्यात आले व सबंधित फर्मचा धनादेश रद्द करण्यात आला. याबाबत त्यांना कोणतेही प्रदान करण्यात आले नाही.

४) सदरहू योजने अंतर्गत वसूल करण्यांत आलेला लाभार्थी हिस्सा हा धनादेशाद्वारे लाभार्थींना परत करण्यात आलेला आहे.

## मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष

अकोला जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिनांक १ जून, २०१७ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, बार्शिटाकळी-सर्वसाधारण शेतकऱ्यांना ५० टक्के अनुदानावर पी.व्ही.सी. पाईप वाटप योजनेंतर्गत पुरवठादाराने साहित्य केव्हा पुरविले, साहित्याचा दर्जा समाधानकारक नाही हे केव्हा लक्षात आले, किती शेतकऱ्यांच्या तक्रारी प्राप्त झाल्या, साहित्यामध्ये कोणता दोष होता, देयक सादर करण्यापूर्वी सदर दोष निदर्शनास आला नव्हता काय, यावर गटविकास अधिकारी, पंचायत समिती, बार्शिटाकळी यांनी खुलासा केला की, पी.व्ही.सी.पाईप पुरवठा आदेश महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळ, अकोला यांना दिला होता. संबंधित फर्मने साहित्याचा पुरवठा केला होता. परंतु सदर पीव्हीसी पाईप दर्जेदार नाहीत अशा तक्रारी प्राप्त झाल्या असल्यामुळे सदर साहित्य परत घेण्यात आले. लाभार्थ्यांचा हिस्सा घेण्यात आला होता तो परत करण्यात आला.

या उत्तरानंतर समितीने विचारणा केली की, सदर साहित्य निकृष्ठ दर्जाचे असल्यामुळे महामंडळावर काय कारवाई करण्यात आली, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, लघुउद्योग विकास महामंडळ हे महाराष्ट्र शासनाचे आहे. त्यांच्याकडून निधी परत घेण्यात आला आहे. त्यामुळे लाभार्थ्यांना लाभ देता आलेला नाही.

तद्नंतर समितीने विचारणा केली की, त्या बदल्यात लाभार्थ्यांना दुसरा लाभ देण्यात आला होता काय, लघुउद्योग विकास महामंडळाने पाईपचा पुरवठा निकृष्ट दर्जाचा केल्यामुळे तो महामंडळाचा दोष आहे. त्यासाठी महामंडळ जबाबदार आहे. त्यामुळे लाभार्थी शेतकरी वंचित राहिले आहेत. ही बाब शासनाच्या निदर्शनास आणली आहे काय, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, सन २०१२-१३ मध्ये पंचायत समिती सेस फंडातून हे साहित्य वाटपाचे नियोजन करण्यात आले होते. त्या पुढील वर्षात १ लाख ५० हजार रुपयांचे साहित्य वाटण्यात आले आहे. महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळ यांनी वेळेत व दर्जेदार साहित्याचा पुरवठा करणे अपेक्षित आहे. शेतकऱ्यांच्या तक्रारी प्राप्त झाल्यानंतर महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळाकडे पत्र पाठवून विचारणा करण्यात आली आहे. त्यांचा खुलासा प्राप्त झालेला नाही.

या उत्तरानंतर समितीने सूचित केले की, जे साहित्य शेतकऱ्यांना मिळणे आवश्यक होते, ते महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळाकडून दर्जेदार मिळाले नाही. त्यामुळे शेतकऱ्यांचा फायदा झाला नाही. यासंदर्भात ज्या अधिकाऱ्यांनी हलगर्जीपणा केला त्यांच्यावर कारवाई करण्यात यावी. महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळाकडून दर्जेदार साहित्याचा पुरवठा होत नसल्यामुळे हा विषय विभागीय सचिवांच्या साक्षीला घेण्यात यावा.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्यांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

शेतकऱ्यांना महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळाकडून पुरविण्यात आलेले पी.व्ही.सी. पाईप निकृष्ट दर्जाचे असल्याने शेतकऱ्यांनी सदरहू पाईप स्वीकारले नसून संबंधीत शेतकरी सदरहू योजनेपासून वंचित राहण्याची कारणे काय आहेत, या प्रकरणी हलगर्जीपणा करणाऱ्या अधिकाऱ्याविरुद्ध कोणती कारवाई करण्यात आली ? नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

**उपरोक्त मुद्यांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

महाराष्ट्र लघु उद्योग विकास महामंडळ, अकोला यांनी पी.व्ही.पाईपचा पुरवठा अयोग्य केल्यामुळे सदर पाईपचे वाटप शेतकऱ्यांना करता आले नाही. त्यामुळे सदरहू योजनेपासून पात्र शेतकरी सन २०११-१२ या आर्थिक वर्षात वंचित राहिले, तथापि पुढील आर्थिक वर्षात एच.डी.पी.ई. पाईप खरेदीची योजना राबवून पात्र शेतकऱ्यांना योजनेचा लाभ देण्यात आलेला आहे.

योजनेशी संबंधीत तत्कालीन सर्व अधिकारी व कर्मचारी यांना कारणे दाखवा नोटीस देऊन खुलासे मागविण्यात आलेले आहेत. खुलाशाअंती संबंधीत अधिकारी व कर्मचारी हे दोषी आढळून आल्यास नियमानुसार संबंधितांवर कार्यवाही करण्यात न

आल्यामुळे विद्यमान गटविकास अधिकारी पंचायत समिती बार्शिटाकळी यांचेवर विभागीय चौकशी कार्यवाही प्रस्तावित करण्यात येत आहे.

**महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळाचे उत्तर :---**

पंचायत समिती बार्शी टाकळी यांनी त्यांचे पुरवठा आदेश क्र.९५० दिनांक २७ मार्च, २०१२ नुसार शासन मान्य महामंडळाच्या दर करारानुसार पी.व्ही.सी.पाईप पुरवठा करण्याबाबत रु.२,९९,८४५/- एवढ्या रकमेचे पुरवठा आदेश दिले होते. सदर पुरवठा आदेशानुसार पी.व्ही.सी.पाईपचा पुरवठा दिनांक ३१ मार्च, २०१२ पर्यंत करणे आवश्यक असल्याचे कळविले होते. सदर आदेशानुसार महामंडळाने पुरवठा आदेश दर करारधारक उद्योजकास दिनांक २७ मार्च २०१२ अन्वये दिले होते.

पंचायत समिती बार्शी, टाकळी यांनी त्यांच्या पुरवठा आदेशानुसार पुरवठा दिनांक ३१ मार्च, २०१२ पर्यंत करण्याचे कळविले होते. पुरवठा करण्यासाठी ३ दिवसांचा कालावधी असल्यामुळे एवढ्या कमी कालावधीत पुरवठा करणे शक्य नसल्यामुळे सदर पुरवठा दिनांक ३१ मार्च, २०१२ पर्यंत करणे शक्य झाले नाही. पुरवठा आदेश रद्द केला असल्यामुळे या आदेशापोटी पी.व्ही.सी.पाईपचा पुरवठा करण्यात आलेला नव्हता. त्यामुळे महामंडळामार्फत पुरवठा करण्यात आलेले पी.व्ही.सी.पाईप निकृष्ट दर्जाचे असल्यामुळे शेतकऱ्यांकडून स्विकारण्यात आले नाहीत, हे म्हणणे खरे नाही.

**मंत्रालयीन विभागाचा अभिप्राय**

**उद्योग, विभागाचे अभिप्राय -** महामंडळाने सादर केलेल्या उत्तराशी उद्योग विभाग सहमत आहे.

**ग्रामविकास विभागाचे अभिप्राय -** (आस्था-२) - जि.प.अकोला कडून अद्याप प्रस्ताव प्राप्त झालेला नाही. प्रस्ताव प्राप्त झाल्यावर तातडीने कार्यवाही करण्यात येईल.

**विभागीय सचिवांची साक्ष**

पंचायती राज समितीने अकोला जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यांवर अधिक माहिती घेण्यासाठी दिनांक २९ मे, २०१८ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, बार्शी-टाकळी सर्वसाधारण शेतकऱ्यांना ५० टक्के अनुदानावर पीव्हीसी पाईप वाटप योजना न राबविण्याबाबत खुलासा करावा.

यावर ग्रामविकास विभागाचे (अतिरिक्त कार्यभार) सचिवांनी खुलासा केला की, महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळाची योजना होती. ही योजना राबवण्याकरिता ४ जबाबदार अधिकारी आहेत. त्यांनी दि. ३१ मार्च, २०१८ रोजी खुलासा मागितला आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सांगितले की, तिघांवर विभागीय चौकशी करावी. त्यांच्यावर हलगर्जीपणाचा आरोप आहे.

यानंतर समितीने विचारणा केली की, पीव्हीसी पाईप पुरवठ्यासंदर्भात पंचायत समिती बार्शी टाकळीचे गट विकास अधिकारी यांच्याशी चर्चा केली होती. त्यांचे असे म्हणणे आहे की, दिनांक २७ मार्च, रोजी पुरवठा आदेश दिल्यावर दिनंक ३१ मार्च, पर्यंत पुरवठा करणे शक्य झाले नाही. याबाबत महाराष्ट्र लघु उद्योग विकास महामंडळाकडे पत्र व्यवहार केलेला असेल. याबाबत त्यांनी पाईपचा पुरवठा केला किंवा नाही ते समितीला सांगावे,

यावर व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र लघु उद्योग विकास महामंडळ यांनी खुलासा केला की, दिनांक २७ मार्च रोजी पुरवठा आदेश प्राप्त झाले असल्यामुळे दिनांक ३१ मार्च, पर्यंत पीव्हीसी पाईपचा पुरवठा करण्यात आलेला नाही.

यावर ग्रामविकास विभागाचे (अतिरिक्त कार्यभार) सचिवांनी खुलासा केला की, यामध्ये प्रशासकीय चूका झालेल्या आहेत. पीव्हीसी पाईप पुरवठा आदेश २७ तारखेला झाले व पुरवठा करण्यासाठी तीन ते चार दिवसांचा अवधी असल्यामुळे अडचणी निर्माण होत आहेत. सदर देयक काढल्याचे दिसून येत आहे. देयक पास झाले होते तक्रार करण्यात आल्यामुळे सदर देयक रद्द करण्यात आले आहे. पीव्हीसी पाईपचा पुरवठा अकोला येथून करण्यात येणार होता. परंतु वेळेमध्ये पुरवठा होऊ शकलेला नाही.

यावर समितीने विचारणा केली की, या प्रश्नाला मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद अकोला यांनी स्पष्ट अभिप्राय नमूद केले आहेत की, लघु उद्योग विकास महामंडळ अकोला यांनी पीव्हीसी पाईपचा पुरवठा अयोग्य केल्यामुळे सदर पाईपचे वाटप शेतकऱ्यांना करता आले नाही. यामध्ये नक्की काय झाले आहे.

यावर ग्रामविकास विभागाचे (अतिरिक्त कार्यभार) सचिवांनी खुलासा केला की, ग्रामविकास विभागाकडे असे उत्तर आहे की, धनादेश आमच्या रेकॉर्डवर आहे.एकूण देयकाचा धनादेश काढला असून सदर धनादेश रद्द करण्यात आलेला आहे. लघु उद्योग विकास महामंडळाने पीव्हीसी पाईपचा पुरवठा निकृष्ट दर्जाचा केलेला असल्यामुळे सदर पाईप शेतकऱ्यांनी स्वीकारले नाहीत. त्यामुळे महाराष्ट्र लघु उद्योग विकास महामंडळास देयक अदा करण्यात आले नाही असे जिल्हा परिषदेच्या अभिलेख्यानुसार दिसत आहे. पुरवठादाराची चूक झाल्यामुळे देयक देण्याची आवश्यकता नव्हती. यामध्ये चूक झाली आहे.

यानंतर समितीने असे मत व्यक्त केले की, ज्यांनी चूक केली ते तत्कालीन अधिकारी कोण होते. त्यांच्यावर जबाबदारी निश्चित केली पाहिजे व संबंधितांवर काय कारवाई केली ती समितीला सादर करण्यात यावी.

## अभिप्राय व शिफारशी

बार्शि टाकळी पंचायत समिती येथे सर्वसाधारण शेतकऱ्यांना ५० टक्के अनुदानावर पी.व्ही.सी. पाईप वाटप योजनेकरिता अंदाजपत्रकीय प्राप्त तरतूद रुपये १,५०,०००/- मधून रक्कम रुपये १,४९,९२८/- पुरवठा आदेश दिलेले होते. या योजनेमध्ये ५३ लाभार्थ्यांची निवड करण्यात आली होती. मात्र अधिकृत यादी लेखापरीक्षणास सादर केली नाही. साहित्य पुरवठा आदेशातील अटी व शर्तीनुसार साहित्य प्राप्त होण्याऐवजी निकृष्ट दर्जाचे साहित्य प्राप्त झालेले असताना ही देयक सादर करण्यात आले आहे. सदर योजनेअंतर्गत वसूल करण्यात आलेला लाभार्थी हिस्सा लेखापरिक्षण कालावधीपर्यंत संबंधितांना अदा केलेला नाही. या लेखा आक्षेपासंदर्भात जिल्हा परिषद, अकोला यांचेकडून लेखी खुलाशाद्वारे कळविण्यात आले आहे की, पंचायत समितीच्या दिनांक २० मार्च, २०१२ रोजीच्या सर्वसाधारण सभेत पारित केलेल्या ठरावासह ५३ लाभार्थ्यांची निवड यादी उपलब्ध आहे. लाभार्थ्यांकडून निकृष्ट दर्जाचे साहित्य प्राप्त झाल्याच्या तक्रारी आल्यामुळे संबंधित फर्मचा धनादेश रद्द करण्यात आला आहे. कोणतेही प्रदान करण्यात आले नाही. वसूल करण्यात आलेला लाभार्थी हिस्सा धनादेशाद्वारे लाभार्थीना परत करण्यात आला आहे.

या लेखी माहितीच्या आधारे समितीने घेतलेल्या साक्षीदरम्यान असे निदर्शनास आले की, महाराष्ट्र लघु उद्योग विकास महामंडळाने पी.व्ही.सी. पाईप्सचा पुरवठा निकृष्ट दर्जाचा केल्यामुळे संबंधित लाभार्थी या योजनेपासून वंचित राहिले आहेत त्यामुळे महाराष्ट्र लघु उद्योग विकास महामंडळ यासाठी जबाबदार आहे, कारण महामंडळाने विहित कालावधीत दर्जेदार साहित्याचा पुरवठा करणे अपेक्षित होते. संबंधित लाभार्थी शेतकऱ्यांकडून तक्रारी प्राप्त झाल्यानंतर महामंडळाकडे निकृष्ट दर्जाचा साहित्य पुरवठा केल्याप्रकरणी खुलासा मागविण्यात आला. सदर खुलाशामध्ये साहित्य पुरवठा ३ दिवसांच्या कालावधीमध्ये करणे शक्य नसल्यामुळे पी.व्ही.सी. पाईप पुरवठा करण्यात आलेला नाही. पी.व्ही.सी. पाईप निकृष्ट दर्जाचा असल्याचे शेतकऱ्यांचे म्हणणे खरे नाही असे नमुद केलेले आहे. तथापि, पी.व्ही.सी. पाईप निकृष्ट असल्याबाबतच्या तक्रारी शेतकऱ्यांसमवेत पंचायत समितीचे सभापती व उपसभापती यांनी केल्यामुळे प्रकरण गंभीर आहे. प्रस्तुत प्रकरणी ४ जबाबदार अधिकाऱ्यांचे खुलासे मागविण्यात आले असून तीन अधिकाऱ्यांवर विभागीय चौकशी करण्यात येणार असून त्यांच्यावर हलगर्जीपणाचा आरोप करण्यात आलेला आहे.

जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडून प्राप्त लेखी खुलाशामध्ये असे नमूद करण्यात आले आहे की, प्राप्त साहित्य समाधानकारक नसल्यामुळे व तक्रारी प्राप्त झाल्याने संबंधित फर्मचे साहित्य परत करण्यात आले असून संबंधित फर्मचा धनादेश रद्द करण्यात आला आहे. यावरुन असे दिसून येते की, महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळाकडून प्राप्त झालेल्या खुलाशामध्ये संदिग्धता आढळून येत आहे. कारण **महामंडळाकडून पुरविण्यात आलेले पी.व्ही.सी. पाईप निकृष्ट दर्जाचे असल्याच्या तक्रारी शेतकरी आणि खुद्द पंचायत समितीच्या सभापती व उप सभापतींनी करून देखील महाराष्ट्र लघु उद्योग विकास महामंडळाने पी.व्ही.सी. पाईप निकृष्ट दर्जाचे असल्याचे म्हणणे खरे नाही असे नमूद केले आहे. त्यामुळे**

महामंडळाचे अधिकारी व तत्कालिन पंचायत समितीचे अधिकारी व जिल्हा परिषदेचे अधिकारी यांनी संगनमताने संबंधित शेतकऱ्यांची एक प्रकारे फसवणूकच केलेली आहे असे सकृत दर्शनी दिसून येत आहे. सबब महामंडळातील संबंधित अधिकाऱ्यांची तसेच पंचायत समिती व जिल्हा परिषदेच्या संबंधित तत्कालिन अधिकाऱ्यांची त्रयस्थ संस्थेद्वारा सखोल चौकशी करण्यात यावी व या चौकशीत दोषी आढळणाऱ्या संबंधितांवर कठोर कारवाई करण्यात यावी तसेच निकृष्ट दर्जाचा पाईप पुरविल्या प्रकरणी महामंडळावर कारवाई करण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे व उपरोक्त प्रकरणी केलेल्या कार्यवाहीचा एकत्रित अहवाल समितीस एक महिन्याच्या आत सादर करण्यात यावा.

प्रकरण आठ

## जिल्हा परिषद, अकोला

## ७५% अनुदानावर महिलांना शिलाई मशीन पुरविणे योजनेबाबत

**परिच्छेद क्रमांक ४.३६४ (सन २०११-१२)**

पंचायत समिती उपकरातुन ७५% अनुदानावर महिलांना शिलाई मशीन पुरविणेबाबत चा खर्च प्रमाणक क्र.१७ दि. १६/०५/२०११ अन्वये रुपये १,७६,५८७/- व रु.५८,८६३/- एवढा खर्च ८५ शिलाई मशीन खरेदीसाठी करण्यात आला आहे. योजना सन २०१०-११ मध्ये रद्द झाल्यामुळे सन २०११-१२ मध्ये साहित्य खरेदी करून लाभार्थ्यांना वाटप करण्यात आले या खर्चाबाबत व साहित्य वाटपाबाबत लेखा परिक्षण अभिप्राय खालील प्रमाणे आहेत.

१) लाभार्थी निवड यादीमध्ये अनुक्रमांक ४२ व ५१ वर एकाच लाभार्थ्यांचे नाव दोन वेळा नमुद आहे. (८५ शिलाई मशीन वाटपासाठी खरेदी केल्या असल्याने एक मशीन शिल्लक असणे आवश्यक आहे.) ८५ लाभार्थ्यांची यादी मंजूर करताना ही बाब लक्षात न घेता यादीस मंजुरी दिली व एक लाभार्थ्यांस योजनेपासुन वंचित ठेवले याबाबत खुलासा करावा.

२) श्रीमती नंदा किसन पाखरे रा. खडकी बु. यांचा समावेश लाभार्थी मंजूर यादीमध्ये नसताना त्यांना लाभ दिला आहे या अनियमिततेबाबत खुलासा करावा.

३) पंचायत समितीने दुबार लाभ दिला जावू नये यांचे नियंत्रणासाठी आवश्यक असलेली गावनिहाय मास्टर नोंदवही न ठेवल्याने दुबार लाभार्थी प्रकरणे पडताळता आली नाही.

४) ८५ शिलाई मशीन मधून ८१ मशीन वाटप करण्यात आल्यात उर्वरित चार लाभार्थ्यांचे अर्ज लेखा परीक्षणास उपलब्ध केले नाहीत ते खालीलप्रमाणे आहेत. १) श्रीमती आशा शेषराव पंडीत रा. पातुर-नंदापुर २) श्रीमती अनिता विशाल शिंगनाद रा. मलकापुर ३) श्रीमती प्रिती माणिकराव मुरुमकार रा. शिवणी ४) श्रीमती प्रियंका रामदास लोणकर रा.शिवणी यांचे अर्ज नसल्याने शिलाई मशीन वाटप केले नाही. त्यामुळे खर्च रुपये ११,०८०/- एवढी रक्कम गुंतुन पडलेली आहे.

५) मंजूर २१ लाभार्थ्यांचे अर्जाची पडताळणी केली असता अर्जात नमुद दिनांक व लाभार्थी निवड मंजूर यादीमध्ये तफावत आढळते. पंचायत समितीने यादी मंजुरीनंतर अर्ज प्राप्त केल्याचे दिसुन येते. २१ लाभार्थी अर्जासोबतच्या त्रुट्यांची पुर्तता करावी.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, अकोला यांचेकडून खालील प्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

१) सदर योजनेतंर्गत पंचायत समिती ठरावानुसार ८५ लाभार्थ्यांची निवड करण्यात आली. तथापि रजिस्टरमध्ये नोंदवितांना अनुक्रमांक ४२ वरील कु. सुषमा बळीराम गावंडे रा. गोरेगांव खु. यांचे नांव अनावधानाने अनुक्रमांक ५१ वर पुन्हा दर्शविले होते. ही बाब दुरुस्त करून श्रीमती नंदा किसन पाखरे रा. खडकी बु या पात्र लाभार्थीचे नांव समाविष्ट करून त्यांना साहीत्याचे वाटप करण्यात आले असून त्याची नोंद साठा पंजी पान क्र. ८ वरील अनुक्रमांक ३७ वर घेण्यात आलेली आहे. त्यामुळे कोणत्याही लाभार्थ्याला योजनेच्या लाभापासुन वंचित करण्यात आले नसुन निवड केलेल्या सर्व लाभार्थ्यांना साहित्याचा लाभ देण्यात आलेला आहे.

२) सदर योजनेची निवड यादी नोंदवहीमध्ये लिहीतांना अनावधनाने श्रीमती नंदा किसन पाखरे, रा. खडकी बु. या पात्र लाभार्थीचे नावाऐवजी नजरचुकीने कु. सुषमा बळीराम गावंडे, रा. गोरेगांव खु. यांचे नांव दुबार दर्शविले होते. सदर बाब लक्षात येताच योग्य दुरुस्ती करण्यात येवून त्यांना साहित्याचे वाटप करण्यात आलेले आहे. त्यामुळे यामध्ये अनियमितता झाली नसल्याची खात्री करण्यात आलेली आहे.

३) लाभार्थीना दुबार लाभ दिला जाणार नाही. याकरिता संबधित ग्राम पंचायतीकडून प्रस्तावीत लाभार्थ्यांस यापुर्वी लाभ दिला नसल्याचे प्रमाणपत्र प्राप्त करण्यात येत असल्याने दुबार लाभ दिला जाऊ नये, याबाबत खबरदारी घेण्यात येते. तथापि पंचायत समितीस्तरावर मास्टर रजिस्टर ठेवण्यात आले असून ग्रामपंचायत स्तरावरसुद्धा मास्टर रजिस्टर ठेवण्याबाबत सुचना देण्यात आलेल्या आहेत.

४) पुरवठादार संस्थेने दिनांक ८ जून, २०११ रोजी साहित्याचा पुरवठा केला असून लेखा परिक्षणापर्यंत एकूण ८५ लाभार्थ्यांपेकी ८१ लाभार्थ्यांना साहित्याचे वाटप करण्यात आले होते. मंजूर लाभार्थ्यांना साहित्य घेऊन जाणेबाबत संबधित ग्रामपंचायत सचिव तसेच पंचायत समितीचे सदस्य यांचे मार्फत वारंवार सूचित करूनही वेळेवर उपस्थित न झाल्याने साहित्य वाटप झाले नव्हते. तथापि तद्नंतर साहित्याचे वाटप करण्यात आले असून साठा निरंक करण्यात आलेला आहे.

५) पंचायत समितीची सर्वसाधारण सभा दिनांक २५ फेब्रुवारी, २०११, ठराव क्र. ७ अन्वये सन २०१०-११ करिता या योजनेतील पात्र लाभार्थ्यांची निवड करण्यात आली असून निवड केलेल्या लाभार्थ्यांचे अर्जासोबत आवश्यक कागदपत्रे व दाखले घेण्यात आले होते. तथापि पुरवठादार संस्थेने दिनांक ३१ मार्च, २०११ पर्यंत साहित्याचा पुरवठा करणे शक्य नसल्याचे लेखी कळविले असल्याने, सदर योजनेतील लाभार्थ्यांना पुढील वर्षी सन २०११-१२ मध्ये लाभ द्यावा लागल्याने लाभार्थ्यांकडून पुढील वर्षातील कागदपत्रे मागविण्याचे उद्देशाने पुन्हा कागदपत्रे मागविण्यात आली. त्यामुळे सदर दाखल्यावर नंतरची तारीख दर्शविल्याचे दिसून येते. तथापि पंचायत समिती सर्वसाधारण सभेने निवड केलेल्या लाभार्थ्यांनाच लाभ दिला असल्याची खात्री करण्यात आलेली आहे.

## मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष

अकोला जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिनांक १ जून, २०१७ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, ७५ टक्के अनुदानावर महिलांना शिलाई मशीन पुरविणे योजना या योजनेअंतर्गत श्रीमती नंदा किसन पाखरे यांचा अर्ज पंचायत समितीला केंव्हा प्राप्त झाला, पंचायत समितीने लाभार्थ्यांची निवड यादी कोणत्या तारखेला केली, सदर यादीमध्ये श्रीमती पाखरे यांचे नाव होते काय,

यावर गट विकास अधिकारी, पंचायत समिती, अकोला यांनी खुलासा केला की, सदर योजनेअंतर्गत पंचायत समिती ठरावानुसार ८५ लाभार्थ्यांची निवड करण्यात आली. तथापि रजिस्टरमध्ये नोंदविताना अनुक्रमांक ४२ वरील कु.सुषमा बळीराम गावंडे, रा.गोरेगाव खु. यांचे नाव अनावधानाने अनुक्रमांक ५१ वर पुन्हा दर्शविले होते. ही बाब दुरुस्त केली. एक नाव दोन वेळेला आले होते त्यामुळे श्रीमती नंदा किसन पाखरे यांचे नाव सुटले होते. कु.सुषमा बळीराम गावंडे यांचे नाव दोन वेळा आले होते.

तद्नंतर संचालक, स्थानिक निधी लेखा यांनी श्रीमती आशा शेषराव पंडित, रा. पातुर, नंदापूर, २) श्रीमती अनिता विशाल शिंगनाद, रा.मलकापूर, ३) श्रीमती प्रिती माणिकराव मुरुमकार, रा.शिवणी आणि ४) श्रीमती प्रियंका रामदास लोणकर, रा.शिवणी या चार लाभार्थ्यांचे अर्ज दिसले नाहीत त्यामुळे शिलाई मशीन वाटप केलेली दिसत नाही असा मुद्दा उपस्थित केला असता गट विकास अधिकारी, पंचायत समिती, अकोला यांनी खुलासा केला की, पंचायत समितीची सर्वसाधारण सभा दिनांक २५ फेब्रुवारी, २०११ रोजी, ठराव क्रमांक ७ अन्वये सन २०१०-२०११ करिता या योजनेतील पात्र लाभार्थ्यांची निवड केलेली असून निवड केलेल्या लाभार्थ्यांचे अर्जासोबत आवश्यक कागदपत्रे व दाखले घेण्यात आले होते. तथापि पुरवठादार संस्थेने दिनांक ३१ मार्च, २०११ पर्यंत साहित्याचा पुरवठा करणे शक्य नसल्याचे लेखी कळविले. सदर योजनेतील लाभार्थ्यांना पुढील वर्षी सन २०११-२०१२ मध्ये लाभ द्यावा लागल्याने लाभार्थ्यांकडून पुढील वर्षातील कागदपत्रे मागविण्याचे उद्देशाने पुन्हा कागदपत्रे मागविण्यात आली. त्यामुळे सदर दाखल्यावर नंतरची तारीख दर्शविल्याचे दिसून येते. तथापि पंचायत समिती सर्वसाधारण सभेने निवड केलेल्या लाभार्थ्यांनाच लाभ दिला असल्याची खात्री करण्यात आलेली आहे.

यावर समितीने असे निदेश दिले की, लोक तालुक्याच्या ठिकाणी व्याजाने पैसे घेतात आणि आपल्या हिस्स्याची रक्कम भरतात. पुढील वर्षी पुन्हा नव्याने कागदपत्रे काढतात. असे होऊ नये म्हणून ज्या अधिकाऱ्यांनी या कामात दिरंगाई केली अशा अधिकाऱ्यांवर कारवाई करून अहवाल समितीला सादर करावा.

शिलाई मशिन देण्यास कोणत्या स्तरावर विलंब झाला, ठेकेदारामार्फत झाला की अधिकाऱ्यामार्फत झाला, या बाबींची मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी चौकशी करावी आणि कारवाईसह अहवाल समितीला सादर करावा. आवश्यकता पडल्यास विभागीय सचिवांची साक्ष घेण्यात येईल.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्यांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

७५ टक्के अनुदानावर महिलांना शिलाई मशीन देण्यास विलंब होण्याची कारणे काय ? या प्रकरणी अद्यापही चौकशी अहवाल सादर न करण्याची कारणे काय ? एकंदरीतच या प्रकरणी अक्षम्य दिरंगाई झाली आहे यास कोण अधिकारी जबाबदार आहेत अशा अधिकाऱ्या विरुद्ध कोणती कार्यवाही करण्यात आली आहे ? नसल्यास, विलंबाची कारणे काय, आहेत

**उपरोक्त मुद्यांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.---**

पंचायत समिती सेस अंतर्गत ७५ टक्के अनुदानावर महिलांना शिलाई मशिन पुरविणे ही योजना सन २०११-१२ मध्ये घेण्यात आली. माहे जानेवारी, २०११ ला पंचायत समिती सर्वसाधारण सभेने सदर योजना राबविण्यास प्रशासकीय मान्यता दिली होती त्या अनुषंगाने योजनेस दिनांक १९ जानेवारी, २०११ रोजी तांत्रिक मान्यता देण्यात आली व सहसंचालक उद्योग यांचे पत्र क्र.बी २३४३७ दिनांक २८ ऑक्टोबर, २०१० चे दरकरारानुसार जानकी मार्केटिंग अकोला देण्यात आला. परंतु पुरवठादाराने त्यांचे पत्र दिनांक २२ फेब्रुवारी, २०११ अन्वये दर करारातील अटीनुसार सहा आठवड्याच्या कालावधीत पुरवठा करावा लागणार असल्याचे कळविले, त्यामुळे पुरवठादाराने दिनांक ३१ मार्च, २०११ पर्यंत पुरवठा केला नाही. सदरचे आर्थिक वर्ष समाप्त झाल्याने याप्रकरणी सन २०११-१२ मध्ये दिनांक २१ एप्रिल, २०११ रोजी पंचायत समितीच्या सर्वसाधारण सभेने प्रशासकीय मान्यता दिली. त्यानुसार दिनांक ०२ मे २०११ रोजी पुरवठादारास पुरवठा आदेश देण्यात आले. पुरवठादाराकडून दिनांक ०८ जून, २०११ रोजी ८५ शिलाई मशिन प्राप्त झाल्या. माहे ऑगस्ट, २०११ अखेरपर्यंत पात्र लाभार्थ्यांना शिलाई मशिनचे वाटप करण्यात आले.

उपरोक्त बाबीवरुन शिलाई मशीन देण्यास झालेला विलंब हा तांत्रिक कारणामुळे झालेला असल्याने कोणत्याही अधिकाऱ्याविरुद्ध कारवाई करण्यात आली नाही तसेच सदरचे आर्थिक वर्ष संपल्याने पंचायत समितीच्या सर्व साधारण समितीने मान्यता दिल्यावर सदर योजना पुढील वर्षामध्ये राबविण्यात आलेली आहे.

## मंत्रालयीन विभागाचा अभिप्राय

**ग्रामविकास विभागाचे अभिप्राय :-** (वित्त-३) जिल्हा परिषदेने केलेल्या कार्यवाहीशी सहमत.

## विभागीय सचिवांची साक्ष

पंचायती राज समितीने अकोला जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यांवर अधिक माहिती घेण्यासाठी दिनांक २९ मे, २०१८ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, ७५ टक्के अनुदानावर महिलांना शिलाई मशीन पुरविण्यास विलंब होण्याची कारणे काय आहेत, यासाठी कोण अधिकारी जबाबदार आहे, त्या अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई करण्यात आली आहे,

यावर महिला व बालविकास विभागाच्या सचिवांनी खुलासा केला की, पंचायत समितीमध्ये जी कार्यवाही झाली त्यासंदर्भातील उत्तर देण्यात आले आहे. कार्यवाही करणारा अधिकारी महिला व बाल कल्याण विभागाचा नसून ग्रामविकास विभागाचा आहे. महिला व बालविकास विभागाने सदर योजनेचा निधी खर्च केला आहे. सदर योजनेसाठी २ लाख ४४ हजार रुपयांची तरतूद होती. २ लाख ३६ हजार रुपये प्रत्यक्षात खर्च झालेला आहे. सदर योजनेचा कार्यादेश दिनांक २२ फेब्रुवारी २०११

रोजी दर कराराप्रमाणे खर्च करण्याचा आदेश देण्यात आला होता. प्रत्यक्षात ४ आठवड्यांनंतर दिनांक १५ मार्चपर्यत शिलाई मशीनचा पुरवठा करावयाचा होता. परंतु विलंब झाल्यामुळे दिनांक ३१ मार्च, ही तारीख उलटून गेली. त्यामुळे सदर आर्थिक वर्षात निधी खर्च करण्यात आला नाही. निधी खर्च झाला नाही तरी तो निधी पुढील वर्षात जमा होत असल्यामुळे पुढच्या वर्षी सदर योजनेचा निधी खर्च करण्यात आला व सर्व संबंधितांना लाभ देण्यात आलेला आहे.

तद्‌नंतर समितीने असे मत व्यक्त केले की, ज्या वर्षात शिलाई मशीनचा लाभ लाभार्थ्यांना देणे अपेक्षित होते त्या वर्षात निधी प्राप्त असताना लाभ देण्यात आलेला नाही. पुढील वर्षी सदर योजनेचा लाभ देण्यात आलेला आहे. म्हणजे लाभार्थी हे लाभापासून एक वर्ष वंचित राहिले आहेत. त्या वर्षाचा लाभ त्याच वर्षात भेटला असता तर त्याचा लाभार्थ्यांना फायदा झाला असता, यावर ग्रामविकास विभागाचा अतिरिक्त कार्यभार असलेल्या सचिवांनी खुलासा केला की, पंचायत समितीकडून ही चूक झाली आहे. कंत्राटदाराने पुरवठा उशिरा केल्यामुळे सदर योजना पुढच्या वर्षात राबविण्यात आली असून सर्व लाभार्थ्यांना लाभ देण्यात आलेला आहे.

## अभिप्राय व शिफारशी

७५% अनुदानावर महिलांना शिलाई मशिन पुरविणे ही सन २०१०-११ मधील योजना सन २०११-१२ मध्ये राबविण्यात आली. सदर योजनेसंदर्भात लेखा परिक्षणामध्ये आक्षेप घेण्यात आलेले आहेत. त्यानुसार लाभार्थी निवड यादीमध्ये अनुक्रमांक ४२ व ५१ वर कु.सुषमा बळीराम गावंडे या एकाच महिलेचे नाव दोन वेळा नमूद करण्यात आलेले होते. तसेच श्रीमती नंदा किसन पाखरे या महिला लाभार्थीचा समावेश मंजूर यादीमध्ये नसताना देखील श्रीमती पाखरे यांना लाभ देण्यात आलेला आहे. मास्टर नोंदवही उपलब्ध नसल्यामुळे दुबार लाभार्थी प्रकरणे पडताळून पाहता आली नाहीत. एकूण ८५ शिलाई मशिन खरेदी करण्यात आल्या असताना ८१ शिलाई मशिनचे वाटप करण्यात आले असून उर्वरित चार लाभार्थ्यांचे अर्ज लेखा परिक्षणाच्या वेळी उपलब्ध करण्यात आले नाहीत. मंजूर २१ लाभार्थ्यांच्या अर्जाची पडताळणी केली असता अर्जात नमूद दिनांक व लाभार्थी निवड मंजूर यादीमध्ये तफावत आढळून आली आहे. उपरोक्त आक्षेपासंदर्भात लेखी खुलाशामध्ये जिल्हा परिषद, अकोला यांनी कळविले आहे की, कु.सुषमा गावंडे यांचे नाव अनावधानाने दोन वेळा दर्शविले होते. त्यामध्ये दुरुस्ती करून श्रीमती नंदा पाखरे यांचे नाव समाविष्ट करण्यात आले. पंचायत समितीस्तरावर मास्टर रजिस्टर ठेवण्यात आले असून ८५ लाभार्थ्यांपैकी ८१ लाभार्थ्यांना साहित्य वाटप करण्यात आल्यानंतर उर्वरित ४ लाभार्थ्यांना साहित्य घेऊन जाण्याबाबत वारंवार सूचित करूनही ते ४ लाभार्थी उपस्थित न झाल्याने साहित्य वाटप झाले नव्हते. मात्र तद्‌नंतर वाटप करण्यात आले असल्यामुळे साठा निरंक आहे. पुरवठादार संस्थेने दिनांक ३१ मार्च, २०११ पर्यंत साहित्य पुरवठा न केल्यामुळे लाभार्थ्यांना सन २०११-१२ मध्ये या योजनेचा लाभ द्यावा लागला.

उपरोक्त लेखी माहितीच्या आधारे समितीने साक्ष घेतली असता समितीच्या निदर्शनास आले की, ७५% अनुदानावर महिलांना शिलाई मशिन पुरविणे ही योजना पंचायत समितीच्या दिनांक २५ फेब्रुवारी, २०११ रोजी झालेल्या सर्वसाधारण सभेतील ठरावानुसार सन २०१०-११ करिता पात्र लाभार्थ्यांची निवड केलेली असताना सन २०११-१२ मध्ये शिलाई मशिन पुरविण्यात आल्या. त्यामुळे लाभार्थ्यांना १ वर्षे लाभापासून वंचित राहावे लागले. **सदर योजनेअंतर्गत निवड केलेल्या ८५ लाभार्थ्यांच्या यादीमध्ये कु.सुषमा गावंडे या लाभार्थीचे नाव दोन वेगवेगळ्या क्रमांकावर नोंदवले गेले ही चूक लक्षात आल्यानंतर श्रीमती नंदा पाखरे या महिलेचे नाव लाभार्थ्याच्या यादीमध्ये निवड झालेली नसताना दुसऱ्या वेळेला कु. गावंडे यांच्या जागी दर्शविण्यात आले. यावरुन लाभार्थ्यांची यादी बनविताना झालेला निष्काळजीपणा व गाफीलपणा दिसून येत आहे. याबद्दल समिती तीव्र नापसंती व्यक्त करीत आहे.**

**तसेच पुरवठादाराने दिनाक २८ ऑक्टोबर, २०१० चे दरकरारानुसार सहा आठवड्यांच्या कालावधीत पुरवठा करावा असे नमूद केलेले असले तरी संबंधितांनी ही बाब लक्षात घेऊन पुरवठादाराकडून दिनांक ३१ मार्च, २०११ पूर्वी शिलाई मशिनचा पुरवठा होण्याच्या दृष्टीने तांत्रिक बाबी तपासून योग्य ती कार्यवाही करणे आवश्यक होते. तथापि, या ठिकाणी योग्य ती काळजी घेतल्याचे दिसून येत नाही. सदर योजनेमध्ये ७५% अनुदान शिलाई मशिनवर देण्यात आले**

होते. उर्वरित २५% रक्कम लाभार्थ्यांना भरावी लागली. तसेच सदर योजनेचा कार्यादेश दिनांक २२ फेब्रुवारी, २०११ रोजी दरकराराप्रमाणे खर्च करण्याचा आदेश देण्यात आला होता. प्रत्यक्षात ४ आठवड्यानंतर दिनांक १५ मार्च, २०११ पूर्वी शिलाई मशिनचे वाटप केलेले नाही. त्यामुळे दिनांक ३१ मार्च, २०११ पर्यंत निधी अखर्चित राहिला, पर्यायाने सन २०११-१२ मध्ये नव्याने कागदपत्रे लाभार्थ्यांना द्यावी लागली. त्यामुळे ठेकेदारामार्फत किंवा अधिकाऱ्यामार्फतच विलंब झालेला आहे. त्यामुळे लाभार्थ्यांना एक वर्षे लाभापासून वंचित रहावे लागणे ही बाब अत्यंत गंभीर आहे. सबब, मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी त्यांचे स्तरावर यासदंर्भात चौकशी करावी व चौकशीनुसार संबंधित ठेकेदार व संबंधित अधिकाऱ्यांची जबाबदारी निश्चित करण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे व त्याअनुषंगाने केलेल्या कारवाईचा अहवाल समितीस तीन महिन्यांच्या आत पाठविण्यात यावा.

प्रकरण नऊ

## जिल्हा परिषद, अकोला
## अपूर्ण स्थितीतील बांधकामांबाबत

**परिच्छेद क्रमांक ४.३९४/१२ (सन २०११-१२)**

जिल्हा परिषद व पंचायत समित्यांना त्यांच्या कार्यक्षेत्रातील ग्रामीण भागामध्ये पिण्याच्या पाण्याची पुरवठा योजना विहिरी, खेड्यातील रस्ते, प्राथमिक आरोग्य केंद्र, प्राथमिक शाळा, इमारती इ.सारख्या स्थानिक विकासाच्या व सामुहिक विकासाच्या बांधकामासाठी योजनेअंतर्गत तरतुदीतून अर्थ सहाय्य देण्यात येते. अर्थ सहाय्याच्या रक्कमेमध्ये जिल्हा परिषद व पंचायत समिती यांनी त्यांचा हिस्सा घालून व स्थानिक भागातून लोकवर्गणी हिस्सा (श्रमदान अगर रोख स्वरुपात) घालून सदर बांधकामे ज्या वर्षी मंजुरी दिली जाते त्या वर्षातच पूर्ण करण्याची शासनाची अपेक्षा असते ही कामे सर्वसाधारणपणे ग्रामपंचायतींच्या अभिकरणामार्फत पार पाडली जातात. परंतु वस्तुस्थिती पाहता सदर बांधकामांना शासनाचे जेवढे अर्थसहाय्य मिळते तेवढ्याच रक्कमेचे बांधकाम करून उर्वरित काम पूर्ण केले जात नाही. अशा अपूर्ण अवस्थेत राहिलेली बांधकामे, वर्षानुवर्षे पडून असतात. त्यामुळे त्या बांधकामात गुंतलेला पैसा निरर्थक अडकून पडतो. त्याचप्रमाणे स्थानिक जनतेला विकासाचा लाभ मिळू शकत नाही. तसेच अशी बांधकामे फार काळ अपूर्ण अवस्थेत राहिल्याने त्यांची पडझड होण्याची शक्यता असते यास्तव जिल्हा परिषद व पंचायत समित्यांनी योजनाअंतर्गत अथवा योजनेत्तर विकास कार्यक्रमाप्रमाणे हाती घेतलेली कामे अपूर्ण अवस्थेत पडून राहणार नाहीत याची दक्षता घेणे आवश्यक आहे. उदाहरणादाखल लेखा परिक्षणाचे वेळी पंचायत समित्यांनी पुरविलेल्या माहितीनुसार अशा प्रकारे अपूर्ण अवस्थेत पडून राहिलेल्या दिनांक ३१ मार्च, २०१२ अखेर बांधकामाचा तक्ता पुढील प्रमाणे दिला आहे.

| अ.क्र | जिल्ह्याचे नाव | पंचायत समितीचे नाव | लेखा परिक्षण अहवालातील परिच्छेद क्रमांक | गुंतलेली रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|
| ६० | अकोला | तेल्हारा | १२ | २,१०,०००/- |

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, अकोला यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

जलपुर्ती सिंचन विहिरी धडक योजना सन २००९-१० अंतर्गत २१ लाभार्थ्यांना प्रती लाभार्थी रु.१०,०००/- प्रमाणे विहिर खोदकाम चालू करण्याकरिता रु.२,१०,०००/- अग्रिम देण्यात आला आहे. विहिर खोदकाम व बांधकाम करणेबाबत सुचना देवूनही सदर लाभार्थ्यांनी काम केलेले नसल्याने विहिरीचे काम होऊ शकले नाही. त्यामुळे या कार्यालयाचे पत्र क्र.३० दि.०२/०१/२०१६ नुसार प्रत्येकी रु.१०,०००/- प्रमाणे जमीन महसुलीच्या थकबाकीप्रमाणे वसुलीबाबतचा प्रस्ताव (RRC) तहसिलदार, तेल्हारा यांना पाठविण्यात आला आहे.

**परिच्छेद क्रमांक ४.३९४/२ (सन २०११-१२)**

**अपूर्ण स्थितीतील बांधकामे- जलपुर्ती सिंचन विहिर :-**

जिल्हा परिषद व पंचायत समित्यांना त्यांच्या कार्यक्षेत्रातील ग्रामीण भागामध्ये पिण्याच्या पाण्याची पुरवठा योजना विहिरी, खेड्यातील रस्ते, प्राथमिक आरोग्य केंद्र, प्राथमिक शाळा, इमारती इ.सारख्या स्थानिक विकासाच्या व सामुहिक विकासाच्या बांधकामासाठी योजनेअंतर्गत तरतुदीतून अर्थ सहाय्य देण्यात येते. अर्थ सहाय्याच्या रकमेमध्ये जिल्हा परिषद व पंचायत समिती यांनी त्यांचा हिस्सा घालून व स्थानिक भागातून लोकवर्गणी हिस्सा (श्रमदान अगर रोखस्वरुपात) घालून सदर बांधकामे ज्या वर्षी

मंजुरी दिली जाते त्या वर्षातच पूर्ण करण्याची शासनाची अपेक्षा असते ही कामे सर्वसाधारणपणे ग्रामपंचायतींच्या अभिकरणामार्फत पार पाडली जातात. परंतु वस्तुस्थिती पाहता सदर बांधकामांना शासनाचे जेवढे अर्थ सहाय्य मिळते तेवढ्याच रक्कमेचे बांधकाम करून उर्वरित काम पूर्ण केले जात नाही. अशा अपूर्ण अवस्थेत राहिलेली बांधकामे, वर्षानुवर्षे पडून असतात. त्यामुळे त्या बांधकामात गुंतलेला पैसा निरर्थक अडकून पडतो. त्याचप्रमाणे स्थानिक जनतेला विकासाचा लाभ मिळू शकत नाही. तसेच अशी बांधकामे फार काळ अपूर्ण अवस्थेत राहिल्याने त्यांची पडझड होण्याची शक्यता असते यास्तव जिल्हा परिषद व पंचायत समित्यांनी योजनाअंतर्गत अथवा योजनेत्तर विकास कार्यक्रमाप्रमाणे हाती घेतलेली कामे अपूर्ण अवस्थेत पडून राहणार नाहीत याची दक्षता घेणे आवश्यक आहे. उदाहरणादाखल लेखा परिक्षणाचे वेळी पंचायत समित्यांनी पुरविलेल्या माहितीनुसार अशा प्रकारे अपूर्ण अवस्थेत पडून राहिलेल्या दिनांक ३१ मार्च, २०१२ अखेर बांधकामाचा तक्ता पुढीलप्रमाणे दिला आहे :---

| अ.क्र. | जिल्ह्याचे नाव | पंचायत समितीचे नाव | लेखा परिक्षण अहवालातील परिच्छेद क्रमांक | गुंतलेली रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|
| ६१ | अकोला | बाळापूर | ०२ | ३८,६०,०००/- |

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, अकोला यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

३८६ लाभार्थींना अग्रिम १००००/- प्रमाणे एकूण रुपये ३८,६०,०००/- प्रदान करण्यात आलेले आहेत. त्यापैकी शासन निर्णय क्र. योजना २०१५ /प्र.क्र./२८(३)/रोहयो-५ मंत्रालय, मुंबई दिनांक २७ नोव्हेंबर, २०१५ नुसार १८१ लाभार्थ्यांच्या विहिरी पुनर्जीवित करण्यात आल्या असून मंजुरी प्रदान करण्यात आलेली आहे. मुदत दिनांक ३० जून, २०१६ पर्यंत आहे.

उर्वरित २०५ लाभार्थ्यांना प्रदान करण्यात आलेले अग्रिम प्रत्येकी रुपये १०,०००/- शासन खाती समायोजित करणेबाबत पत्र क्रमांक जाक्र/पसबा/धडक सिंचन/४२४१ /२०१५ दिनांक ०८ डिसेंबर, २०१५ नुसार तहसिलदार, बाळापूर यांचेकडे कार्यवाहीस्तव आर.आर.सी. प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे.

**परिच्छेद क्रमांक ४.३९४/२ (सन २०११-१२)**

जिल्हा परिषद व पंचायत समित्यांना त्यांच्या कार्यक्षेत्रातील ग्रामीण भागामध्ये पिण्याच्या पाण्याची पुरवठा योजना विहिरी, खेड्यातील रस्ते, प्राथमिक आरोग्य केंद्र, प्राथमिक शाळा, इमारती इ.सारख्या स्थानिक विकासाच्या व सामुहिक विकासाच्या बांधकामासाठी योजनेअंतर्गत तरतुदीतून अर्थ सहाय्य देण्यात येते. अर्थ सहाय्याच्या रकमेमध्ये जिल्हा परिषद व पंचायत समिती यांनी त्यांचा हिस्सा घालून व स्थानिक भागातून लोकवर्गणी हिस्सा (श्रमदान अगर रोख स्वरुपात) घालून सदर बांधकामे ज्या वर्षी मंजुरी दिली जाते त्या वर्षातच पूर्ण करण्याची शासनाची अपेक्षा असते ही कामे सर्वसाधारणपणे ग्रामपंचायतींच्या अभिकरणामार्फत पार पाडली जातात. परंतु वस्तुस्थिती पाहता सदर बांधकामांना शासनाचे जेवढे अर्थसहाय्य मिळते तेवढ्याच रक्कमेचे बांधकाम करून उर्वरित काम पूर्ण केले जात नाही. अशा अपूर्ण अवस्थेत राहिलेली बांधकामे, वर्षानुवर्षे पडून असतात. त्यामुळे त्या बांधकामात गुंतलेला पैसा निरर्थक अडकून पडतो. त्याचप्रमाणे स्थानिक जनतेला विकासाचा लाभ मिळू शकत नाही. तसेच अशी बांधकामे फार काळ अपूर्ण अवस्थेत राहिल्याने त्यांची पडझड होण्याची शक्यता असते यास्तव जिल्हा परिषद व पंचायत समित्यांनी योजनाअंतर्गत अथवा योजनेत्तर विकास कार्यक्रमाप्रमाणे हाती घेतलेली कामे अपूर्ण अवस्थेत पडून राहणार नाहीत

याची दक्षता घेणे आवश्यक आहे. उदाहरणादाखल लेखा परिक्षणाचे वेळी पंचायत समित्यांनी पुरविलेल्या माहितीनुसार अशा प्रकारे अपूर्ण अवस्थेत पडून राहिलेल्या दिनांक ३१ मार्च, २०१२ अखेर बांधकामाचा तक्ता पुढीलप्रमाणे दिला आहे :---

| अ.क्र. | जिल्ह्याचे नाव | पंचायत समितीचे नाव | लेखापरिक्षण अहवालातील परिच्छेद क्रमांक | गुंतलेली रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|
| ६२ | अकोला | पातुर | ०२ | रु.१०,९०,०००/- |

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, अकोला यांचेकडून खालील प्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

अपूर्ण स्थितीतील बांधकामे ही धडक सिंचन विहिर योजनेंतर्गत असलेल्या विहिरीची असून सन २००८-०९ मध्ये मंजूर असलेल्या १०९ विहिरीचे लाभार्थ्यांना प्रत्येकी रुपये १०,०००/- प्रमाणे एकूण रुपये १०,९०,०००/- एवढा अग्रिम देण्यात आला होता. (यादी कार्यालयात उपलब्ध आहे) त्यापैकी २१ लाभार्थ्यांनी विहिरीचे काम पूर्ण केले असून ८८ लाभार्थीनी अद्याप कामे सुरू केलेली नाहीत. तथापि शासन निर्णय नियोजन विभाग क्र. योजना सन २०१५ दि.२७ नोहेंबर, २०१५ नुसार दिनांक ३० एप्रिल, २०१६ पर्यत शासनाने विहिरीची कामे पूर्ण करण्याकरिता मुदतवाढ दिली होती. सदर अपूर्ण विहिरी शासनाचे परिपत्रक क्र.२७/११/२०१५ नुसार महात्मा गांधी रोजगार ग्रामीण हमी योजनेमध्ये वर्ग केल्या असून त्या विहिरी महात्मा गांधी रोजगार ग्रामीण हमी योजना मधून पूर्ण करण्यात येत आहे. शासन निर्णय क्र.यो २१५ प्र.क्र.२८(३) रोहयो-५ मंत्रालय, मुंबई दि.२५ ऑक्टोबर, २०१६ नुसार धडक रोजगार हमी योजने अंतर्गत घेण्यात येणाऱ्या धडक सिंचन विहिर कार्यक्रमातील अपूर्ण विहिरी पूर्ण करण्यासाठी दिनांक ३० जून, २०१७ पर्यंत मुदतवाढ मिळाली आहे.

**परिच्छेद क्रमांक ४.३९४/३ (सन २०११-१२)**

जिल्हा परिषद व पंचायत समित्यांना त्यांच्या कार्यक्षेत्रातील ग्रामीण भागामध्ये पिण्याच्या पाण्याची पुरवठा योजना विहिरी, खेड्यातील रस्ते, प्राथमिक आरोग्य केंद्र, प्राथमिक शाळा, इमारती इ.सारख्या स्थानिक विकासाच्या व सामुहिक विकासाच्या बांधकामासाठी योजनेअंतर्गत तरतुदीतून अर्थसहाय्य देण्यात येते. अर्थ सहाय्याच्या रकमेमध्ये जिल्हा परिषद व पंचायत समिती यांनी त्यांचा हिस्सा घालून व स्थानिक भागातून लोकवर्गणी हिस्सा (श्रमदान अगर रोख स्वरुपात) घालून सदर बांधकामे ज्या वर्षी मंजुरी दिली जाते त्या वर्षातच पूर्ण करण्याची शासनाची अपेक्षा असते ही कामे सर्वसाधारणपणे ग्रामपंचायतींच्या अभिकरणामार्फत पार पाडली जातात. परंतु वस्तुस्थिती पाहता सदर बांधकामांना शासनाचे जेवढे अर्थसहाय्य मिळते तेवढ्याच रक्कमेचे बांधकाम करून उर्वरित काम पूर्ण केले जात नाही. अशा अपूर्ण अवस्थेत राहिलेली बांधकामे, वर्षानुवर्षे पडून असतात. त्यामुळे त्या बांधकामात गुंतलेला पैसा निरर्थक अडकून पडतो. त्याचप्रमाणे स्थानिक जनतेला विकासाचा लाभ मिळू शकत नाही. तसेच अशी बांधकामे फार काळ अपूर्ण अवस्थेत राहिल्याने त्यांची पडझड होण्याची शक्यता असते यास्तव जिल्हा परिषद व पंचायत समित्यांनी योजनाअंतर्गत अथवा योजनेत्तर विकास कार्यक्रमाप्रमाणे हाती घेतलेली कामे अपूर्ण अवस्थेत पडून राहणार नाहीत याची दक्षता घेणे आवश्यक आहे. उदाहरणादाखल लेखा परिक्षणाचे वेळी पंचायत समित्यांनी पुरविलेल्या माहितीनुसार अशा प्रकारे अपूर्ण अवस्थेत पडून राहिलेल्या दिनांक ३१ मार्च, २०१२ अखेर बांधकामाचा तक्ता पुढीलप्रमाणे दिला आहे :---

| अ.क्र. | जिल्ह्याचे नाव | पंचायत समितीचे नाव | लेखापरिक्षण अहवालातील परिच्छेद क्रमांक | गुंतलेली रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|
| ६३ | अकोला | मुर्तिजापुर | ३ | रु.१३,७०,०००/- |

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, अकोला यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

जलपूर्ती सिंचन विहिरीकरिता रु.१०,०००/- प्रमाणे एकूण १३७ लाभार्थींना रुपये १३,७०,०००/- प्रथम अग्रिम देण्यात आलेला होता. पैकी २१ लाभार्थीचा रुपये २,१०,०००/- अग्रिम समायोजन झालेला असून उर्वरित एकूण ११६ लाभार्थ्याकडे रुपये ११,६०,०००/- अग्रिम प्रलंबित आहे.

सदरहू ११६ लाभार्थ्यांना जलपुर्ति सिंचन यंत्रणा उपविभागीय अधिकारी, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण उपविभाग, लघु सिंचन जलसंधारण उपविभाग (स्थानिक स्तर) व ग्रामीण पाणीपुरवठा उपविभाग, मुर्तिजापूर यांचेकडून अनुक्रमे दि. ३० क्टोबर २०१०, दि.२१ मार्च २०११, दि.२८ मार्च २०१२, दि.२१ डिसेंबर २०१२, दि.१० जानेवारी २०१३, दि.२८ मार्च २०१३ ला वारंवार पत्रव्यवहार करून त्वरीत बांधकाम सुरू करावे, अन्यथा अग्रिमाची रक्कम परत करण्यात यावी, असे नोटीसव्दारे कळविण्यात आले आहे.

तसेच दि.२१ ऑक्टोबर २०११, दि. २९ ऑगस्ट २०१२, दि.२३ सप्टेंबर २०१३ अन्वये लाभार्थ्यांकडून रक्कम सक्तीने वसुली होणेकरिता उचित कार्यवाहीस्तव प्रस्ताव जिल्हाधिकारी, अकोला यांचेकडे सादर करण्यात आलेला आहे.

महाराष्ट्र शासन नियोजन विभाग, शासन निर्णय क्र.योजना-२०१५/प्र.क्र/ २८(३)/रोहयो-५ दि. २५ ऑक्टोबर २०१६ अन्वये धडक सिंचन विहिरी पूर्ण करण्याकरिता दि. ३० जून, २०१७ पर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली असून, त्यानुसार सदर विहिरी पूर्ण करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

## मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष

अकोला जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिनांक १ जून, २०१७ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, आक्षेपामध्ये नमूद केलेली कामे कधीपासून प्रलंबित आहेत (२) अपूर्ण कामे पूर्ण न झाल्याने किती रक्कम गुंतून पडली आहे (३) कामे पूर्ण करून घेण्याबाबत जिल्हा परिषदेने काय कार्यवाही केली आणि (४) अपूर्ण कामे पूर्ण करण्यासाठी जिल्हा परिषदेने काय नियोजन केले आहे ?

यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, पहिले प्रकरण पंचायत समिती तेल्हारा, दुसरे प्रकरण बाळापूर आणि तिसरे प्रकरण मुर्तीजापूर पंचायत समिती मधील आहे. तीनही प्रकरणात जलपूर्ती सिंचन विहिर योजनेची कामे आहेत. सन २००९-२०१० अंतर्गत २१ लाभार्थ्यांना प्रती रुपये १० हजार प्रमाणे विहिर खोदकाम चालू करण्याकरिता रुपये २,१०,०००/- अग्रिम देण्यात आला होता. भविष्यात त्याने काम केले नाही तर आणि त्यांना जर पुन्हा काम करावयाचे असेल तर त्यासाठी मागिल वर्षातील विहिरी या पुन्हा पुनर्जीवित केल्या होत्या. अकोला जिल्ह्यात ६६४ विहिरी पुनर्जीवीत केलेल्या आहेत. शासनाने दिनांक ३० जून, २०१७ पर्यंत काम करण्याची संधी दिलेली आहे. २ ते ५ कामे पूर्ण होतील अशी अपेक्षा आहे.

यावर समितीने सूचित केले की, दिनांक ३० जून, २०१७ पर्यंत कामे पूर्ण झाली नाही तर जिल्हा परिषदेला पुढील कार्यवाही करावी लागणार आहे आणि त्यासंदर्भातील अहवाल समितीला सादर करावा लागणार आहे.

तद्नंतर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी विदित केले की, १० हजार रुपयांचा अग्रिम वसूल करण्यासाठी शासनाचे आदेश आहेत. त्यानुसार तहसीलदार यांच्याकडे प्रस्ताव पाठविणार आहोत. यंत्राच्या सहाय्याने कामे केली तरी चालणार आहेत. शासनाने यंत्राच्या सहाय्याने काम करण्याची परवानगी दिलेली आहे. ही कामे शेतकऱ्यांनी करावयाची आहेत. परंतु, शेतकऱ्यांकडे पैसा नाही ही एक अडचण आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी आणखी अग्रिम देण्यासाठी मागणी केलेली आहे. शासनाने त्यांना अगोदरच अग्रिम दिलेला आहे. त्यामुळे पुन्हा अग्रिम देता येणार नाही. अगोदर ज्यांना उचल दिली आहे, त्यांना पुन्हा दिली जात नाही. नवीन धोरणानुसार अडीच लाख रुपये रक्कम केवळ धडक विहिर कार्यक्रमासाठी आहे. एमआरईजीएस चा धडक सिंचन विहिरीचा कार्यक्रम आत्महत्याग्रस्त सहा जिल्ह्यांपुरताच आहे. एमआरईजीएसमध्ये विहिरीचे काम पूर्ण झाल्यावर त्याचे मुल्यांकन करून जिल्हा परिषद त्यास पैसे देते. धडक सिंचन योजना एकदा (वन टाईम) आहे. दहा हजार रुपये द्यायचे व अडीच लाख रुपयांची

विहिर करण्यास सांगायची असे शासनाचे धोरण आहे. या विषयाबाबत सचिवांची साक्ष आयोजित करण्यात यावी असे समितीने सूचित केले.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्यांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

जिल्ह्यातील तेल्हारा, बाळापूर आणि मुर्तिजापूर पंचायत समितीतील पुनर्जीवीत ६६४ विहीरींची सद्य:स्थिती काय आहे ? या विहिरींची कामे पूर्ण केली आहेत काय, नसल्यास विलंबाची कारणे काय ?

**उपरोक्त मुद्यांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालील प्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

अकोला जिल्ह्यातील अकोला व तेल्हारा पंचायत समिती वगळून इतर पाच पंचायत समितीमध्ये पुनर्जीवीत केलेल्या एकूण ६६२ सिंचन विहिरी आहेत. त्यांची तालुकानिहाय संख्या खालील प्रमाणे आहे :-

अकोट-११७, बाळापुर-२२९, बार्शिटाकळी-११३, मुर्तिजापूर-२१, पातुर-१८२

सदर पुनर्जीवीत केलेल्या विहीरींपैकी आजपावेतो २९० विहिरी पूर्ण झालेल्या असून ३७२ विहिरी शिल्लक आहेत. त्यापैकी ३० विहिरी प्रगतीपथावर आहेत. सुरू करावयाच्या सिंचन विहीरींची संख्या १३२ एवढी आहे. उर्वरित २१० विहिरी रद्द करण्याचे प्रस्तावित करण्यात आलेले आहे. सदर विहिरी पूर्ण करण्याच्या अनुषंगाने लाभार्थ्यांच्या बैठका घेऊन दिनांक ३० जून, २०१८ पर्यंत विहिरी पूर्ण करण्याबाबत लाभार्थ्यांना अवगत करण्यात आलेले आहे.

## मंत्रालयीन विभागाचा अभिप्राय

**नियोजन (रोहयो) विभागाचे अभिप्राय :-** नियोजन (रोहयो) विभागाच्या दिनांक ७ नोव्हेंबर, २०१७ च्या शासन परिपत्रकान्वये धडक सिंचन विहिर कार्यक्रमांतर्गत अपूर्ण विहिरी पूर्ण करण्यास दिनांक ३० जून, २०१८ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. तसेच आढावा बैठकींद्वारे, व्हिडीओ कॉन्फरन्सींगद्वारे विहिरी पूर्ण करण्याबाबत क्षेत्रीयस्तरावर पाठपुरावा करण्यात येत आहे.

## विभागीय सचिवांची साक्ष

पंचायती राज समितीने अकोला जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यांवर अधिक माहिती घेण्यासाठी दिनांक २९ मे, २०१८ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, तेल्हारा, बाळापूर, मुर्तिजापूर पंचायत समितीमधील ६६४ सिंचन विहिरीची सद्य:स्थिती काय आहे.

यावर सचिव (रोहयो) यांनी खुलासा केला की, अकोला जिल्ह्यातील अकोला व तेल्हारा पंचायत समिती वगळून इतर पाच पंचायत समितीमध्ये ६६२ विहिरी पुनर्जीवीत केल्या आहेत. त्यापैकी २९० विहिरी पूर्ण केल्या आहेत. ३७२ विहिरी बाकी आहेत. २१० लाभार्थ्यांनी विहिरी रद्द करण्याचा प्रस्ताव दिला आहे. पाच जिल्ह्यामध्ये ८० हजार विहीरींचा धडक कार्यक्रम आयोजित केला होता. त्यापैकी ८ हजार विहिरी पुनर्जीवीत केल्या आहेत. १०३ लाभार्थ्यांनी विहिरी पूर्ण करायच्या नाहीत असे लिहून दिले आहे. त्यामुळे त्या विहिरी रद्द केल्या आहेत.

तद्नंतर मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अकोला यांनी खुलासा केला की, ज्या लाभार्थ्यांनी विहिरी रद्द कराव्यात असे लिहून दिले त्यांचा प्रस्ताव जिल्हाधिकारी यांच्याकडे पाठविण्यात आला आहे. अकोला येथे ११७, अकोट येथे १०३ इतक्या लाभार्थ्यांनी लिहून दिले आहे.

यानंतर समितीने सूचित केले की, अकोला तालुक्यात गट विकास अधिकारी यांनी ५०० ते ६०० विहिरी उद्दिष्टापेक्षा जास्त मंजूर केल्या आहेत. त्यांना थोडाफार निधी दिलेला आहे त्या विहिरी अपूर्ण आहेत, त्या विहीरींना निधी नसल्यामुळे त्या अपूर्ण राहिल्या आहेत. ग्रामविकास विभागाने काही विहीरींना मंजुरी दिली आहे. त्यामुळे ज्या अपूर्ण विहिरी आहेत त्या पूर्ण करण्याचे नियोजन करावे.

यावर सचिव (रोहियो) यांनी खुलासा केला की, दिनांक ३० जून, २०१८ रोजी आढावा बैठक घेण्यात येणार आहे. त्या बैठकीत आढावा घेऊन नरेगामार्फत या विहिरी पूर्ण करण्याचा प्रयत्न करण्यात येईल.

## अभिप्राय व शिफारशी

जिल्हा परिषद व पंचायत समिती अंतर्गत त्यांच्या कार्यक्षेत्रातील ग्रामीण भागामध्ये पेयजल पुरवठा योजना, विहिरी, खेड्यातील रस्ते, प्राथमिक आरोग्य केंद्र, प्राथमिक शाळा, इमारती इत्यादी करिता स्थानिक विकासाच्या व सामुहिक विकासाच्या बांधकामासाठी योजनेअंतर्गत तरतुदीतून अर्थसहाय्य देण्यात येते. सदर अर्थ सहाय्याच्या रकमेमध्ये जिल्हा परिषद व पंचायत समिती यांनी त्यांचा हिस्सा जमा करून व स्थानिक भागातून लोकवर्गणी (श्रमदान अथवा रोख स्वरुपात) जमा करून उक्त बांधकामांना ज्या वर्षी मंजुरी दिली जाते त्या वर्षातच पूर्ण व्हावीत अशी शासनाची अपेक्षा असते ही कामे सर्वसाधारणपणे ग्रामपंचायतीच्या अभिकरणामार्फत पार पाडली जातात. तथापि, सदर बांधकामे शासन प्राप्त निधी एवढीच पूर्ण करून वर्षानुवर्षे अपूर्णावस्थेत पडून राहतात, त्यामुळे गुंतलेल्या निधीचे नुकसान होण्याची शक्यता अधिक असते. दिनांक ३१ मार्च, २०१२ अखेर जिल्हा परिषद अकोला अंतर्गत तेल्हारा, बाळापूर व मुर्तिजापूर या पंचायत समितींच्या कार्यक्षेत्रात जलपूर्ती सिचंन विहिर योजनेची कामे अपूर्ण आहेत. सन २००९-१० अंतर्गत तेल्हारा पंचायत समितीने २१ लाभार्थ्यांना प्रत्येकी रुपये १०,०००/- प्रमाणे विहिर खोदकाम करण्याकरिता २,१०,०००/- अग्रिम देण्यात आला होता. त्याचप्रमाणे बाळापूर आणि मुर्तिजापूर पंचायत समिती कार्यक्षेत्रात अनुक्रमे प्रत्येकी रुपये १०,०००/- प्रमाणे ३८६ लाभार्थ्यांसाठी दिलेली अग्रिम रक्कम रुपये ३८,६०,०००/- रुपये आणि प्रत्येकी रुपये १०,०००/- प्रमाणे १३७ लाभार्थ्यांसाठी दिलेली अग्रिम रक्कम रुपये १३,७०,०००/- एवढी रक्कम विहिरी पुनर्जीवीत करण्याकरिता प्रदान करण्यात आलेली आहे. अकोला व तेल्हारा पंचायत समिती वगळून इतर पाच पंचायत समित्यांमध्ये एकूण ६६४ विहिरी पुनर्जीवीत करण्यासाठी दिनांक ३० जून, २०१७ रोजीपर्यंत मुदत वाढ देण्यात आलेली होती. सदर पुनर्जीवीत केलेल्या विहीरींपैकी आजपावेतो २९० विहिरी पूर्ण झालेल्या असून ३७२ विहिरी शिल्लक आहेत, त्यापैकी ३० विहिरी प्रगतीपथावर आहेत. सुरू करावयाच्या सिंचन विहीरींची संख्या १३२ एवढी आहे. उर्वरित २१० विहिरी रद्द करण्याचे प्रस्तावित करण्यात आलेले आहे. सदर विहिरी पूर्ण करण्याच्या अनुषंगाने लाभार्थ्यांच्या बैठका घेऊन दिनांक ३० जून, २०१८ पर्यंत विहिर पूर्ण करण्याबाबत लाभार्थ्यांना अवगत करण्यात आले आहे असे समितीस विदित करण्यात आलेले होते.

याप्रकरणी अपूर्ण स्थितीतील बांधकामांबाबत झालेल्या दिरंगाई व विलंबासाठी कोणत्याही व्यक्तीवर जबाबदारी निश्चित करण्यात आलेली नाही. समितीने साक्षी दरम्यान निदेश दिले होते की, दिनांक ३० जून, २०१७ पर्यंत कामे पूर्ण न झाल्यास जिल्हा परिषदेने पुढील कार्यवाही करून त्यासंदर्भातील अहवाल समितीला सादर करावा. तथापि, **सदर अपूर्ण विहीरींच्या अनुषंगाने लाभार्थ्यांच्या बैठका घेऊन दिनांक ३० जून, २०१८ पर्यंत विहिरी पूर्ण करण्याबाबत लाभार्थ्यांना अवगत करण्यात आले. या व्यतिरिक्त कोणतीही ठोस कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे समितीची एक प्रकारे दिशाभूल केलेली असल्याने याप्रकरणी समिती तीव्र नापसंती व्यक्त करीत आहे.**

अकोला जिल्ह्यातील अकोला व तेल्हारा पंचायत समिती वगळून इतर पाच पंचायत समितीमध्ये ६६२ विहिर पुनर्जीवीत केल्या आहेत. त्यापैकी २९० विहिरी पूर्ण केल्या आहेत. ३७२ विहिरी बाकी आहेत. **२१० लाभार्थ्यांनी विहिरी रद्द करण्याचा प्रस्ताव दिला आहे. ज्या लाभार्थ्यांनी विहिरी रद्द करण्याबाबतचा प्रस्ताव दिलेला आहे अशा प्रकारे प्रकरणाची संपूर्ण चौकशी करण्यात यावी. शेतकऱ्यांना विहिरींची आवश्यकता असते परंतू प्रशासकीय अधिकारी त्यांना टप्प्याटप्प्याने पैसे देताना विहिरींच्या कामाची जाणीवपूर्वक तपासणी करीत नाहीत. त्यामुळे लाभार्थ्यांच्या विहिरी विहीत वेळेत पूर्ण होत नाहीत. बहुतांशी विहिरी प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या हलगर्जीपणामुळे प्रलंबित राहतात अशी समितीची धारणा आहे. अशा अपूर्ण विहिरी पूर्ण कशा होतील याचा मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी स्वत: आढावा घेऊन अपूर्ण विहिरी पूर्ण करण्याच्या दृष्टीने कार्यवाही करावी तसेच अशा विहिरी अपूर्ण ठेवण्यामध्ये व शेतकऱ्यांना नाहक त्रास देण्यासंदर्भात प्रशासकीय अधिकारी दोषी आढळून आल्यास त्यांचेविरुद्ध कडक स्वरुपाची कारवाई करण्यात यावी व तसेच कडक स्वरुपाचे निदेश शासनाने निर्गमित करावेत अशी समितीची शिफारस आहे. तसेच यापुढे राज्यातील सर्व**

**जिल्हा परिषदांनी व पंचायत समित्यांनी त्यांच्या कार्यक्षेत्रातील पाणीपुरवठा योजना, विहिर, रस्ते, प्राथमिक आरोग्य केंद्र, प्राथमिक शाळा, इमारती इत्यादीकरिता स्थानिक व सामुहिक विकासाच्या योजनांना जिल्हा परिषद, शासकीय व अभिकरण निधीतील योजनांना ज्या वर्षी मंजुरी दिली जाते त्या वर्षातच त्या पूर्ण करण्यात याव्यात व प्रस्तावित कामे पूर्ण करण्यासाठी संबंधितांवर जबाबदारी निश्चित करण्यात यावी** .

तसेच जिल्हा परिषद व पंचायत समितीने योजनांतर्गत व योजना विकास कार्यक्रमाप्रमाणे हाती घेतलेली कामे अपूर्णावस्थेत राहणार नाहीत याची दक्षता घेण्याच्या दृष्टीने परिपूर्ण व सर्वंकष स्वरुपाचे परिपत्रक निर्गमित करावे तसेच शासनाद्वारे विविध बांधकामांसाठी संबंधित वर्षात नियोजित निधी दिलेला असणे व सदर निधी त्याच वर्षात खर्च करून बांधकाम पूर्ण करणे त्याच वित्तीय वर्षात बंधनकारक असते. मात्र **राज्यातील अनेक जिल्हा परिषद व पंचायत समित्या खर्चाचे वेळापत्रक पाळत नसल्यामुळे कामे अपूर्णावस्थेत राहून शासनाच्या उद्देशाची फलश्रुती होत नाही. तसेच लाभार्थी अपेक्षित लाभापासून वंचित राहतात आणि यात शासनाचा निधी देखील वापराअभावी पडून राहतो, ही बाब टाळण्यासाठी शासनाने सर्व संबंधितांना खर्चाच्या वेळापत्रकासंबंधात आवश्यक त्या मार्गदर्शक सूचना द्याव्यात अशी समिती शिफारस करीत आहे व याबाबत केलेल्या कार्यवाहीची स्वयंस्पष्ट माहिती समितीला दोन महिन्यांच्या आत पाठविण्यात यावी.**

प्रकरण दहा

## जिल्हा परिषद, अकोला

## लेखापरीक्षणास कागदपत्रे उपलब्ध न करून देणेबाबत

### १) परिच्छेद क्रमांक ३.२३३ (सन २०११-१२)

दुधाळा, मंडाळा, खांबोरा रस्त्याचे बांधकाम केले आहे, याबाबत खालील प्रमाणे आक्षेप आहेत.

पहिल्यावेळी दिनांक ५ मार्च, २०११ रोजी जाहिरात प्रसिद्ध करून निविदा मागविल्या परंतु कंत्राटदाराने काम करण्यांस नकार दिल्याने दिनांक ८ सप्टेंबर, २०११ रोजी दुसरी निविदा मागविली. श्री. व्ही. एच. विरमानी यांना कंत्राट देण्यांत आले. त्यांनी आयकर व विक्रीकराची कपात कमी केली आहे. कमी कपात केलेली रक्कम रु.२६,४७०/-+३०,४३०/-=५६,९००/- चा भरणा करून योग्य लेखाशिर्षाखाली करून दाखवावे.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, अकोला यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

दुधाळा, मंडाळा, खांबोरा रस्त्याचे कामाची निविदा प्रथम वेळेस दिनांक ५ मार्च, २०११ रोजी जाहीरात प्रसिद्ध करून मागविली होती. सर्वात कमी दरधारक कंत्राटदाराने काम करण्यांस नकार दिल्यामुळे, सदर कामाची निविदा पुनश्च: दिनांक ८ सप्टेंबर, २०११ रोजी दुसरी वेळेस निविदा प्रसिद्ध करण्यात आली. त्यानुसार सदर काम श्री. व्ही. एच. विरमानी यांना मिळाले. सदर कामाची एकूण किंमत रुपये २५.२९ लक्ष चे असून यामध्ये मातीकाम व अस्तरीकरण चे मुल्यांकन एकूण स्वामित्वधनाची रक्कम रुपये १३.२९ लक्ष असल्यामुळे, एकूण कामाचे मुल्यांकन रुपये २५.२९ लक्ष मधुन स्वामित्वधनाची रक्कम वजा करून उर्वरित कामाचे रकमेवर विक्रीकर रुपये ४२,२१५/- व आयकराची कपात रुपये २७,७२९/- करण्यात आली आहे.

मंजूर अंदाजपत्रकात मातीकामाचा एकूण दर रुपये १३३.६५ प्र.घ.मी. असून यामध्ये मातीकामाची किंमत रुपये ६३/- प्र.घ.मी. असून गौणखनिजाची किंमत रुपये ७०.६५/- प्र.घ.मी. एवढी अंतर्भुत आहे. तसेच गौणखनिजाची रक्कम ही कंत्राटदारास अदा केली जात नसल्यामुळे शासनाखाती जमा केली जाते. त्यामुळे ह्या रकमेवर आयकर व विक्रीकर कपात करण्यात आला नाही. त्यामुळे कामाचे एकूण मुल्यांकनावर आयकर व विक्रीकर कपात करण्यात आलेली नाही. मातीकामाची रक्कम रुपये १३.२९ लक्ष रकमेचा भरणा शासन खाती करण्यांत आला आहे.

### २) परिच्छेद क्रमांक ३.३३०/६ (सन २०११-१२)

**जिल्हा नियोजन समितीने मान्यता दिलेल्या कामावर निधी खर्च न करता त्यांच्या विहित मान्यतेशिवाय तो निधी इतर कामावर वळता करून खर्च केल्याबाबत.**

जिल्हा परिषद अकोला सन २०११-२०१२ (परिच्छेद क्र. ०६) मा. जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव, जिल्हा नियोजन समिती, अकोला यांनी त्यांचे आदेश पत्र क्र कक्ष-२३/जिवायो/०९-१०/प्रशानिधी/५२०/१० दिनांक ३० मार्च, २०१० अन्वये खालील कोल्हापुरी बंधारे बांधकामाकरिता जिल्हा परिषद, अकोला यांनी सादर केलेल्या अंदाजपत्रकानुसार रुपये ५०.०० लक्ष निधी प्राप्त झाला होता. मात्र लघुसिंचन विभाग जिल्हा परिषद अकोला यांनी सदर मंजूर कामावर हा निधी खर्च न करता अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी जि. प. अकोला यांचे पत्र क्र. जिप/लसिवि/अंदाज/५३१/२०११, दिनांक ३१ मार्च, २०११ अन्वये हा निधी खालील कामावर वितरित केला आहे.

जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव, जिल्हा नियोजन समिती, अकोला यांनी त्यांचे आदेशपत्र क्र. कक्ष-२३/जिवायो/०९-१०/प्रशानिधी/५२०/१०, दिनांक ३० मार्च, २०१० अन्वये खालील कोल्हापुरी बंधारे बांधकामाकरिता जिल्हा परिषद, अकोला यांना सदर निधी मंजूर करतांना घातलेल्या अटी व शर्ती नुसार सदर निधी हा ज्या कामांकरिता वा योजनेकरिता मंजूर करण्यात आला आहे. त्यावरच व तेही दिनांक ३१ मार्च, २०१० पर्यत खर्च करण्याचे आदेशीत केले होते. यातीलच अट क्र. ११ अन्वये वित्तिय

वर्षाअखेर निधी अखर्चित राहत असल्यास बचत होणा-या निधीचे पुर्नविनियोजन प्रस्ताव जिल्हा नियोजन समिती, अकोला यांना सादर करण्याचेही आदेशित केले होते या बाबत खालील अभिप्राय आहेत :---

१) लेखापरीक्षणाचे अर्ध समास पत्र क्र. ३, दि. ५ ऑक्टोबर, २०१२ अन्वये याबाबत लघुसिंचन विभाग जि.प., अकोला यांनी जिल्हा नियोजन समिती, अकोला यांना सादर केलेले अंदाजपत्रक / प्रस्ताव पत्र क्र जिप/लसिवि/अंदाज/४५५, दि. २० मार्च, २०१० ची मागणी करण्यात आली होती मात्र विभागाने सदर अर्ध समास पत्रास कोणताही प्रतिसाद दिला नाही व अभिलेखेही सादर केली नाहीत.

२) कोल्हापुरी पद्धतीचा बंधारा पार्डी बांधकामाचे अंदाजपत्रक रुपये १४,९६८००/- चे असून त्यास तशी प्रशासकीय व तांत्रिक मान्यता मिळालेली असतांना लघुसिंचन विभाग, जि.प. अकोला यांनी या कामाकरिता रुपये २०.०० लक्ष म्हणजे प्रत्यक्ष प्रशासकीय मान्यता रकमेपेक्षा निष्कारण रुपये ५०,३२००/- जादा प्राप्त करून घेतले आहे.

३) कोल्हापुरी पद्धतीचा बंधारा हिवरा बल्लारखेड गाझीपुर, उनखेड या तिनही कामांचे प्रशासकीय व तांत्रिक मान्यतेचे अभिलेखे वरील अर्ध समास पत्रान्वये मागणी करण्यात आले होते मात्र तेही सादर करण्यात आले नाहीत. मात्र कोल्हापुरी पद्धतीचा बंधारा हिवरा बल्लारखेड बांधकामाचे अद्यापपर्यत अंदाज पत्रक सुद्धा तयार केलेले नसल्याचे मौखिकरित्या सांगण्यात आले.

अ) जिल्हा नियोजन समिती, अकोला यांनी वरील पत्र क्र ५२० दि. ३० मार्च, २०१० अन्वये दिलेला निधी व त्यामधुन केलेल्या खर्चाचे स्वतंत्र नोंदवही ठेवण्याचे व खर्चाचा अहवाल सादर करण्याचे अट क्र २ मध्ये निर्देशित केले आहे ही अभिलेखे सुद्धा सादर न केल्याचे प्रत्यक्ष मंजूर निधी रुपये ५०.०० लक्ष मधुन कोण-कोणत्या कामांवर किती खर्च करण्यात आला मंजूर कामावर किती व मंजूर नसलेल्या कामावर किती खर्च करण्यात आला याबाबतही तपासणी करता आली नाही.

ब) जिल्हा नियोजन समितीने प्रदान केलेल्या वरील अनुदानातुन त्या आदेशात असलेल्या बांधकामावरच खर्च केला किंवा कसे, हे दर्शविणारी अभिलेखे सादर केले नाहीत. जी कामे त्या अनुदान आदेशात नमुद नाहीत मात्र त्यावर खर्च केला असेल तो आवश्यक ती मान्यता न घेता खर्च केला आहे.

क) कोल्हापुरी पद्धतीचा बंधारा पार्डी बांधकामाचे अंदाजपत्रक रुपये १४,९६,८००/- चे असून त्यास तशी प्रशासकीय व तांत्रिक मान्यता मिळालेली असतांना या कामाकरिता घेतलेल्या रुपये २०.०० लक्ष मधून प्रत्यक्ष खर्च वजा जाता उर्वरित रक्कम परत करून तसे अभिलेखे सादर करणे आवश्यक आहे.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, अकोला यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.---**

सन २००९-२०१० मध्ये कोल्हापुरी पद्धतीचा बंधारा विशेष दुरुस्ती २७०२-७०५६ या लेखाशिर्षातर्गत रुपये ५०.०० लक्ष निधी प्राप्त झाला होता. सदर निधी इसापूर, गाझीपूर, पार्डी, सांगवी जोमदेव, उनखेड व हिवरा बल्लारखेड या बंधा-यांचे दुरुस्ती करिता प्राप्त झाला होता. सदर कामांचा सन २००९-२०१० चा वार्षिक आराखडा (सर्वसाधारण) सन २००८-०९ मध्ये सादर केला होता व त्यावेळेस त्यामध्ये ३२ कोल्हापुरी पद्धतीचा बंधारा दुरुस्ती करण्याकरिता रुपये १०५.७८ लक्ष एवढी ची तरतूद करण्यात आली होती. या आराखड्यामध्ये ही सर्व कामे सुद्धा समाविष्ट होती. त्यांची प्रत नस्तीला उपलब्ध आहे. विभागाची प्रत्यक्ष मागणी रुपये १०५.७८ लक्षची असतांना फक्त रुपये ५०.०० लक्ष निधीच मंजूर झाला होता व सदर लेखाशिर्ष सन २०१०-२०११ पासुन बंद होणार होते म्हणजेच कोल्हापुरी पद्धतीचा बंधा-याचे दुरुस्ती करिता निधी प्राप्त होणार नव्हता सदर बंधारे दुरुस्त करण्याबाबत मा. आमदार महोदयांनी जिल्हा नियोजन समितीच्या सभेत मुद्दा उपस्थित केला होता त्यानुसार दुरुस्तीकरिता प्राप्त निधी खर्च करण्याचे नियोजन करण्यात आले होते. संदर्भाकरिता दिनांक ०२ फेब्रुवारी, २०१० व दिनांक १३ ऑगस्ट, २०१० च्या जिल्हा नियोजन समितीच्या इतिवृत्त व विभागाचे अनुपालनाची प्रत उपलब्ध आहे. त्यामुळे लोकप्रतिनिधींची आग्रही मागणी असलेल्या व तातडीने

दुरुस्ती आवश्यक असलेल्या कामांना प्राधान्य देऊन सदर निधी या कामावर खर्च करण्यात आला व त्याकरिता अतिरीक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी निधी वळतीस मान्यता प्रदान केली आहे.

१) विभागाचे सदर पत्र क्र.जिप/लसिवि/अंदाज/४५५, दिनांक २० मार्च, २०१० हया पत्राची प्रत नस्तीला उपलब्ध आहे.

२) कोल्हापुरी पद्धतीचा बंधारा पार्डी या कामाची विशेष दुरुस्ती करणे आवश्यक होते. सन २००९-१० च्या अंदाजपत्रकात या कामाकरिता निधीची तरतूद करण्याकरिता ढोबळमानाने २०.०० लक्षची तरतूद करण्यात आली होती व नंतर सविस्तर मोजमापे घेऊन अंदाजपत्रक (Detail Estimate) करण्यात आले. निधीची तरतूद रुपये २०.०० लक्ष अगोदर करण्यात आली व नंतर सविस्तर अंदाजपत्रक रुपये १४,९६,८००/- चे तयार करून त्यास मान्यता प्राप्त झाली त्यामुळे प्रत्यक्ष मंजूर अंदाजपत्रकापेक्षा तरतूद जास्त होती. खर्च मंजूर अंदाजपत्रकाप्रमाणेच करण्यांत आला आहे.

३) कोल्हापुरी पद्धतीचा बंधारा हिवरा बल्लारखेड, गाझीपूर, व उनखेड या कामांचे अंदाजपत्रकांना तांत्रिक व प्रशासकीय मान्यता घेतलेली नाही. तसेच सदर कामावर खर्चही निरंक आहे. सदर तिनही कामाच्या ऐवजी कोल्हापुरी पद्धतीचा बंधारा विशेष दुरुस्तीचे कामे सिंदखेड, राहीतशिवडी, राहीत-२, वाळकी, दोडकी, खडकीटाकळी, अमानतपूर ताकोडा ही कामे निधीच्या मर्यादेत घेण्यात आली होती व ती पूर्ण झाली आहेत.

अ) जिल्हा नियोजन समितीकडून प्राप्त निधी व त्यामधून कामनिहाय स्वतंत्र खर्चाची नोंदवही ठेवण्यात आली आहे.

ब) खर्च करण्यात आलेला निधी सक्षम अधिका-यांची मान्यता घेऊनच करण्यात आला आहे. सदर लेखाशिर्ष सन २०१०-२०११ पासुन बंद होणार होते म्हणजेच कोल्हापुरी बंधाऱ्याचे दुरुस्तीकरिता निधी प्राप्त होणार नव्हता, त्यामुळे लोकप्रतिनिधींची आग्रही मागणी असलेल्या व तातडीने दुरुस्ती आवश्यक असलेल्या कामांना प्राधान्य देऊन सदर निधी या कामावर खर्च करण्यात आला व त्याकरिता अतिरीक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी निधी वळतीस मान्यता प्रदान केली आहे.

क) कोल्हापुरी पद्धतीचा बंधारा पार्डी दुरुस्ती बांधकामाकरिता ढोबळमानाने रु २०.०० लक्षची तरतूद केली परंतु सविस्तर अंदाजपत्रक रुपये १४.९६ लक्षचे झाल्याने त्यास तांत्रिक मान्यता व प्रशासकीय मान्यता घेऊन त्यानुसार खर्च करण्यात आला व निधी वळतीस अतिरीक्त मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद, अकोला यांची मान्यता घेऊन इतर मंजूर कामावर निधी खर्च करण्यात आला आहे. वर नमूद कोल्हापुरी पद्धतीचा बंधारा पार्डी येथील कामावरील तरतुदीच्या अनुषंगाने उर्वरित रक्कम रुपये ५.०४ लक्ष ही रक्कम सदर लेखाशिर्ष अंतर्गत प्राप्त एकूण रुपये ५०.०० लक्ष मधुन रुपये ४२.६५ लक्ष खर्च वजा जाता उर्वरित रक्कम रुपये ७.३५ लक्ष शासनखाती जमा करण्यात आली व त्यामध्ये वर नमुद रक्कम रुपये ५.०४ लक्ष ही समाविष्ट आहे. सन २०१०-२०११ अखेर योजनांतर्गत ची अखर्चित रक्कम रुपये ९४.६३ लक्ष ही उचित लेखाशिर्षाखाली शासनखाती जमा करण्यात आली आहे. त्यामध्ये अनुपालनात नमुद रकमेचाही प्रामुख्याने समावेश आहे.

**३) परिच्छेद क्रमांक ३.५५०/३ (सन २०११-१२)**

**अनुसूचित जाती उपयोजनेतंर्गत अनुसूचित जाती/नवबौध्दांना ५०% अनुदानावर शेळयांचे गट वाटप सन २०१०-११ मधील अनियमिततेबाबत :**

अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी प्र.क्र.जा.क्र.जिपस/पशुस/तां३/१०१, दिनांक ३१ मार्च, २०११ अन्वये रु.१३.५० लक्ष मधुन रु.११,२३,२००/- चा अग्रिम प्रदान करण्यांस मंजुरी देण्यांत आली याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत :--

१) आयुक्तालयाकडून दिनांक ३१ मे, २०१० ला वित्तीय तरतूद उपलब्ध झाली असतांना त्या वित्तीय वर्षाचे अखेरपर्यंत म्हणजे सन २०१०-११अखेर पर्यंत योजना राबविण्यांत आली नाही.

२) माहे मार्चमध्ये म्हणजे वित्त वर्षाचे अखेरीस कोणतेही अग्रिम मंजूर करणे व प्रदान करण्यास निर्बंध असतांनाही वरीलप्रमाणे दिनांक ३१ मार्च, २०११ ला रु.११२३२००/- चा अग्रिम प्रदान करण्यात आला.

३) अग्रिम प्रदान आदेशावर अग्रिम कोणास देण्यांत यावे हे नमूद नसतांनाही ती रक्कम व्यवस्थापक पुण्यश्लोक अहिल्याबाई मेंढी व शेळी विकास प्रक्षेत्र, पोहरा ता. जि.अमरावती यांना प्रदान करण्यांत आली.

४) पुण्यश्लोक अहिल्याबाई मेंढी व शेळी विकास प्रक्षेत्र पोहरा, ता.जि.अमरावती यांना पुरवठा आदेश देतांना त्यांचे पत्र क्रं.८३४/३५ दिनांक ३१ मार्च, २०११ प्रमाणे शेळी वजन सरासरी १८२ किलो तर बोकड वजन सरासरी १५ किलो दर रु.१६०/- प्रमाणे २४००/- ग्राह्य धरण्यात आले होते व त्यांची रुपये १३.०० लक्ष अग्रीमाची मागणीवरून रु.११२३२००/- प्रदान करण्यांत आले.

५) सदर संस्थेस अग्रिम अदा करूनही त्यांनी शेळी व बोकड पुरवठा न करता सन २०११-१२ मध्ये रक्कम परत केली.

६) पशुधन विकास अधिकारी, पंचायत समिती, अकोला यांचे पत्र क्र.१५७/११, दिनांक २४ मे, २०११ नुसार लाभार्थ्यांना शेळया पसंत नसल्यामुळे सर्व लाभार्थी परत आले व त्यांनी स्थानिक बाजारातून शेळया खेरीदीची मागणी केली असल्याने पुरवठा आदेश रद्द करावे लागतील. सदर पत्राचे अनुषंगाने विचार केला असता किती लाभार्थी पोहरा येथे गेले व कधी गेले ? याचे स्पष्टीकरण करणे आवश्यक आहे.

७) प्रथम पुण्यश्लोक अहिल्याबाई मेंढी व शेळी विकास प्रक्षेत्र पोहरा, ता.जि.अमरावती यांना दिलेला पुरवठा आदेश रद्द करणे व नंतर स्थानिक बाजारातून शेळ्या बोकड खरेदी करण्यास आयुक्तालयाची, शासनाची पूर्वमान्यता घेणे आवश्यक होते.

८) स्थानिक बाजारातुन शेळया व बोकड खरेदी करण्यास विभागाने आदेश क्र.९४२, दि.१४ जुलै, २०११ अन्वये वित्त प्रेषण देण्यांत आले त्याव्दारे त्या त्या स्तरावर ज्या शेळया व बोकड खरेदी करण्यांत आले त्या खरेदीचे निकष स्पष्ट करण्यांत आलेले नाही. वित्त प्रेषण प्रदान करतांना पंचायत समितीस्तरावर स्थानिक बाजारातुन शेळया+बोकड खरेदी करण्याच्या योजनेची कार्यप्रणाली, निकष स्पष्ट करून त्यास सक्षम अधिकारी यांची तांत्रिक मान्यता घेतलेली नाही. खरेदी करावयाच्या शेळ्यांच्या जाती कोणत्या असाव्यात त्यांचे वजन व वय किती असावे, खरेदी करावयाची पद्धत काय, त्यांचे दर पशुसंवर्धन विभागाने कसे निश्चित केले, याबाबत कोणतेही स्वयंस्पष्ट आदेश वित्त प्रेषण वितरीत करतांना देण्यांत आलेले नाहीत.

९) सन २०१०-११ मध्ये पशुसंवर्धन व दुग्धविकास समिती सभा दिनांक १५ जून, २०१०, ठराव क्र.५ अन्वये १०७ गटास रु.१४०१३/- अनुदान व १४,९९,३९१ अधिक १४,९९,२८४ ला लाभार्थी हिस्सा गृहीत धरून रु.२९,२८,६७५/- च्या योजनेस मान्यता घेण्यांत आली होती. मात्र सन २०११-१२ विभागाने खरेदीसंदर्भात केलेल्या बदलास व योजनेस सन २०११-१२ मध्ये प्रशासकीय मान्यता घेतलेली नाही.

१०) वित्त प्रेषण वितरित करण्यापुर्वी विभागाने शेळया व बोकड यांचे स्थानिक बाजारातील दर काय, याबाबत बाजार सर्वेक्षण केलेले नाही. मात्र सन २०११-१२ मध्ये ही अखर्चीत रक्कम खर्च करतांना १०७ ऐवजी केवळ ९६ गटांकरिता वित्त प्रेषण वितरत करण्यांत आले. त्यामध्ये कोणत्या ११ लाभार्थी गटांना वगळले त्या लाभार्थ्यांना काढण्याचे निकष काय त्याबाबत कोणाचे आदेश घेण्यांत आले, ही अभिलेखे लेखापरिक्षणास अप्राप्त आहेत.

११) सन २०१०-११ व २०११-१२ मध्ये वरीलप्रमाणे लाभ देतांना मूर्तिजापूर पंचायत समितीचा समावेश करण्यांत आलेला नाही.

१२) योजनेनुसार केवळ ९६ व्यक्तींना लाभ देता आला. मात्र हीच योजना सन २०१०-११ मध्ये राबविली असती तर, १०७ जणांना लाभ देता आला असता.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, अकोला यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला :--**

१) अनुसूचित जाती उपयोजनेंतर्गत अनुसूचित जाती/नवबौद्ध लाभार्थीना ७५% अनुदानावर शेळ्यांचे गट वाटप करण्यांकरिता सन २०१०-११ साठी रुपये १५.०० लक्ष तरतूद प्राप्त झाली. परंतु सदर अनुदान बी.डी.एस. वर दिनांक ०२ ऑगस्ट, २०११ व दिनांक १५ मार्च, २०११ नुसार उपलब्ध करून देण्यांत आले. त्यानुसार सदर अनुदान (१) प्रमाणक क्रं.२२ दिनांक ६ सप्टेंबर, २०१० रु.७.५० लक्ष, (२) प्रमाणक क्रं.९ दिनांक ०८ मार्च, २०११ रु.४.५० लक्ष, (३) प्रमाणक क्र.१५३ दिनांक ३१ मार्च, २०११ रु.१.५० लक्ष असे एकूण रु.१३.५० लक्ष विलंबाने प्राप्त झाल्यामुळे व लाभार्थी निवड पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय विषय समिती सभा, दिनांक २४ मार्च, २०११, ठराव क्र.४ नुसार करण्यांत आली त्यामुळे सदर योजना सन २०११-१२ अखेर राबविण्यांत आली.

२) पुण्यश्लोक अहिल्यादेवी मेंढी व शेळी विकास महामंडळ लिमिटेड, पुणे हे शासकीय असल्यामुळे त्यांना मागणीनुसार शेळी गट वाटपाकरिता धनादेश क्र. १०२५८४२३, दिनांक ९ मे, २०११, रु.११,२३,२००/- नुसार अग्रिम देण्यांत आला.

३) अग्रीमाची मागणी व्यवस्थापक प्रक्षेत्र पोहरा फार्म ता.जि.अमरावती यांचे पत्र क्रं.८३४-३५/११ दिनांक ३१ मार्च, २०११ नुसार केलेली असल्यामुळे अग्रिम देण्याबाबत नस्ती सादर करण्यांत आली. टिपणीमध्ये प्रक्षेत्र व्यवस्थापक अहिल्यादेवी मेंढी व शेळी विकास प्रक्षेत्र पोहरा यांनी अग्रीमाची मागणी केली आहे असे नमुद आहे. तसेच अग्रिम हा धनादेश क्र.१०२५८४२३ दिनांक ९ मे, २०११ रु.११,२३,२००/- हा सन २०११-१२ मध्ये देण्यांत आला.

४) प्रत्येक शेळी गटाची आधारभूत किंमत रु.२३,४००/- निर्धारीत करण्यांत आली आहे. त्यानुसार ९६ गटांची रक्कम रु.२२,४६,४००/- एवढी होत आहे. त्यांपैकी ५० टक्के अनुदानाची रक्कम रु.११,२३,२००/- एवढी होत असल्यामुळे ५० टक्के अग्रिम रक्कम प्रक्षेत्र व्यवस्थापक, पोहरा फार्म यांचे पत्र क्र.८३४-३५/११, दिनांक ३१ मार्च, २०११ नुसार अग्रीमाची मागणी केली. त्यानुसार रु.११,२३,२००/- अग्रिम देण्यांत आला.

५) प्रक्षेत्र व्यवस्थापक, पोहरा फार्म यांचे पत्र क्रं.२८, दिनांक २३ मे, २०११ नुसार पं.स., अकोला अंतर्गतचे १४ लाभार्थी हे प्रक्षेत्र पोहरा फार्म येथे शेळीगट खरेदी करिता आले होते. प्रक्षेत्रावरील शेळया लाभार्थींना पसंत नसल्याने ते लाभार्थी परत गेले. तसेच लाभार्थींचे निवेदन दिनांक २३ मे, २०११ नुसार लाभार्थींनी स्थानिक बाजारातून खरेदीची मागणी केली आहे. शेळयांची खरेदी लाभार्थाच्या पसंतीनुसार करावी, अशा सूचना उपआयुक्त, पशुसंवर्धन, अकोला यांच्या असल्यामुळे निधी परत मागण्यात आला.

६) पशुधन विकास अधिकारी (विस्तार), पंचायत समिती, अकोला यांचे पत्र क्रं.१५७/११ दिनांक २४ मे, २०११ नुसार दिनांक २३ मे, २०११ रोजी १४ लाभार्थीना पोहरा येथे शेळी गट खरेदी करिता घेऊन गेले होते ते पत्र व लाभार्थींचे निवेदन नस्तीवर ठेवले आहे. प्रक्षेत्रावरील शेळया घेण्यास लाभार्थी तयार नसल्याबाबत प्रक्षेत्र व्यवस्थापक पोहरा यांचे पत्र क्रं.९८/११, दिनांक २३ मे, २०११ नुसार कळविले आहे. तसेच जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जिल्हा परिषद, अकोला यांनी उर्वरित पचांयत समितीचे पशुधन विकास अधिकारी (विस्तार) यांचेशीसुद्धा याबाबत चर्चा केली व त्यानंतरच स्थानिक बाजारातून खरेदीचा निर्णय घेण्यांत आला.

७) स्थानिक बाजारातून शेळी गटाची खरेदी करण्यास अति.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अकोला यांची मंजुरी घेण्यांत आली. तसेच जिल्हा उप आयुक्त पशुसंवर्धन, अकोला यांचे पत्र क्रं.१५७६ दिनांक ३ जून, २०११ नुसार मंजुरी घेण्यांत आली आहे. मार्गदर्शक सूचनेनुसार लाभार्थीच्या पसंतीनुसार शेळी खरेदी करण्याची तरतूद आहे त्यामुळे जिल्हा उपायुक्त यांचे तांत्रिक शिफारशीनुसार व अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे मंजुरीने योजना राबविण्यात आली.

८) या कार्यालयाचे पत्र क्रं.९४२/११ दिनांक १४ जुलै, २०११ व पत्र क्र.८१९/११ दिनांक १४ जून, २०११ नुसार पंचायत समिती स्तरावर तरतूद वितरीत करण्यांत आली. मा.आयुक्त पशुसंवर्धन, महाराष्ट्र राज्य, पुणे-१ यांचे मार्गदर्शक सुचना पत्र क्रं.पशुधन-३/३६/ ९८२/ २००९/पसं-१३, पुणे-१ दिनांक ४ सप्टेंबर, २००९ नुसार योजना राबविण्यांत आली. सदर योजना नियमित असल्यामुळे तांत्रिक मंजुरीची आवश्यकता नसल्यामुळे योजनेस तांत्रिक मंजुरी घेण्यात आलेली नाही.

आयुक्त पशुसंवर्धन, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या मार्गदर्शक सुचना पत्र दिनांक ०४ सप्टेंबर, २००९ नुसार नाबार्डच्या सुधारीत दरानुसार १० अधिक १ बोकड शेळी गटाची किंमत निर्धारीत केलेली आहे. त्या मर्यादेत राहुन स्थानिक जातीच्या शेळया खरेदी करण्यास वित्त प्रेषण वितरीत करतांना संदर्भीय पत्र सोबत जोडुन पाठविण्यांत आलेले आहे. तसेच लाभार्थीच्या पसंतीनुसार शेळी गट खरेदी करणे आवश्यक आहे. लाभार्थीच्या सहमतीने बाजारभावाप्रमाणे शेळया खरेदी केलेल्या आहेत.

९) सन २०१०-११ ची अखर्चित रक्कम सन २०११-१२ मध्ये खर्च करण्यास अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, यांची मंजुरी घेण्यात आली आहे. तसेच शासन निर्णय दिनांक ६ जून, २००८ नुसार अखर्चित निधीलगतच्या आर्थिक वर्ष अखेरपर्यंत खर्च करण्यास अनुमती प्रदान केलेली आहे. त्यानुसार योजना राबविण्यांत आली.

१०) सन २०१०-११ ची अंतिम सुधारीत तरतूद रु.१३.५० लक्ष पत्र क्रं.-११(१०)/सीआर-७३४/११,पसं-६, पुणे-१ दिनांक २६ मार्च, २०११ नुसार प्राप्त झाल्यामुळे व दिनांक ३० मार्च, २०१३ पर्यंत १०७ पैकी ९६ लाभार्थीनीच ५०% लाभार्थी हिस्सा जमा केल्यामुळे फक्त ९६ लाभार्थीलाच पुढील म्हणजे सन २०११-१२ या वर्षात लाभ देण्यात आला व प्राप्त तरतुदीच्या मर्यादेत खर्च ठेवण्यांत आला. त्यामुळे उर्वरित लाभार्थीकडुन लाभार्थी हिस्सा जमा करण्यांत आला नाही.

ज्या लाभार्थीनी ५० टक्के लाभार्थी हिस्सा भरणा केला नाही त्याच लाभार्थीना वगळण्यात आले आहे.

११) सन २०१०-११ मध्ये पंचायत समिती, मुर्तिजापूर मधील अर्ज प्राप्त झाले नाहीत. तसेच २०११-१२ मध्ये ३ लाभार्थींना लाभ देण्यात आला आहे.

१२) सन २०१०-११ ची मूळ तरतूद ही रु. १५.०० लक्ष देण्यांत आली. परंतु बी.डी.एस. वर प्रत्यक्षात रु.१३.५० लक्ष प्राप्त झाले. त्यामुळे ९६ लाभार्थीनाच लाभ देण्यांत आला. तसेच दिनांक ३१ मार्च, २०११ पर्यंत ९६ लाभार्थीनी लाभार्थी हिस्सा भरणा केला होता. उर्वरित लाभार्थीनी लाभार्थी हिस्सा भरणा केला नाही. तसेच अनुदानाच्या मर्यादेत खर्च ठेवण्यांकरिता ९६ लाभार्थीना लाभ देण्यांत आला.

**४) परिच्छेद क्रमांक ३.७२० (सन २०११-१२)**

**९०% अनुदानावर महिला व मुलींना व्यावसायिक व तांत्रिक प्रशिक्षण देणे (जिल्हा परिषद सेस फंडांतर्गत) योजनेतील अनियमितता.**

सन २०११-२०१२ (परिच्छेद क्रमांक-५) महिला व बालकल्याण विभाग, जिल्हा परिषद, अकोला यांनी जिल्हा परिषद सेसफंडा अंतर्गत ९० % अनुदानावर महिला व मुलींना व्यावसायिक व तांत्रिक प्रशिक्षण देणे योजना प्रशासकिय व तांत्रिक मंजुरात घेऊन मिटकॉन कंसलटंसी लिमिटेड अकोला या संस्थेमार्फेत राबविली आहे योजनेसाठी खर्च रक्कम रुपये १८,४०,५०० करण्यात आला. या बाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत :---

१) केवळ सन २००७-०८ करिता लागू असलेल्या उद्योग ऊर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्रमांक एसएसआय-२००३/प्रक्र./७९१८/ उद्योग-३, दिनांक २९ ऑक्टोबर, २००७ नुसार प्रशिक्षणाकरिता मिटकॉन कंसल्टंसी लिमिटेड, अकोला ची निवड व दरनिश्चिती केलेली आहे. सदरचा शासन निर्णय हा सन २००७-०८ मधील उद्योजकता विकास प्रशिक्षण कार्यक्रमांकरिता व दरनिश्चिती केलेली आहे. सदरचा शासन निर्णय हा सन २००७-०८ मधील उद्योजकता विकास प्रशिक्षण कार्यक्रमांकरिताच लागू आहे. सदर संस्थेची निवड करण्याबाबत सन २०११-१२ करिता महिला व बालकल्याण विभागाचे स्वतंत्र आदेश व दर करार नाही. यांचेकडून, १) प्रशिक्षण देणा-या शासन मान्य संस्था, २) तालुकास्तरावरील उपलब्ध सोयी,

३) प्रशिक्षण कालावधी, ४) दर याबाबत माहिती मिळवून त्याप्रमाणे प्रस्ताव बोलावणे आवश्यक होते व तसे करण्याबाबत मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी नस्ती पान क्र.८ वर सूचित करूनही तशी कार्यवाही केलेली नाही, या प्रमाणे कार्यवाही केली असती तर या पेक्षा कमी दर प्राप्त होऊन जास्त ग्रामीण विद्यार्थीनीना लाभ देणे शक्य झाले असते.

२) महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए.२००८/प्रक्र-४४६/ वित्त ९, दिनांक २० जून, २००८ नुसार विहित वेळापत्रक तसेच करावयाच्या जबाबदारीचे पालन केलेले नाही. लाभार्थी निवड ही महिला व बालकल्याण विभागाने केलेली नाही. मिटकॉन कंसल्टंसीने लाभार्थी अर्ज प्राप्त करवून घेऊन स्वतःच लाभार्थी निवड केलेली आहे. लाभार्थी निवड मिटकॉन कंसल्टंसीने करण्याचे आदेश देऊन जिल्हा परिषदेने जबाबदारी टाळलेली आहे.

३) प्रशिक्षण नस्ती पान क्रमांक ६, ७ मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी नमूद केल्याप्रमाणे जाहिरातीव्दारे अर्ज प्राप्त करवून घेऊन त्याप्रमाणे कार्यवाही करावी. त्यामुळे कुठल्या प्रशिक्षणाची किती आवश्यकता आहे या प्रमाणे प्रशिक्षण कार्यक्रमांचे नियोजन करणे शक्य झाले असते.

४) लाभार्थी हिस्सा महिला व बालकल्याण विभागाने स्वतः जमा करणे आवश्यक असतांना तो प्रशिक्षण संस्थेने परस्पर वसूल केलला आहे. लाभार्थीकडून वसूल करावयाची रक्कम विभागाने वसूल करुन प्रथम विभागाच्या रोखपुस्तकात घेऊन नंतर संबंधित संस्थेस अदा करणे आवश्यक असतांना तशी कार्यवाही केलेली नाही. यामुळे लाभार्थीकडून योग्य लाभार्थी हिस्सा वसूल केला आहे या बाबत पूर्तता दर्शविणे आवश्यक आहे.

५) मिटकॉन कंसल्टंसी यांना दिलेल्या आदेशातील अटी व शर्तीमधील अट क्रमांक १२ ई नुसार ३% अपंग महिलांची निवड केलेली असल्याबाबत व अट क्रमांक ८ नुसार परीक्षा घेऊन त्या बाबतचे प्रमाणपत्र अदा केले असल्याबाबतचा अभिलेख आढळून आलेला नाही.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, अकोला यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला :--**

१) प्रशिक्षणाकरिता मिटकॉन कन्सल्टंसी लिमिटेड, अकोला यांची निवड कामगार विभाग शासन निर्णय क्रमांक एसएसआय-२००३/प्रक्र./७९१८/ उद्योग-३ दिनांक २९ ऑक्टोबर, २००७ नुसार करण्यात आली आहे.

सदर शासन निर्णय हा नियोजन विभागाचे सहमतीने घेण्यात आलेला असल्याकारणाने महिला व बालकल्याण विभागाकरिता स्वतंत्र आदेश नाही. परंतु कंपनीकडील प्रशिक्षणाचे सोई/ सुविधा व तालुकास्तरावरील सोई/सुविधा या बाबत खात्री पटवूनच व इतर संस्थेकडे या प्रमाणे सोईसुविधा नसल्याने महिला बालकल्याण विभागाने, महिला व बालकल्याण समितीची दिनांक १६ नोव्हेंबर, २०११ मध्ये झालेल्या चर्चेनुसार मिटकॉन कन्स्टलंसी लि. या संस्थेस प्रशिक्षणाचा कार्यक्रम राबविण्याकरिता देण्याचे ठरविण्यात आले आहे.

२) ग्रामविकास व जलसंधारण विभाग परिपत्रक क्र.झेडपीए.२००८/प्रक्र.४४६/जिक/-९/ दिनांक २० जून, २००८ नुसार दिलेल्या मार्गदर्शक सूचनेप्रमाणे व वेळापत्रकाप्रमाणे योजना राबविण्याची यापुढे दक्षता घेण्यांत येत आहे.

३) सदर योजनेच्या लाभार्थ्याची निवड मिटकॉन कन्सल्टंसी लिमिटेड या संस्थने केली नसुन मिटकॉन कन्सल्टंसी लिमिटेड या संस्थेव्दारे फक्त अर्ज गोळा करण्याची जबाबदारी करारनाम्यानुसार या संस्थेला देण्यात आली होती. संस्थेने जाहीरातीव्दारे अर्ज प्राप्त केलेत व प्राप्त झालेल्या अर्जातुन विषय समितीने पात्र लाभार्थाची निवड दिनांक ३० जानेवारी, २०१२ चे सभेतील ठरावानुसार केलेली आहे.

त्यामुळे या संस्थेने लाभार्थीची निवड केलेली नाही, तसेच विभागाने जबाबदारी टाळलेली नाही

४) मिटकॉन कन्सल्टंसी लि. या संस्थेशी झालेल्या करारनाम्यानुसार लाभार्थी हिस्सा जमा करण्याची जबाबदारी त्याच संस्थेवर सोपविण्यात आली होती. त्यामुळे लाभार्थी हिस्सा संस्थेने वसूल केलेला होता. या बाबत विभागाने संस्थेकडून खात्री केलेली आहे. तशा प्रकारचे संस्थेकडून प्रमाणित करण्यात आले आहे.

५) अपंग महिला लाभार्थी यांची वेगळ्यांनी नोंद ठेवण्यात आली नाही. तथापि गरजू लाभार्थ्यानाच लाभ दिलेला आहे मात्र या पुढे ३% पर्यत अपंग लाभार्थ्याना योजनेचा लाभ देण्याची निश्चितच दक्षता घेण्यात येईल.

**५) परिच्छेद क्रमांक ३.७२२ (सन २०११-१२)**

**अंगणवाडी इमारत बांधकामाकरिता केलेल्या निधी वितरणाबाबत :--**

सन २०११-२०१२ (परिच्छेद क्रमांक-८) एकात्मिक बाल विकास सेवा योजना प्रकल्पांतर्गत मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे अनुदान वितरण आदेश घेऊन एकूण ३२१ अंगणवाडी बांधकामाकरिता ८,८१,२५,००० निधी सन २०११-२०१२ मध्ये वितरीत करण्यात आलेला आहे. या बाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत :--

१) मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे आदेशानुसार गट विकास अधिकारी व उप अभियंता यांनी अंगणवाडी बांधकामाची कामे पूर्ण करवून घेऊन ग्रामपंचायतकडून मासिक प्रगती अहवाल महिला व बालकल्याण विभागाकडे सादर करणे आवश्यक असतांना ग्रामपंचायतस्तरावरुन प्राप्त मासिक प्रगती अहवाल लेखापरीक्षा अर्ध-समास पत्र क्रमांक २ दिनांक ३१ ऑक्टोबर, २०१२ तसेच क्रमांक ४ दिनांक ७ नोव्हेंबर, २०१२ अन्वये मागणी करूनदेखील उपलब्ध झाले नाही. सबब, विभागाचे अंगणवाडी बांधकामावर कोठलेही नियंत्रण नाही.

२) जिल्हा नियोजन समिती यांचे निधी वितरणाचे आदेशातील अट क्रमांक ३ नुसार मंजूर निधीसंबंधी खर्चाची स्वतंत्र नोंदवही ठेवणे आवश्यक आहे. मात्र विभागाने खर्चाची नोंदवही ठेवलेली नाही.

३) जिल्हा नियोजन समीती यांचे निधी वितरणाचे आदेशातील अट क्रमांक १२ नुसार अपूर्ण कामे पूर्ण झाल्याखेरीज कोणतेही नवे काम सुरू करू नये, तसेच महिला व बालविकास विभाग शासन निर्णय क्रमांक एबावि-२००८/प्र.क्र.१७३/का-६/दिनांक १५ जानेवारी, २०१० मध्ये अंगणवाडी बांधकामाबाबत दिलेल्या अटीमधील अट क्र.६ नुसार, दिनांक १६ सप्टेंबर, २००९ च्या शासन निर्णयातील--अ) अंगणवाडी केंद्रे उघड्यावर भरत असल्यास, ब) भाड्याच्या इमारतीतील, क) समाज मंदिर, ग्राम पंचायत केंद्रात भरणारी अंगणवाडी केंद्र इमारत बांधाकामच प्राथम्यक्रमाने करण्यात यावीत पहिल्या प्राथम्य गटातील बांधकाम पूर्ण झाल्यानंतर तसे प्रमाणपत्र आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, रायगड नवी मुंबई यांची मान्यता घेऊनच पुढील गटातील बांधकाम हाती घेण्यात यावे असे न केल्यास शिस्तभंगाची कार्यवाही करण्यात येईल असे निर्देश असतांना याप्रमाणे निकषांची कुठलीही पुर्तता न करता अंगणवाडी केंद्रांना निधी वितरीत केला असल्याचे उपलब्ध अभिलेखे व पुरविण्यात आलेल्या माहितीवरुन निदर्शनास आलेले आहे.

४) सचिव, एकात्मिक बाल विकास सेवा योजना यांचेशी झालेल्या चर्चेनुसार अंगणवाडी बांधकामाकरिता युनीटकॉस्ट वाढवून मिळत नसल्यामुळे कार्यकारी अभियंता, बांधकाम यांनी अंदाजपत्रकामध्ये बदल सूचवून विद्युतीकरण, पाणीपुरवठा, रेनींग वॉटर हॅक प्लीन्थ प्रोटेक्शन, कपबोड वगळण्यात येऊन रुपये ४.०० लक्षचे सुधारीत अंदाजपत्रकास जिल्हाधिका-यांची मंजुरी घेतल्याचे पत्र क्रमांक ४०२८/ दिनांक १६ डिसेंबर, २०१० मध्ये नमुद आहे. मात्र विद्युतीकरण, पाणीपुरवठा या सारख्या बालकांच्या दृष्टीने आवश्यक सेवा वगळून नविन अंदाजपत्रक तयार करणे व तसेच बांधकाम करणे आवश्यक आहे.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, अकोला यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

अंगणवाडी बांधकामाकरिता जिल्हा परिषद महिला व बालकल्याण विभागामार्फत सन २०१०-२०११ व २०११-२०१२ या वर्षामधे एकूण २५४ अंगणवाडी केंद्रांच्या इमारत बांधकामाकरिता प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्यात आली. त्यापैकी १७७ ग्राम

पंचायतीला रुपये ४.०० लक्ष प्रती अंगणवाडीप्रमाणे रु.७०८.०० लक्ष निधी वितरीत करण्यात आला होता व उर्वरित ७७ अंगणवाडी केंद्रांना पहील्या हप्त्याची रक्कम रुपये २.२५ लक्ष प्रती अंगणवाडीप्रमाणे रु.१७३.२५ लक्ष निधी वितरित करण्यात आला होता.

या प्रमाणे आक्षेपामधे नमूद ३२१ अंगणवाडी केंद्रांऐवजी फक्त २५४ अंगणवाडी केंद्राचे इमारत बांधकामाकरिता सन २०११-२०१२ वर्षामधे ८,८१,२५,००० वितरीत करण्यात आले होते.

१) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अकोला यांचे आदेशानुसार संबंधित गटाचे गट विकास अधिकारी तसेच उप अभियंता (बांधकाम), उपविभाग सर्व यांचे देखरेखेखाली अंगणवाडी इमारतीची बांधकामे पूर्ण करून घेणे आवश्यक असतांना तसेच ग्रामपंचायतीकडून प्राप्त मासिक प्रगती अहवाल लेखापरीक्षणास सादर करता आला नाही असे नमूद आहे परंतु आक्षेप हा जिल्हा परिषदस्तरावरील वितरीत करण्यात आलेल्या अनुदानाच्या अनुषंगाने घेण्यात आला असल्यामुळे या सबंधात प्राप्त मासिक प्रगती अहवाल हा सबंधीत गट विकास अधिकारी हयांचे गटस्तरावर प्राप्त करून घेऊन त्याप्रमाणे अहवाल या कार्यालयास सादर केला आहे.

२) सन २०११-१२ या वर्षामधे उप मुख्य कार्यकारी अधिकारी (मबाक) यांनी महिला बालकल्याण जिल्हा कक्ष अकोला कार्यालयात वरिष्ठ सहायक (लेखा) यांची मार्च २०१२ मध्ये एकतर्फी महिला बालकल्याण जिल्हा कक्षातुन कार्यमुक्त केल्यामुळे व त्यानंतर पुढील सहा महिनेपर्यत वरिष्ठ सहायक (लेखा) हे पद रिक्त राहील्यामुळे जिल्हा नियोजन समिती यांचे निधी वितरणाचे आदेशातील अट क्र. ३ नुसार मंजूर निधी सबंधित खर्चाची स्वतंत्र नोंदवही ठेवणे शक्य झाले नाही परंतु या पुढे खर्चाची नोंदवही अदयावत ठेवण्यात येईल.

३) जिल्हा नियोजन समिती यांचे निधी वितरण आक्षेपामधील अट क्र. १२ नुसार अपूर्ण कामे पूर्ण झाल्याखेरीज नविन कामे सुरू करु नये असे जरी नमुद केले असले तरी सदरील अंगणवाडी बांधकामे ही प्रगतीपथावर असल्यामुळे व जिल्हा नियोजन समिती कडून निधी प्राप्त झाल्यामुळे शासन निर्णय क्रमांक दिनांक १५ जानेवारी, २०१० मधे नमुद असल्याप्रमाणे बांधकामास प्राधान्य क्रमाने मंजुरी देऊन त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात आली आहे. (शासन निर्णय दिनांक १५ जानेवारी, २०१० मधे नमुद असल्यामुळे अ, ब, व क नुसार प्राधान्य क्रमानेच बालविकास प्रकल्प अधिकारी यांचेकडून आवश्यक अंगणवाडी सबंधात अहवाल मागवून प्राधान्यक्रमानेच मंजूर करण्यात आली आहे.

४) आयुक्त महिला व बालकल्याण विकास, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्र. जाक्र/ मबावि/ एबाविसेयो/ का-७/अंग/१०-११/ ८९५५/ आयुक्तालय महिला व बालविकास २८ राणीचा बाग पुणे-१ दिनांक २७ जानेवारी, २०११ अन्वये अंगणवाडी केंद्र इमारत बाधकामाचा टाईप प्लॅन (TYPE PLAN) च्या क्षेत्रफळात बदल करता येईल व रुपये ४.०० लक्ष या मर्यादेपेक्षा एका अंगणवाडी केंद्र इमारतीचे बांधकाम करणे शक्य नसल्यास रुपये ४.०० लक्षापेक्षा अधिकचा खर्च इतर स्थानिक निधीतून/ स्थानिक सहभागातुन खर्च करण्यात यावा असे नमुद आहे.

त्या अनुषंगाने कार्यकारी अभियंता (बांधकाम)जिल्हा परिषद अकोला यांचे पत्र क्रमांक ४०२८/१० दिनांक १६ जानेवारी, २०१० अन्वये शासन निर्णय दिनांक १५ जानेवारी नुसार दिलेला आराखडा व Brief Specification मधे १ ते १६ बाबी बदल केल्यास अंदाजपत्रक रुपये ४.०० लक्ष चे मर्यादेत बसते व निधी मर्यादित असल्यामुळे १ ते १६ तरतुदीसहीत अंगणवाडी बांधकामाचे अंदाजपत्रक तयार केल्याची बाब नमुद आहे.

सबब बांधकामाचे प्राकलित रकमेमधे कोणताही बदल न करता रुपये ४.०० लक्ष चे मर्यादीतच अंगणवाडीचे बांधकामाकरिता निधी वितरीत करण्यात आलेला आहे. अंगणवाडीकरिता पाणीपुरवठा भारत निर्माण योजनेतुन पुढील वर्षामध्ये घेण्यांत आला आहे.

## ६) परिच्छेद क्रमांक ३.८१२/२३ (सन २०११-१२)

**जिल्हा परिषदेने लेखापरिक्षणासाठी अभिलेखे सादर न करणे.**

मुंबई स्थानिक निधी लेखा अधिनियम, १९३० मधील कलम (३) प्रमाणे ज्या तारखेस लेखापरिक्षणाचे काम सुरू करण्याचे ठरले जाते त्या तारखेसंबधी आवश्यक तेवढ्या कालावधीची लेखा नोटीस संबधित जिल्हा परिषदेचे विभाग/पंचायत समित्या यांना कळविण्यात येते. त्यानंतर प्रत्यक्ष लेखापरीक्षण सुरू झाल्यावर अधिनियमाचे कलम ६ (१) नुसार योग्य वाटतील अशा लेख्यांच्या संदर्भात जिल्हा परिषद/पंचायत समित्या यांना अर्धसमास पत्राने अभिलेख्यांची मागणी कळविली जाते व सदरचे अभिलेखे विहीत मुदतीत सादर करणेबाबत कालावधी दिला जातो. तरीसुद्धा लेखापरिक्षणास कागदपत्रे/अभिलेखे उपलब्ध केले जात नाहीत. त्या त्या जिल्हा परिषद/विभाग/पंचायत समिती अंतिमीकरणाच्या वेळी अभिलेखे उपलब्ध न केलेल्या आक्षेपांबाबत सविस्तर चर्चा करतानाही असे अभिलेख उपलब्ध करणे टाळण्यात येते. त्यामुळे असे परिच्छेद लेखापरिक्षण अहवालात सामाविष्ट केले जातात. अशा प्रकाराचे परिच्छेद लेखापरीक्षा पुनर्विलोकन अहवालामध्ये निवड करणेसाठी प्रस्तावीत केले जातात व संबंधित जिल्हा परिषद विभागांना निवड केलेले परिच्छेद कळवून त्याबाबतचे अनुपालन मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद आणि मुख्य लेखा व वित्त अधिकारी आणि गट विकास अधिकारी यांना १५ दिवसांच्या आत सादर करणेबाबत सूचित केले जाते. तथापि, या सूचनेबाबतही जिल्हा परिषद व पंचायत समित्या गांभीर्याने लक्ष देत नसल्याचे आढळून येते. वर नमूद केल्याप्रमाणे संबंधित जिल्हा परिषद विभाग व पंचायत समिती यांना लेखे उपलब्ध करून देणेसाठी आवश्यक तेवढ्या संधी उपलब्ध करून देऊनसुद्धा लेखापरीक्षणास असे अभिलेखे सादर करणेसाठी योग्य तो प्रतिसाद दिला जात नाही. सदर बाब गंभीर स्वरूपाची असल्याने ही बाब पंचायती राज समितीच्या निदर्शनास आणण्यात येत आहे. उदाहरणादाखल, जिल्हा परिषदेचे विभाग आणि पंचायत समित्या यांनी उपलब्ध न केलेल्या अभिलेखांबाबत घेतलेले आक्षेप खाली दर्शविण्यात आले आहेत.

| अ. क्र. | जिल्हा परिषदेचे नांव | जिल्हा परिषदेचा विभाग | लेखापरीक्षण अहवालातील परिच्छेद क्र. | गुंतलेली रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|
| २९ | अकोला | सामान्य प्रशासन विभाग | २३ | ----- |

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, अकोला यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

सन २०११-१२ मध्ये ग्रामपंचायत स्तरावरील सामान्य निधी व अन्य निधीचे अभिलेखे लेखापरिक्षणास उपलब्ध न करून दिलेल्या २१३ ग्रामपंचायतीची सद्य:स्थिती खालीलप्रमाणे दिलेली आहे.

सदर प्रकरणी गट विकास अधिकारी पंचायत समिती सर्व या कार्यालयांकडून वारंवार पत्र/अ.शा.पत्र तसेच का.दा.नो. देऊनही २१३ ग्रामपंचायतींपैकी फक्त ११ ग्रामपंचायतीचे लेखापरिक्षण झाले असून आजरोजी एकूण ४२ ग्रामपंचायतीमध्ये अभिलेखे लेखापरिक्षणाकरिता उपलब्ध असल्याबाबत गटविकास अधिकारी यांनी कळविले आहे व उर्वरित २०२ ग्रामपंचायतीचे अद्यापपर्यंत खालीलप्रमाणे लेखापरिक्षण होणे बाकी आहे. या कार्यालयाकडून गटविकास अधिकारी पंचायत समिती सर्व यांना लेखापरिक्षण होणे बाकी असलेल्या ग्रामपंचायतीचे जबाबदार संबंधित ग्रामसेवक / ग्रामविस्तार अधिकारी यांचेवर महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम, १९५९ चे कलम १७९ (२) तसेच महाराष्ट्र स्थानिक निधी लेखा अधिनियम, १९३० चे कलम ८ अन्वये रुपये २५,०००/- दंड आकारून संबंधितांकडून वसुली करून शासन खाती जमा करण्यात यावे याबाबत आदेश देण्यात आले आहेत.

| अ.क्र. | पंचायत समितीचे नांव | आजपर्यंत लेखापरिक्षण झालेल्या ग्रामपंचायत संख्या | आज रोजी ग्रामपंचायतला उपलब्ध असलेल्या ग्रामपंचायतींची संख्या | लेखापरिक्षण बाकी असलेल्या ग्रामपंचायतींची संख्या |
|---|---|---|---|---|
| १ | अकोला | ०३ | ०७ | ४२ |
| २ | अकोट | ०० | ११ | २२ |
| ३ | बाळापूर | ०२ | ०२ | २५ |
| ४ | बार्शिटाकळी | ०० | ०० | ३२ |
| ५ | मुर्तिजापूर | ०६ | ०० | ३६ |
| ६ | पातूर | ०० | २३ | ३० |
| ७ | तेल्हारा | ०० | ०० | १५ |
| एकूण | | ११ | ४३ | २०२ |

तसेच या कार्यालयाचे आदेश क्र.८०४/१७ दिनांक २४ एप्रिल १७ अन्वये संबंधित सर्व विस्तार अधिकारी (पं.) यांच्या महाराष्ट्र जिल्हा परिषद (जिल्हा सेवा शिस्त व अपिल) नियम, १९६७ मधील भाग ४ (२) अन्वये वार्षिक वेतनवाढी रोखण्यात आल्या आहेत.

**७) परिच्छेद क्रमांक ३.८१२/४५० (सन २०११-१२)**

**जिल्हा परिषदेने लेखापरिक्षणासाठी अभिलेखे सादर न करणे.**

मुंबई स्थानिक निधी लेखा अधिनियम, १९३० मधील कलम (३) प्रमाणे ज्या तारखेस लेखापरिक्षणाचे काम सुरू करण्याचे ठरले जाते त्या तारखेसंबंधी आवश्यक तेवढ्या कालावधीची लेखा नोटीस संबंधित जिल्हा परिषदेचे विभाग/पंचायत समित्या यांना कळविण्यात येते. त्यानंतर प्रत्यक्ष लेखापरिक्षण सुरू झाल्यावर अधिनियमाचे कलम ६ (१) नुसार योग्य वाटतील अशा लेख्यांच्या संदर्भात जिल्हा परिषद/पंचायत समित्या यांना अर्धसमास पत्राने अभिलेख्यांची मागणी कळविली जाते व सदरचे अभिलेखे विहीत मुदतीत सादर करणेबाबत कालावधी दिला जातो. तरीसुद्धा लेखापरिक्षणास कागदपत्रे/अभिलेखे उपलब्ध केले जात नाहीत. त्या त्या जिल्हा परिषद/विभाग/पंचायत समिती अंतिमीकरणाच्या वेळी अभिलेखे उपलब्ध न केलेल्या आक्षेपांबाबत सविस्तर चर्चा करतानाही असे अभिलेख उपलब्ध करणे टाळण्यात येते. त्यामुळे असे परिच्छेद लेखापरिक्षण अहवालात समाविष्ट केले जातात. अशा प्रकाराचे परिच्छेद लेखापरीक्षा पुनर्विलोकन अहवालामध्ये निवड करणेसाठी प्रस्तावित केले जातात व संबंधित जिल्हा परिषद विभागांना निवड केलेले परिच्छेद कळवून त्याबाबतचे अनुपालन मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद आणि मुख्य लेखा व वित्त अधिकारी आणि गट विकास अधिकारी यांना १५ दिवसांच्या आत सादर करणेबाबत सूचित केले जाते. तथापि, या सूचनेबाबतही जिल्हा परिषद व पंचायत समित्या गांभीर्याने लक्ष देत नसल्याचे आढळून येते. वर नमूद केल्याप्रमाणे संबंधित जिल्हा परिषद विभाग व पंचायत समिती यांना लेखे उपलब्ध करून देणेसाठी आवश्यक तेवढ्या संधी उपलब्ध करून देवूनसुद्धा लेखापरीक्षणास असे अभिलेखे सादर करणेसाठी योग्य तो प्रतिसाद दिला जात नाही. सदर बाब गंभीर स्वरूपाची असल्याने ही बाब पंचायती राज समितीच्या निदर्शनास आणण्यात येत आहे. उदाहरणादाखल, जिल्हा परिषदेचे विभाग आणि पंचायत समित्या यांनी उपलब्ध न केलेल्या अभिलेखांबाबत घेतलेले आक्षेप खाली दर्शविण्यात आले आहेत.

| अ.क्र. | जिल्हा परिषदेचे नांव | जिल्हा परिषदेचा विभाग | लेखापरीक्षण अहवालातील परिच्छेद क्र. | गुंतलेली रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|
| ३० | अकोला | शिक्षण विभाग | ५ | ----- |

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, अकोला यांचेकडून खालील प्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

लेखापरिक्षणाचे वेळी परिच्छेदात नमूद अभिलेखे लेखापरिक्षणाकरिता उपलब्ध का करून देण्यात आले नाही याबाबत जबाबदार असणाऱ्या अधिकारी/ कर्मचाऱ्यांना पत्र क्र. ४००४/१५ दिनांक २४ नोव्हेंबर, २०१५ व पत्र क्र.२३६/१६ दिनांक १५ जानेवारी, २०१६ अन्वये कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली असून खुलासा मागविण्यात आला आहे, त्यानुसार खुलासा प्राप्त करून जबाबदार असणाऱ्या अधिकारी/ कर्मचाऱ्यांविरुद्ध आवश्यक ती कार्यवाही करण्यात येत आहे.

परिच्छेदामध्ये नमूद अभिलेखे कार्यालयाकडे उपलब्ध आहेत. तसेच सदर अभिलेखे तपासणी करण्याकरिता, संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा, नवी मुंबई यांना तपासणी करणेकरिता पत्र क्र. ४४८०/१५ दि. ३० डिसेंबर, १५ अन्वये विनंती करण्यात आली असून पत्र क्र.२१७/१६ दि. १४ जानेवारी, १६ अन्वये सहाय्यक संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा, अकोला यांना तपासणी करणेकरिता कळविण्यात आले आहे.

**८) परिच्छेद क्रमांक ३.८१२/६ (सन २०११-१२)**

**जिल्हा परिषदेने लेखापरिक्षणासाठी अभिलेखे सादर न करणे.**

मुंबई स्थानिक निधी लेखा अधिनियम, १९३० मधील कलम (३) प्रमाणे ज्या तारखेस लेखापरिक्षणाचे काम सुरू करण्याचे ठरले जाते त्या तारखेसंबंधी आवश्यक तेवढ्या कालावधीची लेखा नोटीस संबंधित जिल्हा परिषदेचे विभाग/पंचायत समित्या यांना कळविण्यात येते. त्यानंतर प्रत्यक्ष लेखापरिक्षण सुरू झाल्यावर अधिनियमाचे कलम ६ (१) नुसार योग्य वाटतील अशा लेख्यांच्या संदर्भात जिल्हा परिषद/पंचायत समित्या यांना अर्धसमास पत्राने अभिलेख्यांची मागणी कळविली जाते व सदरचे अभिलेखे विहीत मुदतीत सादर करणेबाबत कालावधी दिला जातो. तरीसुद्धा लेखापरिक्षणास कागदपत्रे/अभिलेखे उपलब्ध केले जात नाहीत. त्या त्या जिल्हा परिषद/विभाग/पंचायत समिती अंतिमीकरणाच्या वेळी अभिलेखे उपलब्ध न केलेल्या आक्षेपांबाबत सविस्तर चर्चा करतानाही असे अभिलेख उपलब्ध करणे टाळण्यात येते. त्यामुळे असे परिच्छेद लेखापरिक्षण अहवालात सामाविष्ट केले जातात. अशा प्रकाराचे परिच्छेद लेखापरीक्षा पुनर्विलोकन अहवालामध्ये निवड करणेसाठी प्रस्तावित केले जातात व संबंधित जिल्हा परिषद विभागांना निवड केलेले परिच्छेद कळवून त्याबाबतचे अनुपालन मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद आणि मुख्य लेखा व वित्त अधिकारी आणि गट विकास अधिकारी यांना १५ दिवसांच्या आत सादर करणेबाबत सूचित केले जाते. तथापि, या सूचनेबाबतही जिल्हा परिषद व पंचायत समित्या गांभीर्याने लक्ष देत नसल्याचे आढळून येते. वर नमूद केल्याप्रमाणे संबंधित जिल्हा परिषद विभाग व पंचायत समिती यांना लेखे उपलब्ध करून देणेसाठी आवश्यक तेवढ्या संधी उपलब्ध करून देऊनसुद्धा लेखापरीक्षणास असे अभिलेखे सादर करणेसाठी योग्य तो प्रतिसाद दिला जात नाही. सदर बाब गंभीर स्वरूपाची असल्याने ही बाब पंचायती राज समितीच्या निदर्शनास आणण्यात येत आहे. उदाहरणादाखल, जिल्हा परिषदेचे विभाग आणि पंचायत समित्या यांनी उपलब्ध न केलेल्या अभिलेखांबाबत घेतलेले आक्षेप खालीदर्शविण्यात आले आहेत.

| अ.क्र. | जिल्हा परिषदेचे नांव | जिल्हा परिषदेचा विभाग | लेखापरिक्षण अहवालातील परिच्छेद क्र. | गुंतलेली रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|
| ३१ | अकोला | शिक्षण विभाग | ६ | ----- |

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, अकोला यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

सदरचा परिच्छेद हा मूळ सुधारित अंदाजपत्रक, अनुदान आदेश, खर्चाचे विवरणपत्र, पंचायत समितीचे अनुदान मागणी विवरणपत्र इ. बाबत आहे. सदरचे अभिलेखे ही कार्यालयात लेखापरिक्षणासाठी उपलब्ध आहेत व सदरची २०११-१२ या वित्तीय वर्षातील अभिलेख्याचे लेखापरिक्षण करण्याकरिता सहाय्यक संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा, अकोला यांना अभिलेखे लेखापरिक्षणाकरिता पत्र क्र.२४९८ दिनांक २१ नोव्हेंबर, २०१५ अन्वये विनंती करण्यात आली आहे.

**९) परिच्छेद क्रमांक ३.८१२/१८ (सन २०११-१२)**

**जिल्हा परिषदेने लेखापरिक्षणासाठी अभिलेखे सादर न करणे.**

मुंबई स्थानिक निधी लेखा अधिनियम, १९३० मधील कलम (३) प्रमाणे ज्या तारखेस लेखापरिक्षणाचे काम सुरू करण्याचे ठरले जाते त्या तारखेसंबंधी आवश्यक तेवढ्या कालावधीची लेखा नोटीस संबंधित जिल्हा परिषदेचे विभाग/पंचायत समित्या यांना कळविण्यात येते. त्यानंतर प्रत्यक्ष लेखापरिक्षण सुरू झाल्यावर अधिनियमाचे कलम ६ (१) नुसार योग्य वाटतील अशा लेख्यांच्या संदर्भात जिल्हा परिषद/पंचायत समित्या यांना अर्धसमास पत्राने अभिलेख्यांची मागणी कळविली जाते व सदरचे अभिलेखे विहीत मुदतीत सादर करणेबाबत कालावधी दिला जातो. तरीसुद्धा लेखापरिक्षणास कागदपत्रे/अभिलेखे उपलब्ध केले जात नाहीत. त्या त्या जिल्हा परिषद/विभाग/पंचायत समिती अंतिमीकरणाच्या वेळी अभिलेखे उपलब्ध न केलेल्या आक्षेपांबाबत सविस्तर चर्चा करतानाही असे अभिलेख उपलब्ध करणे टाळण्यात येते. त्यामुळे असे परिच्छेद लेखापरिक्षण अहवालात सामाविष्ट केले जातात. अशा प्रकाराचे परिच्छेद लेखापरीक्षा पुनर्विलोकन अहवालामध्ये निवड करणेसाठी प्रस्तावित केले जातात व संबंधित जिल्हा परिषद विभागांना निवड केलेले परिच्छेद कळवून त्याबाबतचे अनुपालन मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद आणि मुख्य लेखा व वित्त अधिकारी आणि गट विकास अधिकारी यांना १५ दिवसांच्या आत सादर करणेबाबत सूचित केले जाते. तथापि, या सुचनेबाबतही जिल्हा परिषद व पंचायत समित्या गांभीर्याने लक्ष देत नसल्याचे आढळून येते. वर नमूद केल्याप्रमाणे संबंधित जिल्हा परिषद विभाग व पंचायत समिती यांना लेखे उपलब्ध करून देणेसाठी आवश्यक तेवढ्या संधी उपलब्ध करून देऊनसुद्धा लेखापरीक्षणास असे अभिलेखे सादर करणेसाठी योग्य तो प्रतिसाद दिला जात नाही. सदर बाब गंभीर स्वरूपाची असल्याने ही बाब पंचायती राज समितीच्या निदर्शनास आणण्यात येत आहे. उदाहरणादाखल, जिल्हा परिषदेचे विभाग आणि पंचायत समित्या यांनी उपलब्ध न केलेल्या अभिलेखांबाबत घेतलेले आक्षेप खालीदर्शविण्यात आले आहेत.

| अ.क्र. | जिल्हा परिषदेचे नांव | जिल्हा परिषदेचा विभाग | लेखापरिक्षण अहवालातील परिच्छेद क्र. | गुंतलेली रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|
| ३२ | अकोला | शिक्षण विभाग | १८ | २५,४३,३७० |

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, अकोला यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

सदरचा परिच्छेद हा विवरणपत्रात नमूद वसतिगृहांचे अभिलेखे लेखापरीक्षणास उपलब्ध न झाल्याबाबत आहे. सदरचे सन २०११-१२ या वित्तीय वर्षातील सदर आक्षेपात गुंतलेली रक्कम रुपये २५,४३,३७०/- संबंधित अभिलेखे कार्यालयात उपलब्ध असून, सहाय्यक संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा, अकोला यांना अभिलेख्यांचे लेखापरिक्षण करण्याकरिता पत्र क्र.२४९८ दिनांक २१ नोव्हेंबर, २०१५ अन्वये विनंती करण्यात आली आहे.

**१०) परिच्छेद क्रमांक ४.२६/२१ (सन २०११-१२)**

**पंचायत समिती स्तरावरील तेराव्या वित्त आयोग निधीचे योजनेतून केलेल्या बांधकामातील अनियमिततेबाबत :-**

पंचायत समिती, मुर्तिजापूर ने सन २०११-२०१२ मध्ये पंचायत समिती स्तरावर प्राप्त तेराव्या वित्त आयोग निधीचे अनुदानातून सभागृहाने सूचविल्याप्रमाणे बांधकामे पूर्ण केलेली आहेत. सदर बांधकामाची अंमलबजावणी करण्यासाठी संबधित ग्रां.पं.ना कार्यादेश देण्यात आलेले आहेत. सदर बांधकामाचे लेखापरीक्षणास उपलब्ध अभिलेख्यांची पडताळणी केली असता त्याबाबत खालीलप्रमाणे आक्षेप आहेत.

१) सदरच्या बांधकामाचे नस्तीची पडताळणी केली असता, ज्या ग्रामपंचायतींनी बांधकामे हाती घेतलेली आहेत अशा ग्रामपंचयातींच्या मागील तीन वर्षाचे उत्पन्नाबाबतचे आवश्यक विवरणपत्र नस्तीत जोडलेले आढळून आलेले नाहीत, त्यामुळे संबंधित ग्रामपंचायती महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय, क्र.झेडपीए- २००८/ प्र. क्र. ४७२/वित्त -९(३३) दिनांक ९ फेब्रुवारी, २००९ नुसार सदरची बांधकामे पार पाडण्यासाठी आर्थिक दृष्ट्या सक्षम असल्याबाबतची पडताळणी करता आलेली नाही.

२) महाराष्ट्र शासन, ग्रामाविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक विकास २०११/प्र.क्र.२१७/पंरा-८ दिनांक १५ नोव्हेंबर, २०११ नुसार ग्रामपंचायत स्तरावरील बांधकामांचा दर्जा व गुणवत्ता संबंधित सविस्तर मार्गदर्शक सूचना / निकष देण्यात आलेले आहेत. सदरचे निकषानुसार बांधकामे पूर्ण केल्याबाबत तसेच विहित प्रयोगशाळेचे कठीण मुरुम, गिटटी इत्यादी गुणवत्ता तपासणी अहवाल घेण्यात आलेले नाहीत.

३) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय झेडपीए-२००१/प्र.क्र.१०५/वित्त-९ दिनांक १६ जानेवारी, २०११ नुसार ग्रामपंचातीचे स्तरावरील बांधकामे ग्रामपंचायतींना अमंलबजावणीसाठी देतांना संबंधित बांधकामाचे प्राकलन/अंदाजपत्रक हे मराठीत तयार करणे आवश्यक असतांना तसे केले नाहीत.

४) तेराव्या वित्त आयोग निधीचे संबधीत बांधकामाचे अंतिम मोजमापे नोंदविलेल्या मोजमाप पुस्तीकेवर गट विकास अधिकारी व संबधीत ग्रामपंचायतीचे सचिवांची स्वाक्षरी घेण्यात आलेली नाही, बांधकामाची नोंद ग्रामपंचायतीने ज्या रस्ते विषयक नोंदवही नमुना क्र. २५ व २६ च्या पानावर घेतली आहे त्याचे उल्लेख असलेले प्रमाणपत्रासह खात्री पटविणे आवश्यक आहे.

५) सदर बांधकामाची मोजमापे व बांधकामाचे मुल्याकंन हे सार्वजनिक बांधकाम विभाग, नियमपुस्तीकेचे परिशिष्ट २४ मधील नियम ११ मध्ये महाराष्ट्र शासन, सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन निर्णय क्र. संक्रीर्ण १०९७/सी. आर ६२२ /इमारत-२ दिनांक २९ जून, १९९९ नुसार तसेच महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता, १९६८ चे नियम १६७, १६८ मधील तरतुदीनुसार विहीत प्रमाणात तपासणी उपअभियंता तसेच कार्यकारी अभिंयंता यांचे दर्जाच्या तांत्रिक प्राधिकाऱ्याने करावयाची आहे. त्याप्रमाणे तपासणी करण्यात आलेली नाही.

६) राज्यातील इमारती व इतर बांधकामाची इमारत व इतर बांधकाम कामगार रोजगार व सेवेच्या शर्ती अधिनियम, १९९६ तसेच बांधकाम कामगार कल्याण उपकर नियम, १९९८ च्या तरतुदीनुसार बांधकामाच्या एकूण मुल्यांच्या १ टक्के उपकर शासन परिपत्रक क्रमांक बी.सी.ए./१२००७/प्र.क्र.७८८/का-७ दिनांक २१ एप्रिल, २००८ अन्वये दिनांक १ जानेवारी, २००८ पासून वसूल करून शासन खाती जमा करणे आवश्यक आहे. ती वसूल करणे आवश्यक आहे

७) शासकीय नियमाप्रमाणे विहीत शासकीय कराची आकारणी विहीत दराने करण्यात आलेली नाही.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, अकोला यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

१) संबंधित ग्रामपंचायतीचे मागील ३ वर्षाचे उत्पन्नाचे विवरणपत्र घेण्यात आलेले असून पंचायत समिती सर्वसाधारण सभेतील ठरावानुसार सदरचे कामे करण्याची यंत्रणा ही ग्रामपंचायतला ठरविण्यात आलेली आहे.

२) आक्षेपामध्ये नमूद केलेल्या ग्रामपंचायत १) हातगांव २) सांगवी ३) मंगरुळ कांबे ४) कवठा शेलू येथील बांधकामाकरिता वापरण्यात आलेल्या साहित्याचे गुणवत्ता तपासणी अहवाल प्राप्त आहे.

३) बांधकामासंबंधीचे प्राकलन / अंदाजपत्रक हे मराठीत तयार करण्याची दक्षता ह्यापुढे घेण्यात येईल.

४) मोजमाप पुस्तीका क्र. ११६५ मधील पान क्रं. ३२, ५९, ६४, ६९ वर संबंधित सचिव ग्रामपंचायत व गट विकास अधिकारी यांच्या स्वाक्षऱ्या आहेत. ग्रामपंचायतीचे नमुना २५ व २६ वर नोंदी घेण्यात आलेल्या असून तसे ग्रामपंचायतीचे प्रमाणपत्र घेण्यात आलेले आहे.

५) कामाची प्रत्यक्ष तपासणी करूनच उपअभियंता यांनी पूर्णत्वाचे प्रमाणपत्र दिलेले आहे. कार्यकारी अभियंता ह्यांनी बांधकामाची विहीत प्रमाणात तपासणी केलेली असून मोजमाप पुस्तीका क्रं. ११६५ मधील पान क्र. ३२, ५९, ६४, ६९ वर तशी नोंद करण्यात आलेली आहे.

६) आक्षेपामध्ये नमूद केलेल्या ग्रामपंचायती कडून बांधकाम उपकराची १% रक्कम रुपये ५,००२ धनाकर्षाव्दारे महाराष्ट्र शासन इमारत व इतर बांधकाम कल्याण मंडळ, मुंबई यांचेकडे दिनांक १४ जानेवारी, २०१६ ला भरणा करण्यात आलेली आहे.

७) ग्रामपंचायत ही स्वायत्त संस्था आहे. त्यामुळे ग्रामपंचायतीने केलेल्या बांधकामाचे देयकातून आयकर व विक्रीकर कपात करण्यात आलेला नाही.

**११) परिच्छेद क्रमांक ४.७१/२० (सन २०११-१२)**

**प्राथमिक शाळांनी प्रदान केलेल्या उपस्थिती भत्ता, प्रोत्साहन भत्ता, शालेय पोषण आहार अनुदान व संपूर्ण स्वच्छता अभियाना अंतर्गत स्वच्छता गृह बांधकामातील अनियमितता :-**

१) महाराष्ट्र शासन शालेय शिक्षण व क्रीडा विभाग शानि क्र. शापोआ २०१०/प्र.क्र./१८/ प्रशि/४/दिनांक २ फेब्रुवारी, २०११ परि.क्र.८ अन्वये शहरी तसेच ग्रामीण विदयार्थ्यांना प्रति दिन प्रति विदयार्थी अन्न शिजवण्याचे काम करण्यासाठी स्वयंपाकी तसेच मदतनीस यांना द्यावयाचे मानधन परि.क्र५ अन्वये याच अन्न शिजविण्याचे काम करणा-या यंत्रनांना आहार शिजविण्यासाठी लागणा-या घटकांसाठी प्राथ वर्गासाठी ०.९० रु. तर उच्च प्राथ.१.२० रु. व याच रकमेत शिजविलेल्या अन्ना व्यतिरिक्त आठवड्यातून एकदा विदयार्थ्यांना पुरक आहार सुद्धा उपलब्ध करून द्यायचा आहे.

२) वरील खर्चाबाबत आवश्यक ते अभिलेख लेखापरिक्षेकरिता सादर करण्याच्या वारंवार मौखिक तसेच लेखी अर्धसमास पत्राव्दारे अभिलेख्यांची मागणीकरूनही गट शिक्षणाधिकारी यांनी या संदर्भात कोणतेही अभिलेखे सादर केले नाही.

३) तसेच या संदर्भात शाळास्तरावर वरील शासन निर्देशानुसार कोणकोणती अभिलेखे ठेवण्यात आले अथवा नाही, कोणकोणती आहार घटके वेळोवेळी संबंधितांनी खरेदी केली, शासन निर्देशानुसार प्राथमिक वर्गातील ४५० उष्मांक व १२ ग्रॅम प्रथीने तसेच वर्ग ६ ते ८ मधील विदयार्थ्यांना ७०० उष्मांक व २० ग्रॅम प्रथीने यांचा आहार देण्यात आला अथवा नाही, याबाबत शाळा मुख्याधिकारी, केंद्र प्रमुख, गट शिक्षणाधिकारी यांनी काय कार्यवाही केली, तपासणी केली याबाबत खात्री करण्यात आली नसल्याचे दिसते. शिक्षण विभागा अंतर्गत प्राथमिक शाळेतील विदयार्थ्यांना द्यावयाचा उपस्थिती भत्ता, प्रोत्साहन भत्ता, शालेय पोषण आहार अनुदानाचे वाटप प्राथमिक शाळांच्या मुख्याधिकारी मार्फत करण्यात आले. लेखा परीक्षा करतांना नमुना दाखल काही शाळांचे अभिलेखे तपासले असता खालील अनियमितता लक्षात आल्या याबाबत खालील प्रमाणे अभिप्राय आहेत.

१) बहुतेक शाळांच्या लेख्यांची अंतर्गत तपासणी केंद्र प्रमुख यांनी केली नसल्याचे, तसेच कोणत्याही शाळेच्या लेख्यांची अंतर्गत तपासणी विस्तार अधिकारी शिक्षण व गट शिक्षणाधिकारी यांनी केलेली नसल्याचे आढळून आले.

२) शाळेतील विद्यार्थ्यांना द्यावयाच्या उपस्थिती भत्ता, प्रोत्साहन भत्ता, सावित्रीबाई फुले तसेच अस्वच्छ व्यवसाय करणाऱ्या पालकांच्या पाल्यांना देय शिष्यवृत्ती इ. बाबतच्या रकमा संबंधित विद्यार्थ्यांच्या वा त्यांच्या पालकांना वाटप केल्याबाबत पोच मात्र लेखापरिक्षणास सादर करण्यात आल्या नाहीत. उदा. जि.प.प्राथ.शाळा, पुनोती बु. यांनी सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती सन २००८-०९ ची रक्कम ९००० दिनांक २५ मे, २०११ ला प्राप्त झाली व वाटप दिनांक ११ जून, २०११ ला केल्याचे नोंदविले मात्र प्रदानाच्या पोच वाटपाच्या नोंदी अनुपालनार्थ सादर केल्या नाहीत.

३) काही शाळांना संपूर्ण स्वच्छता अभियानांतर्गत स्वच्छतागृह बांधकामाकरिता प्रती स्वच्छतागृह ३५००० याप्रमाणे अनुदान प्राप्त करून देण्यात आले. सदर स्वच्छतागृह बांधकामाचे नकाशा व त्या करिता आवश्यक साहीत्य प्रमाण, दर व त्यांची एकूण रक्कम इत्यादी बाबीचे विवरण पत्र शिक्षण विभागाने मुख्याध्यापकांना वितरित केले आहेत. मात्र त्याची अधिकृतता दर्शविणारे सक्षम अधिकारी यांचे स्वाक्षरीचे पत्र मात्र लेखा परीक्षेस पाहावयास मिळाले नाही.

४) या विवरणानुसार स्वच्छतागृह बांधकामाकरिता ४५०० विटा आवश्यक असल्याचे दिसून येते. मात्र जिल्हा परिषद प्राथ. शाळा, मुंगसाजीनगर व मांडोली यांनी अनुक्रमे २००० व २५०० विटांमध्येच स्वच्छतागृहाचे बांधकाम पूर्ण केल्याचे दिसून येते. त्याचप्रमाणे वापरण्यात आलेल्या गिट्टी व रेतीचे प्रमाणात सुद्धा मोठ्या प्रमाणात तफावत दिसून आली आहे.

५) शाळांनी अशा प्रकारे प्राप्त अनुदानातून बांधलेल्या कोणत्याही स्वच्छतागृहाचे संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यानी/अभियंत्यांनी मोजमापे घेऊन मुल्यांकन केलेले नाही.

६) शाळा मुख्याध्यापक यांनी सदरचे साहित्य स्वतः खरेदी करून केले असल्यास, साहित्य खरेदीबाबत ग्राम शिक्षण समिती यांची मान्यता व ठराव आणि ठेका देऊन केले असल्यास त्यासंबंधी अभिलेखे लेखापरीक्षणास सादर केले नाहीत. संदर्भात विस्तार अधिकारी शिक्षण व गट शिक्षणाधिकारी यांनी आवश्यक ती तपासणी करणे आवश्यक आहे.

७) शालेय पोषण आहार अनुदानाचे वाटपाची अभिलेख तपासले असता जवळपास सर्वच मु.अ.भाजीपाला व पुरक आहार दाखल खरेदी केलेल्या बिस्कीटाचे ३/४ महिण्याचे किंवा त्यापेक्षा जास्त कालावधीचे एकच प्रमाणक जोडले आहे. उदा. १) प्राथ. शाळा, निंबी कोस प्रमाणक क्र.२१ दिनांक १ मार्च, २०१२ अन्वये भाजीपालाखरेदी रु. ५५०० खर्च नोंदला आहे. २) प्राथमिक वरिष्ठ शाळा, महान म. प्रमाणक क्र.४७८ दिनांक १ मार्च, २०१२ अन्वये शापोआ मानधन, इंधन खर्च व भाजीपाला खरेदी वर एकत्रित रु.१०४४६ खर्च नोंदविला आहे. दिनांकनिहाय आठवड्याचे वा दरमहा खरेदी केलेल्या साहित्याचा तपशील वजन, दर, खर्च यांच्या नोंदी साठा पुस्तक इ. लेखापरीक्षणास सादर न केल्याने खर्चाची खात्री करता आलेली नाही. केंद्रप्रमुख, विस्तार अधिकारी शिक्षण व गट शिक्षणाधिकारी यांनी आवश्यक ती तपासणी करणे आवश्यक आहे.

८) प्राथमिक शाळा जमकेश्वरला विद्यार्थी गणवेश वाटपाकरिता रु.४४०० दिनांक ८ एप्रिल, २०११ ला प्राप्त झाली जून अखेर पर्यंत गणवेशाचे वाटप होणे बंधनकारक असतांनाही सदर मुख्याध्यापकांनी ते दिनांक १९ डिसेंबर, २०११ ला केले आहे तसेच पालक प्रोत्साहन भत्ता रुपये २२,४८६.०० प्राप्त झाले असतांना वाटप नोंदवहीला रुपये २४,४८६ चे वाटप आढळून येते. खुलासा सादर करणे आवश्यक आहे.

९) जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, पुनोती बु. येथील शाळा वर्गखोल्यांचा हर्रास केल्याचे व रु. ७३,००० प्राप्त झाल्याचे दिसून येते. परंतु हर्रासा च्या कार्यपद्धतीची सविस्तर अभिलेखे लेखापरीक्षणास सादर केले नाहीत.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, अकोला यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

१) प्राथमिक वर्गासाठी ०.९० रुपये तर उच्च प्राथमिक १.२० रुपये व याच रकमेत शिजविलेल्या अन्ना व्यतिरिक्त आठवड्यातून एकदा विद्यार्थ्यांना पुरक आहार सुद्धा उपलब्ध करून देण्यात येतो. सर्वच शाळांच्या साठा नोंदवहीमध्ये पुरक आहार वितरीत केल्याच्या नोंदी नियमितपणे घेण्यात येतात.

२) लेखापरिक्षणाकरिता अभिलेखे उपलब्ध करण्याबाबत पत्र क्र.२६ दिनांक ३ जुलै, २०१३ अन्वये कळविण्यात आले असून सद्यास्थितीत अभिलेखे लेखापरिक्षणाकरिता उपलब्ध आहे.

३) शाळास्तरावर शासन निर्देशाप्रमाणे नोंदवही क्र.१, २ आणि ३ (साठा नोंदवही) या नोंदवह्या ठेवण्यात येतात. याव्यतिरिक्त चव रजिस्टर, कॅशबुक, प्रमाणके नस्ती, पोचपावती नस्ती इत्यादी अभिलेखे ठेवण्यात येतात. शासन निर्देशाप्रमाणे शाळा मुख्याध्यापक पुरक आहार व भाजीपाला स्वरुपात बिस्कीट, चिक्की, राजगीरा लाडू, अंडी व टोमॅटो, पालक, बटाटे यासारखी आहर घटके खरेदी करीत असतात. शासन निर्देशानुसार प्राथ. वर्गातील विद्यार्थ्यांना ४५० उष्मांक व १२ ग्रॅम प्रथीने तसेच वर्ग ६ ते ८ मधील विद्यार्थ्यांना ७०० उष्मांक व २० ग्रॅम प्रथीने यांचा आहार देण्यात येतो. प्रतिदिन प्रति विद्यार्थी शासन निर्देशानुसार प्राथमिक वर्गातील ४५० उष्मांक व १२ ग्रॅम प्रथीने तसेच वर्ग ६ ते ८ मधील विद्यार्थ्यांना ७०० उष्मांक व २० ग्रॅम प्रथीने यांचा आहार देण्यात आला व प्रमाणात साहित्य पुरवठा केला जातो. शासन निर्देशाप्रमाणे वर्ग १ ते ५ करिता १०० ग्रॅम व वर्ग ६ ते ८ करिता १५० ग्रॅम याप्रमाणात आहाराचे वितरण केले जाते. विद्यार्थ्यांना उपरोक्त प्रमाणे उष्मांकाचा आहार दिला जातो किंवा नाही यांची खात्री शाळा मुख्याध्यापक करतात. केंद्र प्रमुख, गटशिक्षणाधिकारी हे सुद्धा शाळा भेटीदरम्यान तपासणी करून सदर बाबीची खात्री करून घेत असतात. ग्रामशिक्षण समिती सभांच्या इतिवृत्तामध्ये व ठरावांमध्ये विद्यार्थ्यांना आवश्यक त्या प्रमाणात पोषण आहाराचे व पुरक पोषण आहाराचे वितरण केल्याच्या नोंदी सुद्धा घेतल्या जातात.

१) सर्वच शाळांच्या लेख्यांची तपासणी केंद्र प्रमुख नियमितपणे करतात. तसेच विस्तार अधिकारी व गट शिक्षणाधिकारी हे सुद्धा शाळांच्या लेख्यांची तपासणी शाळा भेटी दरम्यान करत असतात.

२) शाळेतील विद्यार्थ्यांना द्यावयाच्या उपस्थिती भत्ता,प्रोत्साहन भत्ता,सावित्रीबाई फुले तसेच अस्वच्छ व्यवसाय करणाऱ्या पालकांच्या पाल्यांना देय शिष्यवृत्ती इत्यादी बाबतच्या रकमा संबंधित विद्यार्थ्याच्या वा त्यांच्या पालकांना वाटप करण्यात आलेल्या आहेत. पोच शाळास्तरावर उपलब्ध आहेत. गट शिक्षणाधिकारी यांनी शाळास्तरावरील अभिलेखे तपासून पोच पावती उपलब्ध असल्याची खात्री केली आहे.

३) काही शाळांना संपूर्ण स्वच्छता अभियानांतर्गत स्वच्छतागृह बांधकामाकरिता प्रती स्वच्छतागृह ३५००० याप्रमाणे अनुदान प्राप्त करून देण्यात आले. सदर स्वच्छतागृह बांधकामाचे नकाशा व त्या करिता आवश्यक साहित्य प्रमाण, दर व त्यांची एकूण रक्कम इत्यादि बाबीचे विवरणपत्र शिक्षण विभागाने मुख्याध्यापकांना वितरित केले आहेत.

४) जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, मुंगसाजीनगर व मांडोली यांनी विवरणपत्रानुसार आवश्यक ४५०० विटा वापरुनच बांधकाम पूर्ण केले आहे. बांधकाम सुरू असतांना विटा कमी पडत असल्याने व ग्रामीण भागामध्ये त्वरीत विटा उपलब्ध करून घेऊन बांधकाम पूर्ण करणे शक्य नसल्याने गावातील काही प्रतिष्ठित नागरीकांनी पुढाकार घेऊन बांधकामाकरिता कमी पडत असणाऱ्या विटा उपलब्ध करून दिल्या व बांधकाम पूर्ण करण्यात आले. गावातील नागरीकांनी पैसे स्वरुपात देणगी न देता प्रत्यक्ष विटाच उपलब्ध करून दिल्या आहे. त्यामुळे ४५०० ऐवजी २००० व २५०० विटा वापरुन बांधकाम पूर्ण केल्याचे दिसते. पण प्रत्यक्षात मात्र ४५०० विटा वापरुनच बांधकाम पूर्ण केले आहे. शाळा स्तरावर पालक समिती सभेमध्ये अशा आशयाचा ठराव घेण्यात आला आहे.

५) शाळांना स्वच्छतागृह बांधकामा संदर्भात शालेय व अंगणवाडी स्वच्छतागृह तांत्रिक मार्गदर्शिका या पुस्तकातील सूचनां प्रमाणे बांधकाम पूर्ण करण्यात आले आहे. सद्य:स्थितीत त्याचे मूल्यांकन करण्यात आले आहे.

६) शाळा मुख्याध्यापक यांनी सदरचे साहित्य स्वतः खरेदी केले आहे साहित्य खरेदीबाबत ग्राम शिक्षण समिती यांची मान्यता व ठराव घेउन खरेदी करण्यात आलेली आहे. या संदर्भात विस्तार अधिकारी (शिक्षण) व गटशिक्षणाधिकारी यांनी आवश्यक ती तपासणी केलेली आहे. शाळांस्तरावर अभिलेखे उपलब्ध आहेत.

७) अनुदानाचे वितरण नियमितपणे दरमहा होणे आवश्यक आहे. तथापि पंचायत समिती स्तरावरुन मुख्याध्यापक यांना अनुदानाचे वाटप दर ६ महिन्यांनी करण्यात येते. त्यामुळे मुख्याध्यापक ३-४ किंवा त्यापेक्षा जास्त कालावधीचे एकच प्रमाणक जोडतात. परंतु यापुढे प्रत्येक साहित्याचे महिना निहाय स्वतंत्र्य प्रमाणक जोडण्याची दक्षता घेण्यात येईल. दिनांक निहाय प्राप्त झालेल्या किंवा खरेदी केलेल्या साहित्याचा तपशील वजन, दर, खर्च यांच्या नोंदी साठा नोंदवहीमध्ये नियमितपणे घेण्यात येतात. शाळास्तरावर सदरचे अभिलेखे उपलब्ध आहेत. या संदर्भात विस्तार अधिकारी (शिक्षण) व गट शिक्षणाधिकारी यांनी आवश्यक ती तपासणी केलेली आहे. शाळांस्तरावर अभिलेखे उपलब्ध आहेत.

८) प्राथमिक शाळा जमकेश्वरला विद्यार्थी गणवेश वाटपाकरिता रु.४४००/- दिनांक ८ एप्रिल, २०११ ला प्राप्त झाली होते. त्यानुसार शाळा व्यवस्थापन समितीचे सभेत ठराव मांडला असता, गणवेशाचे रंगाबाबत एकमत न झाल्याने शाळा व्यवस्थापन समितीने गणवेश वितरण स्थगित ठेवण्याचे सुचविले व ऑक्टोंबर महिन्याच्या सभेत रंगाबाबत निर्णय झाल्याने शाळा व्यवस्थापन समितीच्या मान्यतेने गणवेश वितरण करण्यात आले. प्रोत्साहन भत्ता रु २२,४८६/- प्राप्त झाले असतांना वाटप नोंदवहीला रु २४४८६/-चे वाटप करण्यात आले. कारण पालकांचे म्हणणे असे होते की सर्व विद्यार्थ्यांना अनुदान वितरीत करा कोणालाही वंचित ठेवू नका. त्यामुळे २०००/- रुपये मुख्याध्यापक यांनी स्वतः किंवा लोकवर्गणी करून सर्व विद्यार्थ्यांना लाभ देण्यात आल्याने २०००/- रुपयांची अतिरिक्त नोंद आली आहे.

९) जिल्हा परिषद प्राथमिक शाळा पुनोती बु. येथील शाळा वर्गखोल्याचा हर्रास केल्याचे व रु. ७३०००/- प्राप्त झाले असून सर्व कार्यवाही नियमानुसार करण्यात आलेली आहे. याबाबत खात्री करण्यात आलेली आहे. रु.७३,०००/- चा भरणा चलान व्दारे करण्यात आला आहे. चलानची प्रत सोबत जोडण्यात आली आहे. जि.प.शाळा पुनोती बु. यांचे दप्तरी सर्व अभिलेखे उपलब्ध आहेत.

**१२) परिच्छेद क्रमांक ४.३६५/२० (सन २०११-१२)**

**वर्ग १० वा पास महिला व मुलींना १००% अनुदानावर एम.एस.सी.आय.टी. प्रशिक्षण देणे :-**

पंचायत समिती अकोट, जिल्हा अकोला, सन २०११-१२ (परीच्छेद क्रमांक २०) पंचायत समितीने ब वर्ग १० वी पास महिला व मुलींना १००% अनुदानावर एम.एस. सी. आय. टी. प्रशिक्षण देणे करिता रक्कम रुपये २,८३,४३९/- इतका खर्च केला आहे. याबाबत खालील प्रमाणे अभिप्राय आहेत :--

१) सदरच्या प्रशिक्षणाबाबत कालावधी व वेळ ठरविण्यात आला नसून प्रशिक्षण कोणाला कोणत्या दिनांकापासून सुरू केले याबाबत पडताळणी करता आली नाही.

दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत केलेल्या रु.५७,६५,८६४ कामाचे संपूर्ण अभिलेखे या कार्यालयात उपलब्ध आहेत. सहाय्यक संचालक,स्थानिक निधी लेखा अकोला यांना या कार्यालयाचे पत्र क्र.२९५४ दिनांक ९ डिसेंबर, २०१५ अन्वये लेखा परिक्षण करून घेणे बाबत विनंती करण्यात आली आहे.

### ३०) परिच्छेद क्रमांक ४.३४७/०६ (सन २००८-०९)

### पंचायत समित्यांनी लेखापरिक्षणासाठी अभिलेख सादर न करणे

मुंबई स्थानिक निधी लेखा अधिनियम, १९३० मधील कलम ६ (३) प्रमाणे ज्या तारखेला लेखापरिक्षणाचे काम सुरू करण्याचे ठरले जाते त्या तारखेसंबंधी आवश्यक आवश्यक तेवढ्या कालावधीची लेखी नोटीस संबंधित जिल्हा परिषदेचे विभाग/पंचायत समित्या यांना कळविण्यात येते. त्यानंतर प्रत्यक्ष लेखापरिक्षण सुरू झाल्यावर अधिनियमाचे कलम ६ (१) नुसार योग्य वाटतील अशा लेख्यांच्या संदर्भात जिल्हा परिषद / पंचायत समित्या यांना अर्धसमास पत्राने अभिलेख्यांची मागणी कळविली जाते व सदरचे अभिलेख विहित मुदतीत सादर करणेबाबत कालावधीत सादर करणेबाबत कालावधी दिला जातो. तरीसुद्धा लेखापरीक्षणास कागदपत्रे / अभिलेख उपलब्ध केले जात नाही. त्या त्या जिल्हा परिषद / विभाग पंचायत समिती अंतिमिकरणाचे वेळी अभिलेख उपलब्ध न केलेल्या आक्षेपांबाबत सविस्तर चर्चा करतानाही असे अभिलेख उपलब्ध करणे टाळण्यात येते. त्यामुळे असे परिच्छेद लेखापरीक्षण अहवालात समाविष्ट केले जातात. अशा प्रकारचे परिच्छेदाबाबत लेखापरिक्षा पुर्नविलोकन अहवालामध्ये निवड

करणेसाठी प्रस्तावीत केले जातात व संबंधित जिल्हा परिषद विभाग आणि पंचायत समिती यांना निवड केलेले परिच्छेद कळवून त्याबाबतचे अनुपालन मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद आणि मुख्य लेखा व वित्त अधिकारी आणि गट विकास अधिकारी यांना १५ दिवसांच्या आत सादर करणेबाबत सूचित केले जाते. तथापि या सूचनेबाबतही जिल्हा परिषद व पंचायत समित्या गांभीर्याने लक्ष देत नसल्याचे आढळुन येते. वर नमुद केल्याप्रमाणे संबंधित जिल्हा परिषद विभाग व पंचायत समिती यांना लेखे उपलब्ध करून देणेसाठी आवश्यक तेवढ्या संधी उपलब्ध करून देऊनसुद्धा लेखापरीक्षणास असे अभिलेख सादर करणेसाठी योग्य तो प्रतिसाद दिला जात नाही. सदर बाब गंभीर स्वरुपाची असल्याने ही बाब पंचायती राज समितीच्या निदर्शनास आणण्यात येत आहे. उदाहरणादाखल पंचायत समित्यांनी उपलब्ध न केलेल्या अभिलेख्याबाबत लेखापरिक्षणात घेतलेले आक्षेप खाली दर्शविण्यात आले आहेत.

| अ.क्र. | जिल्ह्याचे नाव | पंचायत समिती | परिच्छेद क्रमांक | रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|
| ५३ | अकोला | बाळापूर | ०६ | ३०,०००/- |

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, अकोला यांचेकडून खालील प्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

(१) परिच्छेदामध्ये नमूद केल्यानुसार केंद्रशाळा, अंदुरा येथील अभिलेखे व नस्ती उपलब्ध आहेत. सदरचे लेखापरीक्षण करणेबाबत या कार्यालयाचे पत्र क्रमांक ४४६३/२०१५, दिनांक २९ डिसेंबर २०१५ अन्वये सहायक संचालक, स्थानिक निधी लेखापरिक्षा, अकोला यांना विनंती करण्यात आलेली आहे.

(२) बाळापूर व देगांव येथील केंद्र मुख्याध्यापक यांचेकडून प्रत्येकी १०,००० अशी एकूण २०,००० एवढी रक्कम वसुली करण्याबाबत आदेश क्र. ४३९१, दिनांक २९ डिसेंबर २०१५ अन्वये निर्गमित करण्यात आलेले आहे.

**३१) परिच्छेद क्रमांक ४.३४७/१९ (सन २००८-०९)**

**पंचायत समित्यांनी लेखापरीक्षणासाठी अभिलेख सादर न करणे**

मुंबई स्थानिक निधी लेखा अधिनियम १९३० मधील कलम ६ (३) प्रमाणे ज्या तारखेला लेखापरीक्षणाचे काम सुरू करण्याचे ठरले जाते त्या तारखेसंबंधी आवश्यक आवश्यक तेवढ्या कालावधीची लेखी नोटीस संबंधित जिल्हा परिषदेचे विभाग/पंचायत समित्या यांना कळविण्यात येते. त्यानंतर प्रत्यक्ष लेखापरीक्षण सुरू झाल्यावर अधिनियमाचे कलम ६ (१) नुसार योग्य वाटतील अशा लेख्यांच्या संदर्भात जिल्हा परिषद / पंचायत समित्या यांना अर्धसमास पत्राने अभिलेख्यांची मागणी कळविली जाते व सदरचे अभिलेख विहित मुदतीत सादर करणेबाबत कालावधीत सादर करणेबाबत कालावधी दिला जातो. तरीसुद्धा लेखापरीक्षणास कागदपत्रे / अभिलेख उपलब्ध केले जात नाही. त्या त्या जिल्हा परिषद / विभाग पंचायत समिती अंतिमिकरणाचे वेळी अभिलेख उपलब्ध न केलेल्या आक्षेपांबाबत सविस्तर चर्चा करतानाही असे अभिलेख उपलब्ध करणे टाळण्यात येते. त्यामुळे असे परिच्छेद लेखा परीक्षण अहवालात समाविष्ट केले जातात. अश्या प्रकारचे परिच्छेदाबाबत लेखा परिक्षा पुनर्विलोकन अहवालामध्ये निवड करणेसाठी प्रस्तावीत केले जातात व संबंधित जिल्हा परिषद विभाग आणि पंचायत समिती यांना निवड केलेले परिच्छेद कळवून त्याबाबतचे अनुपालन मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद आणि मुख्य लेखा व वित्त अधिकारी आणि गट विकास अधिकारी यांना १५ दिवसाच्या आत सादर करणेबाबत सूचित केले जाते. तथापि या सुचनेबाबतही जिल्हा परिषद व पंचायत समित्या गांभीर्याने लक्ष देत नसल्याचे आढळुन येते. वर नमुद केल्याप्रमाणे संबंधित जिल्हा परिषद विभाग व पंचायत समिती यांना लेखे उपलब्ध करून देणेसाठी आवश्यक तेवढ्या संधी उपलब्ध करून देवूनसुद्धा लेखापरीक्षणास असे अभिलेख सादर करणेसाठी योग्य तो प्रतिसाद दिला जात नाही. सदर बाब गंभीर स्वरुपाची असल्याने ही बाब पंचायती राज समितीच्या निदर्शनास आणण्यात येत आहे. उदाहरणादाखल पंचायत समित्यांनी उपलब्ध न केलेल्या अभिलेख्याबाबत लेखा परिक्षणात घेतलेले आक्षेप खाली दर्शविण्यात आले आहेत.

| अ.क्र. | जिल्ह्याचे नाव | पंचायत समिती | परिच्छेद क्रमांक | रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|
| ५३ | अकोला | बाळापूर | १९ | १०,३८,८८९/- |

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, अकोला यांचेकडून खालील प्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

सदर प्रकरणी लघुसिंचन उपविभाग पातूर यांचेकडून मोजमाप पुस्तीका, प्रमाणके व नस्ती प्राप्त करण्यात आलेल्या असून लेखा परिक्षणासाठी या कार्यालयात उपलब्ध आहेत.

लेखापरिक्षण करणेबाबत या कार्यालयाचे पत्र क्रमांक ४४६३/१५, दिनांक २९ डिसेंबर २०१५ अन्वये सहायक संचालक, स्थानिक निधी लेखापरिक्षण अकोला यांना विनंती करण्यात आलेली आहे.

**३२) परिच्छेद क्रमांक ४.३४७/३० (सन २००८-०९)**

**पंचायत समित्यांनी लेखापरिक्षणासाठी अभिलेख सादर न करणे**

मुंबई स्थानिक निधी लेखा अधिनियम १९३० मधील कलम ६ (३) प्रमाणे ज्या तारखेला लेखापरिक्षणाचे काम सुरू करण्याचे ठरले जाते त्या तारखेसंबंधी आवश्यक आवश्यक तेवढ्या कालावधीची लेखी नोटीस संबंधित जिल्हा परिषदेचे विभाग/पंचायत समित्या यांना कळविण्यात येते. त्यानंतर प्रत्यक्ष लेखापरिक्षण सुरू झाल्यावर अधिनियमाचे कलम ६ (१) नुसार योग्य वाटतील अश्या लेख्यांच्या संदर्भात जिल्हा परिषद / पंचायत समित्या यांना अर्धसमास पत्राने अभिलेख्यांची मागणी कळविली जाते व सदरचे अभिलेख विहित मुदतीत सादर करणेबाबत कालावधीत सादर करणेबाबत कालावधी दिला जातो. तरीसुद्धा लेखापरीक्षणास कागदपत्रे / अभिलेख उपलब्ध्द केले जात नाही. त्या त्या जिल्हा परिषद / विभाग पंचायत समिती अंतिमिकरणाचे वेळी अभिलेख उपलब्ध न केलेल्या आक्षेपांबाबत सविस्तर चर्चा करतानाही असे अभिलेख उपलब्ध करणे टाळण्यात येते. त्यामुळे असे परिच्छेद लेखापरीक्षण अहवालात समाविष्ठ केले जातात. अश्या प्रकारचे परिच्छेदाबाबत लेखा परिक्षा पुर्नविलोकन अहवालामध्ये निवड करणेसाठी प्रस्तावीत केले जातात व संबंधित जिल्हा परिषद विभाग आणि पंचायत समिती यांना निवड केलेले परिच्छेद कळवून त्याबाबतचे अनुपालन मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद आणि मुख्य लेखा व वित्त अधिकारी आणि गट विकास अधिकारी यांना १५ दिवसाच्या आत सादर करणेबाबत सूचित केले जाते. तथापि या सूचनेबाबतही जिल्हा परिषद व पंचायत समित्या गांभीर्याने लक्ष देत नसल्याचे आढळुन येते. वर नमुद केल्याप्रमाणे संबंधित जिल्हा परिषद विभाग व पंचायत समिती यांना लेखे उपलब्ध करून देणेसाठी आवश्यक तेवढ्या संधी उपलब्ध करून देवूनसुद्धा लेखापरीक्षणास असे अभिलेख सादर करणेसाठी योग्य तो प्रतिसाद दिला जात नाही. सदर बाब गंभीर स्वरुपाची असल्याने ही बाब पंचायती राज समितीच्या निदर्शनास आणण्यात येत आहे. उदाहरणादाखल पंचायत समित्यांनी उपलब्ध न केलेल्या अभिलेख्याबाबत लेखा परिक्षणात घेतलेले आक्षेप खाली दर्शविण्यात आले आहेत.

| अ.क्र. | जिल्ह्याचे नाव | पंचायत समिती | परिच्छेद क्रमांक | रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|
| ५३ | अकोला | बाळापूर | ३० | २०,१३,२७६/- |

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, अकोला यांचेकडून खालील प्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

सदर प्रकरणी मोजमाप पुस्तीका क्रमांक ४२१, ४२०, ७१७, १३११, ४३८ व संबंधीत नस्ती लेखा परिक्षणासाठी या कार्यालयास उपलब्ध आहे.

लेखापरिक्षण करणेबाबत या कार्यालयाचे पत्र क्रमांक ४४६३ दिनांक २९ डिसेंबर, २०१५ अन्वये सहायक संचालक, स्थानिक निधी लेखापरिक्षण अकोला यांना विनंती करण्यात आलेली आहे.

**३३) परिच्छेद क्रमांक ४.११३/२३ (सन २००८-०९)**

**४ टक्के सादील पंचायत समिती स्तर मौजे विवरा व आसोला येथील दोन शाळा (एक खोली) दुरूस्ती बाबत :-**

कामावर रक्कम रु. ९९५००/- इतका खर्च केला आहे या बाबत खालील अभिप्राय आहे. सदर कामाची मोजमाप पुस्तीका लेखापरीक्षणास उपलब्ध झाली नाही.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, अकोला यांचेकडून खालील प्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

४ टक्के सादील मधुन पंचायत समिती पातुर अंतर्गत मौजे विवरा व आसोला येथील येथील शाळा खोली दुरुस्तीची कामे मंजूर असून ती पूर्ण करण्यात आलेली आहेत कामांची मोजमाप पुस्तीका उपलब्ध असून मोजमाप पुस्तिकेची लेखा परिक्षकाकडून तपासणी करण्यात आली आहे. विवरा येथील शाळा दुरुस्तीवर रुपये ४९,७००/- व आसोला येथील शाळा दुरुस्तीवर रुपये ४९,८००/- असा एकूण रुपये ९९,५००/- खर्च करण्यात आला. सदर दोन्ही कामे मंजूर असून पूर्ण झाली आहे. सदर कामाची नोंद मोजमाप पुस्तीका क्र. ३७५ पान क्र. ९२-९५ व ९६-१०० वर घेण्यात आली आहे. वरील दोन्ही कामाचे काम पूर्णत्वाचे प्रमाणपत्र कार्यालयाकडे उपलब्ध आहेत.

**३४) परिच्छेद क्रमांक ५.३३/३७ (सन २००८-०९)**

**ग्रामपंचायतमधील इतर अनियमितता :-**

| अ.क्र. | नियमबाह्य बाबीचे स्वरुप | जिल्ह्याचे नाव | पंचायत समितीचे नाव | लेखा परिक्षण अहवाल परिच्छेद क्र. | रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|---|
| ७ | अभिलेखे उपलब्ध नसणे | अकोला | बार्शिटाकळी ग्रा.प.झोडगा | ३७ | ६२,८४४/- |

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, अकोला यांचेकडून खालील प्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

ग्रामपंचायत झोडगा लेखा परिक्षण वर्ष सन १९८९-९० ते सन १९९१-९२ व सन १९९६-९७ ते सन १९९८-९९ या वित्तीय वर्षात जवाहर रोजगार योजना लेखापरिक्षण अहवालातील परिच्छेद क्र.३७ मुळ प्रमाणके उपलब्ध न करणे.

उपरोक्त नमूद आक्षेपाचे अनुषंगाने प्राथमिक चौकशी केली असता सद्य:स्थितीत आक्षेपित प्रमाणके ग्रामपंचायतीना उपलब्ध नसल्याचे दिसून आले. वसूलपात्र रक्कम रुपये ६२,८४४/- खालीलप्रमाणे कार्यरत तत्कालिन सरपंच व ग्रामसेवक यांचेकडून वसूलपात्र असून वसुलीची कार्यवाही सुरू असून त्यापैकी रुपये ३५,८९२/- वसुली पूर्ण झाली असून उर्वरित वसुलीची कार्यवाही सुरू आहे. गट विकास अधिकारी यांचे पत्र क्रमांक १९६ दिनांक १७ जानेवारी, २०१७ अन्वये संबंधितांस रकमेचा भरणा करणे बाबत कळविण्यात आले आहे.

| अ. क्र. | सरपंच/गावाचे नाव व पदनाम | कालावधी | वसूलपात्र रक्कम | वसूल झालेली | प्रलंबित वसुली |
|---|---|---|---|---|---|
| १) | श्री.वसंतराव देशमुख-सरपंच | १.४.८९ ते ३१.३.९२ | २६३९२ | २६३९२ | - |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| २) | श्री.कृष्णा जगताप - सरपंच | १.४.९६ ते २८.४.९९ | ४७५० | ४७५० | - |
| ३) | श्री.पजई - ग्रामसेवक | १.४.८९ ते १.२.९१ | २३६१ | - | २३६१ |
| ४) | श्री.एस.आर.खंडारे – (मयत) ग्रामसेवक | १.२.९१ ते ३१.३.९७ | २४५९१ | - | २४५९१ |
| ५) | श्री.बि.एस.गरकल – ग्रामसेवक | १.३.९७ ते ३१.३.९९ | ४७५० | ४७५० | - |
| | एकूण | | ६२८४४ | ३५८९२ | २६९५२ |

वरील नमूद वसूल पात्र रकमेपैकी खालील प्रमाणे वसूली करण्यात आलेली आहे.

(१) वसंतराव देशमुख, तत्कालिन सरपंच यांच्याकडून रुपये २६,३९२/- नमूना-७ पावती क्र.३९ दिनांक २० जानेवारी, २०१७ अन्वये वसूली करण्यात आलेली आहेत.

(२) श्री.कृष्णा जगताप, तत्कालिन सरपंच यांच्याकडून रुपये ४७५०/- नमूना-७ पावती क्र.४० दिनांक २३ जानेवारी, २०१७ अन्वये वसूल करण्यात आलेली आहेत.

(३) श्री.बी.एस.गरकल, तत्कालिन सचिव यांच्याकडून रुपये ४७५०/- नमुना-७ पावती क्र.४१ दिनांक २४ जानेवारी, २०१७ अन्वये वसूल करण्यात आलेली आहेत.

उर्वरित वसूलपात्र रकमेची वसुलीची कार्यवाही सुरू आहे.

**मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष**

अकोला जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिनांक १ जून, २०१७ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी सन २००८-०९ व सन २०११-१२ च्या लेखापरिक्षा पुनर्विलोकन अहवालातील ज्या परिच्छेदांमध्ये "अभिलेख लेखापरीक्षणास उपलब्ध करून देण्यात आलेले नाहीत" या संदर्भात आक्षेप नोंदविण्यात आलेले आहेत अशा प्रकरणात महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरिक्षा अधिनियम, १९३० च्या कलम ७ नुसार दंडाची कार्यवाही तसेच दोषींवर एक वेतनवाढ रोखून त्याबाबतची नोंद त्यांचे सेवापुस्तकात घेण्याचे समितीने निदेश दिले.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्यांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

(१) सन-२००८-०९ व सन-२०११-१२ या अहवाल वर्षात लेखा परीक्षणास कागदपत्रे उपलब्ध करून दिले नसल्याप्रकरणी संबंधित अधिकारी/कर्मचारी यांचेवर समितीच्या निदेशानुसार महाराष्ट्र स्थानिक लेखापरिक्षा अधिनियम, १९३० च्या कलम ७ अनुसार दंडाची व एक वेतनवाढ रोखुन तशी नोंद संबंधितांचे सेवा पुस्तिकेमध्ये घेण्याची कारवाई केली आहे काय, त्यानुसार प्रकरण व परिच्छेद निहाय दोन्ही अहवाल वर्षाची माहीती समितीस सादर करण्यात यावी.

(२) भविष्यात लेखापरीक्षणास अभिलेख उपलब्ध न करून देणे असे आक्षेप वारंवार उपस्थित होऊ नयेत याबाबत काटेकोर अंमलबजावणी करण्यासंदर्भात मंत्रालयीन विभागाकडून कोणती कारवाई करण्यात आली वा करण्यात येत आहे ?

**उपरोक्त मुद्यांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली :--**

मा.समिती प्रमुखांनी दिलेल्या निर्देशांचे अनुषंगाने नमूद करण्यात येते की, सन-२००८-०९ तसेच सन-२०११-१२ च्या स्थानिक निधी लेखापरिक्षणावेळी लेखापरिक्षकांस तपासणी करित असतांना ज्या अधिकारी/कर्मचारी यांनी कागदपत्रे दाखविली नाहीत अशा अधिकारी व कर्मचारी यांचे विरुद्ध महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरिक्षा अधिनियम, १९३० च्या कलम ७ अन्वये दंड रक्कम रुपये १०० पर्यंत तसेच सुधारित अधिनियम दिनांक १० मार्च, २०११ अन्वये रुपये २५,०००/- पर्यंत दंड रक्कम वसूल करण्याची तरतूद असून त्यानुसार जिल्हा परिषद, अकोला यांचेकडून कार्यवाही करण्यात आली असून एकूण २३८ प्रकरणी रुपये १,६३,३००/- दंडाची रक्कम वसूल करण्यात आली आहे. सविस्तर यादी परिशिष्टासह सोबत जोडली आहे. (परिशिष्ट ''अ'')

सविस्तर माहिती परिशिष्ट अ व ब अन्वये सोबत जोडली आहे.

**मंत्रालयीन विभागाचा अभिप्राय**

**ग्रामविकास विभागाचे अभिप्राय :**

(१) जिल्हा परिषदेने केलेल्या कार्यवाहीशी शासन सहमत आहे,

(२) लेखापरीक्षणास अभिलेख उपलब्ध करून देण्याबाबत या विभागाच्या दिनांक ३० मार्च, २०१६ च्या परिपत्रकान्वये राज्यातील सर्व जिल्हा परिषदांना सूचित करण्यात आले आहे.

**विभागीय सचिवांची साक्ष :**

पंचायती राज समितीने अकोला जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यांवर अधिक माहिती घेण्यासाठी दिनांक २९ मे, २०१८ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, लेखापरीक्षणास कागदपत्रे उपलब्ध न करून देण्याबाबत महाराष्ट्र स्थानिक लेखापरीक्षा अधिनियम १९३० च्या कलम ७ नुसार दंडाची रक्कम वसूल करण्यात यावी व एक वेतनवाढ रोखून तशी नोंद संबंधितांच्या सेवा पुस्तिकेमध्ये घेण्यात आली आहे काय, यावर ग्रामविकास विभागाचा अतिरिक्त कार्यभार असलेल्या सचिवांनी खुलासा केला की, वसुली कमी झालेली आहे. एकूण २ लाख ६२ हजार रुपये वसूल झाले आहे.

तद्नंतर समितीने विचारणा केली की, पृष्ठ क्रमांक ३९ वर १३७५ रुपये कशाचे नमूद केले आहे. ५३,२५,०००/- ही दंडाची रक्कम आहे काय, यावर ग्रामविकास विभागाच्या अतिरिक्त कार्यभार असलेल्या सचिवांनी खुलासा केला की, पृष्ठ क्रमांक २२ वर ६२ लाख रुपये ही दंडाची रक्कम वसूल करण्यात आलेली आहे. पृष्ठ क्रमांक १९ व २१ वर दंडाची रक्कम वसूल केली असून ती ५३ लाख २५ हजार रुपये आहे.सदर वसुली ग्रामविकास विभागाने केली आहे. यामध्ये कनिष्ठ अभियंता व सहाय्यक अभियंता यांच्याकडून ६२ लाख रुपयांची वसुली केलेली आहे. ग्रामविकास विभागाने वसूलीचे आदेश काढले आहेत. २५ लाख ५० हजार रुपयांची रक्कम जे लोक सेवानिवृत्त होऊन ५ वर्षे झाले त्यांच्याकडून वसूल करावयाची आहे, त्यातील काही लोक मयत झाले आहेत. सेवानिवृत्त झाल्यानंतर ४ वर्षाच्या आत रक्कम वसूल करावयाची असते. २८ लाख रुपयांची वसुली पूर्ण करता येईल. वसुलीला विलंब होत असल्यामुळे काही अधिकारी सेवानिवृत्त होत आहे त्यामुळे त्यांच्याकडून वसूली करता येत नाही. याबाबत समितीने चिंता व्यक्त केली तसेच जे मयत झाले त्यांच्याकडून रकमेची वसुली कशा प्रकारे करता येईल. समितीची अशी अपेक्षा आहे की, वसुलीसाठी विलंब करता कामा नये. समितीच्या असे निदर्शनास आले आहे की, रक्कम वसूल करण्याचे अधिकार महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम, १९३० च्या कलम ७ अन्वये दंड रक्कम रुपये १००/- व सुधारित अधिनियम दिनांक १० मार्च, २०११ अन्वये रुपये २५,०००/- दंड वसूल करण्याची तरतूद आहे. या नियमानुसार आपल्या लक्षात या बाबी आल्यावर आपण समितीची साक्ष लागण्याची वाट कशासाठी पाहत आहात. संबंधितांवर कारवाई करून आपण जबाबदारीतून मोकळे व्हायला पाहिजे. अधिकारी व कर्मचारी सेवानिवृत्त होऊन चार वर्षे झाले की त्यांच्याकडून कोणत्याही रकमेची वसुली करता येत नाही. त्यामुळे शासनाचे नुकसान होत आहे. समितीने अनेक जिल्ह्यांमध्ये दौरे केले आहेत. संपूर्ण महाराष्ट्रात अशीच

परिस्थिती आहे. ग्रामविकास विभागाची संपूर्ण महाराष्ट्रातील प्रकरणांची तपासणी करण्याची जबाबदारी आहे. शासनाचा इतका प्रचंड पैसा बुडतो हे बरोबर नाही. अनेक ठिकाणचे आपण रस्ते पाहतो, कोणत्याही ठिकाणची कामे व्यवस्थित आढळून येत नाही ही मोठी चिंतेची बाब आहे.

यावर ग्रामविकास विभागाच्या अतिरिक्त कार्यभार असलेल्या सचिवांनी खुलासा केला की, लेखापरीक्षणाची ही व्यवस्था आहे, त्या अगोदर विभागाचे अंतर्गत लेक्षापरीक्षण करण्यात येते. त्याद्वारे नियमित आढावा घेण्यात येतो. ही अव्याहत चालणारी प्रक्रीया आहे. अनेक ठिकाणी अंतर्गत लेखापरीक्षेची व्यवस्था करण्यात आलेली आहे. प्रत्येक जिल्हा परिषदेमध्ये अंतर्गत लेखापरिक्षण होत असते.

यावर समितीने सदर प्रकरण गंभीर असून शिल्लक असलेली वसुली कशी करता येईल यासाठी प्रयत्न करावे असे निदेश दिले असता सचिव, रोहयो व जलसंधारण तसेच ग्रामविकास विभागाचा अतिरिक्त कार्यभार असलेल्या सचिवांनी अशी माहिती दिली की, त्यांनी बऱ्याच प्रकरणांबाबत आदेश घेतले असून सेवानिवृत्त झालेल्या अधिकारी व कर्मचारी यांचेकडून वसुली करण्याबाबत प्रयत्न करण्यात येत आहेत असे समितीस आश्वत केले.

**अभिप्राय व शिफारशी :**

अकोला जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या समवेत झालेल्या साक्षीदरम्यान समितीच्या असे निदर्शनास आले की, सन २००८-०९ तसेच सन २०११-१२ च्या स्थानिक निधी लेखा परिक्षणाच्या वेळी लेखापरिक्षकांस ते तपासणी करीत असताना त्यांनी मागितलेली कागदपत्रे संबंधित अधिकारी/कर्मचारी यांनी दाखविली नाहीत. अशा एकूण २३८ प्रकरणी रुपये १,६३,३००/- एवढी दंडाची रक्कम वसूल करण्यात आलेली आहे. सन २००८-०९ तसेच सन २०११-१२ या वर्षाचे एकूण ३४ परिच्छेदांच्या अनुषंगाने संबंधित अधिकारी/कर्मचारी यांचेवर महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरिक्षा अधिनियम, १९३० च्या कलम ७ नुसार सन २००८-०९ मधील प्रकरणांसंदर्भात कारवाई करण्यात यावी तसेच सन २०११-१२ मधील प्रकरणांसंदर्भात वित्त विभागाने या अधिनियमात केलेल्या सुधारणेनुसार महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरिक्षा अधिनियम, १९३० च्या कलम ७ नुसार रुपये २५०००/- इतकी दंडाची शास्ती तसेच एक वेतनवाढ रोखण्याची कारवाई करून तशी नोंद संबंधितांचे सेवा पुस्तिकेमध्ये घेण्याची कारवाई करण्याची शिफारस करूनदेखील काही अधिकारी या नियमास न जुमानता लेखापरीक्षणास कागदपत्रे उपलब्ध करून देत नाहीत.

समिती राज्यात अनेक ठिकाणी भेट देत असताना लेखापरिक्षकांना अभिलेखे संबंधित अधिकाऱ्यांकडून वेळीच उपलब्ध करून दिली जात नाही. त्यामुळे लेखापरिक्षण करता येत नाही. या बाबींचा फायदा संबंधितांकडून घेतला जातो हे टाळण्यासाठी सध्या अस्तित्वात असलेल्या दंडात्मक तरतुदीत बदल करणे आवश्यक आहे. सदर बाब विचारात घेता, आता समिती अशी शिफारस करीत आहे की, "**जी कोणतीही व्यक्ती कलम ६ पोट-कलम (१) खंड (अ) किंवा खंड (ब) अन्वये कायदेशीररीत्या तिला केलेल्या कोणत्याही आज्ञेचे पालन करण्यात जाणूनबुजून दुर्लक्ष करेल किंवा तिचे अनुपालन करण्याचे नाकारेल ती विभागीय आयुक्तांपुढे सदर बाब सिद्ध झाल्यानंतर लेखापरीक्षणास उपलब्ध न झालेले दस्तऐवज/अभिलेख यामध्ये गुंतलेल्या एकूण रक्कमेच्या ५% किंवा रुपये ५०,०००/- यापैकी जास्त असणाऱ्या रक्कमे इतक्या दंडात्मक रकमेस पात्र ठरविण्यात यावी. तसेच त्यांची एक वेतनवाढ रोखण्याची कारवाई करून तशी नोंद संबंधितांच्या सेवा पुस्तकामध्ये घेण्याची कारवाई करण्यात यावी**" अशी सुधारणा संबंधित अधिनियमात करण्यात यावी व करण्यात आलेल्या रकमेबाबतची माहिती समितीला कळविण्यात यावी.

ज्या प्रकरणामध्ये अभिलेखे उपलब्ध करून न देणे याबाबत दंडात्मक कारवाई केलेली नाही त्या प्रकरणामध्ये दंड आकारणी करण्यात यावी. समितीने दिलेल्या भेटीच्या वेळी केलेल्या अनुपालन अहवालामध्ये सदर अभिलेखे उपलब्ध असल्याचे स्पष्टीकरण केले आहे. मात्र सदर अभिलेखे लेखापरिक्षणाच्या वेळी उपलब्ध करून देणे आवश्यक होते. **अकोला जिल्हा परिषदेमध्ये सन २००८-०९ तसेच सन २०११-१२ या वर्षामध्ये एकूण ३४ परिच्छेदांसंदर्भात अभिलेखे उपलब्ध करून**

**देण्यात आलेले नाहीत. त्यामुळे अभिलेखे लेखापरिक्षणाच्या वेळी सादर करण्यात आलेले नाहीत अशा सन २००८-०९ मधील परिच्छेदासंदर्भात तत्कालिन नियमानुसार व सन २०११-१२ मधील परिच्छेदासंदर्भात कलम ६ मधील पोट-कलम (१) खंड (अ) किंवा खंड (ब) नुसार कायदेशीर कारवाई करून वसूल केलेली रक्कम व गुंतलेली एकूण रक्कम याबाबतचा सविस्तर अहवाल समितीला एक महिन्याच्या आत पाठविण्यात यावा, अशी समितीची शिफारस आहे.**

प्रकरण अकरा

## जिल्हा परिषद, अकोला

## सर्वसाधारण शिफारशी

**१. गैरव्यवहार/अपहार/अखर्चित रकमा जमा करण्याबाबत :-**

समितीने राज्यातील जिल्हा परिषदांना भेटी दिल्या असता विशेषत: अकोला जिल्हा परिषदेत गैरव्यवहार व अपहाराच्या मोठ मोठ्या रकमा वसुलीविना प्रलंबित आहेत. अशी अनेक प्रकरणे समितीसमोर तपासणीसाठी आली असताना समितीने या प्रकरणात सदरच्या रकमा शासन खाती जमा करण्याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी यांना निदेशित केले आहे. सदर गैरव्यवहाराची/अपहाराची अनेक प्रकरणे असून ती जुनी आहेत. जिल्हा परिषदांनी वेळीच कार्यवाही केली असती तर शासनाचा कोट्यवधी रुपयांचा निधी या प्रकरणांमध्ये अडकून पडला नसता व तो वेळीच वसूल झाला असता. जिल्हा परिषदांनी सदरच्या रकमा संबंधितांवर प्रशासकीय कारवाई करुन वसुल केल्या असत्या तर या रकमा केंव्हाच शासन खाती जमा झाल्या असत्या. शासनाचा विविध योजनांवरील निधी हा गैरव्यवहाराने जेव्हा हडपला जातो तेव्हा त्या त्या योजना राबविताना त्यात निश्चितच मोठ्या प्रमाणावर अनियमितता होऊन योजनेच्या फलनिष्पत्तीवर त्याचा विपरीत परिणाम होतो असे समितीला आढळून आले आहे. जिल्हा परिषदांकडून त्यांच्या कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्यात विलंब होत असल्यामुळे जिल्हा परिषदा अशा कर्मचाऱ्यांना पाठीशी घालत असून त्यांचेवरील संभाव्य कार्यवाहीस पुढे ढकलण्याचा प्रयत्न करताना दिसतात. त्याद्वारे एकप्रकारे शासनाचा निधी वेळीच वसूल होत नसल्यामुळे याबाबत मोठ्या प्रमाणात प्रशासकीय अनियमितता होत असल्याचे समितीला आढळून आले आहे. **याप्रकरणी समिती अशी शिफारस करीत आहे की, जिल्हा परिषदेची योजना राबविताना संबंधित योजनेत एखादा गैरव्यवहार अथवा अपहार उघडकीस आला असल्यास त्या गैरव्यवहारासंदर्भात कोणत्याही परिस्थितीत तीन महिन्यात दोषारोपपत्र दाखल करुन असे प्रकरण सहा महिन्यात निकाली काढण्यासंदर्भात शासनाने निश्चित अशी भूमिका घ्यावी त्याचप्रमाणे अशी कार्यवाही मुदतीत पूर्ण करण्याची जबाबदारी जिल्हा परिषदेच्या संबंधित विभाग प्रमुखांवर सोपविण्यात यावी व असे विभाग प्रमुख गैरव्यवहाराच्या अथवा अपहाराच्या रकमा सहा महिन्यात शासन खाती जमा करण्यात अयशस्वी झाल्यास त्यांचेविरुध्द जबाबदारी निश्चित करुन त्यांच्यावर त्या प्रकरणी शिस्तभंगाची कार्यवाही करण्याबाबत विभागाने ठोस भूमिका घ्यावी, अशी समितीची शिफारस आहे.**

शासनाकडून एखादी योजना राबविताना कोट्यवधी रुपयांचा निधी तरतूदी करुन मिळविला जातो व असा निधी वेळेत खर्च केला जात नाही व तो शासन खाती जमादेखील केला जात नाही. त्यामुळे वित्तीय बाबीत मोठ्या प्रमाणावर अनियमितता होत असून संबंधित अधिकाऱ्यांकडून रकमा वेळीच खर्च करण्याबाबत कमालीचा हलगर्जीपणा करण्यात येतो. कोट्यवधी रुपये अखर्चित ठेवल्यामुळे शासनाला असा निधी आवश्यक असणाऱ्या अत्यंत महत्वाच्या योजनांवर खर्च करता येत नाही. पर्यायाने विविध भौगोलिक भागातील निधी वाटपातील असंतोष वाढतो. खर्चाच्या बाबतीतील अनियमितता व योजना राबविण्याच्या कामातील अधिकाऱ्यांद्वारा होत असलेला हलगर्जीपणा हा प्रशासकीयदृष्ट्या अत्यंत गंभीर असून त्यामुळे अखर्चित निधी राहून तो दुसऱ्या महत्वाच्या योजनांवर खर्च केला जात नाही. **म्हणून एखाद्या योजनेसाठी मागितलेला निधी त्या योजनेची उपयुक्तता तसेच जनसामान्यांच्या हिताचा विचार करुन राबविणे आवश्यक आहे. जनतेला देय असलेल्या सुविधा योजना राबवून वेळीच मिळत नसल्याने जनतेत नैराश्य व संतापाच्या भावना वाढीस लागण्याची शक्यता नाकारता येत नाही. उपरोक्त सर्व बाबींचा विचार करता अखर्चित रकमांवर बंधन टाकण्यासंदर्भात शासनाने यासंदर्भात कडक धोरण आखून त्याची अंमलबजावणी करण्यासंदर्भात जिल्हा परिषदांना एका परिपत्रकाद्वारे कळविण्यात यावे अशीही समितीची शिफारस आहे.**

**गैरव्यवहार/अपहार/अखर्चित रकमा जमा करण्यासंदर्भात समितीने उपरोक्तप्रमाणे केलेल्या शिफारशीनुसार यासंदर्भात शीघ्रतेने कार्यवाही करुन अकोला जिल्हा परिषदेमधील रक्कमा शासन खाती जमा करण्याबाबत कार्यवाही करण्यात यावी व पंचायती राज समितीने तपासणी केलेल्या अहवालासंदर्भात एकूण किती रकमेची शासन खाती वसुली केली याबाबीची माहिती समितीला कळविण्यात यावी, अशीही समितीची शिफारस आहे.**

**२. लेखा परिक्षणास कागदपत्रे उपलब्ध करुन न देणे :-**

समितीने अकोला जिल्हा परिषदेला भेट दिली असता अनेक लेखा परिच्छेदांमध्ये लेखा परिक्षकांना संबंधित लेख्यांवरील कागदपत्रे उपलब्ध करुन दिली नसल्याने त्याबाबतचा अंतिम अभिप्राय लेखा परिक्षकांस व्यक्त करता आला नाही. याबाबत समितीने असे लेखे विचारात घेतले असता अनेक प्रकरणात लेखा परीक्षणाच्या वेळी कागदपत्रे उपलब्ध नव्हती आता उपलब्ध आहेत असे समितीला सांगण्यात आले. लेखा परिक्षणास कागदपत्रे उपलब्ध नव्हती त्याची कारणे काय या शोधात समितीला अनेक गंभीर बाबी निदर्शनास आल्या. **मुळात कागदपत्रे उपलब्ध असतानाही ते लेखा परिक्षणास न दाखविणे ही गंभीर बाब आहे. तो सरळ शिस्तभंगाचा प्रकार आहे. लेखा परीक्षक सुरुवातीला कागदपत्रे उपलब्ध करुन देण्यासाठी चार महिन्यांचा वेळ देतात व त्यानंतर पुन्हा दोन महिन्यांचा कालावधी संबंधितांना दिला जातो. असे असूनदेखील संबंधित अधिकारी लेखा परीक्षणास कागदपत्रे उपलब्ध करुन देत नाहीत. मुंबई स्थानिक निधी लेखा परीक्षा अधिनियम १९३० च्या कलम ७ मध्ये सन २०११ पूर्वी लेखा परीक्षणास कागदपत्रे उपलब्ध न करुन देणाऱ्या अधिकाऱ्यास केवळ १०० रुपयांचा दंड आकारण्यात येत असे. कदाचित त्यामुळे लेखा परिक्षणास कागदपत्रे उपलब्ध होत नसतील अशी समितीने भावना व्यक्त केल्यानंतर शासनाने सन २०११ मध्ये उक्त अधिनियमाच्या कलम ७ मध्ये सुमारे २५,००० रुपये (पंचवीस हजार रुपये) दंडाच्या रकमेची तरतूद केली आहे. समितीने या प्रकरणी जिल्हा परिषदांना ज्या कोणी लेखा परीक्षणाचे वेळी लेखा परिक्षकांस कागदपत्रे उपलब्ध करुन दिली नाहीत अशा जबाबदार असणाऱ्या सर्व संबंधितांना अधिनियमातील तदतुदीनुसार रु.२५,०००/- इतका दंड आकारण्याची शास्ती करण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार अकोला जिल्हा परिषदेमध्ये अशा किती व्यक्तींना प्रत्येक प्रकरणी दंड करण्यात आला व एकूण किती रक्कम शासन खाती जमा करण्यात आली याची संपूर्ण माहिती प्रकरणनिहाय समितीला तीन महिन्यात पाठविण्यात यावी, अशी समितीची शिफारस आहे.**

**३. नियमानुसार व नैसर्गिक न्याय तत्वाला अनुसरुन दोषीतांवर कारवाई करण्याबाबत :-**

संसदीय लोकशाहीच्या संवर्धनासाठी व यशस्वीततेसाठी शासनाच्या संपूर्ण प्रशासन व्यवस्थेवर सखोल, प्रभावी व अर्थपूर्ण असे नियंत्रण व देखरेख ठेवण्याची आत्यंतिक गरज आहे म्हणून कार्यकारी प्रशासन राबवित असलेल्या विविध योजनांचा अभ्यास करण्यासाठी त्यातील त्रुटी शोधून काढून योजना अंमलबजावणीला व पर्यायाने प्रशासनाला गती देण्यासाठी पंचायती राज समितीची रचना करण्यात आली. समितीला अधिकार मिळाल्यावरुन समितीने अनेक प्रकरणात दोषीतांवर कार्यवाही करण्याबाबत शासनाला निर्देश दिले आहेत. असे निर्देश देत असताना समितीने एखाद्या अधिकारी/कर्मचाऱ्याची प्रथमदर्शनी चूक आढळून देखील संबंधित दोषींविरुध्द जाणीवपूर्वक निलंबनाची कारवाई प्रस्तावित केलेली नाही. भारतीय संविधानाने प्रत्येकाला समान संधी देण्याचे धोरण दिल्याने कारवाई करतानादेखील दोषीताने तो निर्दोष असल्याचे अभिकथन करणे आवश्यक आहे असे समितीला प्रकर्षाने वाटते. कोणत्याही निर्दोष व्यक्तीवर दोष लादले जाणे हे नैसर्गिक न्याय तत्वाला अनुसरुन नाही असे समितीला वाटते. म्हणून प्रशासनाने कार्यवाही करताना कोणत्याही निर्दोष व्यक्तीला शास्ती करुन नये आणि दोषी व्यक्तीला कोणत्याही परिस्थितीत शास्तीविना सोडू नये असे समितीला वाटते. भेटीच्या वेळी संबंधित प्रकरणाची निष्पक्षपणे चौकशी करुन चौकशी अहवालामध्ये दोषीविरुध्द कार्यवाही करुन त्यास शिक्षा करणे योग्य आहे. **तथापि, एखाद्या निर्दोष व्यक्तीवर कार्यवाही केल्यास त्यात समितीच्या सूचनेनुसार कार्यवाही केली असे म्हणणे ही बाब समाजाची लोकशाही व्यवस्थेवरील विश्वास उडवणारी आहे. जनमानसात समितीची भूमिका ही प्रशासनाने केलेल्या चांगल्या व वाईट बाबींना शोधून काढून त्यातून जनतेप्रती महत्वाची कामे कशी केली जातील याबाबतची प्रतिमा उभी करणे हे संसदीय लोकशाहीने दिलेले एक कर्तव्य आहे. समितीची नाहक बदनामी काही कर्तव्यपारायणवता व सचोटी नसलेले अधिकारी निर्माण करतात आणि जाणीवपूर्वक वैयक्तिक द्वेषापोटी, हेवेदाव्यापोटी निर्दोष व्यक्तींवर कार्यवाही करुन समितीची दिशाभूल करण्याचा प्रयत्न करतात. याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सतर्क राहणे आवश्यक असून एखादा गुन्हेगार सुटत असताना त्यास नैसर्गिक न्याय मिळेल परंतु एखाद्या निर्दोष व्यक्तीला शिक्षा होता कामा नये ही समितीची भूमिका असल्यामुळे समितीने ज्या ज्या प्रकरणांमध्ये चौकशी करण्याचे निर्देश दिलेले आहेत. अशा सर्व प्रकरणांमध्ये दोषारोपांची चौकशी**

**करताना सर्व संबंधित व्यक्तींना नैसर्गिक न्याय तत्वानुसार तसेच शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णयानुसार संपूर्ण वस्तुस्थिती विचारात घेतल्यानंतरच नि:पक्षपातीपणे कार्यवाही करुन दोषींना शास्ती तर निर्दोषींना मुक्ती या तत्वानुसार कारवाई करण्यात यावी, अशी समितीची आग्रहाची शिफारस आहे.**

# परिशिष्ट (अ)
# शासनाचे आदेश व परिपत्रके

(परिशीष्ट २.१)

जिल्हा परिषद स्तरांवर राबविण्यात येणा-या
विविध योजनांचे नियोजन व अंमलबजावणी
विशिष्ट मुदतीमध्ये पूर्ण करणे.

**महाराष्ट्र शासन**
**ग्राम विकास व जलसंधारण विभाग**
शासन परिपत्रक क्रमांक:झेडपीए-२००८/प्र.क्र.४५६/वित्त-९
मंत्रालय, मुंबई-४०००३२, दिनांक: २० जून, २००८.

**वाचा:-** परिपत्रक क्रमांक: झेडपीए २०००/प्र.क्र.४१/३३, दिनांक : १७ जानेवारी,२००१

**परिपत्रक :-**

जिल्हा परिषदांनी योजना राबविताना योग्य वेळापत्रकानुसार योजना राबविण्यासाठी उपरोक्त शासन परिपत्रकान्वये सर्व जिल्हा परिषदांना सूचना निर्गमित करण्यात आल्या होत्या. तथापि जिल्हा परिषदांकडून केंद्र व राज्य शासन पुरस्कृत विविध योजनांची तसेच जिल्हा परिषदांनी स्वत:च्या उत्पन्नातून हाती घेतलेल्या योजनांची अंमलबजावणी करताना, उद्दीष्ट पुर्तीसाठी व्यवहार्य नियोजनाचा अभाव आणि विविध स्तरांवर घ्यावयाच्या निर्णयासाठी लागणारा विलंब, यामुळे अनेक योजनांची उद्दीष्टे पूर्ण करण्यांमध्ये आवश्यकतेपेक्षा जास्त वेळ लागणे, वर्षाअखेरीस निविदा मंजुरी, लाभार्थी निवड करणे, आर्थिक वर्ष संपल्यानंतरही साहित्याचा पुरवठा न होणे इ. सारख्या गंभीर व आक्षेपार्ह चूका मोठया प्रमाणात होताना दिसून येतात, **परिणामी जिल्हा परिषदांच्या आणि पर्यायाने शासनाच्या कार्यक्षमतेवर अकारण टीका होत राहते.** यास्तव जिल्हा परिषदेकडून राबविण्यात येणा-या विविध योजनांच्या अंमलबजावणीसाठी व्यवस्थित व जाणीव पूर्वक नियोजन करुन, त्या पध्दतीने अंमलबजावणी झाल्यास बहुतांशी योजनांची उद्दीष्टे त्याच **आर्थिक वर्षाच्या नोव्हेंबर- डिसेंबर** अखेर पूर्ण करता येणे शक्य आहे. ही बाब विचारांत घेवून विविध योजनांच्या अंमलबजावणीसाठी शासन स्तरावरुन सर्वंकष सूचना निर्गमित होणे आवश्यक आहे. **यास्तव उपरोक्त शासन परिपत्रक अधिक्रमित करण्यात येत असून,** या शासन निर्णयान्वये पुढील प्रमाणे नव्याने सूचना निर्गमित करण्यात येत आहे.

**(१) केंद्र पुरस्कृत व राज्य पुरस्कृत योजना -**

१. केंद्र पुरस्कृत योजनांच्या नियोजन व अंमलबजावणी संदर्भात विविध टप्पे निहाय करावयाची कार्यवाही व अशा कार्यवाहीची अंतिम मुदत यांची माहिती व वेळापत्रक **परिशिष्ट "अ" आणि "ब"** मध्ये नमूद करण्यात आले आहे.

२. सदर परिशिष्टामध्ये नमूद बाबीवरील कार्यवाहीची जबाबदारी संबंधीत मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी जिल्हा स्तरावर व पंचायत समिती स्तरावर प्रथम निश्चित करावी. ज्या अधिकारी आणि कर्मचा-यांवर अशी कार्यवाहीची जबाबदारी निश्चित करण्यात आली आहे. त्यांनी कार्यवाही पूर्ण न केल्यास संबंधितांविरुध्द शिस्तभंगाची कारवाई त्याच आर्थिक वर्षात मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी पूर्ण करावी.

**(२) जिल्हा परिषदांकडील हस्तांतरित योजना ( बांधकाम विषयक ) -**

केंद्र व राज्य सरकारच्या विविध योजनांपैकी ज्या योजनांमध्ये बांधकामाचा (work) समावेश आहे. अशा योजनांच्या अंमलबजावणीचे वेळापत्रक **"परिशिष्ट क"** मध्ये नमूद करण्यात आले आहे. निर्धारित वेळेनुसार प्रत्येक टप्प्याची कार्यवाही पूर्ण करण्याची जबाबदारी मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी प्रथमतःनिश्चित करावी व त्या प्रमाणे अंमलबजावणीचे विविध टप्पे मुदती मध्ये पूर्ण करावेत.

बांधकाम विषयक योजनांच्या बाबतीत काही योजनांच्या आराखडयांना किंवा कामांना शासनाची मंजूरी आवश्यक असते अशा कामांच्या बाबतीत सर्व योजनांचे आराखडे शासनाकडे मान्यतेसाठी मुदतीमध्ये सादर करण्यात यावेत यामध्ये विलंब करणा-या **अधिकारी/ कर्मचारी यांचे विरुध्द शिस्तभंगाची कार्यवाही करण्यात यावी.**

ज्या योजनेच्या आराखडयास किंवा योजनेस समिती /सभा यांची मान्यता आवश्यक असेल तर समिती /सभा यांचे समोर आराखडा मान्यतेसाठी /संमतीसाठी / शिफारसीसाठी सादर करावा. विहीत केलेल्या मुदतीमध्ये समितीची /सभेची मान्यता न मिळाल्यास मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी तसे नमुद करुन विभागीय आयुक्तांकडे महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम १९६१ कलम २६२ खाली प्राप्त अधिकाराचा वापर करण्यासाठी त्वरीत प्रस्ताव पाठवावा.

(३) **जिल्हा परिषदांच्या स्वतःच्या उत्पन्नातून राबविण्यात येणा-या योजना.**

जिल्हा परिषदा स्वतःच्या उत्पन्ना मधून बांधकाम विषयक व वैयक्तीक लाभांच्या येजना राबवतात. अशा योजनांच्या अंमलबजावणीचे वेळापत्रक **परिशिष्ट "ड" व "इ"** मध्ये नमुद करण्यात आले आहे.

विविध योजनांच्या अंमलबजावणी प्रक्रियेत जिल्हा परिश्रद स्तरांवर योजनांना प्रशासकीय मान्यता प्रदान करणे, निविदा मंजूर करणे, लाभार्थी निवड यादीस मान्यता देणे इ. बाबतचे अधिकार विषय समित्यांना प्रदान करण्यात आले आहेत. तथापि विविध कारणास्तव विषय समिती समोर प्रस्ताव सादर करताना मोठया प्रमाणात विलंब होतो, असे दिसून आले आहे.

**परिशिष्ट "ड" व "इ"** मध्ये विहीत केलेल्या वेळेनुसार विषय समित्यांनी प्रस्तावांना मान्यता देणे, संबंधीत विषय समितीवर बंधनकारक राहील. अशा मान्यतेचे प्रस्ताव मुदती पूर्वी किमान १५ दिवस अगोदर संबंधित समिती /सभे समोर सादर करणे ही विभाग प्रमुखांची जबाबदारी राहील. विहित वेळेत विषय समितीची मान्यता मिळणेसाठी नियमित मासिक सभे व्यतिरिक्त विशेष सभा बोलविण्यासाठी वा विहित केलेल्या कालावधीमध्ये जिल्हा परिषद /विषय समितीची बैठक घेण्यात आली नसल्यास, अथवा याबाबत वेळ काढूपणाचे धोरण स्वीकारले जात आहे हे निदर्शनास आल्यास, मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ मधील कलम २६२ अनुसार विभागीय आयुक्तांकडे प्रस्ताव पाठवून संबंधित समिती /सभेची बैठक बोलाविण्याची कार्यवाही करावी. व त्यामध्ये या विषयाचा निर्णय घेण्यात यावा.

वस्तु /साहित्य खरेदी संदर्भात अनेक वेळा शासन दर करारासाठी प्रतिक्षा करण्यात येते. त्यामुळे साहित्य खरेदीच्या प्रक्रियेस विलंब होवून वेळेवर साहित्याचा पुरवठा होत नाही. यासाठी साहित्याच्या खरेदीसाठी शासन स्तरावर होणा-या दर कराराची वाट पाहू नये. **खरेदी करावयाच्या साहित्य /वस्तूसंबंधी त्यावेळी दर करार अस्तित्वात असेल** तरच दर करारानुसार खरेदी करण्यात यावी. अन्यथा खुल्या बाजारातून निविदा मागवून साहित्य खरेदीची प्रक्रिया वेळेतच पूर्ण करावी.

**(४) निधी खर्चासाठी कालमर्यादा:-**

विविध योजनांच्या अंमलबजावणी संदर्भात या परिपत्रकानुसार विहित केलेल्या काल मर्यादेत कार्यवाही पूर्ण करण्याची दक्षता सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी घ्यावी. आर्थिक वर्षाच्या अखेर सर्व योजनांचा निधी खर्च होणे आवश्यक आहे. चालु वर्षासाठी माहे फेब्रुवारी २००९ नंतर कोणताही अखर्चित निधी शासनाच्या परवानगी शिवाय खर्च करता येणार नाही. तसेच सन २००८-०९ पासून पुढे अखर्चित निधी खर्चासाठीची **अंतीम मर्यादा जानेवारी अखेरची** राहील. याची नोंद सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी घ्यावी.

हे परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आले असून, त्याचा संगणक संकेतांक २००८०५१४१७४८५८००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या नांवाने व आदेशानुसार,

(ना.रा.भागवत)
**उप सचिव, महाराष्ट्र शासन.**

प्रति,

१)महालेखाकार (लेखा व अनुज्ञेयता ) /(लेखा व परिक्षा) महाराष्ट्र-१, मुंबई.

२)महालेखाकार (लेखा व अनुज्ञेयता ) /(लेखा व परिक्षा) महाराष्ट्र-२, नागपूर.

३)वित्त विभाग, व्यय-१५ व अर्थसंकल्प-१९.

४)सर्व विभागीय आयुक्त (विकास शाखा)

५)मुख्य लेखा परिक्षक स्थानिक निधी लेखा कोकण भवन,नवी मुंबई.

६)उप मुख्य लेखा परिक्षक स्थानिक निधी लेखा नवी मुंबई, पुणे, नाशिक, औरंगाबाद, नागपूर, अमरावती.

७)सर्व जिल्हा परिषदाचे मुख्य कार्यकारी अधिकारी.

८) सर्व जिल्हा परिषदाचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी.

९)सर्व जिल्हा लेखा परिक्षक अधिकारी स्थानिक निधी लेखा,

१०)ग्राम विकास व जलसंधारण विभाग, का.क्र.आस्था ४,६,८,

११)निवड नस्ती, कार्यासन क्रमांक वित्त-९.

# परिशिष्ट "अ"

## केंद्रपुरस्कृत योजना (बांधकामे)

| अ.क्र. | कार्यवाहीची बाब | सन २००८-०९ साठी सूचना | सन २००९-१० पासून पूढील कालावधीसाठी स्थायी सूचना. |
|---|---|---|---|
| १ | उद्दिष्टांची निश्चिती मागील वर्षाचे उधिष्ट ग्राहय धरावे. | ३१ मे | १५ एप्रिल पर्यंत |
| २ | उधिष्टांचे तालुका निहाय वाटप एकुण उधिष्टांच्या १० % वाढ करुन वाटप करणे. | १५ जुन | १५ एप्रिल पर्यंत |
| ३ | प्रस्ताव प्रशासकीय मंजूरीस्तव सादर करणे. | ३० जुन | ३० एप्रिल पर्यंत |
| ४ | जिल्हा स्तरावर प्रस्तावांची छाननी करुन प्रशासकीय मंजुरी प्रदान करणे. | १५ जुलै | १५ मे. |
| ५ | लाभार्थ्या सोबत करारनामे पूर्ण करणे. | १५ जुलै १५ ऑगस्ट | १५ मे ते १५ जून |
| ६ | कामाचे line out देवून कामे सुरु करणे. | १५ ऑगस्ट ते १५ सप्टेंबर | १५ जून ते १५ जूलै |
| ७ | बांधकामे पूर्ण करणे. | १५ सप्टेंबर ते ३१ डिसेंबर, ०९ | १५ जुलै ते ३१ डिसेंबर |
| ८ | बांधकाम पूर्णत्वाचे दाखले प्रदान करणे. | ३१ जानेवारी पर्यंत | ३१ जानेवारी पर्यंत |
| ९ | अंतिम देयके अदा करणे. | फेब्रुवारी अखेर | ३१ जानेवारी पर्यंत |
| १० | बांधकामाचे हस्तांतरण व नोंदी घेणे | मार्च | मार्च |

# परिशिष्ट "ब"
## केंद्रपुरस्कृत वैयक्तीक लाभांच्या योजना
## स्वर्णजयंती ग्राम स्वरोजगार योजना

| अ.क्र. | कार्यवाहीची बाब | सन २००८-०९ साठी सूचना | सन २००९-१० पासून पुढील कालावधीसाठी स्थायी सूचना. |
|---|---|---|---|
| १ | पुढील वर्षाचे नियोजन करणे. | मे पूर्वी | मार्च पूर्वी |
| २ | तालुकानिहाय उद्दिष्ट वाटप करणे. | १५ जून पर्यंत | १५ एप्रिल पर्यंत |
| ३ | कर्ज प्रकरणे/प्रस्ताव सादर करणे. | ३१ जुलै पर्यंत | ३० जून पर्यंत |
| ४ | कर्ज प्रकरणे/प्रस्ताव बँकांकडे सादर करणे. | ३१ ऑगस्ट पर्यंत | ३१ जुलै पर्यंत |
| ५ | कर्ज प्रकरणास मंजूरी प्राप्त करुन घेणे. | ३१ ऑक्टोबर पर्यंत - | ३० सप्टेंबर पर्यंत |
| ६ | कर्ज प्रकरणे वाटप करणे | फेब्रुवारी अखेर | जानेवारी अखेर |

## परिशिष्ट " क "

### जिल्हा परिषदांकडील बांधकाम विषयक शासकीय योजना

CR, SR, MNP, NON MNP वैधानिक विकास मंडळ, तीर्थक्षेत्र विकास योजना, १२ वा वित्त आयोग (राज्य स्तर ), गौण खनिज इत्यादी अनुदान.

| अ.क्र. | कार्यवाहीची बाब | सन २००८-२००९ साठी सुचना | सन २००९ -२०१० पासून पुढील कालावधीसाठी स्थायी सूचना |
|---|---|---|---|
| १ | वार्षिक नियोजन आराखडा तयार करणे. | ३१ मे पर्यंत | ३० एप्रिल पर्यंत |
| २ | आवश्यकतेनुसार आराखडयास समिती/सभा यांची मान्यता घेण्यासाठी आराखडा समिती/ सभेला सादर करणे. | १५ जून | १५ मे |
| ३ | आराखडा मंजूरीसाठी शासनास सादर करणे. | जून अखेर पर्यंत | मे अखेर पर्यंत |
| ४ | कामांना प्रशासकीय व तांत्रिक मंजूरी प्रदान करणे. | जुलै अखेर | जून अखेर |
| ५ | कामाची निविदा प्रक्रीया पूर्ण करणे. | सप्टेंबर अखेर | ऑगस्ट अखेर |
| ६ | कामाचे कार्यारंभ आदेश देणे. | १५ऑक्टोबर | १५ सप्टेंबर |
| ७ | कामाचे line out देवून कामे सुरु करणे. | ऑक्टोबर अखेर | सप्टेंबर अखेर |
| ८ | कामाचे पूर्णत्वाचे दाखले देवून अंतिम देयकाची अदाई करणे. | फेब्रुवारी अखेर | जानेवारी अखेर |
| ९ | विनियोग दाखले घेणे. | ३१ मार्च | ३१ मार्च |

## परिशिष्ट "ड"

## जिल्हा परिषदाकडील बांधकाम विषयक शासकीय योजना

| अ.क्र. | कार्यवाहीची बाब | सन २००८-०९ साठी सुचना | सन २००९-१० पासून पूढील कालावधीसाठी स्थायी सूचना. |
|---|---|---|---|
| १ | योजनाची निवड व अर्थसंकल्पीय तरतूद करणे. | ३१ मे | ३१ मार्च पूर्वी मागील वर्षाची |
| २ | योजनेचे प्रारुप व कामांना प्रशासकीय आणि तांत्रिक मंजूरी प्रदान करणे. | ३१ जुलै | ३१ मे |
| ३ | कामांची निविदा प्रक्रिया पूर्ण करणे. | ३० सप्टेंबर | ३० जुलै |
| ४ | कामाचे कार्यारंभ आदेश देणे. | १५ ऑक्टोबर | १५ ऑगस्ट |
| ५ | कामाचे line out देवून कामे सुरु करणे. | १६ ऑक्टोबर ते ३० नोव्हेंबर | १६ ऑगस्ट ते ३० सप्टेंबर |
| ६ | काम पूर्णत्वाचे दाखले देवून अंतिम देयकाची अदाई करणे. | फेब्रुवारी अखेर | जानेवारी अखेर |
| ७ | विनियोग दाखले घेणे. | ३१ मार्च | ३१ मार्च |

## परिशिष्ट " ३ "
## जिल्हा परिषदांकडील वैयक्तीक लाभांच्या योजना.

| अ.क्र. | कार्यवाहीची बाब | सन २००८-२००९ साठी सुचना | सन २००९-२०१० पासून पुढील कालावधीसाठी स्थायी सूचना |
|---|---|---|---|
| १ | योजनांची निवड व अर्थसंकल्पात तरतूद करणे. | मे पूर्वी | मार्च पूर्वी |
| २ | विविध योजनांचे प्रारुप निश्चित करुन त्यास विषय समितीची मान्यता / मंजूरी घेणे. | ३० जून | ३० एप्रिल |
| ३ | योजनेस प्रशासकीय व तांत्रिक मंजूरी देणे. | ३१ ऑगस्ट | ३० जून पर्यंत |
| ४ | पंचायत समिती निहाय उद्दिष्ट वाटप व प्रस्ताव मागणे, प्रस्तावाची छाननी करणे. | ३१ जुलै अखेर | ३१ मे अखेर |
| ५ | लाभार्थींची निवड करणे. | ३१ जुलै अखेर | ३१ मे अखेर |
| ६ | निविदा प्रक्रीया पूर्ण करुन खरेदीस सक्षम अधिकारी/समितीची मान्यता घेणे. | ३१ ऑक्टोबर पर्यंत | ३१ ऑगस्ट पर्यंत |
| ७ | साहित्य खरेदीचे पुरवठा आदेश. | ३० नोव्हेंबर | ३० सप्टेंबर |
| ८ | लाभार्थ्यांना साहित्य वाटप करणे. | ३१ जानेवारी | ३० नोव्हेंबर |
| ९ | पुरवठादाराचे देयके अदा करणे. | फेब्रुवारी पर्यंत | ३१ जानेवारी |
| १० | विनियोग दाखले प्राप्त करुन घेणे. | मार्च | मार्च |

परिशिष्ट-अ

दंडाची रक्कम वसुल करुन सेवा पुस्तिकेत नोंद घेण्यात आलेल्या अधिकारी/कर्मचारी याबाबतचा तपशील

सन-२००८-०९

| अ. क्र. | अधिकारी/कर्मचारी नांव | पदनाम | विभाग | दंड रक्कम रु | प्रत्यक्ष वसुली रक्कम | वसुली बाबत पत्र व्यवहार | परिच्छेद क्र. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | श्री बी बी कांबळे | कनिष्ट लिपीक | समाजकल्याण | १०० | १०० | ७३४/१८-५/५/२०१८ | ३.१०३७/९ |
| २ | श्री एस एस रगडे | कनिष्ट लिपीक | समाजकल्याण | १०० | १०० | ७३५/१८-५/५/२०१८ | ३.१०३७/१० |
| ३ | श्री पी डीसुसतकर | सहा. कनिष्ट निरिक्षक | समाजकल्याण | १०० | -- | ७३२/१८-५/५/२०१८ | ३.१०३७/११ |
| ४ | श्री दिनेश राढाकरे | वरिष्ठसहा. | बाधकाम | १०० | १०० | २१६३/१८-०५/०५/२०१८ | ३.१०३७/११ |
| ५ | श्री शिवाजी लक्ष्मणराव देशमुख | से नि वरिष्ठसहा. | बांधकाम | १०० | १०० | २०९०/१८-२६/०४/२०१८ | ३.२१८/८ |
| ६ | विनोद तायडे, श्रीमती प्रमिला हांडे | कनिष्ठसहा. | लघु सिंचन | २०० | २०० | ५३०/१८-२१/०३/२०१८ | ३.१०३७/२ |
| ७ | वा.ना.राठोड | कनिष्ठ अभियंता | पंचायत समिती पातुर | १०० | १०० | च.क्र. ५५दि.२२/५/२०१८ | ४.११३/२३ |
| ८. | अशोक भि. मांजरे, मो.जाफर मो.असगर व शिवलाल दौ.काळे | केंद्र प्रमुख | पंचायत समिती बाळापूर | ३०० | --- | पत्र क्र. १५२७ दि.१७/५/२०१८ | ४.३४७/६ |
| ९. | आर.एम.मावंदे | शाखा अभियंता | पंचायत समिती बाळापूर | १०० | --- | पत्र क्र. १४२० दि.५/५/२०१८ | ४.३४७/१९/४५ |
| १०. | एस.पी. सरोदे | शाखा अभियंता | पंचायत समिती बाळापूर | १०० | --- | पत्र क्र. १४२० दि.५/५/२०१८ | ४.३४७/३०/४६ |
| ११. | बि.एस.गरकल | ग्रामसेवक | पंचायत समिती बार्शिटाकळी | १०० | १०० | पत्र क्र. १०६७ दि.१३/४/२०१८ | ५.३३/३७ |
| | | | एकूण | १४०० | ८०० | | |

# परिशिष्ट-ब

## दंडाची रक्कम वसुल करुन सेवा पुस्तिकेत नोंद घेण्यात आलेल्या अधिकारी/कर्मचारी याबाबतचा तपशील

### सन-२०११-१२

| अ.क्र. | अधिकारी/कर्मचारी नांव | पदनाम | विभाग | दंड रक्कम रु | प्रत्यक्ष वसुली रक्कम | वसुली बाबत पत्र व्यवहाराचा पत्र क्र. व दि. | परिच्छेद क्र. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | श्री व्ही आर झामरे | सहा. लेखा अधिकारी | समाजकल्याण | २५००० | ---- | ७३३/१८-५/५/२०१८ | ३.८१२/६ |
| २ | श्री पी डीसुसतकर | सहा. कनिष्ट निरिक्षक | समाजकल्याण | २५००० | ---- | ७३२/१८-५/५/२०१८ | ३.८१२/१८ |
| ३ | श्री व्ही आर अंधारे | ग्राम सेवक | प स अकोला | २५००० | ---- | १०४२/१८-२७/४/२०१८ | ४.३९३/२ |
| ४ | श्री व्ही आर देवुळकर | ग्राम विकास अधिकारी | प स अकोला | २५००० | ---- | १०४२/१८-२७/४/२०१८ | ४.३९३/२ |
| ५ | श्री जी एस निमकर्डे | ग्राम विकास अधिकारी | प स अकोला | २५००० | ---- | १०४२/१८-२७/४/२०१८ | ४.३९३/२ |
| ६ | श्री आर के गोतमारे | ग्राम विकास अधिकारी | प स अकोला | २५००० | ---- | १०४२/१८-२७/४/२०१८ | ४.३९३/२ |
| ७ | श्री आर आर देशमुख | गाम सेवक | प स अकोला | २५००० | ---- | १०४२/१८-२७/४/२०१८ | ४.३९३/२ |
| ८ | श्री आर बी पायघन | ग्राम सेवक | प स अकाला | २५००० | ---- | १०४२/१८-२७/४/२०१८ | ४.३९३/२ |
| ९ | श्री आर एम चव्हाण | ग्राम सेवक | प स अकोला | २५००० | ---- | १०४२/१८-२७/४/२०१८ | ४.३९३/२ |
| १० | श्री एच ऐ अन्सारी | वरिष्ठसहा. लेखा | महिला व बाल कल्याण | २५००० | ---- | ४३३/१८-२३/०४/२०१८ | ३.७२०/५ |
| ११ | श्री एच ऐ अन्सारी | वरिष्ठसहा. लेखा | महिला व बाल कल्याण | २५००० | ---- | ४३३/१८-२३/०४/२०१८ | ३.७२२/८ |
| १२ | श्री शिरिषतट्टे | प्र कार्यकारी अभियंता | लघु सिंचन | २५००० | ---- | ६२४/१८-२४/०४/२०१८ | ३.३३०/६ |
| १३ | श्रीसुधाकर देशमुख | वरिष्ठसहा. | बांधकाम | २५००० | २५००० | १८९३/१८-०९/०४/२०१८ | ३.२३३/११ |
| १४ | श्री एच ऐ अन्सारी | वरिष्ठसहा लेखा | ए बा वि स तेल्हारा | २५००० | ---- | २२२/१८-२४/०४/२०१८ | ४.३९३/(४८) |
| १५ | श्री डोळस, श्री.इंगळे व श्री. नसीम | शाखा अभियंता | पं.स.मुर्तिजापुर | ७५००० | ---- | २२४१/ दि.२२/५/२०१८ | ४.३९३/(५३) |
| १६. | जबाबदारी निश्चीती बाकी | शाखा अभियंता | पं.स.मुर्तिजापुर | २५००० | ---- | २२४०/ दि.२२/५/२०१८ | ४.३९३/(५२) |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १७. | सर्वश्री निंबोळकर, नाथे व नालींदे | ग्रामसेवक | पं.स.मुर्तिजापुर | २५००० | ---- | २२३६/ दि.२२/५/२०१८ | ४.३९३/(५४) |
| १८. | श्री. पि.आर. रनबावरे | शाखा अभियंता | पं.स.मुर्तिजापुर | २५००० | ---- | १९९४/ दि.२०/४/२०१८ | ४.२६/(२१) |
| १९. | सोबत यादी जोडली आहे एकुण २१३ ग्रा.पं | ग्रामसेवक | पं.स.अकोला | ५३२५००० | १३७५०० | २२६/ दि.२६/५/२०१७ | ३.८१२ (२३) |
| २०. | श्रीमती साजियानौशीन | वि.अ.शिक्षण | पं.स.बाळापूर | २५००० | --- | १५२४/२७/५/२०१८ | ४.३९३/९ |
| २१ | पी.बी.घोडस्कर | अधिक्षक | पं.स.बाळापूर | २५००० | ---- | १५२४/२७/५/२०१८ | ४.३९३/९ |
| २२ | जी.व्ही.गोतमारे | क.सहा | | २५००० | | | |
| २३ | एन.डब्ल्यु.वानखडे | क.सहा | | २५००० | | | |
| २४ | के.एन.टोबरे | क.सहा | | २५००० | | | |
| २५ | आर.पी. पिंजरकर | क.सहा | | २५००० | | | |
| २६ | जे.एस.खान | क.सहा | | २५००० | | | |
| २७. | व्ही.डी. रावणकर | स.ले.अ. | पं.स.बाळापूर | २५००० | -- | आदेश क्र/४३८/२२/५/२०१८ | ४.३९३/१७ |
| २८ | एच.के.शेकोकार | स.ले.अ. | | २५००० | | | |
| २९ | एन.पी. राऊत | क.सहा. लेखा | | २५००० | | | |
| ३० | एस.डी.ठोंबरे | व. सहा. लेखा | | २५००० | | | |
| ३१ | वाय.एस. राऊत | क.सहा. | | २५००० | | | |
| ३२ | व.वा. पोहरे | क.सहा. लेखा | | २५००० | | | |
| ३३ | म.अख्तर | क.सहा. | | २५००० | | | |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ३४ | पी.जी. नागापूरे | क.सहा. | | २५००० २५००० | | | |
| २२. | व्ही.पी. गावंडे | कनिष्ठ अभियंता | पं.स.बाळापूर | २५००० | -- | आदेश क्र/४४३/२२/५/२०१८ | ४.३९३/२६ |
| | | | | ६२,००,००० | १,६३,३० ० | | |

ग्रामपंचायतीकडुन लेखापरीक्षण उपलब्ध न झाल्यामुळे कार्यालयीन आदेश क्र. ९० अंतर्गत १ ते २१३ ग्रा.पं.संदर्भात केलेल्या कार्यवाही बाबतचा अहवाल

